PRAYAAS
INSTITUTE OF EXCELLENCE



# भारतीय राज्यव्यवस्था

## सामान्य अध्ययन – २

Class Notes

UPSC / MPSC MAINS

PRAYAAS
INSTITUTE OF EXCELLENCE

© Prayaas Institute Pvt.Ltd.
All rights reserved.

**Published by**
**Prayaas Institute Pvt. Ltd.**
Ramashree, Near Muralidhar Veg.
No. 279, N. C. Kelkar Road,
Narayan Peth, Pune - 30
+ 91 9894998421
www.prayaas.in

**UPSC / MPSC MAINS**

# भारतीय राज्यव्यवस्था

**सामान्य अध्ययन – २**

**क्लास नोट्स**

# INDEX


| | |
|---|---|
| १. संविधानाची मूलतत्त्वे | १ |
| २. महत्त्वाच्या तरतुदी | ११ |
| ३. मूलभूत रचना | २६ |
| ४. संघराज्य | ३३ |
| ५. संसद | ४६ |
| ६. कार्यकारी | ७० |
| ७. केंद्रीय मंत्री परिषद | ७५ |
| ८. न्यायव्यवस्था | ८० |
| ९. शक्तींचे पृथक्करण | ९७ |
| १०. स्थानिक प्रशासन | १०१ |
| ११. घटनात्मक संस्था | १०७ |
| १२. वैधानिक, नियामक आणि अर्ध न्यायिक संस्था | ११५ |
| १३. वैकल्पिक विवाद निराकरण यंत्रणा | १२३ |
| १४. पक्षांतर विरोधी कायदा | १२९ |
| १५. संविधानाची तुलना | १३३ |
| १६. लोकप्रतिनिधी कायदा | १३८ |
| १७. दबाव गट | १६० |

# अभ्यासक्रमाचा विषय – भारतीय संविधान : ऐतिहासिक आधार, उत्क्रांती, वैशिष्ट्ये, सुधारणा, महत्त्वपूर्ण तरतुदी आणि मूलभूत रचना.

**मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.**

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| 2021 | "Constitutional Morality' is rooted in the Constitution itself and is founded on its essential facets. Explain the doctrine of "Constitutional Morality' with the help of relevant judicial decisions. | राज्यघटनेत अंतर्भूत घटनात्मक नैतिकता या तत्त्वावर आधारित प्रश्न. |
| 2016 | Did the Government of India Act, 1935 lay down a federal constitution? Discuss. | भारत सरकार कायदा, १९३५ च्या संघराज्यात्मक वैशिष्ट्यांवर आधारित प्रश्न. |
| 2017 | Examine the scope of Fundamental Rights in the light of the latest judgment of the Supreme Court on Right to Privacy. | गोपनीयतेच्या अधिकाराच्या रक्षणाबाबत न्यायालयाच्या पुधाकाराच्या संदर्भात हा प्रश्न महत्वाचा आहे |
| 2015 | Discuss the possible factors that inhibit India from enacting for its citizen a uniform civil code as provided for in the Directive Principles of State Policy | भारतात सध्या होत असलेल्या समान नागरी कायदा लागू करण्याच्या मागणीच्या संदर्भात हा महत्वाचा प्रश्न आहे. |
| 2014 | What do you understand about the concept freedom of speech and expression? Does it cover hate speech also? Why do the films in India stand on a slightly different plane from other forms of expression? Discuss. | भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली द्वेषमूलक भाषणांचे वाढते प्रकार ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| 2022 | The most significant achievement of modern law in India is the Constitutionalization of environmental problems by the Supreme Court. Discuss this statement with the help of relevant case laws. | न्यायालयाद्वारे पर्यावरणीय समस्यांकडे दिले जात असलेले लक्ष ही घडामोड अधोरेखित करणारा हा प्रश्न आहे. |
| 2013 | Discuss Section 66A of IT Act, with reference to its alleged violation of Art 19. | – |
| 2012 | Right of movement and residence throughout the territory of India are freely available to the Indian citizens, but these rights are not absolute. Comment. | संचार स्वातंत्र्यावरील मर्यादा आणि अटी यांच्या संदर्भातील प्रश्न. |

येथे जे प्रश्न विचारले जातात ते मुख्यतः चालू घडामोडींवर आधारित असतात, ज्यासाठी मूलभूत आकलनाची आवश्यकता असते. येथे आपण अशा प्रश्नांशी संबंधित मूलभूत गोष्टी समजून घेऊ आणि त्याच्याआधारे पुढील भागांमध्ये आपण महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करू.

**संविधान –**

राष्ट्र, राज्य किंवा सामाजिक समूहाची मूलभूत तत्त्वे आणि कायदे जे सरकारचे अधिकार आणि कर्तव्ये निर्धारित करतात आणि त्यातील लोकांना काही हक्कांची हमी देतात.

**संविधानाची कार्ये आणि महत्त्व –**

१. सरकार कोण स्थापन करेल हे ठरवण्याचा अधिकार कोणाकडे आहे हे संविधानाद्वारे निर्दिष्ट केले जाते. भारतीय संविधानाने हे स्पष्टपणे नमूद केले आहे की भारतामध्ये लोकशाही स्वरूपाचे सरकार असेल, यातून हे सूचित होते की देशातील लोक सरकारची निवड करतील.

२. अशा मूलभूत नियमांचा संच प्रदान करणे जे समाजातील सदस्यांमध्ये किमान समन्वयास परवानगी देतात.

३. समाजात निर्णय घेण्याचा अधिकार कोणाकडे आहे हे निर्दिष्ट करणे. यातून सरकार कसे स्थापन करायचे ते ठरते.

४. सरकार आपल्या नागरिकांवर काय लादू शकते यावर काही मर्यादा घालणे. या मर्यादा या अर्थाने पायाभूत आहेत की सरकार त्यांचे कधीही उल्लंघन करू शकत नाही.

५. सरकारला समाजाच्या आशा–आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि न्याय्य समाजासाठी सुयोग्य परिस्थिती निर्माण करण्यास सक्षम करणे.

**ऐतिहासिक आधार –**

भारतीय राज्यघटना केवळ संविधान सभेच्या सदस्यांमधील विचारविनिमयाने तयार झालेली नाही, तर त्यापूर्वीच्या अनेक कायद्यांनी त्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. येथे, आम्ही काही अशा महत्त्वाच्या कायद्यांची वैशिष्ट्ये आणि विश्लेषण देत आहोत. उर्वरित कायद्यांची वैशिष्ट्ये तुम्ही लक्ष्मीकांत यांच्या पुस्तकातून अभ्यासू शकता.

**१८३३ चा सनदी कायदा**

हा कायदा ब्रिटिश भारतातील सत्तेच्या केंद्रीकरणाच्या दिशेने अंतिम टप्पा होता..

**या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती –**

१. या कायद्याने बंगालच्या गव्हर्नर–जनरलला भारताचा गव्हर्नर–जनरल बनवले गेले आणि त्याच्याकडे सर्व नागरी आणि लष्करी अधिकार सोपविले गेले.

२. भारतातील ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या संपूर्ण प्रादेशिक क्षेत्रावर प्रथमच भारत सरकारचा अधिकार असलेला कायदा तयार करण्यात आला. लॉर्ड विल्यम बेंटिक हा भारताचा पहिला गव्हर्नर जनरल होय.

३. यामुळे मुंबई आणि मद्रासच्या गव्हर्नरचे कायदेविषयक अधिकार कमी केले गेले. भारताच्या गव्हर्नर–जनरलला संपूर्ण ब्रिटिश भारतासाठी विशेष कायदेविषयक अधिकार देण्यात आले होते. पूर्वीच्या कायद्यांतर्गत बनवलेले कायदे हे

‘नियम’ म्हणून संबोधले जात होते, तर या कायद्यांतर्गत बनविलेल्या कायद्यांना ‘अधिनियम’ म्हणून संबोधले गेले.

४. या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची व्यावसायिक संस्था म्हणून कार्ये संपुष्टात आली, आणि ती पूर्णपणे प्रशासकीय संस्था बनली. कंपनीचे भारतातील प्रदेश हे ती 'ब्रिटिश सम्राट, त्याचे वारस आणि उत्तराधिकारी यांच्या वतीने' आपल्या ताब्यात ठेवेल अशी तरतूद केली गेली.

५. सन १८३३ च्या सनदी कायद्याने नागरी सेवकांच्या निवडीसाठी खुल्या स्पर्धेची प्रणाली सुरू करण्याचा प्रयत्न केला गेला आणि अशी तरतूद केली गेली की भारतीयांना कंपनीच्या अंतर्गत कोणतेही पद, कार्यालय आणि नोकरी धारण करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. मात्र, संचालक न्यायालयाच्या विरोधानंतर ही तरतूद नाकारण्यात आली.

### १८६१ चा इंडियन कौन्सिल ॲक्ट

### (१८६१ चा भारतीय परिषद कायदा)

१८६१ चा इंडियन कौन्सिल ॲक्ट (भारतीय परिषद कायदा) हा भारताच्या घटनात्मक आणि राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती–**

१. कायदा बनविण्याच्या प्रक्रियेशी भारतीयांना सहभागी करून प्रातिनिधिक संस्थांची सुरुवात केली गेली. व्हाईसरॉयला काही भारतीयांना त्याच्या विस्तारित कौन्सिलचे अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याचा अधिकार दिला गेला.

२. मुंबई आणि मद्रास इलाख्यांना (प्रेसिडेन्सींना) कायदेमंडळाचे अधिकार बहाल करून विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सुरू केली गेली. कायद्यांच्या विकासाच्या या धोरणामुळे १९३७ मध्ये प्रांतांना जवळजवळ संपूर्ण अंतर्गत स्वायत्तता देण्यात आली.

३. बंगाल, उत्तर-पश्चिम प्रांत आणि पंजाबसाठी नवीन विधिमंडळांच्या स्थापनेची तरतूद केली, ज्या अनुक्रमे १८६२, १८८६ आणि १८९७ मध्ये स्थापन झाल्या.

४. व्हाईसरॉयला कौन्सिलमधील कामकाजाच्या अधिक सोयीस्कर संचालनासाठी नियम आणि आदेश बनवण्याचा अधिकार दिला गेला. १८५९ मध्ये लॉर्ड कॅनिंगने सुरू केलेल्या 'पोर्टफोलिओ' प्रणालीलाही त्यांनी मान्यता दिली.

५. आणीबाणीच्या काळात विधानपरिषदेच्या संमतीशिवाय अध्यादेश जारी करण्याचा अधिकार व्हाईसरॉयला दिला गेला.

### १९०९ चा इंडियन कौन्सिल ॲक्ट

### (१९०९ चा भारतीय परिषद कायदा)

हा कायदा ‘मॉर्ले-मिंटो सुधारणा कायदा’ म्हणूनही ओळखला जातो (लॉर्ड मॉर्ले हे भारताचे तत्कालीन भारतमंत्री होते आणि लॉर्ड मिंटो भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय होते).

**या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती :**

१. कायद्यामुळे केंद्रीय आणि प्रांतीय अशा दोन्ही विधिमंडळांच्या आकारमानात लक्षणीय वाढ झाली. मध्यवर्ती विधिमंडळाच्या सदस्यांची संख्या १६ वरून ६० करण्यात आली. प्रांतीय विधिमंडळांतील सदस्यांची संख्या एकसमान नव्हती.

२. या कायद्याने केंद्रीय विधिमंडळात अधिकृत बहुमत कायम ठेवले, परंतु प्रांतिक विधिमंडळांना बिगर-अधिकृत बहुमताची परवानगी दिली गेली.

३. या कायद्याने दोन्ही पातळ्यांवरील विधिमंडळांच्या विवेकाधिन कार्यांमध्ये वाढ केली गेली. उदाहरणार्थ, सदस्यांना पूरक प्रश्न विचारण्याची, अर्थसंकल्पावर ठराव मांडण्याची मुभा होती.

४. व्हाईसरॉय आणि गव्हर्नर यांच्या कार्यकारी परिषदांमध्ये भारतीयांच्या सहभागासाठी (प्रथमच) तरतूद केली. सत्येंद्र प्रसाद सिन्हा व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेत सहभागी होणारे पहिले भारतीय ठरले. त्यांची विधी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

५. या कायद्याने 'विभक्त मतदारसंघ'ही संकल्पना स्वीकारून मुस्लिमांसाठी जातीय प्रतिनिधित्वाची व्यवस्था सुरू करण्यात आली. या अंतर्गत मुस्लिम सदस्यांची निवड मुस्लिम मतदारांद्वारेच करायची होती. अशा प्रकारे, या कायद्याने 'जातीयवादाला कायदेशीर मान्यता दिली'आणि लॉर्ड मिंटो याला 'जातीआधारित मतदारसंघ व्यवस्थेचा जनक' म्हणून ओळखले जाऊ लागले.

६. या कायद्याने प्रेसिडेन्सी कॉर्पोरेशन, चेंबर ऑफ कॉमर्स, विद्यापीठे आणि जमीनदार यांच्यासाठी स्वतंत्र प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात आली.

**१९१९ चा भारत सरकार कायदा**

- २० ऑगस्ट १९१७ रोजी, ब्रिटिश सरकारने प्रथमच घोषित केले की, भारतात जबाबदार शासन पद्धतीची हळूहळू सुरुवात करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.
- अशाप्रकारे १९१९ चा भारत सरकार कायदा लागू करण्यात आला, जो १९२१ मध्ये अंमलात आला. या कायद्याला 'मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा' (मॉन्टेग्यू हे भारतमंत्री होते आणि लॉर्ड चेम्सफोर्ड हे भारताचे व्हाईसरॉय होते) म्हणूनही ओळखले जाते.

**या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.**

१. केंद्रीय आणि प्रांतीय विधिमंडळांना त्यांच्या संबंधित विषयांच्या सूचीवर कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला. तथापि, सरकारची रचना केंद्रीकृत आणि एकात्मक स्वरूपाचीच राहिली.

२. या कायद्याने प्रांतिक विषय दोन भागात विभागले गेले – सोपीव आणि राखीव. गव्हर्नरनी विधान परिषदेला जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या मदतीने सोपीव विषयांचा कारभार करायचा होता. दुसरीकडे, राखीव विषय विधान परिषदेला जबाबदार न राहता गव्हर्नर आणि त्यांच्या कार्यकारी मंडळाद्वारे प्रशासित करायचे होते. शासनाची ही दुहेरी योजना 'द्विदल पद्धत' म्हणून ओळखली जात होती – ही संज्ञा ग्रीक शब्द 'डिआर्के'पासून बनलेली आहे जिचा अर्थ 'दुहेरी शासन' असा आहे. मात्र, हा प्रयोग मोठ्या प्रमाणात अयशस्वी ठरला.

३. या कायद्याने देशात प्रथमच द्विसदन व्यवस्था आणि थेट निवडणुका सुरू केल्या गेल्या. अशाप्रकारे, भारतीय विधिमंडळाची जागा वरिष्ठ सभागृह (राज्यसभा) आणि कनिष्ठ सभागृह (विधानसभा) असलेल्या द्विसदनीय विधिमंडळाने घेतली. दोन्ही सभागृहातील बहुसंख्य सदस्यांची निवड प्रत्यक्ष निवडणुकीने होत असे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेच्या सहा सदस्यांपैकी तीन सदस्य (कमांडर-इन-चीफ व्यतिरिक्त) भारतीय असणे आवश्यक होते.

५. शीख, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन आणि युरोपियन लोकांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची व्यवस्था करून जातीय प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचा विस्तार केला गेला.

६. या कायद्याने मालमत्ता, कर किंवा शिक्षणाच्या आधारावर मर्यादित संख्येने लोकांना मताधिकार दिला गेला.

७. या कायद्याने लंडनमध्ये भारतासाठी उच्चायुक्तांचे नवीन पद तयार केले गेले आणि आतापर्यंत भारत मंत्र्यांकडे असलेली काही कार्ये त्यांच्याकडे हस्तांतरित केली गेली.

८. यात लोकसेवा आयोगाच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली होती. म्हणून, नागरी सेवकांच्या भरतीसाठी १९२६ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.

९. या कायद्याने प्रथमच, प्रांतीय अर्थसंकल्पांना केंद्रीय अर्थसंकल्पापासून वेगळे केले आणि प्रांतीय कायदेमंडळांना त्यांचे अर्थसंकल्प तयार करण्याचा अधिकार दिला गेला.

१०.या कायद्याने विधी आयोगाची नियुक्ती करण्याची व त्याची नियुक्ती झाल्यानंतर दहा वर्षांनी त्याच्या कामकाजाची चौकशी करण्याची आणि त्याचा अहवाल देण्याची तरतूद करण्यात आली.

**१९३५ चा भारत सरकार कायदा**

हा कायदा भारतात पूर्णपणे जबाबदार शासन व्यवस्था स्थापन होण्याच्या दिशेने दुसरा मैलाचा दगड ठरला. हा एक प्रदीर्घ आणि तपशीलवार दस्तऐवज होता ज्यामध्ये ३२१ विभाग आणि १० अनुसूची यांचा समावेश होता.

**या कायद्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती –**

१. या कायद्याने प्रांत आणि संस्थानांचा समावेश असलेल्या अखिल भारतीय महासंघाच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली. या कायद्याने केंद्र आणि प्रांतांच्या अधिकारांची तीन सूचीमध्ये विभागणी केली गेली – संघ सूची (केंद्रासाठी, ५९ विषयांसह), प्रांतीय सूची (प्रांतांसाठी, ५४ विषयांसह) आणि समवर्ती सूची (दोन्हींसाठी, ३६ विषयांसह). अवशिष्ट अधिकार व्हाईसरॉयला देण्यात आले. तथापि, संस्थाने त्यात सामील न झाल्याने महासंघ कधीच अस्तित्वात आला नाही.

२. या कायद्याने प्रांतातील द्विदल शासन व्यवस्था संपुष्टात आणली आणि त्या जागी 'प्रांतीय स्वायत्तता' आणली. प्रांतांना त्यांच्या परिभाषित क्षेत्रात प्रशासनाची स्वायत्त एकके म्हणून काम करण्याची परवानगी होती. शिवाय, या कायद्याने प्रांतांमध्ये जबाबदार शासन व्यवस्था सुरू केली गेली, म्हणजेच गव्हर्नरने प्रांतीय विधिमंडळाला जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या सल्ल्याने कार्य करण्याची तरतूद केली गेली. ही व्यवस्था १९३७ मध्ये लागू केली गेली आणि १९३९ मध्ये संपुष्टात आली.

३. या कायद्याने केंद्रात द्विदल शासन व्यवस्थेचा अवलंब करण्याची तरतूद केली. परिणामी, संघराज्यीय विषय हे सोपीव व राखीव विषयांमध्ये विभागले गेले. मात्र, या कायद्यातील ही तरतूद अजिबात लागू झाली नाही.

४. या कायद्याने अकरापैकी सहा प्रांतांमध्ये द्विसदन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. अशाप्रकारे, बंगाल, मुंबई, मद्रास, बिहार, आसाम आणि संयुक्त प्रांतांची विधिमंडळे द्विसदनीय बनवली गेली ज्यात विधान परिषद (वरिष्ठ सभागृह) आणि विधान सभा (कनिष्ठ सभागृह) होते. मात्र, त्यांच्यावर अनेक निर्बंध घालण्यात आले.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

५. या कायद्याने वंचित वर्ग (अनुसूचित जाती), महिला आणि कामगार यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघांची व्यवस्था करून सांप्रदायिक प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचा विस्तार केला.

६. १८५८ च्या भारत सरकारच्या कायद्याने स्थापन केलेली भारतीय परिषद रद्द केली गेली. भारतमंत्र्यांच्या मदतीसाठी सल्लागारांचा एक गट नियुक्त करण्यात आला.

७. या कायद्याने मताधिकाराचा विस्तार केला. एकूण लोकसंख्येच्या सुमारे १० टक्के लोकांना मतदानाचा हक्क मिळाला.

८. देशाचे चलन आणि पत व्यवस्था नियंत्रित करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेची तरतूद केली.

९. या कायद्याने केवळ संघीय लोकसेवा आयोगच नव्हे तर प्रांतीय लोकसेवा आयोगदेखील स्थापन करण्याची तरतूद केली गेली.

**भारतीय संविधानाची निर्मिती**

- औपचारिकपणे, अखंड भारतासाठी निवडून दिलेल्या संविधान सभेने संविधानाची निर्मिती केली. ९ डिसेंबर १९४६ रोजी तिची पहिली बैठक झाली आणि १४ ऑगस्ट १९४७ रोजी विभाजित भारताची संविधान सभा म्हणून तिची पुनर्रचना करण्यात आली.
- भारत सरकार कायदा, १९३५ अंतर्गत स्थापन झालेल्या प्रांतीय विधिमंडळांच्या सदस्यांनी अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे तिचे सदस्य निवडले होते. संविधान सभेची रचना ब्रिटिश मंत्रिमंडळाची समिती, ज्याला कॅबिनेट मिशन म्हणून ओळखले जाते, तिच्या प्रस्तावित योजनेद्वारे सुचविलेल्या धर्तीवर करण्यात आली होती या योजनेनुसार:
- प्रत्येक प्रांत आणि प्रत्येक संस्थानास किंवा संस्थानांचा गटास त्यांच्या संबंधित लोकसंख्येच्या प्रमाणात १:१०,००,००० च्या प्रमाणात जागा वाटप केल्या गेल्या. परिणामी, प्रांतांना (जे प्रत्यक्ष ब्रिटिश राज्यक्षेत्रात होते) २९२ सदस्य निवडायचे होते, तर संस्थानांना किमान ९३ जागा देण्यात आल्या होत्या.
- प्रत्येक प्रांतातील जागा त्यांच्या संबंधित लोकसंख्येच्या प्रमाणात मुस्लिम, शीख आणि सर्वसामान्य अशा तीन मुख्य समुदायांमध्ये वितरित केल्या गेल्या.
- प्रांतीय विधिमंडळांतील प्रत्येक समुदायाच्या सदस्यांनी एकल हस्तांतरणीय मताने आनुपातिक प्रतिनिधित्वाच्या पद्धतीद्वारे त्यांचे स्वतःचे प्रतिनिधी निवडले.
- संस्थानांच्या प्रतिनिधींच्या बाबतीत निवडीची पद्धत सल्लामसलत करून ठरवायची होती.

**संविधान सभा**

- ३ जून १९४७ च्या योजनेंतर्गत फाळणीचा परिणाम म्हणून जे सदस्य पाकिस्तानच्या अखत्यारीत येतात त्या प्रदेशातून निवडून आलेले सदस्य संविधान सभेचे सदस्य म्हणून राहणार नव्हते. संविधान सभेतील सदस्यांची संख्या २९९ पर्यंत कमी झाली.
- २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारण्यात आले. २४ जानेवारी १९५० रोजी २८४ सदस्य प्रत्यक्षात उपस्थित होते आणि अखेरीस संविधान पारित झाल्यानंतर त्यांनी त्यावर स्वाक्षरी केली. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलात आले.
- संविधानसभेचे सदस्य सार्वत्रिक मताधिकाराने निवडले गेलेले नसले तरी संविधानसभेला प्रातिनिधिक संस्था बनवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला. वर वर्णन केलेल्या योजनेंतर्गत सर्व धर्मांच्या सदस्यांना प्रतिनिधित्व



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

देण्यात आले; याशिवाय, संविधानसभेत अनुसूचित जातींचे अठ्ठावीस सदस्य होते. राजकीय पक्षांच्या बाबतीत, विभाजनानंतर विधिमंडळांच्याच्या तब्बल ८२ टक्के जागांवर काँग्रेसचे वर्चस्व होते. मुळात काँग्रेस हा इतका वैविध्यपूर्ण पक्ष होता की, त्यात जवळजवळ सर्व प्रकारच्या मतप्रवाहांना त्यात सामावून घेतले गेले होते.

**संविधानाचे विविध स्रोत –**




स्रोत – इयत्ता अकरावी NCERT

**विविध अन्वयार्थांमधून स्पष्ट झालेली संविधानाची उत्क्रांती –**

**संविधानाची ठळक वैशिष्ट्ये –**

१. सर्वात प्रदीर्घ लिखित संविधान.

२. मजबूत केंद्रासह संघीय संरचना.

३. लवचिकता आणि ताठरपणा यांचे मिश्रण.

४. सरकारचे संसदीय स्वरूप.

५. स्वतंत्र आणि एकात्मिक न्यायव्यवस्था.

६. संविधानाची सर्वोच्चता.

७. मूलभूत अधिकार.

८. मूलभूत कर्तव्ये.

९. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे.

१०.एकेरी नागरिकत्व.

११.आणीबाणीच्या तरतुदी.

**भारतीय राज्यघटनेच्या अनुसूची –**

| **अनुसूची** | **तरतूद** |
|---|---|
| १. पहिली | राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आणि त्यांच्या प्रदेशांची यादी. |
| २. दुसरी | मानधन. |
| ३. तिसरी | पुष्टीकरण आणि शपथ. |
| ४. चौथी | राज्यसभेच्या जागांचे वाटप. |
| ५. पाचवी | अनुसूचित क्षेत्राचे प्रशासन आणि नियंत्रण |
| ६. सहावी | आसाम, त्रिपुरा, मेघालय आणि मिझोराम या राज्यातील आदिवासी भागांचे प्रशासन आणि विशेष तरतूद. |
| ७. सातवी | केंद्र आणि राज्यांमधील अधिकारांचे विभाजन. |
| ८. आठवी | अधिकृत भाषा. |
| ९. नववी | काही कायदे आणि नियमांचे प्रमाणीकरणविषयक तरतुदी. |
| १०. दहावी | पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदी |
| ११. अकरावी | पंचायत राज संस्था. |
| १२. बारावी | शहरी स्थानिक स्वराज्य संस्था |

**संविधानावरील टीका :**

**टीकाकारांनी विविध कारणांनी संविधान सभेवर टीका केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.**

१. प्रातिनिधिक संस्था नव्हती : टीकाकारांनी असा युक्तिवाद केला आहे की संविधान सभा ही खरी प्रातिनिधिक संस्था नव्हती; कारण तिचे सदस्य सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारावर भारतातील जनतेद्वारे थेट निवडले गेले नव्हते.

२. सार्वभौम संस्था नव्हती : टीकाकारांनी असे म्हटले की, संविधान सभा ही सार्वभौम संस्था नव्हती, कारण ती ब्रिटिश सरकारच्या पुढाकारातून व प्रस्तावांनी तयार केली गेली होती. पुढे ते म्हणतात की, संविधानसभेची अधिवेशने ब्रिटिश सरकारच्या परवानगीने झाली.

३. अवाजवी वेळ लागला: टीकाकारांच्या मते, संविधान सभेला संविधान बनवण्यासाठी अवाजवी वेळ लागला.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. काँग्रेसचे वर्चस्व : टीकाकारांनी असा आरोप केला की, संविधान सभेवर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. अमेरिकन घटनातज्ज्ञ ग्रॅनविले ऑस्टिन यांनी अशी टिप्पणी केली की, 'संविधान सभा ही मूलत: एका एक-पक्षीय देशातील एक-पक्षीय संस्था होती. संविधानसभा म्हणजे काँग्रेस होती आणि काँग्रेस म्हणजे भारत होता.

५. वकील आणि राजकारण्यांचे वर्चस्व : संविधानसभेवर वकील आणि राजकारण्यांचे वर्चस्व होते असे टीकाकार म्हणतात. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, त्यात समाजातील इतर घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेले नाही. त्यांच्या दृष्टीने संविधानातील ढिसाळपणा आणि गुंतागुंतीची भाषा यांचे हेच मुख्य कारण आहे.

६. हिंदूंचे वर्चस्व : काही टीकाकारांच्या मते, संविधान सभा ही हिंदूंचे वर्चस्व असलेली संस्था होती. लॉर्ड व्हिस्काउंट सायमनने तिला 'हिंदूंची संस्था'म्हटले आहे.

**घटनावाद**

**संकल्पना आणि तत्वज्ञान –**

घटनावाद म्हणजे मर्यादित सरकार किंवा सरकारवरील मर्यादा. हे स्वैर किंवा मनमानी शक्तींच्या विरोधी तत्त्व आहे. घटनावाद अधिकारांसह सरकारची गरज मान्य करतो; परंतु त्याच वेळी त्या शक्तींवर मर्यादा घालण्याचा आग्रहही धरतो. घटनावादाचा विरोधक म्हणजे हुकूमशाही. जे सरकार आपल्या मर्यादेपलीकडे जाते ते आपला अधिकार आणि वैधता गमावते. त्यामुळे व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आणि त्याचा सन्मान आणि व्यक्तिमत्व टिकवण्यासाठी संविधानात 'घटनावादा'चे तत्त्व अंतर्भूत असले पाहिजे; सरकारी संस्थांना दिलेल्या अधिकारांवर काही अंगभूत निर्बंध असले पाहिजेत.

**घटनावाद आणि लोकशाही –**

हुकूमशाही सरकारे ही मुळातच अघटनात्मक असतात. अशी सरकारे स्वतःला कायद्यापेक्षा वरची समजतात आणि म्हणून त्यांना अधिकारांचे विभाजन करण्याची किंवा प्रातिनिधिक शासनाची आवश्यकता वाटत नाही. तथापि, घटनावाद हा प्रामुख्याने जनतेच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेवर आधारित आहे, ज्याचा वापर मर्यादित पद्धतीने-- प्रतिनिधी सरकारने केला पाहिजे. आज अस्तित्वात असलेले शासनाचे एकमेव सर्वमान्य व प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे लोकशाही शासन होय.

**घटनावादाचे घटक –**

१. घटनेनुसार असलेले सरकार;

२. शक्तीचे पृथक्करण

३. लोकांचे सार्वभौमत्व आणि लोकशाही सरकार

४. घटनात्मक पुनरावलोकन

५. स्वतंत्र न्यायव्यवस्था

६. व्यक्तिगत अधिकारांच्या विधेयकाच्या अधीन असलेले मर्यादित सरकार

७. पोलिसांवर नियंत्रण ठेवणे

८. सैन्याचे नागरी नियंत्रण

९. राज्यघटनेच्या काही भागांच्या किंवा संपूर्ण राज्यघटनेच्या कामकाजाला स्थगिती देण्याची शक्ती असलेली कोणतीही राज्य शक्ती नसणे, किंवा अत्यंत मर्यादित आणि काटेकोरपणे निर्बंधित केलेली राज्य शक्ती असणे.

**सर्वोच्च न्यायालयाचा निकाल –**

**कोएल्हो (मृत) विरुद्ध तामिळनाडू राज्य या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत –**

घटनावादाचे तत्त्व हे आता एक कायदेशीर तत्त्व आहे ज्यानुसार सरकारी अधिकाराच्या वापरावर नियंत्रण असणे आवश्यक आहे, जेणेकरून ते ज्या लोकशाही तत्त्वांवर आधारित आहे ती नष्ट होणार नाहीत. या लोकशाही तत्त्वांमध्ये मूलभूत हक्कांचे संरक्षणही समाविष्ट आहे. घटनावादाचे तत्त्व अधिकारांच्या विभजनावर नियंत्रण आणि समतोलाच्या प्रारूपाचे समर्थन करते, त्यासाठी अधिकारांच्या प्रसाराची आणि निर्णय घेण्याच्या वेगवेगळ्या स्वतंत्र केंद्रांची आवश्यकता असते.

**घटनात्मक नैतिकता**

घटनात्मक नैतिकता म्हणजे घटनेच्या रक्षणासाठी घटनेच्या मूळ मूल्यांवर/भावनेवर विसंबून राहणे.

- भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांचे कठोरपणे पालन.
- केवळ मजकूराचा शाब्दिक अर्थ पाहणे नव्हे तर त्यामागील गर्भितार्थ पाहणे.

घटनात्मक नैतिकतेचा सिद्धांत न्यायालयाद्वारे औपचारिकपणे मान्य गेला नाही; परंतु विविध निर्णयांमध्ये अनेक वेळा त्याचे प्रकटीकरण केले गेले आहे.

| **सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणे** | **घटनात्मक नैतिकतेच्या सिद्धांताचे प्रकटीकरण** |
|---|---|
| 1. केशवानंद भारती प्रकरण | संविधानात सुधारणा करण्याच्या संसदेच्या अधिकारावर मर्यादा. राज्यघटनेत कुठेही असे लिहिलेले नाही की घटनादुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार मर्यादित आहे. पण न्यायालयाने गर्भितार्थ लक्षात घेऊन निकाल दिला. |
| 2. शबरीमाला प्रकरण | सन २०१८ च्या निकालात, सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले की, कलम २५ मधील नैतिकतेचा संबंध घटनात्मक नैतिकते'शी आहे. |
| 3. नवतेज जोहर प्रकरण | भा. दं. वि.च्या कलम ३७७ ला गुन्हेगारीच्या श्रेणीतून वगळताना सार्वजनिक नैतिकतेपेक्षा घटनात्मक नैतिकता वरचढ ठरेल, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. |
| ४. लिली थॉमस वि. भारतीय संघराज्य | सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे कलम ८(४) रद्द केले. |

**''घटनात्मक नैतिकता ही नैसर्गिक भावना नाही; तर तिची रुजवात करावी लागते.**

**– डॉ. बी.आर. आंबेडकर**

# अभ्यासक्रमातील मुद्दा – भारतीय संविधानातील महत्त्वाच्या तरतुदी.

**मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.**

**उद्देशिका**

**उद्देशिकेचे महत्त्व–**

१. भारताचे लोक, या संविधानातील स्रोताचे मूर्त प्रतिनिधित्व यात होते.

२. सार्वभौमत्व, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक या उद्देशिकेतील संज्ञा राज्यसंस्थेचे स्वरूप सूचित करतात

३. न्याय, स्वातंत्र्य, समता, सहभाव, हे आदर्श संविधानाच्या उद्दिष्टांचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संविधानाचा स्वीकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी करण्यात आल्याचाही उल्लेख त्यात आहे.

४. भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व उद्देशिकेमध्ये विविध कळीच्या शब्दांद्वारे झाले आहे.

**उद्देशिकेतील कळीचे शब्द**

| कळीचे शब्द | अर्थ/निहितार्थ |
|---|---|
| १. सार्वभौम | एका मर्यादित अवकाशामध्ये सर्वोच्च अधिसत्ता राबवणारा. |
| २. समाजवादी | संसाधनांच्या व उत्पादनसाधनांच्या सामायिक किंवा सार्वजनिक मालकीतून अधिक समतापूर्ण समाज निर्माण होतो, या कल्पनेवर समाजवाद आधारलेला आहे. उद्देशिकेमध्ये भारतीय धाटणीच्या समाजवादाचे- लोकशाही समाजवादाचे चित्रण आले आहे. |
| ३. धर्मनिरपेक्ष | सर्व धर्मांना समान स्थान (सकारात्मक धर्मनिरपेक्षता) |
| ४. लोकशाही | ठराविक कालावधीने होणाऱ्या निवडणुकांद्वारे शांततापूर्ण मार्गाने सत्तेचे नियमित हस्तांतरण |
| ५. प्रजासत्ताक | राज्यसंस्थेच्या प्रमुखाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निवडणूक होते. |
| ६. न्याय | सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय. |
| ७. स्वातंत्र्य | व्यक्तीला स्वतःच्या विकासाची पूर्ण संधी असेल अशी स्थिती. |
| ८. समता | कायद्यासमोरील समता आणि होकारात्मक कृतीद्वारे संधीची समता. |
| ९. सहभाव | बंधुत्व (फ्रेंच क्रांतीतून घेतलेली संज्ञा) |

१. बेरुबरी युनियन खटला १९६० – उद्देशिका हा संविधानाचा भाग नाही त्यामुळे त्यात दुरुस्ती करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

२. केशवानंद भारती खटला – उद्देशिका हा भारतीय संविधानाचा भाग आहे त्यामुळे त्यात दुरुस्ती करता येईल, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

**संविधानातील ४२वी दुरुस्ती–**

समाजवादी, धर्मनिरपेक्ष व एकात्मता– हे शब्द वाढवण्यात आले.

**राज्यांची पुनर्रचना**

'भारतीय स्वातंत्र्य अधिनियम, १९४७' या कायद्यात स्वातंत्र्यदिनाचा उल्लेख 'नियुक्त दिन' असा केला आहे, तर त्या दिवशी भारतातील ब्रिटिशांचे वर्चस्व संपुष्टात आले आणि भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र सार्वभौम राज्ये अस्तित्वात आली. स्वातंत्र्यपूर्व भागतात राज्य, प्रांत व ५५०हून अधिक विखुरलेली संस्थानं होती. यातील सुमारे ११४ संस्थानं १५ ऑगस्टपूर्वीच भारतात विलीन झाली होती. उर्वरित संस्थानांना भारतात वा पाकिस्तानात विलीन होण्याचा पर्याय होता, त्यातील बहुतेकांनी भारतात सामील व्हायचा निर्णय घेतला.

तेव्हापासून आता भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे होत असताना देशात २८ राज्ये आहेत व आठ केंद्रशासित प्रदेश आहेत, देशाच्या अंतर्गत हद्दींमध्ये अनेक बदल झाले आहेत, राज्यांची अनेक टप्प्यांमध्ये पुनर्रचना झाली. देशाच्या नकाशाचे पुन्हा आरेखन करण्यामागे विभिन्न घटक आहेत.

संविधानातील १९४९ सालच्या पहिल्या सूचीनुसार, विलीन झालेल्या भूप्रदेशांना २७ राज्यांमध्ये एकत्र करण्यात आलं आणि त्यांचे अ, आ, इ आणि ई असे वर्गीकरण करण्यात आले.

१. गतकालीन गव्हर्नरचे प्रांत अ भागातील राज्यांमध्ये आले.

२. गतकालीन संस्थाने किंवा संस्थानांचे समूह आ भागामध्ये आले.

३. राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या आयुक्तांकडून चालवली जाणारी राज्ये इ भागामध्ये आली.

४. ई भागामध्ये केवळ अंदमान–निकोबार बेटांचा समावेश होता, आणि त्या वेळी केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या उप–राज्यपालांकडून त्याचे प्रशासन चालवले जात असे.

**भाषावार प्रांतरचना**

१९५० साली राज्यांचे गट शासनव्यवहाराच्या रूपानुसार करण्यात आले, त्यानंतर भाषावार प्रांतरचनेसाठीची आवाहने अधिक जोरकसपणे होऊ लागली.

सरकारने भाषावार प्रांतरचनेसंदर्भात नियुक्त केलेल्या एस. के. धर आयोगाने १९४८ साली अशी शिफारस केली की, देशात राष्ट्रवादी भावना बळकट होत नाही तोवर राज्ये केंद्राखाली प्रशासकीय एकक म्हणूनच कार्यरत राहावीत. माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, श्री. पटेल व पट्टाभी सीतारामय्या यांच्या नेतृत्वाखाली जेव्हीपी समितची स्थापना करण्यात आली, पण त्यांच्या अहवालामध्येही भाषावार प्रांतरचना नाकारण्यात आली.

अखेरीस सरकारने नमदे घेत पहिले भाषावार राज्य निर्माण केले– तेलुगूभाषक लोकांसाठी १९५३ साली आंध्र



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

प्रदेशाची निर्मिती झाली. या राज्याच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामुलू यांनी आमरण उपोषण केले, त्यानंतर मद्रासमधून आंध्र प्रदेश वेगळे काढण्यात आले. त्यानंतर इतर भाषाप्रदेशांमधून मागण्या होऊ लागल्या आणि केंद्र सरकारने १९५३ साली राज्ये पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. या आयोगाने १६ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याची शिफारस करणारा अहवाल सादर केला. त्याऐवजी सरकारने १९५६ साली 'राज्ये पुनर्रचना अधिनियम' मंजूर करून १४ राज्ये व सहा केंद्रशासित प्रदेश निर्माण केले.

- राज्ये- आसाम, बिहार, मुंबई, जम्मू-काश्मीर, केरळ, मध्य प्रदेश, मद्रास (१९६९ साली याचे नामकरण तामिळनाडू असे करण्यात आले), म्हैसूर (१९७३मध्ये कर्नाटक असे नामकरण), ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगाल.
- केंद्रशासित प्रदेश- मणिपूर, त्रिपुरा, अंदमान-निकोबार, दिल्ली, हिमाचल प्रदेश, लक्षद्वीप, मिनीकॉय व अमिदिनी बेटे.





**Fig. 5 (b)** – *Indian States before 1 November 1956*



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

भाषावार प्रांतरचना इथे थांबली नाही. मुंबईच्या नकाशाचे पुन्हा आरेखन करण्यात आले आणि त्यात मराठीभाषक व गुजरातीभाषक प्रदेशांचा समावेश करण्यात आला. यातून अनुक्रमे महाराष्ट्र व गुजरात यांच्यासाठी संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन व महागुजरात आंदोलन अशी दोन वेगवेगळी आंदोलने झाली. अखेरीस, १ मे १९६० रोजी मुंबई पुनर्रचना अधिनियम तयार करण्यात आला, आणि दोन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

स्वातंत्र्य मिळाले त्या वर्षीपासूनच पंजाबीभाषक लोकांसाठी वेगळ्या राज्याची मागणी पुढे आली, त्यात हिंदीभाषक प्रदेश वगळण्यात आले व चंदीगढचा समावेश करण्यात आला होता. अकाली दलाच्या नेतृत्वाखाली झालेल्या या पंजाबी सुबा चळवळीला हळूहळू गती मिळाली आणि अखेरीस १९६६ साली शीख व पंजाबी भाषकांसाठी पंजाब, हिंदीभाषकांसाठी हरयाणा अशी राज्ये तयार करण्यात आली, तर पंजाबमधील डोंगराळ भागांचे हिमाचल प्रदेश राज्य तयार करण्यात आले. १ नोव्हेंबर १९६६ रोजी मंजूर करण्यात आलेल्या पंजाब पुनर्रचना अधिनियमाद्वारे हे साधण्यात आले. परंतु, चंदीगढ पंजाबला देण्याची मागणी मात्र पूर्ण करण्यात आली नाही, कारण चंदीगढ हा केंद्रशासित प्रदेश करण्यात आला.

भाषावार प्रांतरचनेनंतर निर्माण झालेल्या राज्यांव्यतिरिक्त गोवा, दमण व दिव हे प्रदेश भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही १४ वर्षे पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. १९५०च्या दशकात गोव्यामध्ये राष्ट्रवादी चळवळी उभ्या राहिल्या आणि भारतानेही पोर्तुगीजांवर दबाव आणून हे प्रदेश भारतात समाविष्ट करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. १९६१ सालच्या अखेरीला भारतीय सैन्यदलांनी गोवा आणि दीव-दमण हे प्रदेश ताब्यात घेतले व ते भारतात सामील झाले. गोव्याला १९८७ साली राज्याचा दर्जा देण्यात आला तर दीव-दमण हा केंद्रशासित प्रदेश झाला.

२००० साली झारखंड, छत्तीसगढ व उत्तराखंड ही राज्ये अनुक्रमे बिहार, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश यांच्यातून वेगळी करण्यात आली. मोठ्या राज्यांमध्ये असल्यामुळे या प्रदेशांचा विकास होत नव्हता आणि काही सांस्कृतिक भेदही होते, या मुद्द्यांवरून ही राज्ये निर्माण झाली. लहान राज्ये तयार केली, तर त्यातून आवश्यक प्रशासकीय लक्ष पुरवता ईल व विकासही साधला जाईल, अशी धारणा यामागे होती.

अगदी अलीकडे २०१९ साली जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेण्यात आल्यावर जम्मू-काश्मीर व लडाख हे केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले.

**लहान राज्यांच्या बाजूने युक्तिवाद –**

१. लहान विधानसभा असतील तर निर्णयप्रक्रिया वेगाने पार पडेल.

२. सांस्कृतिक वैविध्य टिकून राहते- भिन्न संस्कृती असलेली अनेक राज्ये आसाममधून वेगळी करण्यात आली, त्यानंतर नागा, मिझो, इत्यादी अस्मिता देशभरात अधिकाधिक ओळखीच्या होऊ लागल्या.

३. अधिक विकेंद्रीत धोरणे करणे शक्य होते.

४. नवीन शहरांची निर्मिती- आंध्र प्रदेशातून तेलंगण हे वेगळे राज्य बाहेर काढण्यात आले, तेव्हा तिथली राजधानी म्हणून अंमरावतीचा विकास झाला. रांची, डेहराडून, रायपूर, इत्यादींसारखी छोटी शहरे नवीन राज्यांची राजधानी झाल्यानंतर त्यांचे नाव प्रत्येकाच्या तोंडी झाले.

५. राज्यस्तरीय आकडेवारी मिळवणे- सध्या नीती आयोगची बहुतांश आकडेवारी राज्यांनुसार प्रकाशित होते. महाराष्ट्राचा मानवविकास निर्देशांक ०.६९५ इतका आहे, पण तो कोकणात ०.८ इतका जास्त आहे, तर मराठवाड्यात ०.५ इतका कमी आहे.

६. यामुळे लहान राज्यांच्या गरजांच्या आधारे वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यावार सहाय्य पुरवणेही अधिक अचूकपणे शक्य होते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**लहान राज्यांच्या विरोधी युक्तिवाद–**

१. प्रादेशिकतावादी प्रवृत्ती वाढू शकतात.

२. पाण्यावरून सुरू असणारे आंतरराज्यीय वाद आणखी गंभीर होऊ शकतात.

३. नवीन राज्यांमध्ये नवीन विधानसभा, राजभवने, इत्यादी बांधण्यासाठी प्रचंड पायाभूत रचना गरजेच्या आहेत आणि ही खर्चिक बाब आहे.

४. केंद्र सरकारवरील अवलंबित्व वाढेल.

**नागरिकत्व**

नागरिकत्वासंबंधीच्या प्राथमिक तरतुदी तुम्ही 'लक्ष्मीकांत'च्या पुस्तकामध्ये वाचू शकता. इथे आपण नागरिकत्वाशी निगडित काही महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करणार आहोत.

**नागरिकत्व दुरुस्ती अधिनियम (सीएए)**

या अधिनियमाने 'नागरिकत्व अधिनियम, १९५५'मध्ये दुरुस्ती केली आणि अफगाणिस्तान, बांग्लादेश व पाकिस्तान इथून आलेल्या विशिष्ट धार्मिक समुदायांमधील परकीय बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्वासाठी पात्र ठरवण्याची तरतूद त्यात केली आहे.

**भारतात नागरिकत्व कसे मिळते ?**

भारतामध्ये नागरिकत्वाचे नियमन 'नागरिकत्व अधिनियम, १९५५'द्वारे केले जाते. भारतात जन्म होणे, मूळ कुटुंब भारतीय असणे, नोंदणी करणे, नैसर्गिकीकरण (भारतातील प्रदीर्घ निवास), आणि एखादा भूप्रदेश भारतात समाविष्ट होणे– अशा पाच पद्धतींनी भारताचे नागरिकत्व मिळते, असे सदर अधिनियमात नमूद केले आहे.

**बेकायदेशीर स्थलांतरित म्हणजे कोण ?**

बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व मिळवण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. बेकायदेशीररित्या भारतात प्रवेश करणाऱ्या परदेशी व्यक्तीला बेकायदेशीर स्थलांतरित म्हटले जाते– ही व्यक्ती व्हिसा व पासपोर्ट यांसारख्या वैध प्रवासी कागदपत्रांविना भारतात प्रवेश केलेली असेल, किंवा भारतात कायदेशीररित्या प्रवेश करून तिच्या प्रवासी कागदपत्रांमधील मुदतीहून अधिक काळ भारतात राहत असेल.

**नागरिकत्व दुरुस्ती अधिनियमाने कोणते बदल केले ?**

१. तीन विशिष्ट देशांमधील बेकायदेशीर स्थलांतरितांना बेकायदेशीर स्थलांतरित मानले जाणार नाही, त्यांना नागरिकत्वासाठी पात्र मानले जाईल, अशी तरतूद नागरिकत्व दुरुस्ती अधिनियमाने केली. नागरिकत्व मिळाल्यानंतर अशा स्थलांतरितांना त्यांनी भारतात प्रवेश केल्याच्या तारखेपासून भारतीय नागरिक मानले जाईल आणि त्यांच्या बेकायदेशीर स्थलांतरासंदर्भातील किंवा त्यांच्या नागरिकत्वासंदर्भातील सर्व कायदेशीर कार्यवाही थांबवली जाईल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. एखाद्या व्यक्तीने विशिष्ट अर्हता पूर्ण केल्या असतील, तर तिला नैसर्गिकीकरणाद्वारे नागरिकत्वासाठी अर्ज करायची मुभा सदर अधिनियमाने दिली आहे. संबंधित व्यक्ती आधीचे १२ महिने आणि आधीच्या १४ वर्षांमधील किमान ११ वर्षे भारतात राहिलेली असायला हवी किंवा केंद्र सरकारच्या सेवेत कार्यरत हवी, ही यातील एक अर्हता आहे. बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विहित वर्गासाठी निवासाच्या वर्षांची संख्या ११ वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत शिथील करण्यात आली आहे.

**नागरिकत्व दुरुस्ती अधिनियमाच्या उपयोजनामधून वगळण्यात आलेले प्रदेश–**

- संविधानाच्या सहाव्या सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आसाम, मेघालय, मिझोरम व त्रिपुरा इथले आदिवासी प्रदेश.
- बंगाल ईस्टर्न फ्रंटिअर नियमन, १८७३ अनुसार 'इनर लाइन' परमिटद्वारे नियमन केली जाणारी राज्ये.
- सहाव्या सूचीतील या प्रदेशांमध्ये (आसाममधील) कार्बी अंग्लोंग, (मेघालयातील) गारो हिल्स, (मिझोरममधील) चकमा जिल्हा, त्रिपुरा आदिवासी प्रदेश जिल्हा यांचा समावेश होतो. शिवाय, इनर लाइन परमिटद्वारे अरुणाचल प्रदेश, मिझोरम व नागालँड इथे प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांसह सर्वच व्यक्तींचे नियमन केले जाते.

**सरकारी भूमिका**

१. धर्माच्या आधारे केले जाणारे वर्गीकरण हे अंगभूतरित्या असांविधानिक नाही– आपल्या संविधानाने भारतातील अल्पसंख्याक धार्मिक समुदायांमधील सदस्यांना विशेष अधिकार बहाल केले आहेत याची आठवण ठेवणे योग्य राहील.

२. प्रत्येक कायद्याचे सार्वत्रिक उपयोजन व्हायला हवे, असा समतेच्या तत्त्वाचा अर्थ नाही.

३. समतेच्या तत्त्वामुळे राज्यसंस्थेचा वर्गीकरण करण्याचा अधिकार काढून घेतला जात नाही.

४. सरकारच्या मते हा कायदा 'अनुकंपा दाखवणारा व परिस्थिती सुसह्य करणारा' आहे आणि त्यातून कोणत्याही भारतीयाला नागरिकत्वापासून वंचित केले जाणार नाही.

**नागरिकत्व दुरुस्ती अधिनियमाचे चिकित्सक विश्लेषण–**

१. हा कायदा संविधानातील अनुच्छेद १४चा भंग करतो. अनुच्छेद १४मध्ये समतेच्या अधिकाराची हमी देण्यात आली आहे, असे प्रतिपादन टीकाकार करतात.

२. धर्माच्या आधारे दिले जाणारे नागरिकत्व धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा भंग करते.

३. यातून आसाम कराराचा भंग होतो.

४. शेजारच्या ज्या देशांमध्ये धार्मिक अत्याचार झाले आहेत त्यांच्यासोबतचे आपले द्विपक्षीय संबंध या कायद्यानंतर बिघडण्याची शक्यता आहे.

५. इतर शेजारी देशांना यातून का वगळण्यात आले, असा प्रश्न टीकाकार सरकारला विचारतात.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारताचे परदेशनिवासी नागरिक (ओव्हरसीज् सिटिझन ऑफ इंडिया: ओसीआय) –**

इतर पात्रतेच्या निकषांसोबतच २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर भारताचा नागरिक असणारी, किंवा त्या तारखेला भारताचा नागरिक होण्यास पात्र असलेली, किंवा अशा व्यक्तीचे अपत्य किंवा नातवंड असणारी व्यक्ती भारताचा परदेशनिवासी नागरिक ठरते, अशी व्याख्या गृह मंत्रालयाने केली आहे. ओसीआय कार्डसंबंधीच्या नियमांमधील कलम ७-अ अनुसार, एखाद्या अर्जदाराचे पालक किंवा आजीआजोबा कधी पाकिस्तानचे वा बांग्लादेशाचे नागरिक राहिले असतील तर ती व्यक्ती ओसीआय कार्डसाठी पात्र ठरत नाही.

ओसीआय कार्डधारक अनेक वेळा भारतात प्रवेश करू शकतात, भारतात येण्याकरता आयुष्यभरासाठी बहुउद्देशीय व्हिसा मिळवू शकतात आणि ते कितीही काळ भारतात राहिले तरी परकीय प्रादेशिक नोंदणी कार्यालयामध्ये नोंदणी करण्यातून त्यांना सूट दिलेली असते.

**अनिवासी भारतीय–**

भारताची निवासी नसणारी व्यक्ती अनिवासी भारतीय असते. एखाद्या व्यक्तीने (अ) विशिष्ट वर्षी १८२ दिवस किंवा अधिक काळ भारतात निवास केला असेल, किंवा (आ) विशिष्ट वर्षाच्या चार वर्षे आधीपासून ही व्यक्ती ३६५ दिवस वा त्याहून अधिक काळ भारतात राहिली असेल आणि त्या वर्षी ६० दिवस वा अधिक भारतात राहिली असेल, तर तिला निवासी मानता येते.

**मूलभूत अधिकार**

**वैशिष्ट्ये**

१. यातील काही अधिकार केवळ भारतीय नागरिकांना उपलब्ध असतात, तर इतर काही अधिकार नागरिक असो, परकीय असो वा महामंडळे किंवा कंपन्या यांसारख्या कायदेशीर संस्था असोत, सर्वांना उपलब्ध असतात.

२. हे अधिकार सर्वंकष नसून सशर्त असतात. राज्यसंस्था या अधिकारांवर वाजवी निर्बंध लादू शकते. परंतु, असे निर्बंध वाजवी आहेत की नाही हे न्यायालये ठरवतात. व्यक्तीचे अधिकार व एकंदर समाजाचे अधिकार, व्यक्तिगत स्वातंत्र्य व सामाजिक नियंत्रण, आदींमध्ये अशा पद्धतीने समतोल साधला जातो.

३. राज्यसंस्थेच्या मनमानी कृत्याविरोधात हे सर्व अधिकार उपलब्ध आहेत. पण त्यातील काही अधिकार खाजगी व्यक्तीच्या कृत्यांविरोधातही आहेत.

४. यातील काही अधिकार नकारात्मक स्वरूपाचे आहेत– म्हणजे ते राज्यसंस्थेच्या अधिसत्तेवर मर्यादा घालणारे आहेत, तर काही सकारात्मक स्वरूपाचे आहेत– ते व्यक्तींना विशिष्ट विशेषाधिकार बहाल करतात.

५. हे अधिकार न्यायविचारणीय असतात– व्यक्तींना या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी, त्यांचा भंग झाला तर न्यायालयात दाद मागता येते.

६. सर्वोच्च न्यायालयाने या अधिकारांची हमी दिली आहे व त्यांचे समर्थन केले आहे. त्यामुळे पीडित व्यक्तीला थेट सर्वोच्च न्यायालयात जाता येते, उच्च न्यायालयांच्या निकालाविरोधातील याचिका म्हणून सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे बंधन इथे लागू होत नाही.

७. एकाद्या प्रदेशात लष्करी कायदा लागू असेल तर या अधिकारांच्या उपयोजनावर निर्बंध आणता येतात. लष्करी कायदा म्हणजे सुव्यवस्था पुनर्स्थापित करण्यासाठी असाधारण परिस्थितीमध्ये लादलेली 'लष्करी राजवट' (अनुच्छेद ३४). राष्ट्रीय आणीबाणीपेक्षा लष्करी कायदा वेगळा असतो.

८. यातील बहुतांश अधिकारांची थेट अंमलबजावणी करता येते (स्वयं-अंमलबजावणी), तर त्यातील मोजके अधिकार विशिष्ट कायद्याच्या आदारावर अंमलात आणले जातात. असे कायदे केवळ संसदेला करता येतात, कोणत्याही राज्याच्या विधिमंडळाला असा कायदा करता येत नाही, जेणेकरून संपूर्ण देशात त्यांची एकसारखी अंमलबजावणी व्हावी (अनुच्छेद ३५).

इथे आपण मूलभूत अधिकारांशी संबंधित काही महत्त्वाच्या प्रश्नांना स्पर्श करणार आहोत.

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण**

भारतीय संसदेने ९ जानेवारी २०१९ रोजी 'संविधान (१०३वी दुरुस्ती) अधिनियम, २०१९' हा कायदा केला. त्याद्वारे राज्यसंस्थेला केवळ आर्थिक निकषाच्या आधारावर सरकारी नोकरीत व उच्चशिक्षणामध्ये आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार देण्यात आला. या अधिनियमाने संविधानातील अनुच्छेद १५ व १६ यांमध्ये दुरुस्ती करून १५(६) व १६(६) या कलमांची भर घातली. या दुरुस्तीला १२ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आणि त्याच दिवशी राजपत्रामध्ये त्याचे प्रकाशन करण्यात आले.

१. अनुच्छेद १५(६) या दुरुस्तीनुसार राज्यसंस्थेला नागरिकांमधील कोणत्याही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदी करण्याचे अधिकार देण्यात आले, तसेच शैक्षणिक संस्थांमधील आरक्षणाचेही अधिकार देण्यात आले.

२. कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये (अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थांचा यात समावेश होतो) अशा प्रकारचे आरक्षण देता येईल, असे त्यात नमूद केले आहे. फक्त अनुच्छेद ३०(१)अंतर्गत येणाऱ्या अल्पसंख्याक शिक्षणसंस्थांचा यात अपवाद करण्यात आला आहे.

३. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाची कमाल मर्यादा १० टक्के असेल (म्हणजे १० टक्क्यांपर्यंतच्या जागा या प्रवर्गातील नागरिकांसाठी राखून ठेवता येतील), असे सदर दुरुस्ती अनुच्छेदामध्ये नमूद केले आहे. विद्यमान आरक्षणांच्या मर्यादेहून स्वतंत्रपणे ही १० टक्क्याची मर्यादा लागू होईल.

४. अनुच्छेद १६(६) राज्यसंस्थेला नियुक्त्यांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार देते. इथेही सदर तरतुदींना विद्यमान आरक्षणांच्या अलाहिदा १० टक्के कमाल मर्यादा लागू होते.

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या राखीव जागांविरोधातील युक्तिवाद-**

१. केवळ ऐतिहासिक वंचनेमुळे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास राहिलेल्या समूहांसाठी आरक्षण लागू केले गेले, साधनांच्या व्यक्तिगत अभावाचा निकष त्यात अभिप्रेत नव्हता, त्यामुळे आर्थिक निकषावर आरक्षण देऊन सदर तरतुदीने सामाजिक समूहांच्या प्रगतीमधील संरचनात्मक अडथळे दूर करू पाहणारी योजना गरिबीविरोधी उपाययोजनेमध्ये रूपांतरित केली आहे.

२. आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या प्रवर्गातून ओबीसी/एससी/एसटी उमेदवारांना वगळल्याने सांविधानिक तत्त्वांचा भंग होतो.

३. एकूण आरक्षणासाठी निश्चित करण्यात आलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा यातून भंग पावली आहे. अशाने आरक्षण हा नियम ठरेल आणि भेदभाव न करणे व समान वागणूक हे तत्त्व अपवाद ठरेल.

४. सरकारी अनुदान न मिळणाऱ्या शिक्षणसंस्थांमध्ये आरक्षण लागू केल्याने समतेच्या मूलभूत अधिकाराचा भंग होतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या राखीव जागांच्या बाजूने केले जाणारे युक्तिवाद–**

१. आर्थिक निकषावरील आरक्षण समतेच्या आधारावर उभे आहे. आर्थिक निकषावरील आरक्षण समतेच्या तत्त्वाचे नुकसान करते आणि परिणामी पायाभूत संरचनेवर आघात करते, हे प्रतिपादन समजून घेणे अवघड आहे.

२. आर्थिक अक्षमतांमुळे मागे राहिलेल्यांच्या समावेशाचा प्रयत्न हा कायदा करतो. यातून समाजात आर्थिक कल्याण निर्माण होते.

३. मागास वर्गांव्यतिरिक्त इतर अनेक लोक वा वर्ग उपासमारीच्या व दारिद्र्याच्या परिस्थितीत जगत आहेत.

४. सांविधानिक दुरुस्तीद्वारे लागू करण्यात आलेले हे आरक्षण उच्च जातींमधील गरिबांची सांविधानिक दखल घेईल.

सर्वोच्च न्यायालयाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना देण्यात आलेल्या आरक्षणाच्या सांविधानिक वैधतेवर शिक्कामोर्तब केले आहे.

**राजद्रोह**

भारतीय दंड संहितेतील कलम १२४–अ (राजद्रोह अंतर्गत प्रलंबित असलेल्या फौजदारी सुनावण्या व न्यायालयीन कार्यवाही सर्वोच्च न्यायालयाने स्थगित केल्या आहेत, तर भारत सरकारला या ब्रिटिशकालीन कायद्याचा पुनर्विचार करायला सांगितले आहे. सदर कलमाखालील सुनावण्या व कार्यवाही स्थगित ठेवण्याचा निर्णय तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिला.

१. मुख्यत्वे प्रमुख भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचे लेखन व भाषणे दडपण्यासाठी ब्रिटिश वासाहतिक शासनाने लादलेल्या भारतीय दंड संहितेतील 'कलम १२४–अ'मध्ये राजद्रोहाच्या आरोपाचा समावेश होता. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक व जोगेंद्रचंद्र बोस यांच्यासारख्या नेत्यांचे लेखन या कलमाखाली दडपण्यात आले आणि त्यांनी ब्रिटिश राजवटीविरोधात केलेल्या टिप्पण्यांबद्दल राजद्रोहाच्या कायद्याखाली त्यांच्यावर खटले चालवण्यात आले.

२. कलम १२४–अ अनुसार राजद्रोह हा अजामीनपात्र गुन्हा आहे, त्यासाठी तीन वर्षांपासून ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा, आणि सोबतच दंड होऊ शकतो. या कायद्याखाली आरोप लागलेल्या व्यक्तीला सरकारी नोकरी करता येत नाही आणि तिचे पासपोर्ट सरकार जप्त करते. खुद्द युनायटेड किंगडममध्ये २०१० साली राजद्रोहाचा आरोप रद्द करण्यात आला.

**केदारनाथ खटल्यातील निकाल–**

केदारनाथ खटल्यातील निकालाने भारतीय दंड संहितेतील 'कलम १२४ अ'मध्ये नमूद केलेल्या राजद्रोहाची सांविधानिक वैधता कायम ठेवली.

**राजद्रोहाशी (भारतीय दंड संहिता कलम १२४ अ) संबंधित प्रश्न**

- वाजवी निर्बंधाच्या निकषावर अनुच्छेद १९(२)नुसार राजद्रोहाला संरक्षण मिळत नाही.
- अनुच्छेद १९च्या मसुद्यामध्ये वाजवी निर्बंधात राजद्रोहाचा समावेश करण्यात आला होता, पण अंतिमतः संविधान सभेने हा अनुच्छेद स्वीकारला तेव्हा तो वगळण्यात आला.
- संविधानकर्त्यांनी राजद्रोह हा वाजवी निर्बंध असल्याचे मानले नव्हते, असे यावरून स्पष्ट दिसते.
- परंतु, संविधान सभेच्या निर्णयाने सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बदलला नाही.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- अनुच्छेद १९(२) मध्ये वापरण्यात आलेले 'सार्वजनिक सुव्यवस्थेच्या हितासाठी...' या शब्दांचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने लावला आणि राजद्रोह करणाऱ्या उक्तीने अव्यवस्था किंवा हिंसाचार होणार असेल तर राजद्रोहाचा गुन्हा घडल्याचे मानता येते, असे नमूद केले.
- 'कलम १२४ अ'ची व्याप्ती कमी करणारी ही कृती निश्चितपणे या कलमाला अनुच्छेद १९(२)च्या कक्षेत आणणारी होती आणि त्यातून राजद्रोहाचा कायदा कायम राहिला. अन्यथा राजद्रोहाची तरतूद असांविधानिक म्हणून रद्द झाली असती.
- तर, हे कलम अजूनही कायद्याच्या पुस्तकामध्ये आहे आणि नागरिकांनी केलेल्या लेखनातून अव्यवस्था निर्माण झाल्यामुळेच त्यांना तुरुंगात जावे लागते असे नाही, तर सरकारविरोधात टीकात्मक टिप्पणी केल्याच्या कारणावरूनही त्यांना तुरुंगवास भोगावा लागताना दिसतो.

**विधी आयोगाची भूमिका–**

१. भारताच्या विधी आयोगाने २०१८ साली प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, संविधान तयार करताना संविधान सभेने राजद्रोहाचे कलम तेव्हाच्या अनुच्छेद १३खाली अभिव्यक्तीस्वातंत्र्यावरील निर्बंध म्हणून समाविष्ट करायला विरोध केला होता. ही तरतूद वासाहतिक काळाचे सावट दर्शवणारी आहे, त्यामुळे स्वतंत्र भारतात तिला जागा असता कामा नये, असे त्यांचे मत होते. परंतु, भारतीय दंड संहितेतील १२४ अ या कलमानुसार हा गुन्हा कायम राहिला.

२. भारतीय दंड संहितेमधील कलम १२४ अ (राजद्रोह) कायम राहायला हवे, पण 'राजद्रोह' या शब्दाऐवजी दुसरा काही योग्य शब्द वापरता येईल का, याचा विचार व्हायला हवा. शिवाय, 'अपमान करण्याचा अधिकार' हाच द्वेषमूलक वक्तव्य ठरतो का, याचीही छाननी व्हायला हवी, असे सदर अहवालात म्हटले आहे. राजद्रोह आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार यांच्यात समतोल साधला जावा, तसेच राजद्रोहाच्या आरोपाच्या गैरवापरापासून संरक्षण पुरवले जावे, अशीही कळकळीची सूचना या अहवालात केली आहे.

**धर्मांतरविरोधी कायदे**

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व हिमाचल प्रदेश यांसारख्या राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे केले आहेत. यामध्ये विशेषतः विवाहाच्या उद्देशाने केलेल्या धर्मांतराला प्रतिबंध केला जातो.

**संविधान व धर्म–**

१. अनुच्छेद २५– अनुच्छेद २५(१) अनुसार सर्व व्यक्तींना सद्सद्विवेकाच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे आणि धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण मुक्तपणे करायचा अधिकार आहे. पण सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता व आरोग्य या कारणांवरून अशा आचारांवर राज्यसंस्था नियमन ठेवू शकते.

२. अनुच्छेद २५(२)(अ) अनुसार राज्यसंस्था धार्मिक आचरणाशी संबंधित कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजकीय किंवा इतर धर्मनिरपेक्ष कृतीचे नियमन करू शकते.

३. अशा आंतरधर्मीय विवाहांची माहिती जिल्हा दंडाधिकाऱ्याला द्यावी, हा नियम राज्यसंस्थेला व्यक्तीच्या जगण्याच्या अधिकारामध्ये व वैयक्तिक स्वातंत्र्यामध्ये हस्तक्षेप करण्याची परवानगी देणारा आहे, त्यामुळे तो अनुच्छेद २१च्या विरोधात जातो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. अशा प्रकारचे कायदे सांविधानिक लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांचा विपर्यास करतात. सांविधानिक लोकशाहीने व्यक्तींना निवडीचे व धर्माचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु हे कायदे 'भुरळ पाडली'सारखे शब्दप्रयोग करून प्रौढ स्त्रियांच्या स्वतंत्र निवडीचा अवमान करतात.

५. हे कायदे पुरावा सादर करण्याच्या जबाबदारीसंदर्भात फौजदारी न्यायक्षेत्राच्या विरोधात जातात, कारण धर्मांतर केलेल्या व्यक्तीला तिचे धर्मांत सक्तीने, बळाने किंवा बेकायदेशीररित्या झालेले नसल्याचे सिद्ध करायचा पुरावा द्यावा लागतो.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागास वर्गीयांना आरक्षण**

**अलीकडच्या घडामोडी–**

अलाहाबाद उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इतर मागास वर्गीयांना देण्यात आलेले आरक्षण रद्द केले आणि राज्य सरकारने या आरक्षणाविना निवडणुका घ्याव्यात असे आदेश दिले. पुढे राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात जाऊन या निर्णयावर स्थगिती आणली.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणासंदर्भातील सांविधानिक तरतुदी–**

१. संविधानामध्ये १९९२ साली करण्यात आलेल्या ७३व्या व ७४व्या दुरुस्त्यांनी प्रत्येक पंचायतीत/नगरपालिकेत (म्हणजे सर्व तीन स्तरांवर) अनुसूचित जातींना व अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंख्येतील प्रमाणानुसार राखीव जागांची तरतूद केली.

२. याच दुरुस्त्यांद्वारे स्त्रियांना किमान ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

३. या अधिनियमाने राज्यांच्या विधिमंडळांना कोणत्याही पंचायतीत/नगरपालिकेत किंवा पंचायतीत/नगरपालिकेत अध्यक्षपदासाठी मागास वर्गांच्या आरक्षणासाठी कोणतीही तरतूद करण्याचा अधिकार दिला.

**सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांमधील महत्त्वाचे मुद्दे–**

१. 'राहुल रमेश वाघ विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने अलीकडे दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागास वर्गीयांना आरक्षण देताना सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या तत्त्वांचे पालन देशभर करणे अनिवार्य ठरवण्यात आले.

२. 'के. कृष्णमूर्ती (डॉ.) विरुद्ध भारत सरकार' (२०१०) या खटल्यात पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने दिलेल्या निकालामध्ये स्पष्ट करण्यात आले की, राजकीय सहभागामधील अडथळे आणि शिक्षण व रोजगार यांमधील अडथळे एकसारखे नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची मुभा असली तरी त्यासाठी तीन अटींची पूर्तता व्हायला हवी, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले: १) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मागासपणाच्या स्वरूपाबाबत अनुभवजन्य तपास करण्यासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करावी, २) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेनुसार किती आरक्षणाचे प्रमाण आवश्यक आहे ते नमूद करावे, ३) अशा प्रकारचे आरक्षण एससी/एसटी/ओबीसी यांच्या एकत्रित राखीव जागांच्या ५० टक्क्यांहून अधिक असता कामा नयेत.

३. ओबीसींना देण्यात आलेले आरक्षण ही केवळ सरकारी कायद्यांमधून दिलेली वैधानिक नियमसूट आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. अनुसूचित जाती–जमातींना आरक्षण देणाऱ्या 'सांविधानिक' तरतुदींहून हे आरक्षण वेगळे असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**खाजगीपणाचा अधिकार**

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१मध्ये हमी देण्यात आलेला जगण्याचा अधिकार व वैयक्तिक स्वातंत्र्य यांमध्येच खाजगीपणाचा अधिकार हासुद्धा अविभाज्य भाग म्हणून येतो, असा निवाडा 'न्यायमूर्ती पुट्टस्वामी' खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिला. संविधानाने खाजगीपणाचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला अंगभूतरित्या बहाल केला आहे आणि मानवी घटकाचा हा अविभाज्य भाग असल्याचे माले आहे. परंतु, खाजगीपणाचा अधिकार अनिर्बंध नसतो आणि राज्ये खाजगीपणाच्या अधिकाराला निर्बंध घालण्यासाठी कायदे करू शकतात. जगण्यावरील किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यावरील आक्रमणासंदर्भातील कायद्यातून तीन आवश्यकतांची पूर्तता व्हायला हवी.

१. कायदेशीरता: कायद्याचे अस्तित्व, म्हणजे संबंधित राज्यसंस्थेच्या कृतीला कायदेशीर आधार असायला हवा.

२. गरज: राज्यसंस्थेचे वैध उद्दिष्ट असायला हवे.

३. प्रमाणबद्धता: उद्दिष्टे व ती साध्य करण्यासाठी स्वीकारलेली साधने यांच्यात तार्किक संबंध असतील, याची खातरजमा करायला हवी.

**खाजगीपणाचा अधिकार हा अनिर्बंध अधिकार नसतो**

आपल्या संविधानातील अनुच्छेद २१ने खाजगीपणाच्या अधिकाराची हमी दिली आहे. परंतु, देशातील सामाजिक सुव्यवस्था टिकवण्यासाठी मूलभूत अधिकारांवर काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. दहशतवाद, गुन्हेगारी, अव्यवस्था व संबंधित कृतींना प्रतिबंध करण्यासाठी अनेक देशांनी या मूलभूत अधिकारांच्या प्रवाहावर निर्बंध आणू पाहतात.

खाजगीपणाच्या तंत्रज्ञानाने आपल्या जीवनाच्या प्रत्येक अवकाशावर आक्रमण केले आहे– हे आक्रमण इष्ट असो वा नसो. जाणतेपणी अथवा अजाणतेपणी आपण कोणत्या तरी तिसऱ्या घटकाला आपली वैयक्तिक माहिती वापरायचा अधिकार देत असतो, अशा स्थितीत आपण येऊन पोचलो आहोत. विविध कंपन्यांनी व संस्थांनी किंवा प्रशासनानेसुद्धा कोणत्याही योग्य कायद्याविना वैयक्तिक माहिती सादर करणे अनिवार्य केले आहे, ही बाब खाजगीपणाच्या अधिकाराचा संपूर्ण भंग करणारी आहे.

**मूलभूत अधिकारांवरील टीका–**

१. अतिरिक्त मर्यादा– या अधिकारांना असंख्य अपवाद, निर्बंध, अर्हता व स्पष्टीकरण लागू होतात. त्यामुळे संविधान एका हाताने मूलभूत अधिकार बहाल करते, तर दुसऱ्या हाताने ते काढून घेते, अशी टिप्पणी टीकाकारांनी केली आहे.

२. मूलभूत अधिकारांची यादी सर्वांगीण नाही, कारण त्यात मुख्यत्वे राजकीय अधिकारांचा समावेश आहे. सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार, कामाचा अधिकार, रोजगाराचा अधिकार, विश्रांतीचा अधिकार, इत्यादींसारख्या महत्त्वाच्या सामाजिक व आर्थिक अधिकारांसाठी त्यात काहीही तरतूद नाही.

३. मूलभूत अधिकार ढोबळ, अनिश्चित व संदिग्ध पद्धतीने नमूद केलेले आहेत. त्या प्रकरणात वापरलेल्या 'सार्वजनिक सुव्यवस्था', 'अल्पसंख्याक', 'वाजवी निर्बंध', 'सार्वजनिक हित', इत्यादींसारख्या शब्दप्रयोगांची स्पष्ट व्याख्या दिलेली नाही.

४. संसद मूलभूत अधिकारांवर निर्बंध आणू शकते किंवा ते रद्दही करू शकते, त्यामुळे या अधिकारांना पवित्र किंवा अक्षय स्थान लाभलेले नाही. उदाहरणार्थ, मालमत्तेचा मूलभूत अधिकार १९७८ साली रद्द करण्यात आला.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

५. राष्ट्रीय आणीबाणीच्या वेळी मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी स्थगित करण्यात आली होती (अनुच्छेद २० व २१ यांचा त्या अपवाद केला होता) हा या अधिकारांच्या परिणामकारकतेवरील आणखी एक कलंक आहे.

६. प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची तरतूद (अनुच्छेद २२) मूलभूत अधिकारांच्या प्रकरणातील प्रेरणा व भरीवपणा काढून टाकते, असे प्रतिपादन टीकाकारांनी केले आहे. हे प्रकरण राज्यसंस्थेला मनमानी अधिकार बहाल करते आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याला नकार देते.

**राज्यसंस्थेच्या धोरणासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे**

संविधानातील चौथ्या भागत अनुच्छेद ३६ ते अनुच्छेद ५१ यांमध्ये राज्यसंस्थेच्या धोरणासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे नोंदवली आहेत. भारतीय संविधानाच्या निर्मात्यांनी ही कल्पना १९३७ सालच्या आयरिश संविधानाकडून घेतली आणि आयरिश संविधानाने ही संकल्पना स्पॅनिश संविधानातून घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या तत्त्वांचे वर्णन भारतीय संविधानाची 'अभिनव वैशिष्ट्ये' असे केले होते. मार्गदर्शक तत्त्वे, आणि त्यासोबत मूलभूत अधिकार भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानाचे सार सांगणारे आहेत आणि तो संविधानाचा गाभा आहे. मार्गदर्शक तत्त्वे व मूलभूत अधिकार हा 'संविधानाचा सद्सद्विवेक' आहे, असे वर्णन ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी केले आहे.

**वैशिष्ट्ये–**

१. राज्यसंस्थेने धोरणे आखताना व कायदे करताना कोणते आदर्श विचारात घ्यायला हवेत ते 'राज्यसंस्थेच्या धोरणासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे' या शब्दप्रयोगातून सूचित होते.

२. 'भारत सरकार अधिनियम, १९३५'मध्ये नमूद केलेली 'सूचनांचे साधन' आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्या साधर्म्य आहे.

३. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आधुनिक लोकशाही राज्यसंस्थेसाठीचा एक अतिशय सर्वांगीण आर्थिक, सामाजिक व राजकीय कार्यक्रम दिलेला आहे. त्यात संविधानातील उद्देशिकेने मांडलेली न्याय, स्वातंत्र्य, समता व सहभाव हे उदात्त आदर्श साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले हे.

४. मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप न्यायविचारणीय नाही, म्हणजे त्यांचा भंग झाल्यास न्यायालय त्यांची कायदेशीर अंमलबजावणी करू शकत नाही.

५. मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप न्यायविचारणीय नसले, तरी न्यायालयांना कोणत्याही कायद्याची सांविधानिक वैधता तपासताना व ठरवताना त्यांचे सहाय्य होते.

**समान नागरी कायदा**

विवाह, घटस्फोट, दत्तक, इत्यादींसारख्या वैयक्तिक बाबींचे नियमन करणाऱ्या कायद्यांचा समान संच म्हणजे समान नागरी कायदा होय.

अनुच्छेद ४४– भारतीय राज्यक्षेत्रामध्ये सर्वत्र नागरिकांना समान नागरी कायदा लागू व्हावा, यासाठी राज्यसंस्थेने प्रयत्न करायला हवेत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**समान नागरी कायद्याच्या बाजूने केले जाणारे युक्तिवाद–**

१. एकसारखेपणा व विसंवादात घट.

२. धार्मिक आधारावरील लिंगभावात्मक भेदभाव संपवण्यामध्ये समान नागरीक अधिकार उपयुक्त ठरू शकतो.

३. देशाची धर्मनिरपेक्ष वीण अधिक घट्ट होईल.

४. हे आधुनिकतेच्या दिशेने टाकलेले एक पाऊल असेल.

५. भारतातील प्रचंड मोठ्या लोकसंख्येचे प्रशासन यातून अधिक सोपे होईल.

**समान नागरी कायद्याच्या विरोधातील युक्तिवाद–**

१. समान नागरी कायदा वैविध्याला व बहुसांस्कृतिकतेला बाधक आहे, कारण त्यात प्रत्येक जण एकाच छत्राखाली येतो.

२. समान नागरी कायदा भारतीय संविधानातील अनुच्छेद २५चा भंग करेल, असा युक्तिवाद काही टीकाकार करतात.

३. विवाह व वारसाहक्क यांच्याशी निगडीत कायदे युगानुयुगे धर्माचा भाग राहिले आहेत.

४. यातून सांप्रदायिक अशांतता निर्माण होऊ शकते.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. समान नागरी कायद्याची घाईगडबडीने अंमलबजावणी झाली तर त्याचे विपरित परिणाम होऊ शकतात.

२. टप्पाटप्प्याने पुरोगामी बदल घडवण्याची गरज आहे.

३. चांगल्या रूढी–परंपरांचे रक्षण करण्याची गरज आहे.

४. सर्व संबंधित घटकांमध्ये सहमती प्रस्थापित करण्याची गरज आहे.

**मूलभूत कर्तव्ये**

‘अनुच्छेद ५१–अ’नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाने पुढील कर्तव्यांचे पालन करायला हवे–

१) संविधानाशी बांधील राहणे आणि त्यातील आदर्श व प्रथा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) भारताच्या राष्ट्रीय संघर्षाला स्फूर्तिदायक ठरलेल्या उदात्त आदर्शांची जपणूक करणे व त्यांचे अनुसरण करणे.

३) भारताचे सार्वभौमत्व, ऐक्य व एकात्मता यांचे रक्षण करणे.

४) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचा बचाव करणे व राष्ट्रीय सेवा करणे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक वैविध्यांच्या अलाहिदा भारतातील सर्व लोकांमध्ये सामायिक बंधुत्वाच्या भावनेला व सलोख्याला चालना देणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेचा अवमान करणाऱ्या प्रथा सोडून देणे.

६) देशातील संयुक्त संस्कृतीच्या संपन्न वारशाचे मूल्य जाणून त्याचे जतन करणे.

७) वने, तलाव, नद्या व वन्यजीवन यांच्यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे व त्यांत सुधारणा करणे आणि इतर सजीवांबाबत सहानुभूती राखणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

८) वैज्ञानिक प्रवृत्ती, मानवतावाद आणि शोधक प्रेरणा विकसित करून सुधारणा घडवणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचार सोडणे.

१०)राष्ट्राचा सतत उदय व्हावा यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कृतीच्या प्रत्येक अवकाशामध्ये श्रेष्ठत्वाचे स्थान गाठण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

११)सहा ते चौदा वर्षे वयामधील मुलामुलींना शिक्षणाची संधी देणे. '८६व्या सांविधानिक दुरुस्ती अधिनियम, २००२'मध्ये या कर्तव्याची भर घालण्यात आली.

**मूलभूत कर्तव्यांच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध असणाऱ्या कायदेशीर तरतुदी–**

१. राष्ट्रध्वज, भारतीय संविधआन व राष्ट्रगीत यांच्याबाबतीत कोणताही अनादर होणार नाही, याची तजवीज करण्यासाठी 'राष्ट्रीय सन्मानचिन्हांच्या अवमानाला प्रतिबंध अधिनियम, १९७१' हा कायदा करण्यात आला.

२. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा अयोग्य वापर रोखण्यासाठी स्वातंत्र्यानंतर लगेचच 'चिन्हे व नावे (अयोग्य वापराला प्रतिबंध) अधिनियम, १९५०' हा कायदा करण्यात आला.

३. भारताची ध्वज संहिता– यामध्ये राष्ट्रध्वजाचा योग्य वापर व प्रदर्शन कसे असावे ते नमूद केले आहे.

४. भारतीय दंड संहितेमधील कलम १५३–अ– धर्म, वंश, जन्मस्थळ, निवासाचे ठिकाण, भाषा, इत्यादींवरून भिन्न समूहांमध्ये वैरभावाला चालना देणे आणि सलोखा राखण्याला बाधक ठरतील अशा पूर्वग्रहदूषित कृती करणे रोखायला हवे.

५. भारतीय दंड संहितेमधील कलम १५३–आ – राष्ट्रीय एकात्मतेबाबत पूर्वग्रहदूषित ठरतील अशी प्रतिपादने व दूषणे दंडनीय गुन्हा ठरतात.

६. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७– सांप्रदायिक संघटना बेकायदेशीर ठरवता येऊ शकते.

७. भारतीय दंड संहितेमधील कलम २९५–२९८ – धर्माशी संबंधित गुन्हे.

८. 'नागरी अधिकारांचे संरक्षण अधिनियम, १९५५'मधील तरतुदी– अस्पृश्यतेसंदर्भात शिक्षा केली जाते.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – घटनादुरुस्ती व मूलभूत संरचना

**मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.**

| प्रश्न | प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०१९ | "Parliament's power to amend the Constitution is a limited power and it cannot be enlarged into absolute power." In the light of this statement explain whether Parliament under Article 368 of the Constitution can destroy the Basic Structure of the Constitution by expanding its amending power? | संसदेच्या घटनादुरुस्तीच्या संदर्भातील मर्यादा आणि मूलभूत संरचना यांच्याशी संबंधित प्रश्न. |
| २०१३ | 'The Supreme Court of India keeps a check on arbitrary power of the Parliament in amending the Constitution.' Discuss critically. | संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावरील सर्वोच्च न्यायालयाचे नियंत्रण तसेच संविधनाचे संरक्षक म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेच्या संदर्भातील प्रश्न. |
| २०१४ | Starting from inventing the 'basic structure' doctrine, the judiciary has played a highly proactive role in ensuring that India develops into a thriving democracy. In light of the statement, evaluate the role played by judicial activism in achieving the ideals of democracy. | लोकशाही मूल्यांच्या संवर्धनातील न्यायालयीन सक्रियतेच्या भूमिकेच्या संदर्भातील प्रश्न. |

**घटनादुरुस्तीची गरज –**

आपल्याला एक अतिशय सशक्त आणि सुदृढ अशा संविधानाचा वारसा लाभला आहे. राज्यघटनेची मूलभूत चौकट आपल्या देशास अनुरूप अशीच आहे. हे देखील खरे आहे की राज्यघटनेचे निर्माते खूप दूरदर्शी होते आणि त्यांनी भविष्यातील परिस्थितीच्या संदर्भात अनेक उपाययोजना केल्या होत्या; परंतु कोणतीही राज्यघटना सर्वच संभाव्य परिस्थितींची कल्पना करून त्यासाठी तरतूद करू शकत नाही. कोणताही दस्तऐवज असा असू शकत नाही की त्यात बदल करण्याची गरज नाही.


भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांनी संराज्यघटनेला सामान्य कायद्यापेक्षा श्रेष्ठ स्थान दिले आणि भविष्यातील पिढ्या या दस्तऐवजाचा आदर करतील अशी अपेक्षा केली. त्याच वेळी, त्यांनी हे ओळखले की भविष्यात, या राज्यघटनेत सुधारणा करण्याची गरज निर्माण होऊ शकते. राज्यघटना लिहितानाही अनेक मुद्द्यांवर मतभिन्नता असल्याची जाणीव त्यांना होती. जेव्हा समाज कोणत्याही विशिष्ट मताकडे वळेल तेव्हा घटनात्मक तरतुदींमध्ये बदल करणे गरजेचे असेल. अशाप्रकारे, भारतीय राज्यघटना हे वर नमूद केलेल्या दोन्ही दृष्टिकोनांचे संयोजन आहे: राज्यघटना हा एक पवित्र दस्तऐवज आहे आणि ते एक असे साधन आहे ज्यात वेळोवेळी बदल करण्याची गरज निर्माण होऊ शकते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आपली राज्यघटना हा एक स्थिर किंवा कायमस्वरूपी असा दस्तऐवज नाही,



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

तो प्रत्येक गोष्टीबद्दलचा अंतिम शब्द नाही; तो अपरिवर्तनीय नाही.

**घटनादुरुस्तीची प्रक्रिया –**




१. घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात मंत्री किंवा खाजगी सदस्याद्वारे सादर केले जाऊ शकते आणि त्याला राष्ट्रपतींच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही.

२. विधेयक प्रत्येक सभागृहात विशेष बहुमताने, म्हणजे सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि सभागृहात उपस्थित राहणाऱ्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने मंजूर केले जाणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक सभागृहाने स्वतंत्रपणे ते विधेयक मंजूर करणे आवश्यक आहे. दोन सदनांमध्ये मतभेद असल्यास, विधेयकावर चर्चा करण्याच्या आणि ते संमत करण्याच्या उद्देशाने दोन्ही सदनांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची तरतूद नाही.

४. जर विधेयक संविधानाच्या संघीय तरतुदींमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात असेल, तर त्याला निम्म्या घटक राज्यांच्या विधिमंडळांनी साध्या बहुमताने, म्हणजे, सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या बहुसंख्य सदस्यांनी मंजूर केले पाहिजे.

५. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी रीतसर मंजूर केल्यानंतर आणि घटक राज्य विधिमंडळांनी मंजूर केल्यानंतर, ते विधेयक राष्ट्रपतींकडे संमतीसाठी सादर केले जाते.

६. विधेयकाला राष्ट्रपतींनी मंजुरी देणे आवश्यक असते. ते विधेयकाला दिलेली संमती रोखू शकत नाहीत किंवा ते विधेयक संसदेकडे पुनर्विचारासाठी परत पाठवू शकत नाहीत.

७. राष्ट्रपतींच्या संमतीनंतर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते (म्हणजे घटनादुरुस्ती कायदा) आणि कायद्याच्या तरतुदीनुसार घटनादुरुस्ती केली जाते.

**टीका –**

१. राज्यघटनेच्या संघीय पैलूंवरही घटक राज्ये स्वतःहून घटनादुरुस्ती प्रक्रिया सुरू करू शकत नाहीत.

२. बहुसंख्य घटनादुरुस्त्या केवळ संसदेद्वारे स्वतःहून साध्या किंवा विशेष बहुमताने केल्या जाऊ शकतात.

३. दुरुस्ती प्रक्रियेशी संबंधित तरतुदी खूपच गुंतागुंतीच्या आहेत. त्यामुळे ते प्रकरण न्यायव्यवस्थेपर्यंत नेण्याची मोठी



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

शक्यता असते.

४. राज्य सरकारांनी घटनादुरुस्त्यांना मान्यता देण्यासाठी कोणतीही विशिष्ट अशी कालमर्यादा निर्दिष्ट केलेली नाही.

५. अमेरिकेसारख्या राज्यघटनामध्ये घटनादुरुस्तीसाठी कोणत्याही विशेष संस्थेची तरतूद केलेली नाही.

६. घटनादुरुस्तीबाबत दोन सदनांमध्ये मतभेद झाल्यास त्यांच्या संयुक्त बैठकीची तरतूद नाही.

**महत्त्वपूर्ण घटनादुरुस्त्या –**

| घटनादुरुस्ती | तरतुदी |
|---|---|
| **पहिला घटनादुरुस्ती कायदा - १९५१** | १९५१ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकाळात पारित झालेल्या, घटनेतील पहिल्या दुरुस्तीने कलम १५, १५ (३), ४६, ३४१, ३४२, ३७२ आणि ३७६ मध्ये बदल केले, राज्यांना कोणत्याही सामाजिक प्रगतीसाठी आणि नागरिकांमधील शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी ' कोणतीही विशेष तरतूद करण्याचे अधिकार दिले गेले.<br>या दुरुस्तीनंतर, राज्याला नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि कोणताही व्यापार, व्यवसाय किंवा धंदा करण्याच्या अधिकारावर निर्बंध घालणारे कायदे लागू करण्यापासून प्रतिबंधित केले गेले. ही घटनादुरुस्ती राज्यांना कोणत्याही नागरिकाची मालमत्ता ताब्यात घेण्यास परवानगी देणारे कायदे करण्यापासून प्रतिबंधित करते. या घटनादुरुस्तीने राज्यघटनेत नवव्या अनुसूचीचा समावेश केला गेला, ज्यात अनेक अशा कायद्यांची यादी दिलेली आहे, ज्यांना न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही. |
| **चौथी घटनादुरुस्ती – १९५५** | नेहरू सरकारने १९५५ मध्ये पारित केलेल्या, चौथ्या घटनादुरुस्तीने कलम ३१, ३१अ, ३०५ आणि संविधानाच्या नवव्या अनुसूचीमध्ये बदल केला, ज्यामुळे नागरिकांच्या मालमत्तेच्या अधिकाराला मान्यता देण्यात आली. त्यात असे नमूद केले आहे की, कोणतीही मालमत्ता राज्य किंवा राज्याच्या मालकीच्या महामंडळाद्वारे जोपर्यंत ती सार्वजनिक हेतूसाठी आणि नुकसानभरपाईची तरतूद असलेल्या कायद्याच्या अंतर्गत केली जात नाही तोपर्यंत सक्तीने अधिग्रहित केली जाणार नाही. |
| **७ वा घटनादुरुस्ती - १९५६** | १९५६ मध्ये, नेहरू सरकारने सातवी घटनादुरुस्ती करून राज्यांचे अ, ब, क आणि ड या वर्गात केलेले विभाजन रद्द केले आणि भारतात केंद्रशासित प्रदेशांच्या स्थापनेची तरतूद केली गेली. |
| **२४ वा घटनादुरुस्ती कायदा - १९७१** | भारतीय राज्यघटनेची चोवीसवी घटनादुरुस्ती, ज्याला अधिकृतपणे संविधान कायदा, 1971 म्हणून ओळखले जाते, संसदेला संविधानाच्या दुरुस्तीद्वारे |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| | नागरिकांचे मूलभूत अधिकार कमी करण्याचा अधिकार देते. संविधानाच्या कोणत्याही तरतुदीत सुधारणा करण्याचा अधिकार संसदेला आहे हे स्पष्टपणे अधोरेखित करण्यासाठी कलम ३६८ मध्ये सुधारणा केली गेली. |
| **२५ वा घटनादुरुस्ती कायदा - १९७५** | चौथ्या घटनादुरुस्तीमध्ये अनेक उपकलमांचा समावेश करून भूसंपादनावर मर्यादा घालण्यात आल्या. नुकसान भरपाईची योग्य रक्कम निश्चित केली गेली असल्यास राज्याला अल्पसंख्याकांद्वारे प्रशासित शैक्षणिक संस्थेची जमीन सक्तीने संपादित करण्याची परवानगी देण्यात आली. |
| **३९ वा घटनादुरुस्ती कायदा - १९७५** | १० ऑगस्ट १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या एकोणतीसाव्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभेच्या अध्यक्षांची निवड भारतीय न्यायालयांच्या पुनर्विलोकन अधिकाराच्या कक्षेबाहेर ठेवली गेली.<br>ही घटनादुरुस्ती सन १९७५-१९७७ च्या आणीबाणीच्या काळात मंजूर झाली. |
| **४२ वा घटनादुरुस्ती कायदा - १९७६** | १. घटनेच्या प्रस्तावनेमध्ये तीन नवीन शब्द शब्दांचा (म्हणजे समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता) समावेश केला गेला.<br>२. नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला गेला. (नवीन भाग IV A).<br>३. मंत्रिमंडळाचा सल्ला मानणे राष्ट्रपतींना बंधनकारक केले गेले.<br>४. प्रशासकीय न्यायाधिकरणे आणि इतर बाबींसाठीची न्यायाधिकरणे यांच्या स्थापनेची तरतूद केली गेली (भाग १४ क चा समावेश केला गेला).<br>५. १९७१ च्या जनगणनेच्या आधारे सन २००१ पर्यंत लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या जागा गोठवण्यात आल्या.<br>६. तीन नवीन मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केली गेली. उदा., समान न्याय आणि मोफत-कायदेशीर मदत, उद्योगांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग आणि पर्यावरण, जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण.<br>७. भारताच्या भूभागाच्या एखाद्या भागात राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेची तरतूद केली गेली.<br>८. राज्य सूचीतील पाच विषय समवर्ती सूचीत टाकले गेले. उदा., शिक्षण, जंगले, वन्य प्राणी आणि पक्षी संरक्षण, वजन व मापे आणि न्याय प्रशासन, सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये वगळता सर्व न्यायालयांची घटना आणि रचना. |
| **४४ वा घटनादुरुस्ती कायदा - १९७८** | १. मंत्रिमंडळाचा सल्ला पुनर्विचारासाठी परत पाठवण्याचा अधिकार राष्ट्रपतींना दिला गेला. परंतु, त्यांनी पुनर्विचार करून परत पाठविलेला सल्ला मानणे राष्ट्रपतींना बंधनकारक करण्यात आले.<br>२. राष्ट्रीय आणीबाणीच्या संदर्भात 'अंतर्गत अशांतता' या शब्दाची जागा |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| | 'सशस्त्र बंडाळी' ने घेतली.<br>३. मंत्रिमंडळाच्या लेखी शिफारसीनुसारच राष्ट्रपतींनी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करणे बंधनकारक केले गेले.<br>४. मूलभूत हक्कांच्या यादीतून मालमत्तेचा अधिकार वगळला गेला आणि तो फक्त कायदेशीर अधिकार बनवला गेला.<br>५. परंतु कलम २० आणि २१ द्वारे हमी दिलेले मूलभूत अधिकार राष्ट्रीय आणीबाणीच्या काळातही निलंबित केले जाऊ शकत नाहीत. |
| **५२ वा घटनादुरुस्ती कायदा - १९८५** | राजकीय पक्षांतरांवर कडक कारवाई करण्याच्या हेतूने राजीव गांधी सरकारने १९८५ मध्ये बावन्नवी घटनादुरुस्ती केली, ज्याद्वारे दहाव्या अनुसूचीतील तरतुदींनुसार संसद, विधानसभा किंवा राज्याच्या विधान परिषदेच्या सदस्यांना अपात्र ठरविता येऊ शकत होते. |
| **६१ वा घटनादुरुस्ती कायदा - १९८८** | राजीव गांधी सरकारने १९८८ मध्ये मंजूर केलेल्या, ६० व्या घटनादुरुस्तीने मतदानासाठी मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केले आणि मतदानाचा अधिकार हा घटनात्मक अधिकार बनला. |
| **८४ वा घटनादुरुस्ती कायदा - २००१** | २००१ च्या ८४ व्या घटनादुरुस्ती कायद्यानुसार, २०२६ नंतर किंवा किमान २०३१ नंतरच्या पहिल्या जनगणनेपर्यंत मतदारसंघाच्या सीमा गोठविल्या गेल्या. १९७१ च्या जनगणनेस सध्याच्या लोकसभेच्या जागा वाटपाचा आधार मानले जात होते. |
| **८७ वा घटनादुरुस्ती कायदा - २००३** | घटना (८७ वा दुरुस्ती) कायदा, २००३ अन्वये राज्यांमधील प्रादेशिक मतदारसंघांचे समायोजन आणि तर्कसंगतीकरण हे २००१ च्या ८४ व्या दुरुस्ती कायद्याने पूर्वी तरतूद केल्याप्रमाणे १९९१ च्या जनगणनेच्या आधारे नाही, तर २००१ च्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आकड्यांच्या आधारे करण्याची तरतूद केली गेली. |
| **९१ वा घटनादुरुस्ती कायदा - २००३** | १. केंद्रीय मंत्रिमंडळातील पंतप्रधानांसह एकूण मंत्र्यांची संख्या लोकसभेच्या एकूण संख्याबळाच्या १५% पेक्षा जास्त नसावी.२. पक्षांतराच्या कारणास्तव अपात्र ठरलेल्या कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असलेला संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य देखील मंत्री म्हणून नियुक्त होण्यासाठी अपात्र ठरविला जाईल.<br>३. एखाद्या राज्यातील मंत्रिमंडळातील मुख्यमंत्र्यांसह एकूण मंत्र्यांची संख्या त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण संख्याबळाच्या १५% पेक्षा जास्त नसावी. परंतु, घटक राज्यात मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांची संख्या १२ पेक्षा कमी नसावी.<br>४. पक्षांतराच्या कारणास्तव अपात्र ठरलेल्या कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असलेला राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| | देखील मंत्री म्हणून नियुक्त होण्यासाठी अपात्र ठरविला जाईल.<br>६. विधिमंडळ पक्षाचे एक तृतीयांश सदस्य पक्षातून फुटून निघाल्यास त्यांना अपात्रतेपासून सूट मिळण्याशी संबंधित दहाव्या अनुसूची (पक्षांतरविरोधी कायदा) ची तरतूद हटवण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, पक्षांतर करणाऱ्यांना फुटीच्या कारणास्तव यापुढे संरक्षण मिळणार नाही. |
| **१०० वा घटनादुरुस्ती कायदा - २०१५** | बांगलादेशसोबत काही एन्क्लेव्ह प्रदेशांची देवाणघेवाण. भारत आणि बांगलादेश यांच्यातील भू-सीमा करारा (LBA) वर स्वाक्षरी झाल्यामुळे एन्क्लेव्हमधील नागरिकांना नागरिकत्वाचे अधिकार प्रदान केले गेले. |
| **१०१ वा घटनादुरुस्ती कायदा - २०१६** | आंतरराज्यीय व्यापार किंवा वाणिज्यामध्ये वस्तू आणि सेवा करा (GST) संदर्भात कायदे करण्यासाठी संसदेला अधिकार देण्यासाठी अनुछेद २४६ मध्ये दुरुस्ती केली गेली. या दुरुस्तीन्वये राज्य विधिमंडळे केंद्र किंवा कोणत्याही घटक राज्याने लादलेल्या वस्तू आणि सेवा कराच्या संदर्भात कायदे करू शकतात. |
| **१०२ वा घटनादुरुस्ती कायदा - २०१८** | राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा. |
| **१०३ वा घटनादुरुस्ती कायदा - २०१९** | कलम १५ च्या कलम (४) आणि (५) अंतर्गत न येणाऱ्या म्हणजे - सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC), अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) अंतर्गत न येणाऱ्या नागरिकांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) कमाल १० टक्के आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या (EWS) कोट्याच्या या व्याख्येला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे, हे न्यायालय लवकरच या याचिकांवर सुनावणी करणार आहे. |
| **१०५ वा घटनादुरुस्ती कायदा – २०२१** | १०५ व्या घटनादुरुस्ती कायद्याने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (SEBC) वर्गांची यादी तयार करण्याचे राज्य सरकारचे अधिकार पुनस्थापित केले गेले. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, १०२ घटनादुरुस्ती कायद्यानुसार राज्य सरकारांना SEBC वर्गाची ओळख करण्याचा अधिकार नाही. |

## मूलभूत संरचनेचा सिद्धांत

भारतीय राज्यघटनेच्या उत्क्रांतीवर दीर्घकाळ प्रभाव टाकणारी एक गोष्ट म्हणजे संविधानाच्या मूलभूत संरचनेचा सिद्धांत. केशवानंद भारती या प्रसिद्ध खटल्यात न्यायव्यवस्थेने हा सिद्धांत मांडला. या निर्णयाने खालील प्रकारे संविधानाच्या उत्क्रांतीत योगदान दिले आहे :

घटनादुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारासाठी विशिष्ट मर्यादा निश्चित केल्याआहेत. त्यात म्हटले आहे की, कोणतीही घटनादुरुस्ती संविधानाच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन करू शकत नाही ;

ते संसदेला संविधानाच्या कोणत्याही आणि सर्व भागांमध्ये (या मर्यादेत) सुधारणा करण्याची परवानगी देते ; आणि त्यातून घटनादुरुस्तीमुळे मूलभूत संरचनेचे उल्लंघन होते का आणि मूलभूत संरचनेचे काय होते हे ठरवण्याचा अंतिम अधिकार न्यायपालिकेला दिला गेला आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**तर्क –**

त्यात शब्द आणि अर्थ यातील फरक अंतर्भूतआहे. न्यायालय या निष्कर्षापर्यंत पोहोचले की, एखादा मजकूर किंवा दस्तऐवज वाचताना आपण त्या दस्तऐवजामागील हेतू लक्षात घेऊन त्याचा आदर केला पाहिजे. कायद्याचा केवळ मजकूर हा कायदा किंवा दस्तऐवज तयार केलेल्या सामाजिक परिस्थिती आणि आकांक्षांपेक्षा जास्त महत्त्वाचा नाही. न्यायालय मूलभूत संरचनेकडे असे काहीतरी म्हणून पाहत होते ज्याशिवाय राज्यघटनेची अजिबात कल्पनाच करता येत नाही अथवा ज्याशिवाय तिला अर्थच नाही. हे संविधानातील लिखित मजकूर आणि त्याचा गर्भितार्थ यांच्यात समतोल साधण्याचा प्रयत्न करण्याचे उदाहरण आहे.

**मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास –**

१. शंकरी प्रसाद खटला, १९५१ – सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, कलम ३६८ अंतर्गत संविधानात दुरूस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारात मूलभूत अधिकारांमध्ये दुरूस्ती करण्याचा अधिकारदेखील समाविष्ट आहे.

२. गोलकनाथ खटला, १९६७ – सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत अधिकारांना 'अतिपरिवर्तनीय आणि अपरिवर्तनीय' स्थान दिले आहे आणि म्हणून, संसद यापैकी कोणतेही अधिकार कमी करू शकत नाही किंवा काढून घेऊ शकत नाही असा निर्णय दिला.

३. २४ वा घटनादुरुस्ती कायदा – कलम ३६८ अन्वये नागरिकांचे कोणतेही मूलभूत अधिकार कमी करण्याचा किंवा काढून घेण्याचा अधिकार संसदेला आहे आणि अशी कृती कलम १३ च्या अर्थानुसार कायदा होणार नाही अशी तरतूद केली गेली.

४. केशवानंद भारती खटला, १९७३ – सर्वोच्च न्यायालयाने २४ वी घटनादुरुस्ती वैध ठरवली आणि म्हटले की, संसद ही घटनेच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन न करता मूलभूत अधिकारांमध्ये दुरूस्ती करू शकते.

५. ४२ वा घटनादुरुस्ती कायदा १९७६ – या कायद्याने कलम ३६८ मध्ये दुरुस्ती केली गेली आणि घोषित केले की, संसदेच्या विधायी शक्तीवर कोणतीही मर्यादा नाही आणि कोणत्याही मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनासह कोणत्याही कारणास्तव कोणत्याही न्यायालयात कोणत्याही दुरुस्तीला आव्हान दिले जाऊ शकत नाही.

६. मिनर्व्हा मिल्स खटला, १९८० – सर्वोच्च न्यायालयाने ४२ व्या घटनादुरुस्तीची तरतूद अवैध ठरवली ज्यात न्यायिक पुनरावलोकनाला घटनेचे मूलभूत वैशिष्ट्य म्हणून अमान्य करण्यात आले.

**मूलभूत संरचना सिद्धांतावरील टीका –**

- याला घटनात्मक आधार नाही.
- समीक्षकांचा असा युक्तिवाद आहे की हा सिद्धांत लोकशाही पद्धतीने निवडलेल्या सरकारवर न्यायपालिकेचे मत/दृष्टिकोन लादतो.
- मूलभूत संरचनेच्या घटकांबाबत सुस्पष्टता नाही. यामुळे हा सिद्धांत संदिग्ध स्वरूपाचा होतो.
- मूलभूत संरचनेतील घटकांचे निर्धारण करण्याचे काम पूर्णपणे न्यायव्यवस्थेवर सोपविले आहे.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – संघराज्य प्रणालीतील समस्या आणि आव्हाने यांच्याशी संबंधित मुद्दे.

मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०२१ | The jurisdiction of the Central Bureau of Investigation (CBI) regarding lodging an FIR and conducting a probe within a particular state is being questioned by various States. However, the power of States to withhold consent to the CBI is not absolute. Explain with special reference to the federal character of India. | केंद्र आणि राज्यांमधील अधिकारांच्या विभाजनाशी संबंधित मुद्द्यांवर आधारित प्रश्न. |
| २०२० | How far do you think cooperation, competition and confrontation have shaped the nature of federation in India? Cite some recent examples to validate your answer | संघराज्यातील प्रचलित प्रवृत्ती ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०२० | The Indian constitution exhibits centralizing tendencies to maintain unity and integrity of the nation. Elucidate in the perspective of the Epidemic Diseases Act, 1897; The Disaster Management Act, 2005 and recently passed Farm Acts. | भारतीय राज्यघटनेतील केंद्रीकरण करण्याची प्रवृत्ती अधोरेखित करणारा हा प्रश्न आहे. |
| २०१९ | From the resolution of contentious issues regarding distribution of legislative powers by the courts, 'Principle of Federal Supremacy' and 'Harmonious Construction' have emerged. Explain. | संघीय वर्चस्व , सुसंवादी संरचना या घटकांवर आधारित प्रश्न. |
| २०१७ | Explain the salient features of the constitution (One Hundred and First Amendment) Act, 2016. Do you think it is efficacious enough 'to remove cascading effect of taxes and provide for common national market for goods and services'? | वित्तीय संघराज्यवाद या घटकावर आधारित प्रश्न. |
| २०१६ | To what extent is Article 370 of the Indian Constitution, bearing marginal note "Temporary provision with respect to the State of Jammu and Kashmir", temporary? Discuss the future prospects of this provision in the context of Indian polity. | जम्मू आणि काश्मीरच्या संदर्भातील बहुचर्चित कलम ३७० वर आधारित प्रश्न. |
| २०१५ | The concept of cooperative federalism has | संघराज्याशी संबंधित समस्या |
| | been increasingly emphasized in recent years. Highlight the drawbacks in the existing structure and the extent to which cooperative federalism would answer the shortcomings. | आणि ते सोडवण्यासाठी सहकारी संघराज्याची भूमिकेशी संबंधित मुद्द्यांवर आधारित प्रश्न. |
| २०१४ | Though the federal principle is dominant in our Constitution and that principle is one of its basic features, it is equally true that federalism under the Indian Constitution leans in favor of a strong Centre, a feature that militates against the concept of strong federalism. Discuss. | भारतीय संघराज्याच्या केंद्रीभूत प्रवृत्ती या प्रश्नामागील प्रेरणा आहेत. |
| २०२२ | While the national political parties in India favor centralisation, the regional parties are in favor of State autonomy." Comment. | हा प्रश्न.केंद्र-राज्य वादाशी निगडित आहे. |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

मागील वर्षांमधील  परीक्षांमध्ये ज्या मुख्य विषयांच्या अनुषंगाने प्रश्न विचारले गेले ते म्हणजे – भारतीय राज्यघटनेच्या केंद्रीभूत प्रवृत्ती, केंद्र–राज्य संघर्ष, सहकारी संघराज्य. या सर्व विषयांवर स्वतंत्रपणे चर्चा करूया.

**संघराज्यवाद –**

ही सरकारची एक अशी  प्रणाली आहे ज्यामध्ये केंद्र सरकार आणि अनेक प्रादेशिक सरकारांमध्ये अधिकारांची विभागणी केली जाते.

**भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये –**

१. लिखित संविधान.

२. घटनेची सर्वोच्चता.

३. द्विगृही कायदेमंडळ व्यवस्था इळलराशीरश्रळी.

४. स्वतंत्र न्यायव्यवस्था.

५. राज्यव्यवस्थेच्या दोन संचांचा समावेश.

६. केंद्राकडे कायद्याचे शेषाधिकार.

७. केंद्राद्वारे घटक राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती.

८. केंद्र आणि राज्यांच्या कायद्यांसाठी एकात्मिक न्यायव्यवस्था.

९. राज्यसभेत घटक राज्यांचे असमान प्रतिनिधित्व.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतीय संघराज्यवादाच्या केंद्रीभूत प्रवृत्ती –**

| | |
|---|---|
| १. अनुच्छेद २४८ | केंद्राकडे कायद्याचे शेषाधिकार |
| २. अनुच्छेद २४९ | राष्ट्रीय हितासाठी राज्य सूचीतील विषयांवर कायदे करण्यासाठी राज्यसभेला विशेष अधिकार. |
| ३. अनुच्छेद २५० | आणीबाणीच्या काळात राज्य सूचीतील कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा संसदेचा अधिकार. |
| ४. अनुच्छेद २५१ | विसंगतीच्या बाबतीत संसदेचा कायदा राज्याच्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ ठरण्याची तरतूद. |
| ५. अनुच्छेद २५३ | आंतरराष्ट्रीय कराराला लागू करण्यासाठी संसदेला कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार. |
| ६. अनुच्छेद २५६ | राज्यांनी संसदेने केलेल्या कायद्यांचे पालन करणे. |
| ७. अनुच्छेद ३५२ | राष्ट्रीय आणीबाणी |
| ८. अनुच्छेद ३५६ | राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोलमडल्यामुळे राज्य सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा केंद्राचा अधिकार |
| ९. अनुच्छेद ३६० | आर्थिक आणीबाणी. |

**१. भारतीय संघराज्याशी संबंधित मुद्दे/समस्या –**

१. राज्यांच्या कर्ज काढण्याच्या क्षमतेवर मर्यादा – अनुच्छेद २९३ – रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, राज्ये भांडवली खर्चाच्या २/३ भाग खर्च करतात. त्यामुळे कर्ज घेण्याची मर्यादा राज्यांच्या खर्चावर नियंत्रण आणते.

२. बाजारातील कर्जासाठी केंद्राकडून राज्यांना विभेदात्मक व्याज देणे भाग पाडले जाते (७% च्या तुलनेत सुमारे १०%).

३. समवर्ती सूचीचा वाढता वापर – तामिळनाडू आणि केंद्र सरकार यांच्यातील छएएढ चा मुद्दा.

४. उपकर आणि अधिभाराचा जास्त हिस्सा (१९८० मध्ये २.३%, २०२० मध्ये १५%) सेस आणि अधिभार लावण्याचा अधिकार केंद्राकडे आहे जो केंद्रीय वितरणयोग्य साठ्याचा (Divisible Pool) भाग नाही.

५. नियोजन आयोग बरखास्त केल्याने अनुच्छेद २८२ अंतर्गत राज्यांना दिले जाणारे स्वैच्छिक अनुदान बंद झाले आहे.

६. केंद्र पुरस्कृत योजना – राज्यांच्या कार्यात्मक आणि परिचालन स्वायत्ततेवर परिणाम करतात; कारण केंद्र सरकारला नियम तयार करण्याचा आणि कोणत्या बाबींसाठी निधी वापरायचा हे निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे.

७. राज्यांमधील वाढते सीमा आणि नदी विवाद. उदा., बेळगाववरून महाराष्ट्र व कर्नाटकातील विवाद.

८. वाढता प्रादेशिकतावाद – नवीन राज्यांची मागणी – विदर्भ, गोरखालँड.

**केंद्र सरकारच्या वाढत्या हस्तक्षेपाची उदाहरणे –**

१. आरोग्य – महामारी रोग कायदा, १८९७ मध्ये सुस्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि निर्देशाचा अभाव असल्यामुळे केंद्र सरकारला राज्यसरकारांच्या अखत्यारित येणार्या सार्वजनिक आरोग्य या विषयाबाबत कायदा करण्याचा अमर्याद अधिकार मिळाला – कोविडच्या पहिल्या लाटेदरम्यान राज्यांशी सल्लामसलत न करता राष्ट्रीय लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली.

२. शिक्षण – राज्य अनुदानित महाविद्यालयांमध्ये केंद्रीय कोटा.

३. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ – उर्ध्व ते निम्न स्तर दृष्टिकोन (टॉप डाउन अॅप्रोच) – अनुच्छेद २४८ (केंद्राला अवशिष्ट अधिकारांची तरतूद) अंतर्गत अधिनियमित – आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चा अनुच्छेद ७२ हा राज्यांचे अधिकार लक्षणीयरीत्या कमी करतो आणि केंद्र सरकारला अधिरिक्त अधिकार देतो.

**इतर विविध मुद्दे आणि पुंच्छी आयोगाच्या शिफारशी**

| **मुद्दे** | **पुंच्छी आयोगाच्या शिफारशी** |
|---|---|
| **१. कायदेविषयक अधिकार -** शेषाधिकार, समवर्ती सूची, राज्यपालांद्वारे विधेयके राखून ठेवली जाणे. | केंद्र आणि राज्यांनी समवर्ती सूचीबाबत व्यापक सहमती विकसित केली पाहिजे. केंद्राने शेषाधिकारातील विषयांवर अत्यंत संयम पाळावा. |
| **२. अनुच्छेद ३५६ -** राष्ट्रपती राजवट लादणे. | एस. आर. बोम्मई खटल्यातील मार्गदर्शक तत्त्वांची पूर्ण अंमलबजावणी. विधिमंडळात बहुमत चाचणीशिवाय सरकार बरखास्त केले जाऊ नये. |
| **३. राज्यांची परिषद -** असमान प्रतिनिधित्व | घटनादुरुस्तीद्वारे त्यात समानता आणली पाहिजे. |
| ४. राज्यपालांची भूमिका | पात्रता, निश्चित कालावधी, विधायकांवर निर्णय घेण्यासाठी ६ महिन्यांची कालमर्यादा निधारित करावी. |

**सरकारिया आयोगाच्या महत्त्वाच्या शिफारशी (पुढचे पाऊल) –**

१. कर आकारणी वगळता उर्वरित शेषाधिकार समवर्ती सूचीमध्ये ठेवले पाहिजेत.

२. केंद्राने समवर्ती सूचीतील विषयांवर आधी कायदे करणार्या राज्यांशी खुलेपणाने सल्लामसलत करावी.

३. सामान्यतः, केंद्राने व्यापक राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनातून समवर्तीतील अशाच विषयांवर लक्ष द्यावे ज्यांच्या संदर्भात धोरण आणि कृतीची एकसमानता आवश्यक असते आणि उर्वरित विषय राज्याच्या कृतीसाठी सोडून द्यावे.

४. विचारविनिमय आणि चर्चेचे व्यासपीठ असलेल्या आंतर–राज्य परिषदांना बळकट करणे.

५. अनुच्छेद ३५६ बाबत अशी शिफारस करण्यात आली होती की, जेव्हा इतर सर्व पर्याय एखाद्या राज्यातील घटनात्मक यंत्रणा कोलडल्यापासून प्रतिबंधित करण्यात किंवा तिची पुनर्स्थापना करण्यात इतर सर्व पर्याय अयशस्वी ठरतात तेव्हा अशा प्रकरणांमध्ये, शेवटचा उपाय म्हणून अत्यंत संयमाने या कलमाचा वापर करावा.

**इतर विविध सूचना –**

१. राज्य सरकारांशी सल्लामसलत करून केंद्र पुरस्कृत योजनांचे (उडड) आर्थिक तर्कसंगतीकरण करणे.

२. राज्य वित्त आयोगांच्या कामकाजात सुधारणा करणे.

३. ७ व्या अनुसूचीमध्ये सुधारणा करणे आणि राज्यांना अधिक अधिकार देणे.

४. अनुच्छेद २९३ मध्ये सुधारणा करून निधी उभारण्यासाठी राज्यांना अधिक आर्थिक स्वायत्तता प्रदान करणे.

५. निधीचे स्वेच्छाधीन हस्तांतरण कमी करणे, विशेषतः उडड द्वारे दिले गेलेले.

६. केंद्रीय कायद्याच्या अंमलबजावणीसाठीच्या खर्चाची राज्यांवरील जबाबदारी संपूर्णपणे केंद्र सरकारने उचलली पाहिजे.

७. राज्यांच्या राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन (ऋ्रइच्) कायद्यातील वित्तीय तुटीची राज्य–विशिष्ट लक्ष्ये.

**भारतीय संघराज्याच्या उत्क्रांतीचे तीन व्यापक टप्पे –**

१. १९६७ पूर्वी – कोणताही संघर्ष नाही.

२. १९६७–१९९० – संघर्षाचा कालखंड – राज्य सरकारे बरखास्त करणे, राष्ट्रपती राजवट लागू करणे.

३. १९९० नंतर – निवडणुकीच्या राजकारणामुळे सहकार्य (युती सरकारे)



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**सहकारी संघराज्यवाद व स्पर्धात्मक संघराज्यवाद**

| सहकारी संघराज्यवाद | स्पर्धात्मक संघराज्यवाद |
|---|---|
| १. सहकारी संघराज्यवादाची संकल्पना केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील क्षैतिज संबंध दर्शवते. याचा मूलत: अर्थ असा आहे की संघराज्य तसेच राज्य स्तरावरील विधिमंडळे ही व्यापक सार्वजनिक हितासाठी एकमेकांशी सहकार्य करतात.<br>२. केंद्र आणि राज्य सरकारे समान राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनाने प्रेरित होतात.<br>३. अत्यावश्यक सेवांची किमान उपलब्धता आणि सर्व व्यक्तींसाठी राष्ट्रीय स्तरावर स्वीकार्य राहणीमान यांची सुनिश्चिती करते.<br>४. सहकारी संघराज्यामुळे विविध स्तरांवर सरकारकडून सर्व उपलब्ध संसाधने समन्वित मार्गाने उभारणे शक्य होते.<br>५. सहकारी संघराज्यात संसाधनांची देवाणघेवाण सुरळीतपणे होते. | १. स्पर्धात्मक संघराज्यात, राज्ये आपापसात स्पर्धा करताना केंद्र सरकारशी ऊर्ध्व स्वरूपाचे संबंध स्थापित करतात. मुळात, घटकराज्ये ही त्यांच्या विकासात्मक उपक्रमांना मदत करण्यासाठी निधी आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी वैयक्तिकरित्या प्रयत्न करतात.<br>२. हे सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करते आणि बहुविध घटक राज्यांमध्ये विकासाच्या यशस्वी प्रारूपांचा वापर करण्यास मदत करते.<br>३. विकासाद्वारे राज्या-राज्यांतील आणि राज्यांतर्गत असमानता कमी करण्यात मदत होते.<br>४. सर्वांसाठी एकच सामाईक धोरणाऐवजी विविध राज्यांसाठी त्यांच्या स्वतःच्या प्राधान्यांच्या आधारावर विविध धोरणांचा अवलंब.<br>५. प्रत्येक राज्य स्वनिधीसह आपल्या शहरांच्या विकासासाठी स्वतःची धोरणे तयार करेल. ही संकल्पना राज्यांमध्ये शिस्तीला प्रोत्साहन देते. |

असे निर्विवादपणे म्हणता येईल की, संघराज्य व्यवस्थेचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी सहकार्य ही गुरुकिल्ली आहे. तथापि, याला राज्यांमधील सकारात्मक स्पर्धेची जोड दिल्यास त्यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकासाला चालना मिळेल.

**आंतरराज्य संबंध**

**आंतरराज्य जलविवाद –**

भारतात २५ प्रमुख नदी खोरी आहेत, बहुतेक नद्या राज्यांमधून वाहतात. नदीचे खोरे ही सामायिक संसाधने असल्याने, नदीच्या पाण्याचे जतन, न्याय्य वितरण आणि शाश्वत वापरासाठी केंद्राच्या पुरेशा सहभागासह राज्यांमध्ये समन्वित दृष्टिकोन असण्याची आवश्यकता आहे. भारताच्या संघराज्यीय राजकीय संरचनेत, आंतर–राज्य विवादांच्या संघीय निराकरणासाठी दोन स्तरांवर केंद्र सरकारच्या सहभागाची आवश्यकता असते : विवाद करणार्या राज्यांमध्ये आणि केंद्र आणि राज्यांमध्ये.

केंद्राकडे सोपवलेल्या प्रमुख जलसंबंधित मुद्द्यांपैकी एक, भारतातील आंतर–राज्य नदी विवादांची हाताळणी आंतर–राज्य नदी जल विवाद कायदा, १९५६ द्वारे केली जाते. या कायद्यातील सुधारणा विधेयकाला २०१९ मध्ये लोकसभेने मंजुरी दिली होती; परंतु त्याला संसदेच्या वरिष्ठ सभागृहाची अद्यापही मंजुरी मिळालेली नाही.

**भारतातील नदी जल विवादांची काही उदाहरणे**

| विवादाशी संबंधित नद्या | सहभागी राज्ये |
|---|---|
| १. कावेरी नदी | कर्नाटक आणि तामिळनाडू. |
| २. सतलज-यमुना लिंक कालवा | पंजाब आणि हरियाणा |
| ३. कृष्णा नदी | कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा |
| ४. महानदी | कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा |

**नदी जल विवाद कसे सोडवले जाऊ शकतात?**

१. अधिनियमांतर्गत, कोणतेही राज्य इतर राज्यांबरोबरचा नदी जलविवाद निराकरणासाठी न्यायाधिकरणाकडे पाठवण्याची विनंती केंद्राला करू शकते.

२. वाटाघाटींनी वाद मिटवता येत नाही असे केंद्राला वाटत असल्यास, ते तक्रारीच्या एका वर्षाच्या आत असे जल विवाद न्यायाधिकरण स्थापन करू शकते.

३. न्यायाधिकरणाने विवादावर तीन वर्षांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक आहे, ही कालमर्यादा दोन वर्षांनी वाढविले जाऊ शकते.

४. तथापि, जर एखादे प्रकरण पुन्हा फेरविचारासाठी न्यायाधिकरणाकडे पाठवले गेले, तर त्याने एक वर्षाच्या आत केंद्राकडे अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. आवश्यकता वाटल्यास ही कालमर्यादा वाढविली जाऊ शकते.

५. न्यायाधिकरणाचे सर्व निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतात. हे निर्णय अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यानंतर ते सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणेच प्रभावी होतात.

६. अशा न्यायाधिकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र एक योजना तयार करू शकते. देशातील प्रत्येक नदीच्या खोर्‍याची डेटा बँक ठेवण्याचे कामही या संस्थेकडे आहे.

आंतर–राज्य नदी पाणी विवाद (सुधारणा) विधेयक, २०१९ मार्फत सर्व विद्यमान न्यायाधिकरण विसर्जित करून आणि चालू असलेले विवाद आंतर–राज्य नदी जल विवाद न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित करून ही यंत्रणा सुव्यवस्थित करण्याचे प्रस्तावित आहे. या न्यायाधिकरणात अनेक खंडपीठे असू शकतात. कोणत्याही नदीच्या वादासंदर्भात केंद्र सरकारचे सदस्य, तज्ज्ञ व्यक्ती आणि प्रत्येक सहभागी राज्याच्या सदस्यांसोबत एका वर्षाच्या आत समस्या सोडवण्यासाठी विवाद निराकरण समिती स्थापन करते, जी सहा महिन्यांनी वाढवली जाऊ शकते.

समितीने न सोडवलेले विवाद न्यायाधिकरणाकडे पाठवले जातील, ज्यात केंद्र सरकारचे मंत्री किंवा नामनिर्देशित व्यक्ती आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असतील. न्यायाधिकरणाने एका वर्षाच्या आत कोणत्याही विवादावर निर्णय घेणे बंधनकारक आहे आणि त्याचा निर्णय अंतिम आणि संबंधित पक्षांवर बंधनकारक असेल. तसेच, न्यायाधिकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्राला एक योजना तयार करणे बंधनकारक आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**आंतर–राज्य परिषद (Inter-State Council) :**

आंतर–राज्य परिषद ही एक घटनात्मक संस्था आहे ज्यामध्ये केंद्र सरकारचे प्रतिनिधी तसेच राज्यांचे मुख्यमंत्री असतात. देशाचे पंतप्रधान  हे या परिषदेचे अध्यक्ष असतात आणि त्यात काही केंद्रीय मंत्र्यांचाही कायमस्वरूपी समावेश असतो. अशा प्रकारे आंतर–राज्य परिषद नवीन जीएसटी पकरषदेपेक्षा खूप वेगळी आहे, ज्याचे सदस्य हे त्यांच्या निवडलेल्या राजकीय प्रमुखांऐवजी घटक राज्यांचे अर्थमंत्री हे असतात. तिचे स्वरूप वित्त आयोगापेक्षाही वेगळे आहे,. वित्त आयोगाचे सदस्य हे मुख्यत्वे तांत्रिकदृष्ट्या तज्ज्ञ व्यक्ती असतात ज्यांना करांच्या वितरणासाठी धोरण तयार करण्याचे काम दिले जाते.

संविधानाच्या अनुच्छेद २६३ मध्ये भारताच्या राष्ट्रपतींद्वारे आंतर–राज्य परिषद आणि तिच्या स्थापनेच्या संदर्भातील तरतुदी दिलेल्या आहेत. आंतर–राज्य परिषदेकडे 'राज्यांमधील विवादांची चौकशी करणे आणि सल्ला देणे, राज्ये किंवा केंद्र आणि राज्यांमध्ये समान हितसंबंध असलेल्या विषयांवर विचारविनिमय करणे आणि सुयोग्य अशा समन्वित धोरण आणि कृतीसाठी कोणत्याही विषयावर शिफारस करणे' ही कार्ये सोपविली गेली आहेत.

**आंतर–राज्य परिषदेच्या कामकाजाशी संबंधित समस्या –**

१. नियतकालिक बैठका नाहीत – १९९० मध्ये स्थापन झाल्यापासून आंतर–राज्य परिषदेच्या फक्त १२ बैठका झाल्या आहेत. २००६ मधील १० वी बैठक आणि २०१६ मधील ११ वी बैठक यामध्ये एक दशकाचे अंतर होते आणि परिषदेची नोव्हेंबर २०१७ मध्ये पुन्हा बैठक झाली.

२. कायमस्वरूपी सचिवालय नाही.

३. कोणतेही विशिष्ट अधिकार नाहीत – फक्त एक चर्चा गट असे तिचे स्वरूप आहे.

४. राजकीय सहमतीचा अभाव.

**आंतरराष्ट्रीय उदाहरणे –**

१. युरोपियन युनियनसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये कर धोरणांचे समन्वय साधण्यासाठी आर्थिक आणि वित्तीय व्यवहार परिषद असते.

२. ऑस्ट्रेलियातील घटक राज्यांनी सन २००५ मध्ये एकत्र येऊन ऑस्ट्रेलियन फेडरेशनसाठी कॅनबेरामध्ये त्यांच्या हितसंबंधांचे संयुक्तपणे प्रतिनिधित्व करण्यासाठी परिषद स्थापन केली.

३. कॅनडाच्या १३ प्रांत आणि प्रदेशांचे प्रमुख फेडरेशनच्या परिषदेचा भाग म्हणून एकत्र येऊन बैठकांमध्ये भाग घेतात.

४. राज्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करणार्या मजबूत द्वितीय गृहासह जर्मन फेडरेशनचे कार्य करते.

**पुढचे पाऊल –**

१. परिषद अद्याप फक्त एक चर्चा गट आहे, परंतु भविष्यात संघराज्यीय समन्वयामध्ये त्याच्या म्हणण्यास महत्त्व असले पाहिजे.

२. जीएसटी कौन्सिलमध्ये एक नाविन्यपूर्ण मतदान रचना आहे, ज्यामध्ये केंद्र सरकारला एक तृतीयांश मताधिकार आहे, तर उर्वरित मताधिकाराचे वाटप घटक राज्यांमध्ये त्यांच्या लोकसंख्येचा किंवा अर्थव्यवस्थेचा आकार

विचारात न घेता समान रीतीने केलेले आहे.

३. अधिक सक्षम आंतर–राज्य परिषदेसाठी हा एक पर्याय आहे.

४. राज्या–राज्यांमधील संघर्ष व विवादांची प्रभावीपणे हाताळणी करण्यासाठी आंतर–राज्य परिषदेस एक प्रमुख संस्था म्हणून पुढे आणायचे असेल तर, सर्वप्रथम तिच्या नियमित बैठकांचे वेळापत्रक तयार करणे गरजेचे आहे.

५. परिषदेला कायमस्वरूपी सचिवालय देखील असणे गरजेचे आहे, जे या परिषदेच्या नियमित बैठका घेऊन त्या अधिक फलदायी करण्याकडे लक्ष देईल.

भारतीय संघराज्यात सध्या एक संस्थात्मक पोकळी आहे – आणि आंतरराज्यीय संघर्ष हाताबाहेर जाण्यापूर्वी ती भरून काढणे गरजेचे आहे.

## आणीबाणीविषयक तरतुदी

आणीबाणीविषयक तरतुदी संविधानाच्या भाग दतखखख मध्ये, कलम ३५२ ते ३६० मध्ये समाविष्ट आहेत. या तरतुदी केंद्र सरकारला कोणत्याही असामान्य परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यास सक्षम करतात. देशाचे सार्वभौमत्व, एकता, अखंडता आणि सुरक्षा, लोकशाही राजकीय व्यवस्था आणि राज्यघटनेचे रक्षण करणे हा या तरतुदींचा संविधानात समावेश करण्यामागील तर्कशुद्ध हेतू आहे.

### १. राष्ट्रीय आणीबाणी

| | |
|---|---|
| **उद्घोषणेसाठीची कारणे** | कलम ३५२ अन्वये राष्ट्रपती हे राष्ट्रीय आणीबाणी तेव्हा जाहीर करू शकतात जेव्हा भारताची किंवा त्याच्या काही भागाची सुरक्षा युद्ध किंवा बाह्य आक्रमण किंवा सशस्त्र बंडामुळे धोक्यात आली असेल. येथे हे लक्षात घ्यावे लागेल की, राष्ट्रपती प्रत्यक्ष युद्ध किंवा बाह्य आक्रमण किंवा सशस्त्र बंडखोरी होण्याआधीच राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतात, जर त्यांना अशा प्रकारचा धोका लगेचच उद्भवणार असल्याची खात्री असेल. |
| **मंजुरीची पद्धत** | आणीबाणीच्या घोषणेला ती जारी केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळणे आवश्यक आहे. मुळात, संसदेने मंजुरीसाठी दिलेला कालावधी दोन महिन्यांचा होता, परंतु १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्ती कायद्याने तो कमी करण्यात आला. मात्र, अशा वेळी या आणीबाणीची घोषणा जारी केली असेल जेव्हा लोकसभा विसर्जित झाली असेल किंवा या घोषणेला मंजुरी न देता या एका महिन्याच्या कालावधीत लोकसभा विसर्जित झाली असेल आणि जर यादरम्यान राज्यसभेने तिला मान्यता दिली असेल तर त्यानंतर ही घोषणा लोकसभेच्या पुनर्रचनेनंतरच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवसांपर्यंत लागू राहते. |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| **परिणाम** | १. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात, केंद्राच्या कार्यकारी अधिकाराची व्याप्ती कोणत्याही घटक राज्याला त्याच्या कार्यकारी अधिकाराचा वापर करण्याच्या पद्धतीबाबत निर्देश देण्यापर्यंत वाढते.<br>२. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात, संसदेला राज्य सूचीमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार प्राप्त होतो.<br>३. संसदेच्या कायद्याद्वारे लोकसभेचा कालावधी तिच्या सामान्य कालावधीच्या (पाच वर्षांच्या) पलीकडे एका वेळी एका वर्षासाठी (कोणत्याही कालावधीसाठी) वाढविला जाऊ शकतो. तथापि, आणीबाणीची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर ही मुदतवाढ चालू ठेवता येणार नाही.<br>४. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात संसद राज्य विधानसभेचा सामान्य कार्यकाळ (पाच वर्षे) प्रत्येक वेळी एक वर्षाने (कोणत्याही कालावधीसाठी) वाढवू शकते, मात्र, आणीबाणीची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर ही मुदतवाढ चालू ठेवता येणार नाही.<br>५. अनुच्छेद १९ अंतर्गत मूलभूत अधिकारांचे निलंबन. |

२. आर्थिक आणीबाणी

| | |
|---|---|
| **उद्घोषणेसाठीची कारणे** | अनुच्छेद ३६० राष्ट्रपतींना अशा परिस्थितीत आर्थिक आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार देते जर ते समाधानी असतील की अशी परिस्थिती उद्भवली आहे की, ज्यामुळे भारताची आर्थिक स्थिरता किंवा पत धोक्यात आली आहे. |
| **मंजुरीची पद्धत** | आर्थिक आणीबाणी जाहीर करणारी उद्घोषणा संसदेच्या दोन्ही सभागृहांनी ती जारी केल्यापासून दोन महिन्यांच्या आत मंजूर केली पाहिजे. तथापि, अशा वेळी या आणीबाणीची घोषणा जारी केली असेल जेव्हा लोकसभा विसर्जित झाली असेल किंवा या घोषणेला मंजुरी न देता या एका महिन्याच्या कालावधीत लोकसभा विसर्जित झाली असेल आणि जर यादरम्यान राज्यसभेने तिला मान्यता दिली असेल तर त्यानंतर ही घोषणा लोकसभेच्या पुनर्रचनेनंतरच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवसांपर्यंत लागू राहते. |


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| **परिणाम** | १. केंद्राच्या कार्यकारी अधिकाराची व्याप्ती ही कोणत्याही राज्याला (अ) निर्देशांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्थिक औचित्याच्या नियमांचे पालन करण्यासाठी निर्देश देण्यापर्यंत वाढते; आणि (ब) राष्ट्रपतींना कोणत्याही राज्यासाठी आवश्यक आणि पुरेसे वाटतील असे इतर निर्देश.<br>२. अशा इतर कोणत्याही निर्देशामध्ये (अ) राज्यात सेवा करणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींचे पगार आणि भत्ते कमी करणे आवश्यक असलेली तरतूद; आणि (ब) सर्व अर्थ विधेयके किंवा इतर वित्तीय विधेयके राज्याच्या विधिमंडळाने मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखीव ठेवणे यांचा समावेश असू शकतो.<br>३. राष्ट्रपती (अ) संघीय सेवेत असणाऱ्या सर्व किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तींचे; आणि (ल) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे वेतन आणि भत्ते कमी करण्याचे निर्देश जारी करू शकतात. |

३. राष्ट्रपती राजवट

| | |
|---|---|
| **उद्घोषणेसाठीची कारणे** | १. घटनेच्या तरतुदींनुसार एखाद्या राज्याचे सरकार चालवता येत नाही अशी परिस्थिती उद्भवली आहे अशी खात्री असल्यास, अनुच्छेद ३५६ अन्वये राष्ट्रपतींना घोषणा जारी करण्याचा अधिकार मिळतो. विशेष म्हणजे, राष्ट्रपती एकतर राज्याच्या राज्यपालांच्या अहवालावर किंवा अन्यथा देखील (म्हणजे, राज्यपालांच्या अहवालाशिवाय देखील) यासंदर्भात निर्णय घेऊ शकतात.<br>२. अनुच्छेद ३६५ अन्वये, जेव्हा जेव्हा एखादे राज्य केंद्राच्या कोणत्याही निर्देशाचे पालन करण्यात किंवा त्याची अंमलबजावणी करण्यात अयशस्वी ठरते, तेव्हा राष्ट्रपतींना अशी परिस्थिती उद्भवली आहे की राज्याचे सरकार चालू ठेवता येत नाही असे मानणे कायदेशीर असेल. संविधानाच्या तरतुदींनुसार. |
| **मंजुरीची पद्धत** | राष्ट्रपती राजवट लागू करणाऱ्या घोषणेला संसदेच्या दोन्ही सभागृहांनी ती जारी केल्यापासून दोन महिन्यांच्या आत मंजुरी देणे आवश्यक आहे. तथापि, लोकसभा विसर्जित झालेल्या वेळी राष्ट्रपती राजवटीची घोषणा जारी केली गेली किंवा घोषणेला मान्यता न देता दोन महिन्यांच्या कालावधीत लोकसभेचे विसर्जन झाले, तर ती घोषणा पहिल्यापासून ३० दिवसांपर्यंत टिकते. लोकसभेची पुनर्रचना झाल्यानंतर, राज्यसभेने या दरम्यान त्याला मान्यता दिली तर. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यास, राष्ट्रपती राजवट सहा महिने सुरू राहते. संसदेच्या मान्यतेने दर सहा महिन्यांनी ती जास्तीत जास्त तीन वर्षांसाठी वाढवता येते. |

| | |
|---|---|
| **परिणाम** | जेव्हा एखाद्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाते तेव्हा राष्ट्रपतींना खालील असाधारण अधिकार प्राप्त होतात :<br>१. ते राज्य सरकारची कामे आणि राज्यपाल किंवा राज्यातील इतर कोणत्याही कार्यकारी प्राधिकाऱ्याकडे निहित अधिकार आपल्या हाती घेऊ शकतात.<br>२. ते असे घोषित करू शकतात की, राज्य विधिमंडळाचे अधिकार संसदेने वापरायचे आहेत.<br>३. ते राज्यातील कोणत्याही संस्था किंवा प्राधिकरणाशी संबंधित घटनात्मक तरतुदींच्या निलंबनासह इतर सर्व आवश्यक पावले उचलू शकतात.<br>जेव्हा राज्य विधिमंडळ अशा प्रकारे निलंबित किंवा विसर्जित केले जाते तेव्हा :<br>१. संसद राज्यासाठी कायदे करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना किंवा या संदर्भात त्यांच्याद्वारे निर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही प्राधिकरणाला सोपवू शकते.<br>२. संसद किंवा प्रतिनिधित्वाच्या बाबतीत, राष्ट्रपती किंवा कोणतेही इतर विनिर्दिष्ट प्राधिकारी केंद्र किंवा त्याचे अधिकारी आणि प्राधिकरणांना अधिकार प्रदान करणारे आणि जबाबदाऱ्या लादणारे कायदे करू शकतात,<br>३. लोकसभेचे अधिवेशन चालू नसताना, संसदेच्या मंजुरीपर्यंत राज्याच्या संचित निधीतून खर्च करण्यास राष्ट्रपती अधिकृत करू शकतात आणि<br>४. संसदेचे अधिवेशन चालू नसताना राष्ट्रपती राज्याच्या कारभारासाठी अध्यादेश जारी करू शकतात. |

**योग्य आणि अयोग्य वापर –**

केंद्र–राज्य संबंधांवरील सरकारिया आयोगाच्या (१९८८) अहवालाचा आधार घेऊन, सर्वोच्च न्यायालयाने बोम्मई प्रकरणात (१९९४) कोणत्या परिस्थितीत अनुच्छेद ३५६ अंतर्गत अधिकारांचा वापर करणे योग्य किंवा अयोग्य ठरेल हे स्पष्ट करणारी यादी केली.

**खालील परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागू करणे योग्य ठरेल.**

१. जेव्हा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नसेल, म्हणजेच 'त्रिशंकू विधानसभा'.

२. जेव्हा विधानसभेत बहुमत असलेल्या पक्षाने मंत्रिमडळ बनवण्यास नकार दिला असेल आणि राज्यपालांना विधानसभेत बहुमत असलेले कोणत्याही पक्ष्यांच्या युतीचे मंत्रिमंडळ स्थापन होऊ शकत असल्याची शक्यता दिसून येत नसेल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. जेव्हा विधानसभेतील पराभवानंतर मंत्रिमंडळ राजीनामा देते आणि इतर कोणताही पक्ष विधानसभेत बहुमत असलेल्या मंत्रिमंडळाची स्थापना करण्यास इच्छुक किंवा सक्षम नसतो.

४. जेव्हा केंद्र सरकारच्या घटनात्मक निर्देशाकडे राज्य सरकार दुर्लक्ष करते.

५. जेव्हा अंतर्गत विध्वंस, उदाहरणार्थ, एखादे सरकार मुद्दाम संविधान आणि कायद्याच्या विरोधात वागत आहे किंवा हिंसक बंडखोरी करत आहे अशी स्थिती उद्भवते.

६. जेव्हा आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यास सरकारद्वारे जाणूनबुजून नकार दिल्याने राज्याची सुरक्षा धोक्यात येऊन भौतिक विघटन घडून येणे.

**खालील परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागू करणे अयोग्य आहे.**

१. जेव्हा मंत्रिमंडळ राजीनामा देते किंवा विधानसभेत बहुमत गमावल्याने बरखास्त केले जाते तेव्हा राज्यपालांनी पर्यायी मंत्रिमंडळाच्या स्थापनेची शक्यता तपासल्याशिवाय राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करणे.

२. जेव्हा राज्यपाल मंत्रिमंडळास विधानसभेत असलेल्या बहुमताचे स्वतःच मूल्यांकन करतात आणि मंत्रिमंडळाला विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करू न देता राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करतात.

३. जेव्हा विधानसभेत बहुमताचा पाठिंबा असलेल्या सत्ताधारी पक्षाला १९७७ आणि १९८० च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

४. अंतर्गत अशांततेची स्थिती ज्यामध्ये अंतर्गत विध्वंस किंवा भौतिक विघटन होत नाही.

५. राज्यातील कुप्रशासन किंवा मंत्रिमंडळाविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप किंवा राज्यातील प्रतिकूल, कठोर आर्थिक परिस्थिती.

६. जेव्हा अत्यंत विघातक परिणाम होऊ शकतील अशी अत्यंत निकडीची परिस्थिती वगळता, राज्य सरकारला स्वत:मध्ये सुधारणा करण्याची पूर्वसूचना दिली न जाणे.

७. सत्ताधारी पक्षाच्या अंतर्गत समस्यांचे निराकरण करण्यासाठी किंवा ज्यासाठी हेतूसाठी राज्यघटनेने अधिकार/सत्ता बहाल केली आहे त्याच्याशी संबंध नसलेल्या किंवा अप्रासंगिक हेतूसाठी त्यांचा वापर केला जाणे.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – संसद आणि दोन सभागृहे – रचना, कामकाज, व्यवहाराचे संचालन, अधिकार आणि विशेषाधिकार आणि यातून उद्भवणारे मुद्दे.

मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/ विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०२१ | Do Department -related Parliamentary Standing Committees keep the administration on its toes and inspire reverence for parliamentary control? Evaluate the working of such committees with suitable examples. | संसदीय समित्या आणि त्यांची कार्यकारिणींवर पकड ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०२१ | Explain the constitutional provisions under which Legislative Councils are established. Review the working and current status of Legislative Councils with suitable illustrations. | विधान परिषद, त्यांच्या कार्याचे विश्लेषण यावर आधारित प्रश्न. |
| २०२१ | To what extent, in your view, the Parliament is able to ensure accountability of the executive in India? | कार्यकारिणीला जबाबदार धरून संसदेच्या कामगिरीच्या विश्लेषणावर आधारित प्रश्न. |
| २०२० | "Once a speaker, Always a speaker'! Do you think the practice should be adopted to impart objectivity to the office of the Speaker of Lok Sabha? What could be its implications for the robust functioning of parliamentary business in India. | सभापतींची भूमिका आणि संबंधित मुद्दे यावर आधारित प्रश्न. |
| २०२० | Rajya Sabha has been transformed from a 'useless stepney tyre' to the most useful supporting organ in the past few decades. Highlight the factors as well as the areas in which this transformation could be visible. | राज्यसभेची प्रसंगयोचितता या मुद्द्यावर आधारित प्रश्न. |
| २०१९ | Individual Parliamentarian's role as the national lawmaker is on a decline, which in turn, has adversely impacted the quality of debates and their outcome. Discuss. | संसद सदस्यांची गुणवत्ता या मुद्द्यावर आधारित प्रश्न. |
| २०१८ | Why do you think the committees are considered to be useful for parliamentary work? Discuss, in this context, the role of the Estimates Committee. | संसदीय समित्या आणि त्यांचे विश्लेषण (अंदाज समिती) या मुद्द्यावर आधारित प्रश्न. |

| | | |
|---|---|---|
| २०१७ | The Indian Constitution has provisions for holding a joint session of the two houses of the Parliament. Enumerate the occasions when this would normally happen and also the occasions when it cannot, with reasons thereof. | संसदेचे संयुक्त अधिवेशन. या महत्त्वाच्या मुद्द्यावर आधारित प्रश्न. |
| २०१४ | The 'Powers, Privileges and Immunities of Parliament and its Members' as envisaged in Article 105 of the Constitution leave room for a large number of un-codified and un-enumerated privileges to continue. Assess the reasons for the absence of legal codification of the 'parliamentary privileges'. How can this problem be addressed? | संसदीय विशेषाधिकारांचे संहितीकरण ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०१३ | The role of individual MPs (Members of Parliament) has diminished over the years and as a result healthy constructive debates on policy issues are not usually witnessed. How far can this be attributed to the anti-defection law which was legislated but with a different intention? | वैयक्तिक आमदारांची भूमिका व पक्षांतर विरोधी कायद्याच्या विश्लेषणावर आधारित प्रश्न. |
| २०२२ | Discuss the role of the Vice –Presidents of India as the chairman of the Rajya Sabha. | उपराष्ट्रपतींची भूमिका अधोरेखित करणारा प्रश्न. |

**संसद**

केंद्रीय विधिमंडळ, ज्याला संसद म्हणतात, त्यात राष्ट्रपती आणि दोन सभागृहे, ज्यांना राज्य परिषद (राज्यसभा) आणि लोकांचे सभागृह (लोकसभा) म्हणून ओळखले जाते. प्रत्येक सभागृहाची बैठक आधीच्या बैठकीच्या सहा महिन्यांच्या आत होणे आवश्यक आहे.

**संसदेची भूमिका आणि कार्ये –**

कायदा बनवण्याव्यतिरिक्त संसदेला इतरही अनेक कार्ये पार पाडावी लागतात.

१. कायदेविषयक कार्ये : संसद देशासाठी कायदे बनवते.

२. कार्यकारी मंडळाचे नियंत्रण आणि त्याच्या जबाबदार्या निश्चित करणे : संसदेचे बहुदा सर्वात महत्वाचे कार्य हे सुनिश्चित करणे आहे की कार्यकारी मंडळने त्याच्या अधिकाराचा अतिरेक करू नये आणि ज्या लोकांनी त्यांना निवडून दिले आहे त्यांना ते जबाबदार असावे.

३. आर्थिक कार्ये : संसदेच्या आर्थिक अधिकारांमध्ये सरकारला त्याचे कार्यक्रम लागू करण्यासाठी संसाधने प्रदान करणे समाविष्ट आहे. सरकारने कायदेमंडळाला खर्च केलेला पैसा आणि उभारायची संसाधने यांचा हिशेब द्यावा लागतो. विधिमंडळ हे देखील सुनिश्चित करते की सरकार चुकीचा किंवा जास्त खर्च करणार नाही. हे काम वार्षिक अंदाजपत्रक आणि आर्थिक विवरणपत्रांद्वारे केले जाते.

४. प्रतिनिधित्व : संसद ही देशाच्या विविध भागांतील विविध प्रादेशिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक गटांतील सदस्यांच्या भिन्न विचारांचे प्रतिनिधित्व करते.

५. चर्चा व विचारविनिमयाचे कार्य : संसद हे देशातील चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. त्याच्या चर्चेच्या सामर्थ्यावर कोणतेही बंधन नाही. सदस्य कोणत्याही विषयावर न घाबरता बोलण्यास मोकळे आहेत. यामुळे संसदेला देशासमोरील कोणत्याही किंवा प्रत्येक मुद्द्याचे विश्लेषण करणे शय होते. या चर्चा लोकशाहीतील निर्णय निर्धाश्रण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहेत.

६. घटनात्मक कार्य : संसदेला राज्यघटनेतील बदलांवर चर्चा करण्याचा आणि अंमलात आणण्याचा अधिकार आहे. दोन्ही सभागृहांचे घटनात्मक अधिकार समान आहेत. सर्व प्रकारच्या घटनादुरुस्त्या दोन्ही सभागृहांच्या विशेष बहुमताने मंजूर करणे आवश्यक आहे.

७. निवडणूकविषयक कार्ये : संसद काही निवडणूकविषयक कार्ये देखील करते. ती भारताचे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांची निवड करते.

८. न्यायिक कार्ये : संसदेच्या न्यायिक कार्यांमध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवरील महाभियोग प्रस्तावांवर विचार करणे समाविष्ट आहे.

**राज्यसभा :**

- राज्यसभा किंवा संसदेचे उच्च सभागृह ही कायमस्वरूपी संस्था आहे कारण ती विसर्जित केली जाऊ शकत नाही. राज्यसभेची सदस्यसंख्या २५० पेक्षा जास्त असू शकत नाही. त्यापैकी साहित्य, विज्ञान, कला आणि समाजसेवेतील उत्कृष्ट कार्याच्या आधारावर राष्ट्रपती १२ सदस्यांची नियुक्ती करतात आणि उर्वरित निवडले जातात. सध्या तिची एकूण सदस्यसंख्या २४५ आहे.
- राज्यसभा ही भारतीय संघराज्यातील राज्यांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे. राज्यांच्या विधानसभांचे निवडून आलेले सदस्य हे राज्यसभेच्या सदस्यांची एकल हस्तांतरणीय मतदान प्रणालीद्वारे आनुपातिक प्रतिनिधित्वाच्या आधारे निवड करतात. परंतु सर्व राज्ये समान संख्येने सदस्य राज्यसभेवर पाठवत नाहीत. त्यांचे प्रतिनिधित्व संबंधित राज्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर ठरवले जाते. त्यामुळे मोठ्या राज्यांना जासत प्रतिनिधित्व मिळते आणि लहान राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळते. उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्याला ३१ जागा देण्यात आल्या आहेत, तर सिक्कीम आणि त्रिपुरासारख्या छोट्या राज्यांचा प्रत्येकी एकच सदस्य आहे. दिल्ली विधानसभेद्वारे राज्यसभेचे तीन सदस्य निवडले जातात आणि पाँडेचेरीचा एकच सदस्य आहे. इतर केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेत प्रतिनिधित्व दिले जात नाही.

**लोकसभा :**

- राज्यसभेप्रमाणे लोकसभा हे स्थायी सभागृह नाही. लोकसभेचे सदस्य हे सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारे थेट लोकांद्वारे निवडले जातात. त्याला लोकप्रिय सदन किंवा कनिष्ठ सभागृह असेदेखील म्हणतात. लोकसभेची जास्तीत जास्त अनुज्ञेय सदस्यसंख्या ५५० आहे, त्यापैकी ५३० थेट राज्यांमधून तर २० सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडून येतात.
- लोकसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी ठराविक जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रारंभी ही तरतूद राज्यघटना सुरू झाल्यापासून दहा वर्षांसाठी करण्यात आली होती, जी विविध घटनादुरुस्तींद्वारे पुन्हा दहा वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे.

**द्विसभागृह पद्धतीच्या बाजूने युक्तिवाद –**

- मोठ्या आकाराचे आणि बहुविविधता असलेले देश सहसा समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी आणि देशाच्या सर्व भौगोलिक प्रदेशांना किंवा भागांना प्रतिनिधित्व देण्यासाठी राष्ट्रीय विधिमंडळाची दोन सभागृहे स्थापन करण्यास प्राधान्य देतात.
- द्विसदनीय विधिमंडळाचा आणखी एक फायदा असा आहे की, द्विसदनीय विधिमंडळामुळे प्रत्येक निर्णयाचा पुनर्विचार करता येतो. एका सभागृहाने घेतलेला प्रत्येक निर्णय किंवा मंजूर केलेला प्रस्ताव दुसर्या सभागृहाकडे त्याच्या निर्णयासाठी पाठविला जातो. याचा अर्थ प्रत्येक विधेयक आणि धोरणावर दोनदा चर्चा होते. यामुळे प्रत्येक निर्णयाच्या किंवा धोरणाच्या दुहेरी तपासणीची सुनिश्चित होते. एका गृहाने घाईघाईने निर्णय घेतला तरी तो निर्णय दुसर्या गृहात चर्चेसाठी येतो आणि त्यावर पुनर्विचार करणे शक्य होते.

**संसदेचे सार्वभौमत्व –**

संसदेचे सार्वभौमत्व, ज्याला संसदीय वर्चस्व किंवा कायदेमंडळाचे वर्चस्व देखील म्हणतात, ही संसदीय लोकशाहीच्या घटनात्मक कायद्यातील एक संकल्पना आहे. हे तत्त्व असे अधोरेखित करते की, कायदेमंडळाला पूर्ण सार्वभौमत्व आहे आणि कार्यकारी किंवा न्यायिक संस्थांसह इतर सर्व सरकारी संस्थांपेक्षा ते सर्वोच्च आहे. हे तत्त्व असेही स्पष्ट करते की, कायदेमंडळ हे पूर्वीचे कोणतेही कायदे बदलू शकते किंवा रद्द करू शकते आणि म्हणून ते कोधत्याही लिखित कायद्यास (काही बाबतीत, अगदी घटनेसही नाही) किंवा प्रथा–संकेतांनाही बांधील नाही.

**ब्रिटनममध्ये संसद ही सर्वोच्च आहे. तर भारतात खालील कारणांमुळे संविधान हे सर्वोच्च आहे.**

१. लिखित संविधान.

२. संघराज्य शासनप्रणाली.

३. न्यायिक पुनरावलोकन.

४. मूलभूत अधिकार.

**लोकसभेचे पदाधिकारी –**

लोकसभेचे पीठासीन अधिकारी हे सभापती म्हणून ओळखले जातात. सभागृहातील सदस्य त्यांची निवड करतात. लोकसभा विसर्जित झाल्यानंतरही पुढील सभागृह त्यांच्या जागी नवीन सभापती निवडत नाही तोपर्यंत ते/ती सभापती राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत, सभागृहाने निवडलेला उपसभापती सभागृहाच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवितो. लोकसभेच्या सर्व तत्कालीन सदस्यांच्या बहुमताने मंजूर केलेल्या ठरावाद्वारे सभापती आणि उपसभापती दोघांनाही पदावरून दूर केले जाऊ शकते.

**सभापतींचे काही अधिकार आणि कार्ये खाली दिली आहेत :**

१. सभापतीचे मूलभूत कार्य म्हणजे सभागृहाचे अध्यक्षपद भूषविणे आणि सभागृहाच्या बैठका व्यवस्थितपणे चालवणे. कोणत्याही सदस्याला त्याच्या परवानगीशिवाय सभागृहात बोलता येत नाही. तो/ती एखाद्या सदस्याला त्याचे

भाषण संपवण्यास सांगू शकतो आणि सदस्याने त्याचे पालन न केल्यास तो/ती ते भाषण नोंदीतून काढून टाकावे, असा आदेश देऊ शकतो.

२. सर्व विधेयके, अहवाल, प्रस्ताव आणि ठराव सभापतींच्या परवानगीने सादर केले जातात. तो प्रस्ताव किंवा विधेयक मतदानासाठी सभागृहापुढे ठेवतो. तो/ती मतदानात भाग घेत नाही, पण जेव्हा दोन्ही बाजूंना समान मते असतील, तेव्हा तो/ती आपले निर्णायक मत वापरू शकतो. परंतु त्याने/तिने तिचे मत अशा पद्धतीने देणे अपेक्षित आहे की, जेणेकरून त्याची/तिची निष्पक्षता आणि स्वातंत्र्य टिकून राहील.

३. सर्व संसदीय प्रकरणांमध्ये त्याचे/तिचे निर्णय अंतिम असतात. तो सदस्यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्द्यावर देखील नियम करतो आणि त्याचा निर्णय अंतिम असतो.

४. तो/ती सदस्यांचे हक्क आणि विशेषाधिकारांचा संरक्षक आहे.

५. तो/ती पक्षांतर करणार्या सदस्यास अपात्र ठरतवतो. तो/ती सदस्यांचा राजीनामा देखील स्वीकारतो आणि राजीनाम्याच्या वास्तविकतेबद्दल निर्णय घेतो.

६. लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीच्या बाबतीत, सभापती बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितात.

**राज्यसभेचे पदाधिकारी –**

भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. ते/ती राज्यसभेच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवितात. त्याच्या अनुपस्थितीत, उपसभापती, ज्यांची निवड राज्यसभेच्या सदस्यांमधून करतात, ते सभागृहाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान करतात. उपसभापतीला राज्यसभेतील सर्व विद्यमान सदस्यांच्या बहुमताने काढून टाकले जाऊ शकते. परंतु अध्यक्ष (उपराष्ट्रपती) यांना केवळ राज्यसभेतील सर्व तत्कालीन सदस्यांच्या बहुमताने पारित केलेल्या आणि लोकसभेने मंजूर केलेल्या ठरावाद्वारेच त्यांच्या पदावरून हटवले जाऊ शकते.

उपराष्ट्रपती हा पदसिद्ध अध्यक्ष असतो आणि राज्यसभेचा सदस्य नसल्यामुळे त्याला/तिला सामान्यतः मतदानाचा अधिकार नसतो. तो/ती फक्त टाय झाल्यास मतदान करू शकतो.

**उपराष्ट्रपतींची कार्ये दुहेरी स्वरूपाची आहेत :**

१. ते राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून काम करतात. या नात्याने त्यांचे अधिकार आणि कार्ये लोकसभा अध्यक्षांसारखीच आहेत. या संदर्भात, त्यांचे स्थान अमेरिकेच्या उपाध्यक्षांसारखे दिसते, जे सिनेटचे, म्हणजे अमेरिकन कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाचे अध्यक्ष म्हणून काम करतात.

२. राजीनाम्यामुळे, महाभियोगाने, मृत्यूमुळे किंवा अन्य कारणांमुळे राष्ट्रपतीच्या पदावर जागा रिक्त झाल्यास ते राष्ट्रपती म्हणून काम करतात.

३. ते जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीसाठी राष्ट्रपती म्हणून काम करू शकतात. या कालावधीमध्ये नवीन राष्ट्रपती निवडला जाणे आवश्यक असते. याशिवाय, जेव्हा विद्यमान राष्ट्रपती अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणत्याही कारणामुळे त्यांची कार्ये पार पाडू शकत नसतील, तेव्हा राष्ट्रपती त्यांचे कार्य पुन्हा सुरू करेपर्यंत उपराष्ट्रपती हे त्यांचे कार्य पार पाडतात.


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**राज्यसभा व लोकसभा यांच्या अधिकारांची तुलना –**

राज्यसभेला बहुतेक बाबतीत लोकसभेसारखे अधिकार आहेत. मात्र, राज्यसभेस काही विशेष अधिकार दिलेले आहेत आणि काही अपवादही आहेत.

**लोकसभेच्या तुलनेत असमान स्थिती –**

१. अर्थसंकल्प आणि अर्थ विधेयकाच्या संदर्भात राज्यसभेला मर्यादित अधिकार आहेत.

२. राष्ट्रीय आणीबाणी रद्द करण्याचा ठराव केवळ लोकसभेद्वारे मंजूर केला जाऊ शकतो.

३. लोकसभेचे अध्यक्ष दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितात.

४. राज्यसभा अविश्वास प्रस्ताव मंजूर करून मंत्रिपरिषदेस पदच्युत करू शकत नाही. कारण, मंत्रिपरिषद ही सामूहिकपणे फक्त लोकसभेला जबाबदार असते. परंतु, राज्यसभेत सरकारच्या धोरणांवर आणि कृतींवर चर्चा आणि टीका केली जाऊ शकते.

**राज्यसभेचे विशेष अधिकार –**

**राज्यसभेला चार अनन्य किंवा विशेष स्वरूपाचे अधिकार दिले गेले आहेत, जे लोकसभेला मिळत नाहीत :**

१. राज्य सूची (अनुच्छेद २४९) मध्ये नमूद केलेल्या विषयावर कायदा करण्यासाठी संसदेला अधिकार देऊ शकते.

२. केंद्र आणि राज्य या दोघांसाठी समान असलेल्या नवीन अखिल भारतीय सेवा तयार करण्यासाठी ती संसदेला अधिकार देऊ शकते (अनुच्छेद ३१२).

३. राज्यसभा उपराष्ट्रपतींना हटवण्याचा ठराव दाखल करू शकते. दुसर्या शब्दांत, उपराष्ट्रपतींना हटवण्याचा ठराव लोकसभेत नव्हे तर केवळ राज्यसभेत मांडला जाऊ शकतो (अनुच्छेद ६७).

४. राष्ट्रीय आणीबाणी किंवा राष्ट्रपती राजवट किंवा आर्थिक आणीबाणी लागू करण्याची घोषणा लोकसभा विसर्जित करण्यात आली असताना किंवा तिच्या मान्यतेसाठी दिलेल्या कालावधीत लोकसभेचे विसर्जन झाले असताना राष्ट्रपतींद्वारे जारी केली गेली, तर ही घोषणा एकट्या राज्यसभेने (कलम ३५२, ३५६ आणि ३६०) मंजूर केली तरीही ती प्रभावी राहू शकते.

**संसदेतील नेते –**

१. सभागृह नेता – लोकसभेच्या नियमांनुसार, 'सभागृहाचा नेता' म्हणजे पंतप्रधान, जर तो लोकसभेचा सदस्य असेल किंवा एखादा मंत्री जो लोकसभेचा सदस्य असेल आणि सभागृह नेता म्हणून काम करण्यासाठी पंतप्रधानांद्वारे नामनिर्देशित असेल तर. राज्यसभेतही एक 'सभागृह नेता' असतो. तो मंत्री आणि राज्यसभेचा सदस्य असतो आणि पंतप्रधानांद्वारे असे कार्य करण्यासाठी नामनिर्देशित केलेला असतो. दोन्ही सभागृहांतील सभागृहाचा नेता हा एक महत्त्वाचा पदाधिकारी असतो आणि कामकाजाच्या संचालनावर त्याचा थेट प्रभाव असतो. तो सभागृहाच्या उपनेत्याचीही नियुक्ती करू शकतो.

२. विरोधी पक्षनेता – संसदेच्या प्रत्येक सभागृहात 'विरोधी पक्ष नेता' असतो. सभागृहाच्या एकूण संख्याबळाच्या एक दशांशपेक्षा कमी जागा नसलेल्या सर्वात मोठ्या विरोधी पक्षाच्या नेत्याला त्या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता म्हणून

मान्यता दिली जाते. संसदीय शासन पद्धतीमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याची भूमिका महत्त्वाची असते. सरकारच्या धोरणांवर विधायक टीका करणे आणि पर्यायी सरकार उपलब्ध करून देणे ही त्यांची मुख्य कार्ये आहेत. म्हणून, लोकसभा आणि राज्यसभेतील विरोधी पक्षाच्या नेत्यांना १९७७ मध्ये वैधानिक मान्यता देण्यात आली. ते कॅबिनेट मंत्र्याच्या बरोबरीचे वेतन, भत्ते आणि इतर सुविधांसाठी देखील पात्र आहेत. १९६९ मध्ये पहिल्यांदाच विरोधी पक्षाच्या अधिकृत नेत्याला मान्यता मिळाली.

**विरोधी पक्षनेत्याचे महत्त्व –**

१. विरोधी पक्षनेताला 'छाया पंतप्रधान' (Shadow Prime Minister) म्हणून संबोधले जाते.

२. सरकार पडल्यास ती/त्याने सत्ता हाती घेण्यास तयार असणे अपेक्षित आहे.

३. विरोधी पक्षांच्या कार्यपद्धतीत धोरणात्मक आणि विधिमंडळाच्या कामकाजात सुसंगतता आणि परिणामकारकता आणण्यात विरोधी पक्षनेत्याची महत्त्वाची भूमिका बजावते.

४. उत्तरदायित्व आणि पारदर्शकता – केंद्रीय दक्षता आयोग, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, केंद्रीय माहिती आयोग, लोकपाल इत्यादी संस्थांमधील नियुक्तींमध्ये पारदर्शकता आणि निष्पक्षता आणण्यात विरोधी पक्षनेता महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

३. प्रतोद (Whip) - जरी भारतीय राज्यघटनेत सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेत्याच्या पदांचा उल्लेख नसला तरी, त्यांचा अनुक्रमे सभागृहाच्या नियमांमध्ये आणि संसदीय कायद्यात उल्लेख आहे. दुसरीकडे, 'प्रतोद' पदाचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत किंवा सभागृहाच्या नियमांमध्ये किंवा संसदीय कायद्यात नाही. हे संसदीय शासनव्यवस्थेच्या प्रथा–संकेतांवर आधारित आहे. प्रत्येक राजकीय पक्ष, मग तो सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्ष, त्याचा संसदेत स्वतःचा प्रतोद असतो. त्याची राजकीय पक्षाद्वारे सहाय्यक सभागृह नेता म्हणून नियुक्ती केली जाते. त्याच्या पक्षाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती असण्याची खात्री करण्याची आणि एखाद्या विशिष्ट मुद्द्याच्या बाजूने किंवा विरोधात त्यांचा पाठिंबा मिळवण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. तो संसदेतील त्यांच्या वर्तनाचे नियमन आणि देखरेख करतो. सदस्यांनी प्रतोदाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे अपेक्षित आहे. अन्यथा, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.

**संसदेचे सत्र –**

राष्ट्रपती वेळोवेळी संसदेच्या प्रत्येक सभागृहांची अधिवेशन आयोजित करतात. परंतु, संसदेच्या दोन अधिवेशनांमधील जास्तीत जास्त अंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. दुसर्या शब्दांत, संसदेची वर्षातून किमान दोनदा बैठक झाली पाहिजे. साधारणपणे वर्षातून तीन अधिवेशने आयोजित केली जातात, उदा.

१. अर्थसंकल्पीय अधिवेशन (फेब्रुवारी ते मे) ;

२. पावसाळी अधिवेशन (जुलै ते सप्टेंबर) ; आणि

३. हिवाळी अधिवेशन (नोव्हेंबर ते डिसेंबर).

संसदेचे 'अधिवेशन' म्हणजे सभागृहाची पहिली बैठक आणि तिची बरखास्ती (किंवा लोकसभेच्याबाबतीत विसर्जन) या दरम्यानचा कालावधी. सत्रादरम्यान, कामकाज पार परडण्यासाठी सभागृहाची दररोज बैठक होते. सभागृहाची बरखास्ती आणि पुनर्स्थापना यादरम्यानच्या कालावधीला 'विराम' म्हणतात.




Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**लाभाचे पद –**

- घटनेच्या कलम १०२(१)(र) आणि १९१(१)(र) नुसार, खासदार किंवा आमदार यांना लाभाचे पद धारण करण्यास जनाई केली आहे; कारण अशा पदांमुळे त्यांना आर्थिक लाभ मिळवण्याची संधी मिळू शकते. 'एखादी व्यक्ती संसदेच्या कोणत्याही सभागृहाची सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून निवड होण्यास अपात्र ठरेल, (अ) जर त्याने घोषित केलेल्या पदाव्यतिरिक्त, भारत सरकार किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या अंतर्गत लाभाचे कोणतेही असे पद धारण केले असेल, ज्याच्या धारकाला संसदेने कायद्याने अपात्र ठरवले नसेल.'
- राज्यघटनेत या संज्ञेची व्याख्या केलेली नाही.
- लोकप्रतिनिधी कायद्यानुसारही लाभाचे पद धारण करणे हे अपात्रतेचे कारण आहे.
- 'लाभाचे पद' निश्चित करण्यासाठीच्या कसोट्या/चाचण्या
- केंद्रीय निवडणूक आयोगाने लाभाचे पद आणि विधानसभेच्या सदस्याच्या अपात्रतेच्या समृद्ध न्यायविनिर्णयांचे परीक्षण केले आणि तीन निर्णायक कसोट्यांची/चाचण्यांची यादी केली – आर्थिक लाभाचा निकष, पदाचे कार्यकारी स्वरूप, संसदीय सचिव म्हणून काम करताना घटनात्मक/कार्यकारी अधिकारांच्या वापराचा निकष. पोल पॅनलने खालीलप्रमाणे तिसर्या कसोटीवर जास्त भर दिला

**संसदीय कामकाजाची साधने/आयुधे –**

संसदीय लोकशाहीत, सरकार आपल्या कृतींसाठी संसदेला सामूहिकपणे जबाबदार असते. त्यामुळे सरकारच्या कामाची छाननी करण्यासाठी खासदारांकडे अनेक साधने असतात. यामध्ये सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारणे आणि राष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करणे यांचा समावेश आहे.




**प्रश्नोत्तराचा तास (Question Hour) :**

संसदेच्या प्रत्येक बैठकीचा पहिला तास यासाठी राखून ठेवला जातो. या वेळी सदस्य प्रश्न विचारतात आणि सामान्यत: मंत्री त्यांना उत्तरे देतात. हे प्रश्न तीन प्रकारचे असतात, ते म्हणजे तारांकित, अतारांकित आणि अल्प सूचना.




Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

१. तारांकित प्रश्नाला तोंडी उत्तर दिले जाते आणि म्हणून पूरक प्रश्न विचारले जाऊ शकतात.

२. दुसरीकडे, अतारांकित प्रश्नाचे उत्तर लेखी स्वरूपात देणे आवश्यक असते आणि म्हणून, पूरक प्रश्न विचारले जाऊ शकत नाहीत.

३. अल्प सूचना प्रश्न म्हणजे असा प्रश्न जो दहा दिवसांपेक्षा कमी कालावधीची नोटीस देऊन विचारला जातो. त्याला तोंडी उत्तर दिले जाते.

- मंत्र्यांसोबतच खासगी सदस्यांनाही प्रश्न विचारता येतात. अशाप्रकारे, प्रश्नाचा विषय काही विधेयक, ठराव किंवा सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या इतर बाबी ज्यासाठी तो सदस्य जबाबदार आहे त्या विषयाशी संबंधित असल्यास एखादा प्रश्न खाजगी सदस्याला विचारला जाऊ शकतो. अशा प्रश्नाबाबतची कार्यपद्धती मंत्र्याला विचारलेल्या प्रश्नांच्या बाबतीत पाळली जाते तशीच असते.

**शून्य प्रहर (Zero Hour) :**

कार्यपद्धतीच्या नियमांमध्ये प्रश्नोत्तराच्या वेळेप्रमाणे शून्य प्रहराचा उल्लेख नाही. कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय मुद्दे मांडण्यासाठी संसदेच्या सदस्यांसाठी हे एक अनौपचारिक साधन आहे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर लगेच शून्य तास सुरू होतो आणि दिवसभराचा अजेंडा (म्हणजे सभागृहाचे नियमित कामकाज) हाती घेईपर्यंत चालतो. दुसर्या शब्दांत, प्रश्नोत्तराचा तास आणि कार्यक्रमपत्रिका यांच्यातील वेळेचे अंतर शून्य तास म्हणून ओळखले जाते. संसदीय कार्यपद्धतीच्या क्षेत्रातील ही एक भारतीय नवकल्पना आहे आणि ती १९६२ पासून अस्तित्वात आहे.

**प्रस्ताव (Motion) :**

- पीठासीन अधिकार्याच्या संमतीने मांडलेल्या प्रस्तावाशिवाय सामान्य सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर कोणतीही चर्चा होऊ शकत नाही. सभागृह विविध मुद्द्यांवर आपले निर्णय किंवा मते मंत्री किंवा खाजगी सदस्यांनी मांडलेले प्रस्ताव स्वीकारून किंवा नाकारून व्यक्त करते.

**समापन प्रस्ताव (Closure Motion ) :**

- हा सदस्याने सभागृहासमोरील विषयावरील चर्चेला थांबवण्यासाठी आणलेला प्रस्ताव होय. हा प्रस्ताव सभागृहाने मंजूर केल्यास, चर्चा ताबडतोब थांबविली जाते आणि प्रस्ताव मतदानासाठी ठेवला जातो.

**अविश्वास प्रस्ताव (No-Confidence) :**

- घटनेच्या अनुच्छेद ७५ मध्ये असे म्हटले आहे की मंत्रिपरिषद लोकसभेला सामूहिकपणे जबाबदार असेल. याचा अर्थ असा की, जोपर्यंत लोकसभेतील बहुसंख्य सदस्यांचा मंत्रिमंडळावर विश्वास असतो तोपर्यंत ते पदावर राहते. दुसर्या शब्दांत, लोकसभा अविश्वास प्रस्ताव मंजूर करून मंत्रिमंडळाला पदच्युत करू शकते. प्रस्ताव सादर करण्यासाठी ५० सदस्यांचा पाठिंबा आवश्यक आहे.

**विश्वासदर्शक प्रस्ताव (Confidence Motion) :**

- त्रिशंकू संसद, अल्पसंख्याक सरकारे आणि युती सरकारे यांच्यामुळे खंडित जनादेशांच्या सध्या उद्भवलेल्या



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

परिस्थितींचा सामना करण्यासाठी विश्वासदर्शक प्रस्ताव हे एक नवीन प्रक्रियात्मक साधन म्हणून पुढे आले आहे. काठावरच्या बहुमताने स्थापन झालेल्या सरकारांना राष्ट्रपतींद्वारे सभागृहात त्यांचे बहुमत सिद्ध करण्यास सांगितले जाते. आजच्या काळात कधी–कधी सरकारच स्वतःहून विश्वासदर्शक ठराव मांडून आणि सभागृहाचा विश्वास जिंकून आपले बहुमत सिद्ध करू पाहते. जर विश्वासदर्शक ठराव नकारला गेला तर त्याचा परिणाम सरकार पडण्यात होतो.

**निंदाव्यंजक प्रस्ताव (Censure Motion) :**

- निंदाव्यंजक प्रस्ताव हा एखाद्या मंत्र्याविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावापेक्षा वेगळा असतो.

**आभारदर्शक प्रस्ताव (Motion of Thanks) :**

- प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरचे पहिले सत्र आणि प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या सत्रात राष्ट्रपती अभिभाषण करतात. या अभिभाषणात, राष्ट्रपती सरकारच्या मागील वर्षातील आणि आगामी वर्षातील धोरणे आणि कार्यक्रमांची रूपरेषा देतात.

**औचित्याचा मुद्दा (Point of Order) :**

- जेव्हा सभागृहाचे कामकाज सामान्य प्रक्रियेच्या नियमांचे पालन करून होत नाही, असे वाटत असल्यास सदस्य हरकतीचा मुद्दा मांडू शकतो. हरकतीचा मुद्दा हा सभागृहाच्या नियमांच्या किंवा घटनेच्या अशा कलमांचा अन्वयार्थ किंवा अंमलबजावणीशी संबंधित असावा जे सभागृहाच्या कामकाजाचे नियमन करतात आणि सभापतींच्या आकलनात असलेला प्रश्न उपस्थित केला पाहिजे. सामान्यपणे सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून औचित्याचा मुद्दा मांडला जातो.

**ठराव (Resolutions) :**


- लोकहिताच्या सर्वसामान्य बाबींकडे सभागृहाचे किंवा सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सदस्य ठराव मांडू शकतात. ठरावावरील चर्चा ही ठरावाच्या व्याप्तीशी सुसंगत आणि तिच्यापुरती मर्यादित असावी. ज्या सदस्याने ठराव मांडला असेल त्याला तो सभागृहाच्या मंजुरीशिवाय मागे घेता येत नाही.

**संसदेतील वैधानिक प्रक्रिया :**

- विधेयक हा प्रस्तावित कायद्याचा मसुदा असतो. विविध प्रकारची विधेयके असू शकतात. जेव्हा मंत्र्याव्यतिरिक्त एखादा सदस्य विधेयक मांडतो तेव्हा त्याला 'अशासकीय विधेयक' म्हणतात. मंत्र्याने प्रस्तावित केलेल्या विधेयकाचे वर्णन 'शासकीय विधेयक' असे केले जाते. आता आपण विधेयकाच्या मंजुरीतील विविध टप्पे पाहू.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**कायदानिर्मितीची प्रक्रिया –**

१. प्रसारण : एखादे विधेयक सभागृहात सादर होण्याच्या किमान दोन दिवस आधी प्रसारित केले जाते. मात्र, या नियमातून सवलत देण्याचा स्वच्छाधिकार सभापतींना आहे. उदाहरणार्थ, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण देण्यासाठी २०१९ चे विधेयक एकाच दिवशी प्रसारित केले गेले, त्यावर चर्चा करून ते मंजूर करण्यात आले.

२. प्रस्ताव मांडणे : मंत्री सभागृहात विधेयक मांडण्यासाठी प्रस्ताव मांडतो. हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी त्याला सात दिवसांची नोटीस द्यावी लागते. सभापती हे अल्पकालीन सूचनेवर प्रस्ताव मांडण्याची परवानगी देऊ शकतात. संसदेत विधेयक मांडण्याला 'प्रथम वाचन' असे म्हणतात. विधेयक मांडण्याचा प्रस्ताव नामंजूर झाल्यास, विधेयक मांडता येणार नाही.

३. विधेयकास समितीकडे पाठविणे : एकदा विधेयक मांडले गेले की, ते सभागृहात चर्चेसाठी घेतले जाऊ शकते किंवा छाननीसाठी संसदीय समितीकडे पाठवले जाऊ शकते. सभापतींकडून स्थायी समितीकडे विधेयक पाठवले जाऊ शकते किंवा विधेयकाचे तपशीलवार परीक्षण करण्यासाठी सभागृह एक छाननी समिती किंवा संयुक्त संसदीय समिती (गझउ) स्थापन करू शकते. उदाहरणार्थ, १६ व्या लोकसभेत, अनेक खासदारांच्या मागणीवरून, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ चे विधेयक छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले होते.

४. चर्चा किंवा दुसरे वाचन : स्थायी किंवा छाननी समितीचा अहवाल सभागृहाला प्राप्त झाल्यानंतर, संबंधित मंत्रालय विधेयकात योग्य त्या सुधारणा करण्यासाठी अहवालाचे परीक्षण करू शकते. फायनान्शियल रिझोल्यूशन आणि



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

डिपॉझिट इन्शुरन्स बिल, २०१७ च्या बाबतीत घडले त्याप्रमाणे, काही वेळा मंत्रालयाद्वारे विधेयक मागे घेतले जाऊ शकते किंवा विधेयकाच्या जागी पूर्णपणे नवीन कायदा केला जाऊ शकतो. विधेयक चर्चेसाठी घेतले जाते. वेगवेगळ्या पक्षांना सभागृहातील संख्याबळाच्या आधारावर चर्चेसाठी वेळ दिला जातो.

५. तपशीलवार चर्चा : एकदा विधेयकावर सर्वसाधारण चर्चा झाली की, तपशीलवार चर्चा केली जाते. त्यानंतर हे विधेयक विचारात घेण्यासाठी प्रस्ताव मांडला जातो. या टप्प्यावर, खासदार आणि प्रभारी मंत्री दोघेही विधेयकात सुधारणा करू शकतात. यासाठी, विधेयक विचारार्थ यादीत येण्यापूर्वी एक दिवसाची नोटीस द्यावी लागते. ज्या खासदाराने दुरुस्ती सुचविली आहे त्याला विशिष्ट दुरुस्ती सुचविण्याचे कारण स्पष्ट करावे लागते. जर बहुसंख्य खासदारांनी ती मान्य केली तर ती दुरुस्ती विधेयकाचा भाग होऊ शकते. याला 'द्वितीय वाचन' म्हणतात.

६. तिसरे वाचन : या टप्प्यावर दुरुस्त्या केलेल्या विधेयकाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात मुद्दे मांडून चर्चा केली जाते. सामान्य किंवा अर्थ विधेयके मंजूर होऊन त्यांचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणार्या सदस्यांच्या साध्या बहुमताची आवश्यकता असते. हा टप्पा 'तिसरे वाचन' म्हणून ओळखला जातो.

७. दुसर्या सभागृहात विधेयक मांडणे : पहिल्या सभागृहाने एकदा विधेयक मंजूर केले की, ते दुसर्या सभागृहाकडे विचारार्थ आणि मंजूर करण्यासाठी पाठवले जाते, तिथे त्याच्यावर पहिल्या सभागृहाप्रमाणेच प्रक्रियेचे पालन केले जाते.

८. राष्ट्रपतींची संमती : संसदेच्या दोन्ही सभागृहांनी विधेयक मंजूर केले की ते राष्ट्रपतींना त्यांच्या संमतीसाठी सादर केले जाते. राष्ट्रपतींनी संमती दिल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

**विविध प्रकारची विधेयके –**

**सार्वजनिक विधेयक व खाजगी विधेयक –**

| **सार्वजनिक विधेयक** | **खाजगी विधेयक** |
|---|---|
| १. हे विधेयक संसदेत मंत्र्याद्वारे हे विधेयक सादर केले जाते. | १. हे विधेयक मंत्र्याव्यतिरिक्त संसदेच्या कोणत्याही सदस्याद्वारे सादर केले जाते. |
| २. हे विधेयक सरकारच्या (सत्ताधारी पक्ष) धोरणांशी संबंधित असते. | २. हे विधेयक सार्वजनिक प्रकरणावर विरोधी पक्षाची भूमिका प्रतिबिंबित करते. |
| ३. संसदेद्वारे मंजूर होण्याची अधिक संधी असते. | ३. असे विधेयक संसदेद्वारे मंजूर होण्याची शयता कमी असते आहे. |
| ४. हे विधेयक सभागृहाने नाकारणे हे सरकारवरील संसदेच्या अविश्वासाचे प्रतीक आहे आणि त्यामुळे सरकारला राजीनामा द्यावा लागू शकतो. | ४. हे विधेयक सभागृहाने नामंजूर केल्यास त्यातून संसदेचा सरकारवरील अविश्वास किंवा त्याचा राजीनामा असा अर्थ निघत नाही. |
| ५. हे विधेयक सभागृहात मांडण्यासाठी सात दिवसांची नोटीस आवश्यक असते. | ५. हे विधेयक सभागृहात मांडण्यासाठी एक महिन्याची सूचना आवश्यक असते. |
| ६. कायदा विभागाशी सल्लामसलत करून संबंधित विभाग त्याचा मसुदा तयार करतो. | ६. या विधेयकाचा मसुदा तयार करणे ही संबंधित सदस्याची जबाबदारी असते. |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. **सामान्य विधेयके :**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १०७ आणि १०८ नुसार, सामान्य विधेयक हे आर्थिक विषयांव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयाशी संबंधित असते. सामान्य विधेयके ही संसदेच्या कोणत्याही सभागृहांत आधी मांडता येतात. ही विधेयके मंत्री किंवा खाजगी सदस्यांद्वारे सादर केली जाऊ शकतात. सामान्य विधेयकांच्या बाबतीत राष्ट्रपतींची शिफारस आवश्यक नसते. सामान्य विधेयकात राज्यसभेद्वारे दुरुस्ती केली जाऊ शकते किंवा ते नाकारले जाऊ शकते आणि ते राज्यसभेद्वारे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी रोखलेही जाऊ शकते. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यानंतर, भारतीय राज्यघटनेच्या कलम १११ नुसार राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी किंवा संमतीसाठी ते सादर केले जाते. सामान्य विधेयकांच्या बाबतीत संयुक्त बैठकीची तरतूद आहे.

३. **अर्थ विधेयके –**

अर्थ विधेयके ही अशी अर्थ विधेयके असतात जी कर आकारणी, सार्वजनिक खर्च इत्यादीसारख्या आर्थिक बाबींशी संबंधित असतात. ही अशी विधेयके असतात ज्यात भारतीय संविधानाच्या कलम ११० मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींशी संबंधित तरतुदी असतात. हे विधेयक लोकसभेतच अगोदर मांडले जाते. मंत्र्यांनाच अर्थ विधेयके मांडावी लागतात. राष्ट्रपतींच्या शिफारसीनंतरच अर्थ विधेयक सादर केले जाते. या विधेयकात राज्यसभेला दुरुस्ती करता येत नाही किंवा ते फेटाळता येत नाही. जास्तीत जास्त १४ दिवसांच्या कालावधीसाठी ते राज्यसभेत रोखून धरले जाऊ शकते. लोकसभेत मंजूर झाल्यानंतरच अर्थ विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठवले जाते. अर्थ विधेयकाच्या बाबतीत संयुक्त बैठकीची तरतूद नाही.

४. **वित्तीय विधेयके –**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ११७ नुसार, वित्तीय विधेयके ही अशी विधेयके असतात, जी आर्थिक बाबींशी संबंधित असतात; परंतु अर्थ विधेयकांपेक्षा वेगळी असतात. वित्तीय विधेयकांचे श्रेणी अ आणि इ असे वर्गीकरण केले जाते. श्रेणी अ विधेयकांमध्ये भारतीय संविधानाच्या कलम ११० च्या उपकलम (१) च्या उपखंड ए ते एफमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींशी संबंधित तरतुदींचा समावेश असतो आणि श्रेणी इ विधेयकांमध्ये भारताच्या संचित निधीतून करावयाच्या खर्चाचा समावेश असतो.

५. **घटनादुरुस्ती विधेयक –**

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३६८ हे घटनादुरुस्तीच्या तरतुदींशी संबंधित आहे.

६. **अध्यादेशाची जागा घेणारे विधेयक –**

हे विधेयक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १२३ अंतर्गत राष्ट्रपतींनी जारी केलेल्या अध्यादेशाची जागा घेण्यासाठी संसदेसमोर मांडले जाते.

**संसदेची संयुक्त बैठक –**

संयुक्त बैठक ही एक विलक्षण यंत्रणा आहे जी राज्यघटनेने विधेयक मंजूर करताना दोन्ही सभागृहांमधील मतभेद दूर करण्यासाठी प्रदान केली आहे. एखादे विधेयक एका सभागृहाने मंजूर केल्यानंतर आणि दुसर्या सभागृहाकडे पाठविल्यानंतर पुढील तीनपैकी कोणत्याही एका परिस्थितीत त्यांच्यात मतभेद निर्माण झाल्यास अशी संयुक्त बैठक घेतली जाते :

१. जर विधेयक दुसर्या सभागृहाने नाकारले असेल;

२. विधेयकात करावयाच्या दुरुस्त्यांबाबत दोन्ही सभागृहांमध्ये मतभेद असेल; किंवा

३. दुसर्या इतर सभागृहाकडे विधेयक मंजुरीसाठी सादर झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांहून अधिक काळ लोटला असेल.

वरील तीनही परिस्थितींमध्ये राष्ट्रपती हे संबंधित विधेयकावर विचारविनिमय आणि मतदान करण्याच्या उद्देशाने दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलावू शकतात. येथे हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, संयुक्त बैठकीची तरतूद केवळ सर्वसामान्य विधेयके किंवा वित्तीय विधेयकांना लागू आहे. अर्थ विधेयके किंवा घटनादुरुस्ती विधेयकांना ही तरतूद लागू नाही. अर्थ विधेयकाच्या बाबतीत, लोकसभेला महत्त्वाचे अधिकार आहेत. घटनादुरुस्ती विधेयक हे प्रत्येक सभागृहाने स्वतंत्रपणे मंजूर केले पाहिजे, अशी तरतूद आहे.

**सरकारी अर्थसंकल्प –**

- संविधानाने अर्थसंकल्पाचा उल्लेख 'वार्षिक आर्थिक विवरणपत्र' म्हणून केला आहे. दुसर्या शब्दांत सांगायचे तर, 'अर्थसंकल्प' हा शब्द संविधानात कुठेही वापरला गेला नाही. संविधानाच्या कलम ११२ मध्ये विवेचन केल्या गेलेल्या 'वार्षिक आर्थिक विवरणपत्रा'चे हे प्रचलित लोकप्रिय नाव आहे.
- अर्थसंकल्प हे भारत सरकारच्या आर्थिक वर्षातील (जे १ एप्रिलपासून सुरू होते आणि पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपते) अंदाजे प्राप्ती आणि खर्चाचे विवरणपत्र असते.
- प्राप्ती आणि खर्चाच्या अंदाजाव्यतिरिक्त, अर्थसंकल्पामध्ये इतरही काही घटक असतात. एकूणच, अर्थसंकल्पामध्ये किंवा अंदाजपत्रकामध्ये खालील गोष्टींचा समावेश असतो :

१. वार्षिक आर्थिक विवरण : सरकारचा खर्च आणि प्राप्ती यांचा सारांश.

२. संक्षिप्त अंदाजपत्रक : अर्थसंकल्पाचे संक्षिप्त विहंगावलोकन.

३. खर्चाचे अंदाजपत्रक : प्रत्येक मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागण्यांसह विविध मंत्रालये आणि विभागांच्या खर्चाचा तपशील.

४. प्राप्ती अंदाजपत्रक : सरकारसाठी कर आणि कर–विरहित निधी योजनेचे तपशील.

५. वित्त विधेयक : देशातील विद्यमान कर कायद्यांमधील कोणत्याही बदलांचा तपशील.

६. मध्यम मुदतीच्या वित्तीय धोरणाचा दस्तऐवज : फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी आणि बजेट मॅनेजमेंट ॲट, २००३ नुसार निवडक वित्तीय निर्देशकांसाठी तीन वर्षांची फिरती लक्ष्ये निर्धारित करते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**अर्थसंकल्पाच्या अंमलबजावणीचे टप्पे –**

१. अर्थसंकल्पाचे सादरीकरण – प्रथेप्रमाणे, अर्थमंत्री लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतात. अर्थमंत्री अर्थसंकल्पीय भाषणाने अर्थसंकल्प सादर करतात. लोकसभेतील भाषणानंतर अर्थसंकल्प राज्यसभेपुढे ठेवला जातो, ज्यावर फक्त चर्चा होऊ शकते आणि अनुदानाच्या मागण्यांवर मतदान करण्याचा अधिकार राज्यसभेला नसतो.

२. सामान्य वाचन – अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा त्याच्या सादरीकरणानंतर काही दिवसांनी सुरू होते. ही चर्चा संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये होते आणि साधारणतः तीन ते चार दिवस चालते. या टप्प्यात, लोकसभा संपूर्णपणे अर्थसंकल्पावर किंवा त्यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीवर चर्चा करू शकते; परंतु कोणताही कपातीचा प्रस्ताव मांडता येत नाही किंवा सभागृहात अर्थसंकल्पावर मतदान घेतले जाऊ शकत नाही. अर्थमंत्र्यांना चर्चेअंती उत्तर देण्याचा सर्वसाधारण अधिकार आहे.

३. छाननी आणि विभागीय समित्या – अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुमारे तीन ते चार आठवडे तहकूब केले जाते. या कालावधीत संसदेच्या २४ विभागीय स्थायी समित्या संबंधित मंत्र्यांच्या अनुदानाच्या मागण्यांचे परीक्षण करतात आणि त्यावर तपशीलवार चर्चा करतात आणि त्यांचा अहवाल तयार करतात. हे अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे विचारार्थ सादर केले जातात.

४. अनुदान मागण्यांवर मतदान – विभागीय स्थायी समित्यांच्या अहवालांच्या आधारे, लोकसभेत अनुदान मागण्यांसाठी मतदान घेतले जाते. मागण्या मंत्रालयनिहाय मांडल्या जातात. रीतसर मतदान झाल्यानंतर मागणीचे रूपांतर अनुदानात होते.

५. विनियोजन विधेयक पारित करणे – संविधानात असे नमूद केले आहे की 'कायद्याद्वारे विनियोजन केल्याखेरीज भारताच्या एकत्रित निधीतून कोणताही पैसा काढता येणार नाही'. त्यानुसार, भारताच्या एकत्रित निधीतून, खालील बाबींसाठी आवश्यक असलेल्या पैशाच्या विनियोजनाची तरतूद करण्यासाठी विनियोजन विधेयक सादर केले जाते :

(अ) लोकसभेने मंजूर केलेले अनुदान.

(ब) भारताच्या एकत्रित निधीतून केला जाणारा खर्च.

संसदेच्या कोणत्याही सभागृहात विनियोजन विधेयकासाठी अशी कोणतीही दुरुस्ती प्रस्तावित केली जाऊ शकत नाही ज्याचा परिणाम होऊन मंजूर केलेल्या कोणत्याही अनुदानाच्या गंतव्यस्थानात बदल होईल किंवा भारताच्या एकत्रित निधीवर आकारल्या जाणा–या कोणत्याही खर्चाच्या रकमेमध्ये बदल होईल.

६. वित्तीय विधेयक मंजूर करणे – आगामी आर्थिक वर्षासाठी भारत सरकारच्या आर्थिक प्रस्तावांना अमलात आणण्यासाठी वित्तीय विधेयक सादर करण्यात येते. हे विधेयक अर्थ विधेयकासाठी लागू असलेल्या सर्व अटींच्या अधीन असते. विनियोजन विधेयकाच्या उलट, वित्तीय विधेयकांच्याबाबतीत दुरुस्त्या (कर काढून टाकण्याचा किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे) मांडल्या जाऊ शकतात. १९३१ च्या प्रोव्हिजनल कलेशन ऑफ टॅस कायद्यानुसार, वित्तीय विधेयकाचे ७५ दिवसांच्या आत कायद्यात रूपांतर केले जाणे आवश्यक आहे (म्हणजे संसदेद्वारे मंजूर केले जाणे आणि नंतर राष्ट्रपतींद्वारे मंजूर केले जाणे) वित्त कायदा अर्थसंकल्पाच्या उत्पन्नाच्या बाजूला कायदेशीर वैधता प्रदान करतो आणि अर्थसंकल्पाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पूर्ण करतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**निधी –**

**१. भारताचा एकत्रित निधी (Consolidated Fund of India) -**

हा एक असा निधी आहे ज्यामध्ये सर्व प्राप्ती जमा केल्या जातात आणि सर्व देयके नावे बाजूस टाकली जातात. दुसर्या शब्दांत, (अ) भारत सरकारला मिळालेला सर्व महसूल; (ब) राजकोषीय पत्रे, कर्जे किंवा अग्रिमे यांच्याद्वारे सरकारने उभारलेली सर्व कर्जे; आणि (क) कर्जाच्या परतफेडीच्यारूपाने सरकारला मिळालेल्या सर्व रकमांचा समावेश भारताच्या एकत्रित निधीत होतो. भारत सरकारच्या वतीने सर्व कायदेशीररित्या अधिकृत देणी या निधीतून दिली जातात. संसदीय कायद्यातील तरतुदीशिवाय या निधीतून कोणत्याही रकमेचे विनियोजन (देणे किंवा काढणे) केले जाऊ शकत नाही.

**२. भारताचे लोक लेखे (Public Account of India) -**

भारत सरकारद्वारे किंवा त्यांच्या वतीने प्राप्त झालेल्या इतर सर्व सार्वजनिक रकमा (भारताच्या एकत्रित निधीमध्ये जमा केले जातात त्याव्यतिरिक्त) भारताच्या लोक लेख्यांमध्ये जमा केल्या जातात. यामध्ये भविष्य निर्वाह निधी ठेवी, न्यायिक ठेवी, बचत बँक ठेवी, विभागीय ठेवी, इत्यादींचा समावेश आहे. हे खाते शासकीय व्यवहारांद्वारे संचलित होते, म्हणजेच या खात्यातून संसदीय विनियोगजनाशिवाय खर्च केला जाऊ शकतो. अशी देणीबहुतेककरून बँकिंग व्यवहारांच्या स्वरूपाची असतात.

**३. भारताचा आकस्मिक निधी (Contingency Fund of India) -**

संविधानाने संसदेला 'भारताचा आकस्मिक निधी' स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे, ज्यातून कायद्याद्वारे निर्धारित रकमा वेळोवेळी दिल्या जातात. त्यानुसार, संसदेने १९५० मध्ये भारताचा आकस्मिक निधी कायदा मंजूर केला. या निधीतून खर्च करणे हे राष्ट्रपतींच्या विवेकाधीन अधिकारात येतो. संसदेने त्यांच्या अधिकारांतर्गत ठेवलेल्या अनपेक्षित खर्चाची पूर्तता करण्यासाठी ते त्यातून रकमा उचलू शकतात. हा निधी राष्ट्रपतींच्या वतीने वित्त सचिवांच्या ताब्यात असतो. भारताच्या सार्वजनिक खात्याप्रमाणे, हा निधीदेखील शासनाच्या व्यवहारांसाठी वापरला जातो.

**संसदेच्या कामकाजाशी संबंधित समस्या–**

१. सतत व्यत्यय आणि सत्रे स्थगित होणे.

२. विधिविधानासाठी अध्यादेशाच्या मार्गाचा अवलंब करणे. उदा., कृषी कायदे.

३. छाननी समित्यांना पाठवलेल्या विधेयकांच्या संख्येतील घट – १६ व्या लोकसभेत केवळ ३३% विधेयके समित्यांकडे पाठवण्यात आली. ब्रिटनमध्ये प्रत्येक विधेयक छाननीसाठी समितीकडे पाठवले जाते.

४. पूर्वछाननीशिवाय विधेयक सादर करणे.

५. आंतर–मंत्रालयीन कौशल्याची आवश्यकता असलेल्या किंवा व्यापक सरकारी धोरणाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही.

६. १६ व्या लोकसभेत, प्रश्नोत्तराचा तास नियोजित वेळेच्या ८२%, तर राज्यसभेत ४३% वेळ चालला. कामकाजाचा

कमी दर हा व्यत्ययांमुळे वाया गेलेला वेळ दर्शवितो, ज्यामुळे तोंडी उत्तरे मिळू शकणार्या प्रश्नांची संख्या कमी होते.

७. राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण – १७ व्या लोकसभेत ४३% खासदारांवर गुन्हेगारी आरोप आहेत, तर १६ व्या लोकसभेत हा आकडा ३४% होता.

**व्यत्ययाचे परिणाम –**

१. संसदेच्या एकूण उत्पादकतेत घट.

२. फारशी चर्चा न करता विधेयके घाईघाईने मंजूर केली जातात.

३. संसदीय पद्धती आणि लोकशाही मानदंडांचा अवमान होतो.

**संसदीय सुधारणा –**

१. कायद्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी कायदेनिर्मिती आधीच्या आणि नंतरच्या विधिविधान प्रभाव मूल्यांकनाची आवश्यकता.

२. प्रश्नोत्तराच्या वेळी पंतप्रधानांची अनिवार्य उपस्थिती.

३. विभागीय समित्यांचे कार्य प्रभावीपणे चालण्यासाठी दीर्घ कार्यकाल आणि शैक्षणिक पार्श्वभूमीवर आधारित विशेषज्ञीकरणास प्रोत्साहन देणे.

४. संसदेत महिलांसाठी आरक्षण.

५. खासदारांवरील खटल्यांसाठी विशेष न्यायाधिकरणाची स्थापन करणे.

६. समित्यांसमोर मंत्र्यांची उपस्थिती अनिवार्य करणे.

७. नियामकांचे संसदीय निरीक्षण.

८. व्हीप प्रणाली आणि पक्षांतर विरोधी कायद्याचे पुनरावलोकन. सरकार संकटात असतानाच व्हीप लागू व्हायला हवा.

**संसदीय समित्या**

संसदीय समिती म्हणजे एक अशी समिती जी सभागृहाद्वारे नियुक्त केली किंवा निवडली जाते किंवा सभापती/अध्यक्षांनी नामनिर्देशित केली जाते आणि जी सभापती/अध्यक्षांच्या निर्देशानुसार काम करते आणि आपला अहवाल सभागृहाला किंवा सभापती/अध्यक्षांना आणि सचिवालयाला सादर करते.

**उगम –**

भारतीय संसदीय लोकशाहीच्या इतर अनेक पद्धतींप्रमाणेच, संसदीय समित्यांची संस्थांचा उगमदेखील ब्रिटिश संसदीय पद्धतीततून झालेला आहे. ब्रिटनमध्ये १५७१ मध्ये पहिली संसदीय समिती स्थापन करण्यात आली. लोकलेखा समितीची स्थापना १८६१ मध्ये झाली. भारतात एप्रिल १९५० मध्ये पहिली लोकलेखा समिती स्थापन करण्यात आली. लोकसभेचे माजी सरचिटणीस पी.डी.टी. आचारी यांच्या मते, 'सरकारी विभागांनी त्यांच्या

स्वतःच्या स्थायी समित्या स्थापन करण्यास सुरुवात केल्यानंतर १९८९ मध्ये समित्यांकडे नियमितपणे विधेयके पाठवण्याची प्रथा सुरू झाली. त्याआधी, निवडक समित्या किंवा सभागृहांच्या संयुक्त समित्या केवळ काही महत्त्वाच्या विधेयकांची तपशीलवार छाननी करण्यासाठी स्थापन करण्यात आल्या होत्या, परंतु याचे प्रमाण फारच कमी होते.

**संसदीय समित्यांची गरज –**

संसदीय कामकाजाचे गुंतागुंतीचे स्वरूप आणि संसदीय अधिवेशनांदरम्यान उपलब्ध होणारा मर्यादित वेळ लक्षात घेता, खासदारांना सभागृहात मांडलेल्या प्रश्नांची तपशीलवार छाननी करता येत नाही. त्यामुळे संसदेच्या कामकाजाचा मोठा भाग संसदीय समित्यांच्या माध्यमातून पार पाडला जातो. या समित्यांमध्ये, पक्षांना त्यांच्या सभागृहातील संख्याबळाच्या प्रमाणात जागांचे वाटप केले जाते.

समित्या बारकाईने तपासणीसाठी अनेक प्रकरणे आपल्या हाती घेतात.

१. त्या प्रस्तावित कायद्यांचे पुनरावलोकन करतात, सरकारच्या कृतींवर देखरेख करतात आणि सरकारी खर्चाची छाननी करतात.

२. समित्यांनी सादर केलेल्या अहवालावर संसदेत माहितीपूर्ण चर्चा घडवून आणता येते आणि त्यामुळे संसदेची कार्यक्षमता आणि कौशल्य वाढते.

३. त्या पक्षीय पातळीवर मतैक्य निर्माण करण्यासाठी आणि स्वतंत्र तज्ज्ञ आणि सहभागी घटकांशी सल्लामसलत करण्याची संधी उपलब्ध करून देतात.

**संसदीय समित्यांचे प्रकार**

संसदेत काही स्थायी समित्या असतात ज्या कायमस्वरूपी असतात. त्या तदर्थ समित्याही स्थापन करू शकतात.

तदर्थ समित्या विशिष्ट हेतूने स्थापन केल्या जातात. उदाहरणार्थ, दूरसंचार परवाने आणि स्पेट्रमची किंमत तपासण्यासाठी दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात आली होती.

स्थायी समित्या चार प्रकारच्या असतात.

१. विभागांशी संबंधित स्थायी समित्या,

२. वित्तीय समित्या,

३. इतर स्थायी समित्या, आणि

४. प्रशासकीय समित्या.

**विभागीय स्थायी समित्या (DRSC) :**

अशा एकूण २४ समित्या आहेत. प्रत्येक समिती मंत्रालयाच्या संचाचे निरीक्षण करतात. त्यांची प्राथमिक कार्ये आहेत–

१. त्यांच्याकडे पाठविलेल्या विधेयकांची तपासणी करणे,



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. अनुदान मागण्यांची छाननी करणे, आणि

३. त्यांनी निवडलेल्या प्रकरणांचे परीक्षण करणे.

अशा छाननी व तपासणीदरम्यान, या समित्या सरकारी अधिकार्यांशी संपर्क साधू शकतात, मुख्य सहभागीदारांशी सल्लामसलत करू शकतात किंवा तज्ज्ञांकडून त्यांची मते मागवू शकतात.

**विभागीय स्थायी समित्या खालील कार्ये करतात –**

१. विधेयकांचे परीक्षण करणे – सभागृहात एकदा विधेयक मांडले गेले की, ते तपशीलवार छाननीसाठी संबंधित विभागांशी संबंधित स्थायी समितीकडे पाठवले जाऊ शकते. छाननी संपल्यानंतर, समिती आपला अहवाल संसदेत मांडते.

२. अनुदान मागण्यांचे परीक्षण करणे : अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुट्टीसाठी तहकूब केले जाते. या कालावधीत, विभागीय स्थायी समित्या त्यांच्या कार्यकक्षतील सर्व मंत्रालयांच्या अनुदान मागण्यांचे परीक्षण करतात. त्या प्रत्येक मंत्रालयांतर्गत विविध योजना आणि कार्यक्रमांसाठी वाटप केलेल्या निधीचे परीक्षण करतात आणि या निधीच्या वापराचा कलदेखील पाहतात.

३. प्रकरणांचे/मुद्द्यांचे परीक्षण : दरवर्षी, विभागीय स्थायी समित्या तपशीलवार परीक्षणासाठी प्रकरणांची निवड करतात. त्यांनी आपला अहवाल संसदेत सादर केल्यानंतर, संबंधित मंत्रालये त्यांच्या शिफारशींचा विचार करून कृती करतात. त्यानंतर, विभागीय स्थायी समित्या कृती अहवाल सभागृहात सादर करतात. उदाहरणार्थ, २०१६ मध्ये, ऊर्जाविषयक स्थायी समितीने भारतातील ऊर्जेच्या उपलब्धतेवर आपला अहवाल सादर केला.

**वित्तीय समित्या –**

वित्तीय समित्या तीन प्रकारच्या असतात. या समित्या सरकारी खर्चाची संसदीय छाननी सुलभ करतात. विभागांशी संबंधित स्थायी समित्यांप्रमाणेच, वित्तीय समित्यादेखील सरकारी अधिकार्यांशी संपर्क साधू शकतात आणि समस्यांचे परीक्षण करताना मुख्य सहभागीदार आणि तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकतात.

**१. लोकलेखा समिती :**

ही समिती प्रथम १९२१ मध्ये, १९१९ च्या भारत सरकार कायद्याच्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आली होती आणि तेव्हापासून ती अस्तित्वात आहे. सध्या त्यात २२ सदस्य (लोकसभेचे १५ आणि राज्यसभेचे ७ सदस्य) आहेत.

**लोकलेखा समितीची कार्ये –**

१. विभागीय स्थायी समित्यांनी संसदेत मांडलेल्या लेखापरीक्षण अहवालांची तपासणी करणे.

२. केंद्र सरकारची विनियोजन खाती आणि वित्तीय खाती आणि लोकसभेसमोर मांडलेल्या इतर कोणत्याही खात्यांचे परीक्षण करणे.

३. आर्थिक वर्षात कोणत्याही सेवेवर लोकसभेने त्या उद्देशाने मंजूर केलेल्या रकमेपेक्षा खर्च केलेल्या अतिरिक्त रकमेची तपासणी करणे.

विनियोजन खाती आणि त्यावरील कॅगच्या लेखापरीक्षण अहवालाची छाननी करताना, समितीने याची खात्री केली पाहिजे की (अ) वितरीत केलेला पैसा निर्धारित केलेल्या सेवेसाठी किंवा उद्देशासाठी कायदेशीररीत्या उपलब्ध केला गेला आहे; (ब) खर्चाचा पैसा त्याच प्राधिकार्याकडे सोपविला गेला आहे ज्याच्या अखत्यारित तो खर्च आहे; (ल) प्रत्येक पुनर्विनियोग संबंधित नियमांनुसार केला गेला आहे.

**लोकलेखा समितीच्या मर्यादा –**

१. तिचा व्यापक अर्थाने धोरणाच्या प्रश्नांशी संबंध नाही.

२. ती खात्यांमधील खर्चांची ते होऊन गेल्यावर तपासणी (Port-Mortem Ewamination) करते (आधीच केलेला खर्च दर्शविते).

३. ती दैनंदिन प्रशासनाच्या बाबतीत हस्तक्षेप करू शकत नाही.

४. तिच्या शिफारशी केवळ सल्ल्याच्या स्वरूपाच्या असतात; मंत्रालयांसाठी त्या बंधनकारक नसतात.

५. विभागांच्या खर्चाचे वितरण नामंजूर करण्याचे अधिकार तिच्याकडे नाहीत.

६. ही कार्यकारी संस्था नाही आणि म्हणून ती आदेश जारी करू शकत नाही. केवळ संसदच तिच्या निष्कर्षांवर अंतिम निर्णय घेऊ शकते.

**२. अंदाज समिती :**

या समितीचा उगम १९२१ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या स्थायी वित्तीय समितीमधून झाल्याचे दिसून येऊ शकते. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली अंदाज समिती १९५० मध्ये तत्कालीन अर्थमंत्री जॉन मथाई यांच्या शिफारशीवरून स्थापन करण्यात आली होती. सुरुवातीस तिचे २५ सदस्य होते; पण १९५६ मध्ये तिची सदस्यसंख्या ३० वर नेण्यात आली. सर्व तीस सदस्य हे फक्त लोकसभेचे असतात. या समितीत राज्यसभेस प्रतिनिधित्व नाही.

**अंदाज समितीचे कार्य –**

- अंदाज समितीचे मुख्य कार्य हे आहे की संस्थेमध्ये काय सुधारणा, कार्यक्षमता किंवा प्रशासकीय सुधारणा, अंदाजांशी निगडित धोरणाशी सुसंगत असू शकतात, याचा अहवाल देणे.
- प्रशासनात कार्यक्षमता आणि काटकसर आणण्यासाठी पर्यायी धोरणे सुचवणे
- अंदाजामध्ये अंतर्भूत केलेल्या धोरणांच्या मर्यादेत निधी व्यवस्थापित केला आहे की नाही हे तपासणे.
- संसदेत कोणत्या प्रारूपामध्ये अंदाज मांडला जाणार आहे ते सुचवणे.

**अंदाज समितीच्या मर्यादा –**

१. ती संसदेने सांगितल्यानंतरच अर्थसंकल्पीय अंदाजांचे परीक्षण करते, त्यापूर्वी नाही.

२. ती संसदेने निर्धारित केलेल्या धोरणावर प्रश्न उपस्थित करू शकत नाही.

३. तिच्या शिफारशी सल्ल्याच्या स्वरूपात असतात आणि त्या मंत्रालयांसाठी बंधनकारक नाहीत.

४. ही समिती दरवर्षी फक्त काही निवडक मंत्रालये आणि विभागांचे परीक्षण करते. अशा प्रकारे, प्रत्येकाचे परीक्षण करण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागू शकतो.

५. (लोकलेखा समितीलज्ञ ज्याप्रमाणे CAG च्या तज्ञांचे साह्य उपलब्ध होते तसे साह्य या समितीला उपलब्ध होत नाही.

६. तिचे कार्य घटनेनंतरच्या विश्लेषणाच्या (Port-Mortem Examination) स्वरूपाचे आहे.

**संसदीय समित्यांशी संबंधित महत्त्वाचे समस्या/मुद्दे –**

१. अल्प कालावधी – समित्यांचा कार्यकाळ फक्त १ वर्षाचा असतो. यामुळे खासदार कौशल्ये विकसित करण्यात अपयशी ठरतात.

२. समित्यांकडे पाठवल्या जाणार्या विधेयकांची घटती संख्या – १६ व्या लोकसभेत केवळ २७% विधेयके संबंधित समित्यांना पाठवली गेली होती.

३. अंदाज समिती, लोकलेखा समिती यांसारख्या समित्यांच्या अहवालांवर नियमितपणे चर्चा होत नाही.

४. असे अनेकदा घडते की, संसदीय समित्यांचे अहवाल हे मागण्यांवर चर्चा झाल्यानंतर किंवा चर्चेच्या दिवशी सादर केले जातात. यामुळे अहवालावर विचार करण्यासाठी खूप कमी वेळ मिळतो.

५. विभागांशी संबंधित स्थायी समित्या त्यांच्या अखत्यारितील विभाग किंवा मंत्रालयांशी संबंधित विविध विषयांचे, प्रकरणांचे परीक्षण करतात. काही समित्या विशिष्ट मुद्द्यांवर लोकांकडून सूचना मागवत असल्या तरी, या समित्यांमध्ये आणि मुद्द्यांवर लोकसहभागाच्या पद्धतीत सातत्य नाही.

६. समित्यांच्या कामगिरीचे आणि कामकाजाचे नियमितपणे मूल्यांकन करणारी कोणतीही यंत्रणा नाही.

७. पुरेशा तज्ज्ञांच्या उपलब्धतचा अभाव.

८. समित्यांकडे कोणती विधेयके पाठवायची याबाबत कोणताही योग्य नियम किंवा यंत्रणा नाही.

**नवीन दृष्टिकोन –**

१. या समित्यांकडे विधेयके संदर्भित करण्याची प्रक्रिया अनिवार्य/स्वयंचलित स्वरूपाची असणे उपयुक्त ठरू शकते. सविस्तर स्पष्टीकरणानंतर सभापती/अध्यक्षांच्या विशिष्ट मान्यतेने त्यात सूट दिली जाऊ शकते.

२. समित्यांना शिफारशी करण्यासाठी आणि त्याचा अहवाल सादर करण्यासाठी एक निश्चित कालमर्यादा निश्चित करता येईल, ज्याबाबतचा निर्णय सभापती/अध्यक्ष घेऊ शकतात.

३. समित्यांचे कामकाज दर्जेदार होण्यासाठी, त्या–त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांना आमंत्रित केले जाऊ शकते; कारण अशा तज्ज्ञ त्यांच्यासोबत त्या–त्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान आणू शकतात आणि जगभरातील त्या क्षेत्रातील नवीनतम



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

घडामोडी आणि प्रवृत्तींची ओळख करून देण्यास मदत करू शकतात.

४. समित्यांनी केवळ अर्थसंकल्पीय प्रस्तावांवर चर्चा करण्यापुरते मर्यादित राहू नये आणि तर त्यानी त्यात आवश्यक त्या सुधारणा किंवा दुरुस्त्या करून त्यांना मान्यता द्यावी. त्यांनी मंत्रालयांना नवीन उपक्रम आणि लोकाभिमुख उपाययोजना करण्यासाठी सूचनाही द्याव्यात.

५. समितीच्या अहवालांवर चर्चा करणे अनिवार्य करावे.

६. संसदीय स्थायी समितीमधील सर्व चर्चा मोकळ्या आणि मुक्त असाव्यात. त्यासाठी समितीच्या बैठकींच्या चर्चेदरम्यान त्यांना पक्षाचा कोणताही व्हीप लागू होणार नाही, अशी तरतूद केली जाऊ शकते.

७. ब्रिटनप्रमाणे आपल्याकडेही अशा समित्यांना योग्य तांत्रिक साहाय्य उपलब्ध केले जावे.

**संसदीय विशेषाधिकार**

- संसदीय विशेषाधिकार म्हणजे संसदेची दोन सभागृहे, त्यांच्या समित्या आणि त्यांचे सदस्य यांना मिळालेले विशेष अधिकार, संरक्षण आणि सवलत. संसदेच्या सभागृहांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही समितीच्या कामकाजात बोलण्याचा आणि भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींनाही संविधानाने संसदीय विशेषाधिकारांच्या कक्षेत समाविष्ट केले आहे. यामध्ये भारताचे ॲटर्नी जनरल आणि केंद्रीय मंत्री यांचा समावेश आहे.
- येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की संसदेचे विशेषाधिकार राष्ट्रपतींना मिळत नाहीत जे संसदेचे अविभाज्य भाग आहेत.

**संसदीय विशेषाधिकारांची गरज –**

- संसद सदस्यांच्या कृतींचे स्वातंत्र्य आणि परिणामकारकता अबाधित ठेवण्यासाठी विशेषाधिकारांची आवश्यकता आहे. या विशेषाधिकारांशिवाय, सभागृहे त्यांचे अधिकार, प्रतिष्ठा आणि सन्मान राखू शकत नाहीत किंवा त्यांच्या संसदीय जबाबदार्‍या पार पाडताना कोणत्याही अडथळ्यापासून त्यांच्या सदस्यांचे संरक्षण करू शकत नाहीत.

**संसदीय विशेषाधिकारांचा स्रोत –**

- भारतीय राज्यघटनेने कलम १०५ मध्ये संसदेचे अधिकार आणि विशेषाधिकार आणि कलम १९४ मध्ये राज्य विधिमंडळांचे अधिकार निर्दिष्ट केले आहेत. थोडयात, ते (अ) संविधानाच्या इतर तरतुदी आणि सभागृहाच्या स्थायी आदेशांच्या अधीन राहून संसदेत भाषण स्वातंत्र्य प्रदान करतात; (ब) संसदेतील सर्व भाषणे आणि मतांना न्यायालयीन छाननीपासून सूट देतात; आणि (क) संसदेला (आणि राज्य विधिमंडळांना) विशेषाधिकारांना संहिताबद्ध करण्याची परवानगी देतात आणि तोपर्यंत, ब्रिटिश संसदेला १९५० मध्ये जे विशेषाधिकार मिळाले होते तेच विशेषाधिकार आहेत. आजपर्यंत, संसद आणि राज्य विधिमंडळांनी त्यांच्या विशेषाधिकारांना संहिताबद्ध करण्यासाठी कोणताही कायदा पारित केलेला नाही.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**खासदारांच्या विशेषाधिकारांचे काही महत्त्वाचे स्रोत पुढीलप्रमाणे आहेत –**

१. संविधान.

२. दोन्ही सभागृहांचे नियम.

३. संसदीय अधिवेशने.

४. न्यायिक अन्वयार्थ.

५. संसदेने केलेले विविध कायदे.

**संसदीय विशेषाधिकारांचे दोन मुख्य श्रेणींमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते :**

१. असे विशेषाधिकार ज्यांचा संसदेचे प्रत्येक सभागृह एकत्रितपणे उपभोग घेते, आणि

२. असे विशेषाधिकार ज्यांचा सदस्य वैयक्तिकरित्या उपभोग घेतात.

**सामूहिक विशेषाधिकार वैयक्तिक विशेषाधिकार**

| सामूहिक विशेषाधिकार | वैयक्तिक विशेषाधिकार |
|---|---|
| १. आपले अहवाल, चर्चा आणि कार्यवाही प्रकाशित करण्याचा अधिकार आणि इतरांना ते प्रकाशित करण्यास मनाई करण्याचा अधिकार.<br>२. ते आपल्या कार्यवाहीतून अनोळखी व्यक्तींना वगळू शकते आणि काही महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी गुप्त बैठका आयोजित करू शकते.<br>३. आपल्या विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा अवमान केल्याबद्दल ते सदस्यांना तसेच बाहेरील लोकांना समज देऊन, सूचना करून किंवा तुरुंगवासाद्वारे शिक्षा देऊ शकते.<br>४. न्यायालयांना सभागृहे किंवा त्याच्या समित्यांच्या कामकाजाची चौकशी करण्यास मनाई आहे.<br>५. कोणत्याही व्यक्तीला (एकतर सदस्य किंवा बाहेरील व्यक्ती) अटक केली जाऊ शकत नाही आणि पीठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणतीही कायदेशीर प्रक्रिया (दिवाणी किंवा फौजदारी) सभागृहाच्या हद्दीत केली जाऊ शकत नाही. | १. संसदेच्या अधिवेशनादरम्यान आणि अधिवेशन सुरू होण्याच्या ४० दिवस आधी आणि अधिवेशन संपल्यानंतर ४० दिवसांपर्यंत त्यांना अटक करता येत नाही. हा विशेषाधिकार केवळ दिवाणी प्रकरणांमध्ये उपलब्ध आहे आणि फौजदारी प्रकरणांमध्ये किंवा प्रतिबंधात्मक अटकेच्या प्रकरणांमध्ये नाही.<br>२. कोणताही सदस्य संसदेमध्ये किंवा तिच्या समित्यांमध्ये सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी किंवा व्यक्त केलेल्या कोणत्याही मतासाठी कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीसाठी जबाबदार धरला जात नाही. हे स्वातंत्र्य संविधानाच्या तरतुदींच्या आणि संसदेच्या कार्यपद्धतीचे नियमन करणारे नियम आणि स्थायी आदेशांच्या अधीन आहे.<br>३. त्यांना ज्युरी सेवेतून सूट देण्यात आली आहे आणि संसदेचे अधिवेशन चालू असताना न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यात पुरावे देण्यास किंवा साक्षीदार म्हणून हजर राहण्यास ते नकार देऊ शकतात. |

**विशेषाधिकारांचा भंग आणि सभागृहांचा अवमान –**

१. जेव्हा कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी कोणत्याही विशेषाधिकार, अधिकार आणि प्रतिकारशक्तीचा अवहेलना करते किंवा त्यावर हल्ला करते, वैयक्तिकरित्या किंवा सभागृहाच्या त्याच्या सामूहिक क्षमतेमध्ये, त्या गुन्ह्याला विशेषाधिकाराचा भंग म्हणून संबोधले जाते आणि सदनाद्वारे दंडनीय आहे.

२. संसदेची सभागृहे, त्यांचे सदस्य किंवा अधिकारी यांच्या कामकाजात अडथळा आणणारी किंवा सभागृहाच्या प्रतिष्ठेला, अधिकाराच्या आणि सन्मानाच्या विरोधात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम घडविण्याची प्रवृत्ती असणारी कोणतीही केलेली कृती किंवा न केलेली कृती म्हणजे सदनाचा अवमान असे मानले जाते.

**संसदीय विशेषाधिकारांशी संबंधित समस्या/मुद्दे–**

१. विशेषाधिकारांचे अद्याप संहितीकरण केलेले नसल्यामुळे, कायदेनिर्मात्यांची न्यायालयीन छाननी होत नाही.

२. खूप विस्तृत शक्ती – कायदेनिर्मात्यांना त्यांचे विशेषाधिकार काय आहेत, त्यांचे उल्लंघन कशाला म्हणतात आणि उल्लंघन झाल्यास कोणती शिक्षा द्यायची हे स्वत:च ठरविण्याचा अधिकार आहे.

३. हे 'मर्यादित अधिकार' या तत्त्वाच्या विरुद्ध आहे; कारण संसदच सर्व काही ठरवते.

४. कलम १०५ आणि १९४ स्पष्टपणे नमूद करतात की 'विधिमंडळाचे अधिकार, विशेषाधिकार आणि उन्मुक्ती वेळोवेळी विधिमंडळाद्वारे निश्चित केल्या जातील आणि अशाप्रकारे निश्चित होईपर्यंत, हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणेच असतील'. 'अशाप्रकारे निश्चित होईपर्यंत' या शब्दप्रयोगाचा अर्थ विशेषाधिकारांची अजिबात व्याख्या न करण्याचा पूर्ण अधिकार असा होत नाही.

५. विशेषाधिकारांचा गैरवापर – अनेकदा असे दिसून आले आहे की आमदारांकडून विशेषाधिकारांचा गैरवापर केला जातो. उदा. २०१७ मध्ये, कर्नाटक विधानसभेने दोन पत्रकारांना तिच्या विशेषाधिकाराचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरविले आणि त्यांना तुरुंगात शिक्षा सुनावली. हे पत्रकारांनी लिहिलेल्या काही लेखांनंतर घडले होते, ज्यात त्यांनी काही आमदारांची बदनामी केल्याचा आरोप होता. या प्रकरणामुळे विधिमंडळाच्या विशेषाधिकारात काय असावे असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.

६. भारत ब्रिटिश संसदेमध्ये प्रचलित असलेल्या विशेषाधिकार प्रणालीचे अनुसरण करतो. पण लक्षात घेण्याचा मुद्दा म्हणजे ब्रिटिश संसद भारतीय संसदेपेक्षा अधिक सार्वभौम आहे.

- म्हणूनच संसदीय विशेषाधिकारांना संहिताबद्ध करण्याची नितांत गरज आहे; कारण यामुळे ते मूलभूत अधिकार आणि न्यायिक छाननीच्या अंतर्गत येतील ज्यामुळे भारतीय लोकशाही मजबूत होईल.
- न्यायमूर्ती एम. एन. वेंकटचलैया यांच्या अध्यक्षतेखालील घटना पुनरावलोकन आयोगाने अशी शिफारस केली होती की, कायदेमंडळांच्या मुक्त आणि स्वतंत्र कामकाजासाठी विशेषाधिकार निश्चित केले पाहिजेत आणि त्यावरील मर्यादा काढल्या पाहिजेत.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाची रचना, संघटना आणि कार्यप्रणाली.

**भारताचे राष्ट्रपती –**

केंद्रीय कार्यकारी मंडळामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्रिपरिषद आणि भारताचे ॲटर्नी जनरल यांचा समावेश होतो. राष्ट्रपती हे शासनाचे प्रमुख असतात. ते भारताचे प्रथम नागरिक आहेत आणि राष्ट्राची एकात्मता, अखंडता आणि ऐक्य यांचे प्रतीक म्हणून काम करतात.

**निवडणूक –**

राष्ट्रपतींची निवड थेट जनतेंद्वारे केली जात नाही, तर निर्वाचक गणा (इलेटोरल कॉलेज) च्या सदस्यांद्वारे निवडले जातात :

१. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निर्वाचित सदस्य;

२. राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य;

३. दिल्ली आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य.

अशा प्रकारे, संसदेच्या दोन्ही सभागृहांचे नामनिर्देशित सदस्य, राज्य विधानसभांचे नामनिर्देशित सदस्य, राज्य विधान परिषदेचे सदस्य (निवडलेले आणि नामनिर्देशित दोन्ही) (द्विगृह विधिमंडळांच्या बाबतीत) आणि दिल्ली आणि पुद्दुचेरी विधानसभांचे नामनिर्देशित सदस्य राष्ट्रपतींच्या निवडणुकीत भाग घेत नाहीत. जेव्हा एखादी विधानसभा विसर्जित केली जाते, तेव्हाही तिचे सभासद राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र ठरतात. अशावेळी जरी राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीपूर्वी विसर्जित विधानसभेच्या नव्या निवडणुका घेतल्या नसल्या तरीही ते मतदान करू शकतात.

**राष्ट्रपतींचे अधिकार आणि कार्ये –**

राष्ट्रपती हे सरकारचे औपचारिक प्रमुख असतात हे आपण आधीच पाहिले आहे. या औपचारिक अर्थाने, राष्ट्रपतींना जवळजवळ एकूण ८५ विस्तृत असे कार्यकारी, कायदेविषयक, न्यायविषयक आणि आपत्कालीन अधिकार आहेत. संसदीय व्यवस्थेमध्ये, राष्ट्रपतींना हे अधिकार प्रत्यक्षात मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसार वापरावे लागतात. पंतप्रधान आणि मंत्रिपरिषदेला लोकसभेत बहुमताचा पाठिंबा असतो आणि तेच खरे कार्यकारी असतात. बहुतेक बाबतीत, राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्याचे पालन करावे लागते. घटनात्मकदृष्ट्या, राष्ट्रपतींना सर्व महत्त्वाच्या बाबी आणि मंत्रिपरिषदेच्या चर्चेची माहिती घेण्याचा अधिकार आहे. राष्ट्रपती मागवतील ती सर्व माहिती त्यांना देणे हे पंतप्रधानांना बंधनकारक आहे. राष्ट्रपती अनेकदा पंतप्रधानांना पत्र लिहितात आणि देशाला भेडसावणार्या मुद्द्यांवर त्यांचे मत व्यक्त करतात.

**राष्ट्रपतींचे विवेकाधीन अधिकार –**

१. मंत्रिपरिषदेने दिलेला सल्ला राष्ट्रपती पुनर्विचारार्थ परत पाठवू शकतात आणि परिषदेला निर्णयावर पुनर्विचार



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

करण्यास सांगू शकतात. हे करताना, राष्ट्रपती त्यांच्या (किंवा तिच्या) स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कार्य करतात. जेव्हा राष्ट्रपतींना वाटते की, मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यामध्ये काही कमतरता किंवा कायदेशीर त्रुटी आहेत किंवा तो देशाच्या हिताचा नाही, तेव्हा राष्ट्रपती मंत्रिपरिषदेला त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगू शकतात. जरी मंत्रिपरिषद पुनर्विचार करून पुन्हा तोच सल्ला परत पाठवू शकत असली आणि राष्ट्रपतींनी त्या सल्ल्याला मान्यता देण्यास बांधील असले, तरीही स्वाभाविकपणे अशा निर्णयाचा पुनर्विचार करण्याची विनंती करण्याइतके राष्ट्रपतींच्या शब्दांना वजन असते. तर, हा एक असा मार्ग आहे ज्याद्वारे राष्ट्रपती स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कार्य करू शकतात.

२. राष्ट्रपतींना नकाराधिकारा (व्हेटो) चा अधिकारदेखील आहे ज्याद्वारे ते संसदेने मंजूर केलेल्या विधेयकांना (अर्थविधेयकाव्यतिरिक्त) मंजुरी देण्यास रोखू शकतात किंवा त्याला नकार देऊ शकतात. राष्ट्रपती विधेयकावर पुनर्विचार करण्यास सांगून ते विधेयक संसदेकडे परत पाठवू शकतात. संसदेने तेच विधेयक पुन्हा मंजूर करून राष्ट्रपतींकडे पाठवले, तर राष्ट्रपतींनी त्या विधेयकाला संमती द्यावी लागते. तथापि, राष्ट्रपतींनी हे विधेयक किती कालमर्यादेत फेरविचारासाठी परत पाठवावे याबद्दल घटनेत कोणताही उल्लेख नाही. याचा अर्थ राष्ट्रपती कोणत्याही कालमर्यादेशिवाय विधेयक त्यांच्याकडे प्रलंबित ठेवू शकतात. यामुळे राष्ट्रपतींना अत्यंत प्रभावीपणे नकाराधिकार वापरण्याचा अनौपचारिक अधिकार मिळतो. याला कधीकधी 'पॉकेट व्हेटो' असेही संबोधले जाते.

३. जेव्हा निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी बहुमत मिळालेले नसते, तेव्हा राष्ट्रपती पंतप्रधान निवडण्यासाठी आपल्या विवेकाधिकाराचा वापर करतात.

**भारतीय राजकारणातील राष्ट्रपतीपदाच्या स्थानाचे विश्लेषण –**

संसदीय प्रणालीमध्ये, मंत्रिपरिषदेचे अस्तित्व हे कायदेमंडळातील बहुमताच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. याचा अर्थ मंत्रिपरिषदेस कधीही पदत्याग करावा लागू शकतो आणि नवीन मंत्रिपरिषद स्थापन करावी लागू शकते. अशा स्थितीत राज्याच्या अशा औपचारिक प्रमुखाची आवश्यकता असते ज्याची मुदत निश्चित असते, ज्याला पंतप्रधान नियुक्त करण्याचा अधिकार असतो आणि जो संपूर्ण देशाचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करू शकतो. सामान्य परिस्थितीत राष्ट्रपतींची हीच भूमिका असते. याशिवाय, कोणत्याही पक्षाकडे स्पष्ट बहुमत नसताना, देशाचे सरकार चालवण्यासाठी मंत्रिमंडळाची निवड करणे आणि पंतप्रधानांची नियुक्ती करण्याची अतिरिक्त जबाबदारी राष्ट्रपतींवर असते.

**राष्ट्रपती हे फक्त रबर स्टॅम्प आहेत का ?**

घटनेच्या अनुच्छेद ५३ मध्ये असे म्हटले आहे की 'संघाची कार्यकारी शक्ती राष्ट्रपतींकडे निहित असेल आणि या संविधानानुसार ते प्रत्यक्षपणे किंवा त्यांच्या अधीनस्थ अधिका–यांद्वारे वापरतील.' याचा अर्थ राष्ट्रपती हे अधिकार फक्त मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसार व मदतीने वापरतात.

१. भारताचे राष्ट्रपती हे केवळ रबर स्टॅम्प नसतात आणि असू शकत नाहीत. ते प्रत्यक्षपणे संघराज्याच्या कार्यकारी अधिकाराचा वापर करत नाहीत, परंतु ते मंत्री परिषदेच्या निर्णयाशी असहमत असू शकतात, त्यांना सूचना व इशारा देऊ शकतात, त्यांना सल्ला देऊ शकतात, इत्यादी.

२. राष्ट्रपती मंत्रिमंडळाला त्यांच्या निर्णयांवर पुनर्विचार करण्यास सांगू शकतात. मंत्रिमंडळाने अशा फेरविचारानंतर तोच



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

प्रस्ताव कोणताही बदल न करता परत पाठवला तर राष्ट्रपतींना त्यावर स्वाक्षरी करावी लागेल ही वेगळी गोष्ट आहे. कारण सरकारच्या मंत्रिमंडळ व्यवस्थेंतर्गत, मंत्रिमंडळ हेच शासनाच्या निर्णयांसाठी जबाबदार असते.

३. राष्ट्रपती ज्या निर्णयांना मान्यता देतात त्यांना वैयक्तिकरीत्या जबाबदार नसतात.

४. भारतीय राज्यघटना ही राष्ट्रपतींनी जागरुक आणि उत्तरदायी असावे अशी अपेक्षा करते आणि त्यांना किंवा तिला स्वत:वर कार्यकारी मंडळाच्या संकुचित राजकीय दृष्टिकोनाचा प्रभाव पडू न देता व्यापक दृष्टिकोन स्वीकारण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

५. निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाला बहुमत मिळत नसेल, तेव्हा सरकार स्थापन करण्यासाठी कोणाला निमंत्रित करायचे हे ठरविण्यात राष्ट्रपती महत्त्वाची भूमिका बजावतात.

**राज्यपाल**

**ऐतिहासिक पार्श्वभूमी –**

१. भारतात ब्रिटिश राजवटीच्या काळात १८५८ पासून, प्रांतीय गव्हर्नर हे गव्हर्नर–जनरलच्या देखरेखीखाली काम करत. ते ब्रिटिश शासनाचे प्रतिनिधी म्हणूनच काम करत होते.

२. पुढील दशकांमध्ये, भारतीय राष्ट्रवादी चळवळीद्वारे उत्तम शासनाचे उद्दिष्ट ठेवून ब्रिटिश राजवटीकडून विविध सुधारणांची मागणी केली गेली. या प्रयत्नांची फलनिष्पत्ती भारत सरकार कायदा, १९३५ च्या रूपाने झाली. हा कायदा १९३७ मध्ये अंमलात आला आणि त्याने प्रांतीय स्वायत्तता आणली. यानंतर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला सहा प्रांतात बहुमत मिळाले.

३. १९३५ च्या कायद्यानुसार, गव्हर्नरना आता प्रांताच्या विधिमंडळाच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार काम करायचे होते, परंतु त्यांच्या विशेष जबाबदार्या आणि विवेकाधिकार कायम ठेवण्यात आल्या होत्या.

४. स्वातंत्र्यानंतर, १९४७ ची तात्पुरती घटना १९३५ च्या कायद्यापासून स्वीकारली गेली ज्यानुसार गव्हर्नरचे पद कायम ठेवण्यात आले, परंतु 'त्याच्या विवेकबुद्धीनुसार वागणे' आणि 'त्याच्या वैयक्तिक निर्णयशक्तीचा वापर करणे' ही वाक्ये वगळण्यात आली.

**महत्त्वाच्या घटनात्मक तरतुदी –**

१. अनुच्छेद १६३(१) – राज्यपालास आपले कार्याधिकार वापरण्याच्या कामी, या संविधानानुसार किंवा त्याअन्वये त्याने आपले कार्याधिकार किंवा त्यांपैकी कोणताही कार्याधिकार स्वविवेकानुसार वापरणे आवश्यक असेल तेवढी मर्यादा खेरीजकरून एरव्ही, साहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री प्रमुखपदी असलेली एक मंत्रिपरिषद असेल.

२. अनुच्छेद १६३(२) – (२) एखादी बाब, जिच्याबाबत राज्यपालाने या संविधानानुसार किंवा त्याखाली स्वविवेकानुसार कृती करणे आवश्यक आहे अशा स्वरूपाची आहे किंवा नाही, असा कोणताही प्रश्न उद्भवला तर, राज्यपालाने स्वविवेकानुसार दिलेला निर्णय अंतिम असेल आणि राज्यपालाने केलेल्या कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यता, त्याने स्वविवेकानुसार कृती करावयास हवी होती किंवा नको होती, या कारणावरून प्रश्नास्पद करता येणार नाही.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**राज्यपालांचे विवेकाधिन अधिकार –**

१. कोणतेही विधेयक अनुच्छेद २०० अंतर्गत राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवणे.

२. अनुच्छेद १६४(१) अंतर्गत राज्याच्या मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करणे ज्यामध्ये त्रिशंकू परिस्थितीत सभागृहात बहुमत सिद्ध करण्यासाठी सर्वात मोठ्या पक्षाच्या नेत्याला आमंत्रित करणे समाविष्ट आहे.

३. मंत्रिमंडळ बरखास्त करणे. अनुच्छेद १६४(१) अन्वये राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मुख्यमंत्री म्हणून मंत्रालय व इतर मंत्री पद धारण करतील.

४. राज्यांमध्ये घटनात्मक यंत्रणा अपयशी ठरल्यास कलम ३५६ अंतर्गत राज्यपालांचा अहवाल.

५. आसाममधील आदिवासी क्षेत्रासारख्या विशिष्ट प्रदेशांसाठी राज्यपालांची जबाबदारी आणि अनुच्छेद ३७१अ (नागालँड), ३७१क (मणिपूर), ३७१ह (अरुणाचल प्रदेश) अंतर्गत राज्यपालांवर सोपवण्यात आलेल्या जबाबदार्या.

आपण आधी चर्चा केलेले मुद्देदेखील उद्धृत करू शकतो.

**सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निकाल :**

**१. नबाम फेलिस खटल्याचा निकाल :**

- सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, राज्यपाल हे स्वतः नव्हे तर केवळ मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखालील मंत्रिपरिषदेच्या मदतीवर आणि सल्ल्याने सभागृहाचे अधिवेशन बोलावू शकतात, स्थगित करू शकतात आणि बरखास्त करू शकतात.
- न्यायालयाने संविधान सभेतील चर्चेच्या आधारे आपला निर्णय दिला ज्याद्वारे कलम १७४ अंतर्गत राज्यपालांना विवेकाधीन अधिकार न देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**२. समशेर सिंग विरुद्ध पंजाब राज्य (१९७४) :**

- सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, 'राज्यपालांना मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसार कार्य करण्यास नकार देण्याचा अधिकार नाही. अशी भूमिका 'जबाबदार शासन' या संकल्पनेच्या विरोधी आहे.'

**३. बी. पी. सिंघल वि. भारतीय संघराज्य २०१० :**

- सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, राज्यपालांची दुहेरी भूमिका आहे – अ) केंद्राचे प्रतिनिधी, ब) राज्याचे प्रमुख.

**४. एस. आर. बोम्मई वि. भारतीय संघराज्य (१९९४) :**

- सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की त्रिशंकू विधानसभेच्या (कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नसणे) परिस्थितीत अंतिम निर्णय विवाद करणार्या पक्षांवर नाही तर संबंधित विधिमंडळावर 'बहुमत' चाचणीद्वारे अवलंबून असतो. या प्रकरणामुळे सर्वोच्च न्यायालयाला राज्यपालांच्या अहवालाचा आधार आलेल्या कोणत्या कारणांची चौकशी करण्याची परवानगी मिळाली.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**शिफारसी –**

१. सरकारिया आयोग : सरकारिया आयोगाने खालील निकषांची शिफारस केली आहे ज्यांचा राज्याच्या राज्यपालांची नियुक्ती करताना विचार केला पाहिजे :

- तो जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती असावा.
- तो राज्याबाहेरील व्यक्ती असावा.
- तो एक अलिप्त व्यक्तिमत्व असावा आणि राज्याच्या स्थानिक राजकारणाशी फारसा जवळचा संबंध नसावा ; आणि
- तो असा व्यक्ती असावा ज्याने राजकारणात आणि विशेषतः अलीकडच्या काळात फार मोठा भाग घेतला नाही.
- वरील निकषांनुसार राज्यपाल निवडताना, अल्पसंख्याक गटातील व्यक्तींना संधी दिली जावी.

२. दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग : राज्यपालांनी विवेकाधिकाराचा वापर कसा करावा याबद्दल आंतर–राज्य परिषदेने मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत.

३. व्यंकटचलय्या आयोग : राज्यपालांना त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ सामान्यपणे पूर्ण करण्याची परवानगी देण्याची शिफारस केली.

४. अशी 'आचारसंहिता' तयार करण्याची गरज आहे जिने असे काही 'निकष आणि तत्त्वे' स्पष्ट केली पाहिजेत जी राज्यपालांची स्वविवेकबुद्धी आणि घटनात्मक आदेशाला मार्गदर्शन करतील.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – कार्यकारी मंडळाची रचना, संघटना आणि कार्यप्रणाली – सरकारची मंत्रालये आणि विभाग.

## पंतप्रधान

संविधानाद्वारे निर्माण केलेल्या संसदीय शासनव्यवस्थेत, राष्ट्रपती हा नामधारी कार्यकारी प्रमुख असतो आणि पंतप्रधान हा वास्तविक कार्यकारी कार्यकारी प्रमुख (डी फॅटो एझियुटिव्ह) असतो. दुसर्या शब्दांत, राष्ट्रपती हा राज्याचा प्रमुख असतो तर पंतप्रधान हा सरकारचा प्रमुख असतो.

## नियुक्ती –

राज्यघटनेत पंतप्रधानांची निवड आणि नियुक्तीसाठी कोणतीही विशिष्ट प्रक्रिया नाही. कलम ७५ मध्ये फक्त असे म्हटले आहे की, पंतप्रधानांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाईल. तथापि, याचा अर्थ असा नाही की, राष्ट्रपती कोणालाही पंतप्रधान म्हणून नियुक्त करण्यास स्वतंत्र आहेत. संसदीय शासन पद्धतीच्या नियमांनुसार, राष्ट्रपतींनी लोकसभेतील बहुमत असलेल्या पक्षाच्या नेत्याची पंतप्रधान म्हणून नियुक्ती करावी. परंतु, लोकसभेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नसताना, राष्ट्रपती पंतप्रधानांची निवड आणि नियुक्ती करताना वैयक्तिक विवेकाचा वापर करू शकतात. अशा स्थितीत, राष्ट्रपती सहसा लोकसभेतील सर्वात मोठ्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या नेत्याची पंतप्रधान म्हणून नियुक्ती करतात आणि त्याला एका महिन्याच्या आत सभागृहात विश्वासदर्शक ठराव घेण्यास सांगतात.

## अधिकार आणि कार्ये –

| | |
|---|---|
| **मंत्रिपरिषदेच्या बाबतीत** | १. तो अशा व्यक्तींची शिफारस करतो ज्यांना राष्ट्रपती मंत्री म्हणून नियुक्त करू शकतात. पंतप्रधानांनी शिफारस केलेल्या व्यक्तींनाच राष्ट्रपती मंत्री म्हणून नियुक्त करू शकतात.<br>२. तो मंत्र्यांमध्ये विविध खात्यांचे वाटप आणि फेरबदल करतो.<br>३. तो एखाद्या मंत्र्याला राजीनामा देण्यास सांगू शकतो किंवा मतभेद झाल्यास त्याला बडतर्फ करण्याचा सल्ला राष्ट्रपतींना देऊ शकतो. |
| **राष्ट्रपतींच्या बाबतीत** | (अ) संघराज्याच्या कारभाराच्या प्रशासनाशी संबंधित मंत्रिपरिषदेचे सर्व निर्णय आणि कायद्याचे प्रस्ताव याबाबत राष्ट्रपतींना कळवणे;<br>(ब) संघराज्याच्या कारभाराच्या प्रशासन आणि कायद्याचे प्रस्ताव यांच्याशी संबंधित अशी माहिती जी राष्ट्रपती मागवू शकतात ती त्यांना सादर करणे; आणि<br>(क) राष्ट्रपतींना आवश्यक असल्यास, त्यासाठी सादर करणे ज्या बाबीवर मंत्र्याने निर्णय घेतला असेल; परंतु ज्याचा मंत्रिपरिषदेने विचार केला नसेल अशी कोणतीही बाब राष्ट्रपतींनी आवश्यक केल्यास मंत्रिमंडळासमोर विचारार्थ ठेवणे. |


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| **संसदेच्याबाबतीत** | १. संसदेचे अधिवेशन बोलावणे आणि ते पुढे चालू ठेवण्याबाबत तो राष्ट्रपतींना सल्ला देतो.<br>२. तो कधीही राष्ट्रपतींना लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस करू शकतो.<br>३. तो सभागृहात सरकारच्या धोरणांची घोषणा करतो. |
| **इतर अधिकार आणि कार्ये** | १. तो निती आयोग (ज्याची नियोजन आयोगाच्या जागी स्थापना झाली), राष्ट्रीय एकात्मता परिषद, आंतरराज्य परिषद, राष्ट्रीय जल संसाधन परिषद आणि इतर काही संस्थांचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.<br>२. देशाच्या परराष्ट्र धोरणाला आकार देण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.<br>३. तो केंद्र सरकारचा मुख्य प्रवक्ते असतो. |

**युती सरकार :**

जेव्हा अनेक राजकीय पक्ष सरकार स्थापन करण्यासाठी हातमिळवणी करतात आणि सामाईक सहमत कार्यक्रमाच्या आधारे राजकीय शक्ती वापरतात, तेव्हा आपण या प्रणालीचे वर्णन युतीचे राजकारण किंवा युती सरकार असे करू शकतो.

**युती सरकारचे फायदे आणि तोटे –**

| फायदे | तोटे |
|---|---|
| • विविध हितसंबंध सामावून घेता येतात.<br>• अधिक प्रातिनिधिक स्वरूप.<br>• सहमतीवर आधारित धोरण तयार करणे.<br>• सरकार किंवा कोणत्याही एका राजकीय पक्षाची जुलूमशाही कमी करते.<br>• भारतीय राजकीय व्यवस्थेचे संघराज्यात्मक स्वरूप बळकट करते. | • अस्थिर स्वरूप.<br>• युतीच्या समन्वय समितीला महत्त्व प्राप्त झाल्याने मंत्रिमंडळाची भूमिका कमी होते.<br>• निर्णय घेण्याच्या गतीवर परिणाम होतो.<br>• युतीतील भागीदार घटक अनेकदा दोषारोपांचे खेळ खेळतात आणि त्यामुळे सामूहिक जबाबदारी तसेच वैयक्तिक जबाबदारी या दोन्हीपासून पळ काढतात. |

**केंद्रीय मंत्रिपरिषद :**

भारतीय राज्यघटनेने ब्रिटिश पद्धतीनुसार संसदीय शासन पद्धतीची तरतूद केल्यामुळे, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिपरिषदेकडे आपल्या राजकीय–प्रशासकीय व्यवस्थेचे खरे कार्यकारी अधिकार आहेत.

**घटनात्मक तरतुदी –**

१. अनुच्छेद ७४ – राष्ट्रपतींना मदत आणि सल्ला देण्यासाठी मंत्रिपरिषद.

२. अनुच्छेद ७५ – मंत्र्यांसाठी इतर तरतुदी.

३. अनुच्छेद ७७ – भारत सरकारचे कामकाज चालविणे – भारत सरकारचे कामकाज अधिक सोयीस्कररीत्या चालण्यासाठी आणि उक्त कामकाजाचे मंत्र्यांमध्ये वाटप करण्यासाठी राष्ट्रपती नियम तयार करतील.

**मंत्र्यांच्या सल्ल्याचे स्वरूप –**

कलम ७४ मध्ये राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांसह मंत्रिमंडळाची तरतूद केली आहे. ४२ व्या आणि ४४ व्या घटनादुरुस्ती कायद्याने हा सल्ला राष्ट्रपतींना बंधनकारक केला आहे.

शिवाय, मंत्र्यांनी राष्ट्रपतींना दिलेल्या सल्ल्याच्या स्वरूपाबाबत कोणतेही न्यायालय विचारणा करू शकत नाही. ही तरतूद राष्ट्रपती आणि मंत्री यांच्यातील घनिष्ट आणि गोपनीय संबंधांवर भर देते.

**मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी –**

कलम ७५ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की मंत्रिपरिषद लोकसभेला सामूहिकपणे जबाबदार असतील. याचा अर्थ, सर्व मंत्री हे त्यांनी टाळलेल्या व केलेल्या सर्व कृतींसाठी संयुक्तपणे जबाबदार असतात. ते एक संघ म्हणून काम करतात आणि एकत्र तरतात किंवा बुडतात. मंत्रिमंडळाचे निर्णय हे सर्व कॅबिनेट मंत्र्यांना (आणि इतर मंत्र्यांना) बंधनकारक असतात. जरी कॅबिनेट बैठकीत त्या निर्णयांबाबत त्यांच्यात मतभिन्नता असली तरीही ते त्यांच्यावर बंधनकारक असतात. मंत्रिमंडळाच्या निर्णयांसोबत ठामपणे उभे राहून संसदेत आणि संसदेबाहेर त्यांना पाठिंबा देणे हे प्रत्येक मंत्र्याचे कर्तव्य आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयाशी कोणताही मंत्री असहमत असेल आणि त्याचा बचाव करण्यास तयार नसेल तर त्याने राजीनामा द्यावा.

**मंत्र्याची वैयक्तिक जबाबदारी –**

कलम ७५ मध्ये वैयक्तिक जबाबदारीचे तत्त्वदेखील समाविष्ट आहे. त्यात असे नमूद केले आहे की, मंत्री हे राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्रिपद धारण करतात, याचा अर्थ असा की जोपर्यंत लोकसभेचा मंत्रिपरिषदेला विश्वास असेल तोपर्यंत राष्ट्रपती कोणत्याही मंत्र्याला काढून टाकू शकत नाहीत. मात्र, राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानेच मंत्र्याला हटवतात.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**मंत्रिपरिषद आणि कॅबिनेट यांची तुलना**

| मंत्रिपरिषद | कॅबिनेट |
|---|---|
| यात मंत्र्यांच्या तीनही श्रेणींचा समावेश होतो, त्या म्हणजे कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्री. | यात फक्त कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश आहे. हा मंत्रिपरिषदेचा एक भाग आहे. |
| ६० ते ७० मंत्र्यांचा समावेश असलेली ही एक विस्तृत संस्था आहे. | १५ ते २० मंत्री असलेली ही एक छोटी संस्था आहे. |
| याची कार्ये कॅबिनेटद्वारे निर्धारित केली जातात. | सर्व मंत्र्यांना बंधनकारक असलेले धोरणात्मक निर्णय घेऊन ते मंत्रिपरिषदेला निर्देश देते. |
| ही संसदेच्या कनिष्ठ सभागृहास सामूहिकपणे जबाबदार असते. | हे संसदेच्या कनिष्ठ सभागृहाशी असलेल्या मंत्रिमंडळाच्या सामूहिक जबाबदारीची अंमलबजावणी करते. |
| तत्त्वत: मंत्रिपरिषदेच्या हाती सर्व अधिकार असतात. | व्यावहारिकदृष्ट्या कॅबिनेट हे मंत्रिपरिषदेच्या अधिकारांचा वापर करते आणि तिच्यावतीने कार्य करते. |

**मंत्रिपरिषदेची भूमिका –**

१. हे आपल्या राजकीय–प्रशासकीय व्यवस्थेतील सर्वोच्च निर्णय घेणारे प्राधिकरण आहे.

२. ही केंद्र सरकारची मुख्य धोरण तयार करणारी संस्था आहे.

३. हा केंद्र सरकारचा सर्वोच्च कार्यकारी प्राधिकारी आहे.

४. ही केंद्रीय प्रशासनाची मुख्य समन्वयक आहे.

५. ही राष्ट्रपतींची सल्लागार संस्था आहे आणि तिचा सल्ला त्यांच्यावर बंधनकारक आहे.

६. ही मुख्य संकटमोचक असून, ती सर्व आपत्कालीन परिस्थिती हाताळते.

७. ही सर्व प्रमुख कायदेविषयक आणि आर्थिक बाबी हाताळते.

८. ही संवैधानिक अधिकारी आणि वरिष्ठ सचिवालय प्रशासकांसारख्या उच्च नियुक्त्यांवर नियंत्रण ठेवते.

९. ही सर्व परराष्ट्र धोरणे आणि परराष्ट्र व्यवहारांशी संबंधित आहे.

**किचन कॅबिनेट –**

मंत्रिमंडळातील हा एक असा लहान भाग आहे, ज्यामध्ये पंतप्रधान आणि काही १५ ते २० सर्वात महत्वाचे मंत्री असतात. औपचारिक अर्थाने हीच निर्णय घेणारी सर्वोच्च संस्था आहे. तथापि, 'इनर कॅबिनेट' किंवा 'किचन कॅबिनेट' नावाचा हा छोटा गटच सत्तेचे खरे केंद्र बनला आहे. या अनौपचारिक गटात पंतप्रधान आणि त्यांचे दोन ते चार प्रभावशाली सहकारी असतात ज्यांच्यावर त्यांचा विश्वास आहे आणि ज्यांच्याशी ते प्रत्येक समस्येवर चर्चा करू शकतात. किचन कॅबिनेट हे महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय मुद्द्यांवर पंतप्रधानांना सल्ला देते आणि महत्त्वपूर्ण

निर्णय घेण्यास मदत करते. यात केवळ कॅबिनेट मंत्रीच नाही, तर पंतप्रधानांचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यांसारखे बाहेरचे लोक यांचादेखील समावेश असतो.

### कॅबिनेट समित्या

या खरेतर अघटनात्मक संस्था आहेत. दुसर्या शब्दांत सांगायचे तर, त्यांचा राज्यघटनेत उल्लेख नाही. तथापि, कामकाजाचे नियम त्यांच्या स्थापनेची तरतूद करतात.

### कॅबिनेट समित्यांचे फायदे –

१. मंत्रिमंडळ समित्या कोणत्याही प्रकरणाची सखोल छाननी करण्यात मदत करतात.

२. मौल्यवान वेळ वाचतो.

३. समन्वयात सुधारणा – बरेचदा समितीचे सदस्य एकमेकांना ओळखत असतात. या परिचयामुळे समितीच्या कामकाजात अधिक समन्वय निर्माण होतो.

४. एखाद्या व्यक्तीच्या शिफारशींपेक्षा समितीची शिफारस अधिक मान्य असते. तिची अंमलबजावणी करणेदेखील सोपे असते.

५. विविध विभागांमध्ये उत्तम समन्वय साधता येतो.

### तोटे –

१. सदस्यत्व राजकीय विचारसरणीवर अवलंबून असते.

२. बैठका नियमितपणे होत नाहीत.

३. कनिष्ठ मंत्री क्वचितच नियुक्त केले जातात.

४. प्रत्येक समितीमध्ये पंतप्रधानांचा सहभाग किंवा हस्तक्षेप.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# न्यायव्यवस्था

# अभ्यासक्रमाचा विषय – संसद आणि राज्य विधिमंडळे – रचना, कामकाज, व्यवसायाचे आचरण, अधिकार आणि विशेषाधिकार आणि यातून उद्भवणारे मुद्दे.

**भारताचे सर्वोच्च न्यायालय**

अमेरिकन राज्यघटनेच्या अगदी उलट, भारतीय राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालय आणि त्याखालील उच्च न्यायालयांसह एकात्मिक न्यायव्यवस्था स्थापन केली गेली आहे. उच्च न्यायालयाच्या अंतर्गत (आणि राज्य स्तराच्या खाली) अधीनस्थ न्यायालये, म्हणजे, जिल्हा न्यायालये आणि इतर कनिष्ठ न्यायालये आहेत. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यातून स्वीकारलेली न्यायालयांची ही एकल व्यवस्था, केंद्रीय कायदे तसेच घटक राज्यांचे कायदे या दोन्ही कायद्यांचा अवलंब करते.

सध्या, सर्वोच्च न्यायालयात चौतीस न्यायाधीश (एक मुख्य न्यायाधीश/सरन्यायाधीश आणि इतर तेहेतीस न्यायाधीश) असतात. २०१९ मध्ये, केंद्र सरकारने भारताच्या सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या एकतीस वरून चौतीसपर्यंत वाढवण्याची सूचना केली. यानंतर सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा कायदा, २०१९ मंजूर करण्यात आला.

**नियुक्ती –**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात. जोपर्यंत भारताच्या सरन्यायाधीशांच्या (CJI) नियुक्तीचा संबंध आहे, वर्षानुवर्षे, एक असा संकेत अगर प्रथा विकसित झाली होती ज्याद्वारे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीशांना भारताचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त केले जात होते.

सर्वोच्च न्यायालयातील उर्वरित न्यायाधीशांची नियुक्ती कॉलेजियमच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती करतात. कॉलेजियममध्ये भारताचे सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयातील इतर चार ज्येष्ठ न्यायाधीश असतात.

**पात्रता –**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त होण्यासाठी व्यक्तीची खालील पात्रता असावी.

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. (अ) तो उच्च न्यायालयाचा किमान सलग पाच वर्षे न्यायाधीश असावा ; किंवा

(ब) तो किमान सलग दहा वर्षे उच्च न्यायालयात वकील असावा ; किंवा

(क) राष्ट्रपतींच्या मतानुसार तो एक निष्णात कायदेतज्ज्ञ असावा.

**पदच्युती –**

- सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला राष्ट्रपतींच्या आदेशाने त्याच्या पदावरून हटवता येते. अशा पदच्युतीसाठी त्याच अधिवेशनात संसदेने विनंती केल्यानंतरच राष्ट्रपती पदच्युतीचा आदेश जारी करू शकतात. न्यायाधीश चौकशी कायदा (१९६८) महाभियोग प्रक्रियेद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढून टाकण्याच्या प्रक्रियेचे नियमन करतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

१. १०० सदस्यांनी (लोकसभेच्या बाबतीत) किंवा ५० सदस्यांनी (राज्यसभेच्या बाबतीत) स्वाक्षरी केलेला न्यायाधीशांना हटवण्याचा प्रस्ताव सभापती/अध्यक्षांना सादर करावा लागेल.

२. सभापती/अध्यक्ष हा प्रस्ताव मान्य करू शकतात किंवा मान्य करण्यास नकार देऊ शकतात.

३. जर तो प्रस्ताव मान्य केला गेला असेल, तर सभापती/अध्यक्षांनी आरोपांची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करावी लागते.

४. समितीमध्ये (अ) मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश, (ब) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि (क) एक प्रतिष्ठित कायदेतज्ज्ञ.


५. जर समितीला न्यायाधीश गैरवर्तनासाठी दोषी किंवा अक्षम असल्याचे आढळले, तर सभागृह प्रस्तावावर विचार करू शकते.

६. संसदेच्या प्रत्येक सभागृहाने विशेष बहुमताने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर, न्यायाधीशांना काढून टाकण्यासाठी राष्ट्रपतींना कळविले जाते.

७. शेवटी, राष्ट्रपती न्यायाधीशांना काढून टाकण्याचा आदेश देतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या एकाही न्यायाधीशावर आतापर्यंत महाभियोग चालवण्यात आलेला नाही.

**अधिकारक्षेत्र आणि अधिकार –**






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- अभिलेख न्यायालय म्हणून, सर्वोच्च न्यायालयाला पुढील दोन अधिकार आहेत :

  (अ) सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे, कार्यवाही आणि कृती यांना कायमस्वरूपी जतन करण्यासाठी आणि साक्ष म्हणून ठेवण्यासाठी नोंद केली जाते. या अभिलेखांना पुरावा मूल्य असल्याचे मान्य केले गेले आहे आणि कोणत्याही न्यायालयात हजर केले असता त्यांच्याबाबत प्रश्न उपस्थित केला जाऊ शकत नाही. ते कायदेशीर उदाहरणे आणि कायदेशीर संदर्भ म्हणून ओळखले जातात.

  (ब) न्यायालयाच्या अवमानासाठी सहा महिन्यांपर्यंतच्या साध्या कारावासाची किंवा रु. २,००० पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा करण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

  न्यायालयाचा अवमान दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचा असू शकतो. दिवाणी अवमान म्हणजे न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाची, आदेशाची, रिटची किंवा न्यायालयाच्या इतर प्रक्रियेची जाणूनबुजून अवज्ञा करणे किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणे.

  फौजदारी अवमान म्हणजे कोणत्याही बाबीचे प्रकटीकरण किंवा अशी कृती करणे जी–(i) न्यायालयाच्या अधिकाराचा अधिक्षेप करते किंवा ते कमी करते ; किंवा (ii) न्यायालयीन कार्यवाहीच्या योग्य संचालनात हस्तक्षेप करते किंवा अडथळा आणते ; किंवा (iii) इतर कोणत्याही प्रकारे न्यायीक प्रशासनात हस्तक्षेप करते किंवा अडथळा आणते.

- तसेच, सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार आहे ज्याद्वारे ते कायदेविषयक आणि कार्यकारी कृतींचे परीक्षण करू शकते.
- सर्वोच्च न्यायालयास राज्यघटनेचा अन्वयार्थ लावण्याचा अंतिम अधिकार आहे.

**उच्च न्यायालय**

भारतीय एकल एकात्मिक न्यायव्यवस्थेमध्ये, उच्च न्यायालय हे सर्वोच्च न्यायालयाच्या खाली' ; परंतु अधीनस्थ न्यायालयांच्या वर आहे. राज्यातील न्यायव्यवस्थेमध्ये उच्च न्यायालय आणि त्याखाली अधीनस्थ न्यायालये अशी रचना आहे. उच्च न्यायालय हे राज्याच्या न्यायालयीन प्रशासनात सर्वोच्च स्थानी असते.

**नियुक्ती –**

- उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. भारताचे सरन्यायाधीश आणि संबंधित राज्याचे राज्यपाल यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर राष्ट्रपतींकडून मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती केली जाते. इतर न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचाही सल्ला घेतला जातो. दोन किंवा अधिक राज्यांसाठी एकच सामाईक उच्च न्यायालय असेल तर त्याच्या बाबतीत, राष्ट्रपतींकडून संबंधित सर्व राज्यांच्या राज्यपालांचा सल्ला घेतला जातो.
- उच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांची नियुक्ती कॉलेजियमच्या शिफारशींनुसार राष्ट्रपती करतात.

**न्यायाधीशांची पात्रता –**

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त होणार्या व्यक्तीची खालील पात्रता असावी.


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. (अ) त्याने भारताच्या राज्यक्षेत्रात किमान दहा वर्षे न्यायीक अधिकारीपद धारण केलेले असावे ; किंवा

(ल) तो किमान सलग दहा वर्षे एखाद्या उच्च न्यायालयात (किंवा दोन किंवा अधिक उच्च न्यायालयांमध्ये सलग) अधिवक्ता असावा .

**न्यायाधीशांची बदली –**

भारताच्या सरन्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर राष्ट्रपती न्यायाधीशांची एका उच्च न्यायालयातून दुसर्या उच्च न्यायालयात बदली करू शकतात. बदली झाल्यावर, तो त्याच्या पगाराव्यतिरिक्त संसदेद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे भरपाई भत्ते मिळण्याचा अधिकार आहे.

**उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची हकालपट्टी –**

वर चर्चा केल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाना न्यायाधीशांना काढून टाकण्यासाठी असलेल्या प्रक्रियेप्रमाणेच आहे.

**अधिकारक्षेत्र आणि अधिकार –**

सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयालाही व्यापक आणि प्रभावी अधिकार दिलेले आहेत. हे राज्यातील सर्वोत वरिष्ठ न्यायालय आहे. ते नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षक आहे. राज्यघटनेचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार त्याच्याकडे आहे. याशिवाय, ते पर्यवेक्षक आणि सल्लागाराची भूमिकाही पार पाडते.

**१. प्रारंभिक अधिकार क्षेत्र–**

याचा अर्थ ज्या खटल्यांची सुरूवात उच्च न्यायालयातच होऊ शकते, इतर कोणत्याही न्यायालयात जे खटले प्रथम दाखल करता येत नाहीत अशा खटल्यांची सुनावणी करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे. या अधिकाराची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :

(र) न्यायालयाच्या अवमानासारख्या बाबी.

(ल)संसद आणि राज्य विधिमंडळांच्या सदस्यांच्या निवडणुकीशी संबंधित विवाद

(ल)महसुलाच्या बाबी किंवा महसूल संकलन आदेश दिलेल्या किंवा केलेल्या कृतीबाबत

(व)नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची अंमलबजावणी.

(श)अधीनस्थ न्यायालयांकडून संविधानाचा अन्वयार्थ लावण्यासंबंधीची प्रकरणे हस्तांतरित करण्याचे आदेश देणे.

(ष)चार उच्च न्यायालयांना (उदा. कलकत्ता, मुंबई, मद्रास आणि दिल्ली उच्च न्यायालये) उच्च मूल्याच्या प्रकरणांमध्ये प्रारंभिक दिवाणी अधिकारक्षेत्र आहे.

**२. प्राधिलेख काढण्याचे अधिकार :**

संविधानाच्या अनुच्छेद २२६ मध्ये उच्च न्यायालयाला नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि इतर कोणत्याही हेतूसाठी निदेश, आदेश अथवा देहोपस्थिती, महादेश, प्रतिशेध आणि क्राधिकार यासह



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

प्राधिलेख जारी करण्याचा अधिकार दिला आहे. 'इतर कोणत्याही हेतूसाठी' हा वाक्यांश सर्वसामान्य कायदेशीर अधिकाराच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आहे. उच्च न्यायालय कोणतीही व्यक्ती, प्राधिकारी आणि सरकारला केवळ त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रातच नाही तर, जर कारवाईचे कारण त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात उद्भवले तर त्याच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्राबाहेर देखील प्राधिलेख जारी करू शकते

**३. अपिलाचे अधिकार क्षेत्र :**

उच्च न्यायालय हे प्रामुख्याने अपिलीय न्यायालय असते. ते त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेल्या कनिष्ठ न्यायालयांच्या निर्णयांविरुद्ध अपिलांची सुनावणी करते. यात दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्ही प्रकरणांमध्ये अपिलीय अधिकार क्षेत्र आहे. म्हणून, उच्च न्यायालयाचे अपिलीय अधिकार क्षेत्र त्याच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रापेक्षा विस्तृत आहे.

**४. देखरेखीचे अधिकार :**

उच्च न्यायालयाला त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेली सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणांवर (लष्करी न्यायालये किंवा न्यायाधिकरणांव्यतिरिक्त) देखरेखीचा अधिकार असतो. या अधिकारांतर्गत हे न्यायालय–

(अ) त्यांच्याकडून प्रतिवेदने मागवू शकते;

(ब) त्यांच्यासाठी सामान्य नियम तयार करू शकते आणि जारी करू शकते आणि त्यांच्या प्रथा आणि कार्यवाही नियम करून ते प्रसृत करू शकते आणि त्याचे नमुने विहित करू शकते;

(क) त्यांनी त्यांची पुस्तके, नोंदी आणि खाती आहेत कोणत्या नमुन्यामध्ये ठेवायची आहेत हे निर्धारित करू शकते; आणि

(ड) त्यांचे शेरीफ, लिपिक, अधिकारी आणि विधि व्यावसायिक यांना देय शुल्काचे निर्धारण करू शकते.

उच्च न्यायालयांनादेखील भारताच्या सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे न्यायालयीन पुनरावलोकन आणि न्यायालयाच्या अवमानाबाबत शिक्षा करण्याचे अधिकार आहेत.

**न्यायपालिकेचे स्वातंत्र्य**

न्यायपालिका ही शासनाच्या इतर शाखांपासून स्वतंत्र असावी ही संकल्पना न्यायालयीन स्वातंत्र्यात अभिप्रेत आहे. म्हणजेच, न्यायालये सरकारच्या इतर शाखांच्या किंवा खासगी अथवा पक्षीय हितसंबंधांच्या अनुचित प्रभावाच्या अधीन नसावीत.

**न्यायपालिकेचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याबाबतच्या तरतुदी –**

- अनुच्छेद १२४ आणि २१७ अंतर्गत अनुक्रमे सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी योग्यरीत्या लिखित स्वरूपात पात्रतेचे निकष.
- न्यायाधीशांचे वेतन आणि भत्ते हा देखील एक घटक आहे जो न्यायाधीशांना स्वतंत्र बनवतो, कारण त्यांचे वेतन



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

आणि भत्ते निश्चित आहेत आणि ते विधिमंडळांच्या मतावर अवलंबून नाहीत.

- सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या हकालपट्टीबाबतची कठोर प्रक्रिया.
- कार्यकाळाची सुरक्षा.
- अवमानासाठी शिक्षा करण्याचा अधिकार.

**न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याचे महत्त्व –**

न्यायपालिकेचे स्वातंत्र्य न्यायाधीशांना निर्णय घेण्याची, विशेषतः सरकारने (किंवा इतरांद्वारे) केलेल्या कृती किंवा घेतलेले निर्णय हे कायद्याचे उल्लंघन करणारे आहेत आणि विशेषकरून त्याच्या मूलभूत, किंवा मानवी अधिकारांचे उल्लंघन करणारे आहेत, असा निष्कर्ष काढण्यास आणि अर्थातच त्यांच्यावर योग्य उपाययोजना निर्धारित करण्यास मोकळीक देण्याची हमी देते.

**न्यायालयीन जबाबदारीचे तत्त्व**

न्यायालयीन जबाबदारीचे तत्त्व म्हणजे आपले निर्णय आणि कृतींसाठी जबाबदार असणे. कामकाज आणि निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता ही जबाबदारी सुनिश्चित करणारी सर्वात महत्त्वाची बाब आहे.

**सध्याची यंत्रणा –**

१. अनुच्छेद १२४ आणि २१७ – गैरवर्तन आणि अक्षमता सिद्ध झाल्यावर न्यायाधीशांवर महाभियोगाची कारवाई.

२. सभागृहातील शिस्तबद्ध कार्यपद्धती.

**न्यायालयीन जबाबदारीची गरज –**

१. यामुळे निकालांची कार्यक्षमता आणि गुणवत्ता सुधारेल.

२. न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास वाढेल.

३. न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आहे.

४. प्रलंबित प्रकरणे अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहेत.

५. कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळाच्या अगदी उलट, न्यायमंडळावर वार्षिक अहवाल सादर करण्याचे कोणतेही कायदेशीर बंधन नाही.

**आव्हान –**

- न्यायालयीन स्वातंत्र्याचे तत्त्व न्यायालयीन जबाबदारीच्या तत्त्वाच्या आड येऊ शकते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**नवा दृष्टिकोण –**

१. संसदेने असा कायदा केला पाहिजे जो न्यायपालिकेला वार्षिक अहवाल प्रकाशित करणे बंधनकारक करेल.

२. न्यायाधीशांबाबतच्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी कायमस्वरूपी शिस्तपालन समिती स्थापन करणे.

३. नियमित कामगिरी आणि मूल्यमापन प्रणालीची स्थापना करणे.

४. माहिती अधिकाराची मर्यादा आणि व्याप्ती निर्धारित करणे.

**न्यायालयीन स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांच्यातील समतोल राखणे ही काळाची गरज आहे.**

१. एस. पी. गुप्ता विरुद्ध भारतीय संघराज्य प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले की, न्यायपालिका जनतेला जबाबदार आहे.

२. ओडिशाच्या उच्च न्यायालयाने २०२१ मध्ये वार्षिक कामगिरी अहवाल प्रकाशित केला आहे, ज्यात –

- विलंब आणि अनुशेषाची कारणे स्पष्ट केली गेली.
- आव्हानांचे स्वयंनिरीक्षण केले गेले.

**न्यायालयीन पुनरावलोकन**

भारतीय राज्यघटनेने, अनुच्छेद ३२ द्वारे भारतीय सर्वोच्च न्यायालयास आणि अनुच्छेद २२६ आणि २२७ द्वारे घटक राज्यांच्या उच्च न्यायालयांना स्पष्टपणे न्यायालयीन पुनरावलोकनाचा अधिकार प्रदान केला आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेतही अशी तरतूद नाही. न्यायमंडळ हे संविधानाची आणि नागरिकांच्या हक्कांची संरक्षक आहे. त्यामुळे, ते कार्यकारी व प्रशासकीय विभागाच्या कृती किंवा विधिमंडळाचे कायदे यांना असंवैधानिक म्हणून संपुष्टात आणू शकते. कायद्याच्या राज्यासाठी न्यायालयीन स्वातंत्र्याची नितांत आवश्यकता आहे.

**घटनात्मक तरतुदी –**

१. अनुच्छेद ३७२ (१) घटनापूर्व कायद्यांच्या न्यायालयीन पुनरावलोकनाचा मार्ग मोकळा करते.

२. अनुच्छेद १३ असे नमूद करते की, कोणताही कायदा जो मूलभूत अधिकारांच्या भागाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करतो तो रद्दबातल ठरेल.

३. अनुच्छेद ३२ आणि २२६ अन्वये सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांना नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षक आणि हमीदाराची भूमिका सोपविली आहे.

**९ वी अनुसूची आणि न्यायालयीन पुनरावलोकन –**

९ व्या अनुसूचीमध्ये केंद्र आणि राज्यांच्या अशा कायद्यांची यादी दिलेली आहे ज्यांना न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही आणि घटना (प्रथम दुरुस्ती) अधिनियम, १९५१ द्वारे या घटनेमध्ये या अनुसूचीचा समावेश केला गेला आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**आय. आर. कोएल्हो प्रकरण –**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ११ जानेवारी २००७ रोजी एक निर्णय दिला ज्यानुसार केशवानंद भारती प्रकरणात स्पष्ट केलेली संविधानाची मूलभूत रचना कायम ठेवली गेली. न्यायालयाने असेही घोषित केले की, नवव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेले कायदे न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त नाहीत. हे आय. आर. कोएल्हो (मयत) विरुद्ध तामिळनाडू राज्य या खटल्यामध्ये हे दिसून आले.

**न्यायालयीन सक्रियता (Judicial Activism)**

शासनव्यवस्थेच्या इतर शाखांना त्यांची घटनात्मक कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी भाग पाडणे ही न्यायपालिकेची ठाम भूमिका आहे. न्यायालयीन सक्रियता ही प्रामुख्याने कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळे त्यांच्या कार्यात अपयशी झाल्यामुळे उदयास आली आहे. त्याचा परिणाम म्हणून, जेव्हा न्यायालये स्वत: पुढाकार घेतात आणि संबंधित प्राधिकरणाला कारवाई करण्यास भाग पाडतात तेव्हा न्यायालयीन सक्रियता सुरू होते. यामुळे भारतातील कायद्याच्या निर्मितीला नवीन आयाम प्राप्त झाले आहेत.

**न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे –**

१. सर्वोच्च न्यायालय जनहित याचिका यंत्रणा संस्थात्मक करते.

२. प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीबाबत एनजीटीचा आदेश.

**फायदे –**

- न्यायालयीन सक्रियता समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
- न्यायालयीन सक्रियतेत गुंतलेली न्यायालये पारंपरिक पुराणमतवादी न्यायालयांपेक्षा कितीतरी अधिक कार्यक्षम आहेत.
- न्यायालयीन सक्रियता ही कार्यकारी मंडळाच्या दडपशाहीवर नियंत्रण ठेवते.
- न्यायालयीन सक्रियता ही समस्यांचे जलद निराकरण करते.

**तोटे –**

- न्यायालयीन सक्रियता ही सत्ता विभाजनच्या तत्त्वाचे उल्लंघन करते.
- न्यायालयांच्या वारंवार होणार्या हस्तक्षेपामुळे लोकांचा प्रचलित सरकारी यंत्रणेवरील विश्वास कमी होतो.
- लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या विधिमंडळाच्या अधिकारावर मर्यादा येते.
- वैयक्तिक पूर्वाग्रह आणि पूर्वमतांवर भर दिला जाऊ शकतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

एक दुर्मिळ अपवाद म्हणून न्यायालयीन सक्रियता चांगली असू शकते परंतु अशी स्वयंसक्रियता दाखविणारी न्यायव्यवस्था ही देशासाठी किंवा न्यायव्यवस्थेसाठीही चांगली नाही; कारण त्यामुळे सरकारला आपल्याशी एकनिष्ठ असलेल्या न्यायाधीशांची नियुक्ती करण्यास प्रोत्साहन मिळेल.

'न्यायालयीन सक्रियता न्यायालयीन हुकूमशाही बनू नये' – सोली सोराबजी.

**न्यायालयीन अतिक्रमण (Judicial Overreach)**

न्यायालयीन अतिक्रमण ही एक अशी स्थिती आहे जेव्हा न्यायमंडळ हे कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाचे अधिकार व शक्ती यांच्यावर अतिक्रमण करून ती आपल्या हाती घेते. न्यायालयीन अतिक्रमण तेव्हा होते, जेव्हा न्यायमंडळ हे विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या योग्यप्रकारे चाललेल्या कामकाजात हस्तक्षेप करून त्याद्वारे विधिमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अधिकार क्षेत्रावर अतिक्रमण करते.

**न्यायालयीन अतिक्रमणाची उदाहरणे –**

१. वाढत्या वायू प्रदूषणाचे कारण देत सर्वोच्च न्यायालयाने फटायांवर बंदी घातली – अरुण गोपाल विरुद्ध भारतीय संघराज्य खटला, २०१७.

२. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी विशाखा प्रकरणांमध्ये न्यायालयीन विधिविधान.

३. मुळातच एक घटनाबाह्य संस्था असलेल्या कॉलेजियमची स्थापना करून न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये कार्यकारी मंडळाची कोणतीही भूमिका नाकारणे.

४. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला छएएढ परीक्षा आयोजित करण्याचे निर्देश दिले.

**न्यायालयीन अतिक्रमणाचे मूल्यमापन –**

- न्यायालयीन अतिक्रमणाने काही बाबतींमध्ये सकारात्मक भूमिका बजावली आहे. त्यामुळेच अनेक वर्षांपासून विशाखा मार्गदर्शक तत्त्वे ही त्यासंबंधीचा कायदा नसतानाही अंमलात आणणे शक्य झाले आहे.
- न्यायालयीन अतिक्रमणाने पर्यावरण संरक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. उदा. जुन्या डिझेल गाड्यांवर ठराविक कालावधीनंतर बंदी.
- सर्वोच्च न्यायालयाने एस. आर. बोम्मई प्रकरणात अनुच्छेद ३५६ ला न्यायालयीन पुनरावलोकनाखाली आणून भारतीय शासनव्यवस्थेचे संघीय स्वरूप राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.
- तथापि न्यायालयीन अतिक्रमण हे सत्ता विभाजनाच्या तत्त्वाचे उल्लंघन करते.
- न्यायमंडळ ही लोकांद्वारे निवडून आलेली संस्था नसल्याने ती लोकांच्या इच्छेचे/लोकमताचे महत्त्व कमी करते.
- कायद्याच्या निर्मितीमध्ये अनिश्चितता निर्माण होते आणि न्यायव्यवस्थेवरचा भार वाढतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

राज्यघटनेच्या इतर दोन शाखांप्रमाणे, एक संस्था म्हणून न्यायव्यवस्था ही जनतेस थेट जबाबदार नाही. जबाबदारीच्या या अभावामुळे न्यायमंडळाने आत्मसंयम पाळणे, स्वत:च्या घटनात्मक अधिकारांच्या कक्षेत जबाबदारीने वागणे आवश्यक आहे.

**न्यायालयीन संयम (Judicial Restraint)**

न्यायालयीन संयमाच्या सिद्धांतामागील तत्त्व असे आहे की, संविधानाच्या अंतर्गत अधिकारांची विस्तृतपणे विभागणी करते आणि राज्याच्या तीन अंगांनी, विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांनी एकमेकांचा आदर केला पाहिजे आणि शक्य तितके एकमेकांच्या अधिकारक्षेत्रामध्ये अतिक्रमण करू नये. अन्यथा, शासनव्यवस्था योग्यरीत्या कार्य करू शकत नाही. तसेच, न्यायपालिकेने हे लक्षात घेतले पाहिजे की कायदेमंडळ ही लोकशाही पद्धतीने निवडून आलेली संस्था आहे, जी जनतेची इच्छा व्यक्त करते (अर्थातच पूर्णपणे नाही) आणि लोकशाहीत ही इच्छा हलकीशी निराशा किंवा ठेचून काढू नये.

**उदाहरणे –**

- एस. आर. बोम्मई विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (१९९४) हे एक असे प्रसिद्ध उदाहरण आहे ज्याचा उल्लेख अनेकदा न्यायालयीन संयमाचे एक चांगले उदाहरण म्हणून केला जातो. या असे निकालात नमूद करण्यात आले आहे की, काही प्रकरणांमध्ये राजकीय मुद्दा असल्याने न्यायालयीन पुनर्विलोकन शक्य होत नाही. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, अनुच्छेद ३५६ चा अधिकार हा एक राजकीय मुद्दा होता, त्यामुळे न्यायालयीन पुनरावलोकनास नकार दिला गेला. न्यायमंडळाचे निकष राजकीय मुद्द्यांच्या बाबतीत लागू केल्यास त्यांचा राजकीय क्षेत्रात प्रवेश होईल आणि न्यायालयाने ते टाळले पाहिजे, असे न्यायालयाने नमूद केले.

**न्यायमंडळाच्यादृष्टीने न्यायालयीन संयमाचे महत्त्व –**

१. राज्यव्यवस्थेच्या तीन शाखांपैकी, एक शाखा असलेल्या न्यायपालिकेला, तिन्ही शाखांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा घोषित करण्याचा अधिकार आहे. या अत्यंत महत्त्वाच्या अधिकाराचा वापर न्यायव्यवस्थेने अत्यंत नम्रतेने आणि आत्मसंयमाने केला पाहिजे.

२. कनिष्ठ न्यायालयांच्या चुका उच्च न्यायालयांद्वारे दुरुस्त केल्या जाऊ शकतात, परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या चुका सुधारण्यासाठी त्याच्याही वरचे कोणीही नाही.

३. जर न्यायव्यवस्थेने संयम राखला नाही आणि आपली मर्यादा ओलांडली तर त्यावर अशी प्रतिक्रिया व्यक्त होईल ज्यामुळे न्यायव्यवस्थेचे, तिच्या स्वातंत्र्याचे आणि समाजातील तिच्या सन्मानीय स्थानाचे मोठे नुकसान होऊ शकते.

काही लोक कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ ही त्यांची कार्ये योग्यरीत्या पार पाडत नाहीत असे सांगून न्यायालयीन सक्रियतेचे समर्थन करतात. या युक्तिवादाचे उत्तर असे की, न्यायव्यवस्थेवरही अनेकदा तोच आरोप लावला जातो. मग कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाने न्यायालयीन कार्ये हाती घ्यावीत का? जर कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ हे त्यांची कार्ये योग्यरीत्या पार पाडत नसतील, तर लोकांनी त्यांच्या मताधिकाराचा योग्य वापर करून, किंवा शांततापूर्ण आणि कायदेशीर मार्गाने सार्वजनिक सभा आणि निदर्शने, आणि/किंवा माध्यमांद्वारे



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

आणि इतर कायदेशीर मार्गाद्वारे टीका करून त्यांना सुधारणे आवश्यक आहे. म्हणजे न्यायमंडळाने कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाची कार्ये आपल्या हाती घेणे हा योग्य उपाय नाही, कारण ही कार्ये पार पाडण्यासाठी न्यायपालिकेकडे ना कौशल्य आहे ना संसाधने आहेत.

**सार्वजनिक हित याचिका (Public Interest Litigation)**

सार्वजनिक हित याचिका (Public interest litigation (PIL)) ही संकल्पना सार्वजनिक हिताचे संरक्षण करण्यासाठी स्वीकारलेल्या याचिकांच्या संदर्भात वापरण्यात येते आणि ती सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना न्यायाची उपलब्धता दर्शवते. याची सुरुवात न्यायमूर्ती पी. एन. भगवती यांनी केली होती. ही उपस्थानाधिकारा (लोकस स्टँडी) च्या पारंपरिक नियमातील शिथिलता दर्शविते.

सार्वजनिक हित याचिका (पीआयएल) ही १९७० च्या दशकात शैक्षणिक, सामाजिक कार्यकर्ते आणि वकील यांची विधीक्षेत्रातील नवकल्पना म्हणून उदयास आली, जिला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी ठामपणे पाठिंबा दिला. हुसैनारा खातून आणि सुनील बत्रा खटल्यांमध्ये, न्यायालयाने गरीब आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी – स्वत: किंवा प्रतिनिधींमार्फत आपली बाजू मांडण्याबाबतचे कठोर नियम शिथिल करून आणि न्यायालयाला सार्वजनिक हितासाठी स्वत: पुढाकार घेऊन खटले दाखल करून घेण्यासाठी एक नवीन दृष्टिकोन विकसित केला.

'जनहित याचिका' तत्त्व तीन प्रमुख खटल्यांमध्ये आकाराला आले आणि विकसित झाले. हे खटले म्हणजे, फर्टिलायझर कॉर्पोरेशन कामगार युनियन, एसपी गुप्ता आणि पीपल्स युनियन फॉर डेमोक्रॅटिक राइट्स. येथे, न्यायालयाने भारतीय संवैधानिक निर्णयामध्ये या मूलगामी नवकल्पना घटनात्मक आणि राजकीयदृष्ट्या प्रासंगिक असल्याचे स्पष्ट केले, कारण त्या राजकीय आणि कायदेशीरदृष्ट्या उपेक्षित घटकांना (ज्यांना राजकीय किंवा प्रशासकीय व्यवस्थेत प्रभावी प्रतिनिधित्व नाही आणि न्यायालयापर्यंत सहजपणे जाता येत नाही अशा घटकांना) एक विशेष व्यवस्था उपलब्ध करून देतात. याचिकाकर्त्यांना स्वत: किंवा प्रतिनिधींमार्फत त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेता येते. राज्याच्या या विशिष्ट राजकीय अपयशांना प्रतिसाद देण्यासाठी उच्च न्यायालयांची विशेष संवैधानिक भूमिका ही सत्ताविभाजनाच्या पारंपारिक नियमांचे उल्लंघन करणा–या कार्यपद्धती आणि उपाययोजनांमधील सुधारणांना न्याय्य ठरविते.

**गुण आणि यशोगाथा –**

१. जनहित याचिकांद्वारे जागरुक नागरिकांना एक स्वस्त पर्याय मिळू शकतो, कारण यात कोर्ट फीचा दर नाममात्र असतो.

२. याचिकाकर्ते हे विशेषकरून मानवी हक्क, ग्राहक कल्याण आणि पर्यावरण क्षेत्रातील मोठ्या सार्वजनिक समस्यांवर लक्ष केंद्रित करू शकतात आणि सकारात्मक परिणाम साध्य करू शकतात.

३. पुरेशी कायदेशीर माहिती नसलेल्या सामाजिकदृष्ट्या वंचित गटांना लाभ मिळू शकतो.

४. इतरही अशी अनेक प्रकरणे आहेत ज्यात लोकसहभाग किंवा जनहित याचिका यांनी अशा प्रकरणांमध्ये आणि त्यांच्या निकालांमध्ये महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

- शीला बारसे विरुद्ध महाराष्ट्र राज्य या खटल्यात, महिलांवरील कोठडीतील हिंसाचाराच्या मुद्द्यावर ऐतिहासिक निकाल देण्यात आला. न्यायालयाने सांगितले की, महिला आरोपींसाठी संभाव्य छळ आणि क्रूरतेपासून संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र पोलिस लॉकअप असणे आवश्यक आहे.

- एम. सी. मेहता विरुद्ध. भारतीय संघराज्य युनियन ऑफ इंडिया या खटल्यात, न्यायालयाने कानपूरच्या चर्मोत्पादन कारखान्यांमधून प्रक्रिया न केलेले सांडपाणी गंगा नदीत सोडण्यास परवानगी देणार्या सरकारी अधिका–यांना फटकारले.
- जयपूर शहर हिंदू विकास समिती विरुद्ध राजस्थान राज्य या खटल्यात, न्यायालयाने अशा जनहित याचिका 'अज्ञान, वंचितता, निरक्षरतेमुळे असहाय असलेल्या लोकांना न्याय कसा मिळवून देतात' हा मुद्दा अधोरेखित केला.

**तोटे –**

१. अनेक लोकांनी जनहित याचिकांचा वापर छळवणुकीचे साधन म्हणून करण्यास सुरुवात केली; कारण खासगी खटल्यांच्या तुलनेत क्षुल्लक खटले हे भरमसाठ न्यायालयीन शुल्काशिवाय दाखल केले जाऊ शकतात.

२. जनहित याचिकांच्या लवचिक स्वरूपामुळे, विरुद्ध पक्षाला अचूकपणे आरोपाची पडताळणी करण्याची आणि विशिष्ट मुद्द्यांना प्रतिवाद करण्याची संधी मिळते.

३. न्यायपालिकेवर ती आपल्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा ओलांडत असल्याची टीका केली जात आहे आणि ती आपल्या आदेशांचीही प्रभावीपणे अंमलबजावणी करू शकत नाही.

४. जनहिताच्या मुद्द्यांना समर्थन देण्याऐवजी प्रसिद्धी मिळवण्यासाठी जनहित याचिकांचा गैरवापर केला जात आहे.

५. क्षुल्लक जनहित याचिका न्यायालयीन व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर परिणाम करू शकतात, कारण त्यामुळे न्यायालयाने लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या खटल्यांसाठी न्यायालयाचा वेळ आणि संसाधने खर्च करण्याची क्षमता कमी करते.

**नवा दृष्टिकोन –**

१. सुप्रीम कोर्टाने आपल्या बलवंत सिंग चौफळ निकालात घटनात्मक न्यायालयांना खर्या जनहित याचिका आणि अनावश्यक याचिका यांच्यात फरक करणे सुलभ व्हावे यासाठी आठ निर्देश जारी केले होते.

२. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक उच्च न्यायालयाला प्रामाणिक जनहित याचिकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि खोट्या, फसव्या याचिकांवर अंकुश ठेवण्यासाठी स्वतःचे नियम तयार करण्यास सांगितले होते.

- यापैकी काही सूचनांमध्ये याचिका स्वीकारण्यापूर्वी याचिकाकर्त्याच्या विश्वसनीयतेची पडताळणी करणे; याचिकेतील मुद्द्यांची सत्यता तपासणे; याचिकेत 'मोठे सार्वजनिक हित, गांभीर्य आणि तातडीची निकड' असलेल्या प्राधान्यक्षम मुद्द्यांचा समावेश असल्याची खात्री करणे; सार्वजनिक हित याचिकेमागे कोणताही वैयक्तिक फायदा, त्यात खाजगी हेतू किंवा छुपा हेतू नसल्याची खात्री करणे; खरोखरच सार्वजनिक हानी किंवा सार्वजनिक नुकसानीचे निवारण करण्याचा उद्देश असल्याची खात्री करणे अशा सूचनांचा समावेश होता.

**कॉलेजियम पद्धत आणि राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग**

- राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग प्रकरणावर चर्चा करण्यापूर्वी, प्रथम उच्च स्तरावरील न्यायव्यवस्थेतील न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेची चर्चा करूया (कॉलेजियम प्रणालीची उत्क्रांती).

**घटनात्मक तरतूद –**

१. भारताचे सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांची नियुक्ती भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १२४ चे उपकलम (२) अंतर्गत राष्ट्रपतींद्वारे केली जाते. अनुच्छेद १२४ मध्ये असे नमूद केले आहे की, राष्ट्रपती 'आवश्यक वाटेल' त्याप्रमाणे राष्ट्रपतींद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांशी 'सल्लामसलत' केल्यानंतर न्यायाधीशांची नियुक्ती केली जाते.

२. अनुच्छेद २१७, जे उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीशी संबंधित आहे, त्यात असे म्हटले आहे की, राष्ट्रपतींनी संबंधित उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, राज्यपाल आणि मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घ्यावा. सरन्यायाधीशांचा कार्यकाळ हा ते वयाची ६५ वर्षांचे होईपर्यंत असतो, तर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६२ व्या वर्षी निवृत्त होतात.

**कॉलेजियम प्रणाली –**

१. प्रणाली अंतर्गत, भारताचे सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे चार वरिष्ठ न्यायाधीश न्यायाधीशांच्या नियुक्ती आणि बदल्यांची शिफारस करतात.

२. यादरम्यान उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमचे नेतृत्व विद्यमान मुख्य न्यायाधीश आणि त्या न्यायालयाचे दोन ज्येष्ठ न्यायाधीश करतात.

३. कॉलेजियम प्रणालीचा उगम संविधानातून झालेला नाही, तर ती सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमधून विकसित झाली आहे.

४. या प्रणालीत, एखाद्या वकिलाला उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून पदोन्नती द्यावयाची असल्यास इंटेलिजन्स ब्युरोद्वारे चौकशी करण्यापुरती सरकारची भूमिका मर्यादित आहे.

५. सरकार कॉलेजियमच्या निवडीबद्दल आक्षेप नोंदवू शकते आणि स्पष्टीकरण मागू शकते, परंतु, जर कॉलेजियमने त्याच नावांची पुन्हा शिफारस केली तर, सरकार घटनापीठाच्या निर्णयानुसार, त्यांना या पदावर नियुक्त करण्यास बांधील आहे.

**उच्च न्यायपालिकेच्या न्यायाधीशांची नियुक्ती –**

१. भारताचे सरन्यायाधीश – प्रचलित संकेतानुसार, मावळते सरन्यायाधीश हे त्यांच्या उत्तराधिका–याची शिफारस करतात. राष्ट्रपती हे या शिफारस केलेल्या न्यायाधीशाची नवीन सरन्यायाधीश म्हणून करतात.

२. सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश – कॉलेजियमच्या (सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे चार सर्वात वरिष्ठ न्यायाधीश) यांच्या शिफारशींच्या आधारे राष्ट्रपती नियुक्त करतात.

३. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश – कॉलेजियमच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींद्वारे नियुक्त केले जातात.

४. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश – उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची शिफारस सरन्यायाधीश आणि दोन सर्वात वरिष्ठ न्यायाधीश यांचा समावेश असलेल्या कॉलेजियमद्वारे केली जाते. तथापि, त्यांच्या नावाची शिफारस संबंधित उच्च न्यायालयाच्या निवृत्त होत असलेल्या मुख्य न्यायमूर्तींनी दोन वरिष्ठ सहका–यांशी सल्लामसलत करून केलेली असावी.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

### कॉलेजियम प्रणालीची उत्क्रांती –

'सल्लामसलत' या शब्दाची संदिग्धता लक्षात घेता, नियुक्तीच्या या पद्धतीला अनेकदा न्यायालयात आव्हान दिले गेले आहे, ज्यामुळे खटले चालविले गेले आहेत.

१. प्रथम न्यायाधीश प्रकरण (१९८१) – असा निर्णय दिला गेला की, सरन्यायाधीशांनी राष्ट्रपतींकडे केलेली शिफारस 'समुचित कारणांमुळे' नाकारली जाऊ शकते. याचा अर्थ राष्ट्रपती किंवा कार्यकारी मंडळ हे न्यायाधीशांच्या नियुक्त्या ठरविण्यात अधिक प्रभावशाली भूमिका पार पाडू शकतील.

२. द्वितीय न्यायाधीश प्रकरण (१९९३) – 'सल्लामसलत' चा वास्तविक अर्थ 'सहमत' असा धरून कॉलेजियम प्रणालीची ओळख करून दिली गेली. त्यात असेही म्हटले गेले आहे की, हे सरन्यायाधीशांचे वैयक्तिक मत नव्हते, तर सर्वोच्च न्यायालयातील दोन सर्वात वरिष्ठ न्यायमूर्तींच्या सल्लामसलत करून तयार केलेले एक संस्थात्मक मत होते.

३. तिसरे न्यायाधीश प्रकरण (१९९८) – राष्ट्रपतींच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने कॉलेजियमचा विस्तार करून त्याची सदस्यसंख्या पाच इतकी केली गेली, ज्यामध्ये सरन्यायाधीश आणि त्यांचे चार वरिष्ठ न्यायाधीश यांचा समावेश होता.

### टीका –

१. समीक्षकांनी निदर्शनास आणून दिले आहे की ही प्रणाली पारदर्शक नाही, कारण त्यात कोणतीही अधिकृत यंत्रणा किंवा सचिवालयाचा समावेश नाही.

२. या प्रणालीकडे पात्रतेचे निकष किंवा निवड प्रक्रियेबाबत कोणतेही विहित नियम नसलेले बंदिस्त प्रकरण म्हणून पाहिले जाते.

३. कॉलेजियमची बैठक कशी आणि केव्हा होते आणि त्यात कशा पद्धतीने निर्णय घेतले जातात याबद्दल लोकांना माहिती नसते.

४. कॉलेजियमच्या कामकाजाचे कोणतेही अधिकृत कार्यवृत्त ठेवले जात नाही.

५. २००९ मध्ये सादर करण्यात आलेल्या भारतीय विधी आयोगाच्या २३० व्या अहवालात, या प्रणालीत घराणेशाही प्रचलित असण्याच्या शयतेकडे लक्ष वेधले गेले होते.

### राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग

**(National Judicial Appointment Commission)**

ऑगस्ट २०१४ मध्ये, संसदेने संविधान (९९ वा दुरुस्ती) कायदा, २०१४ बरोबरच राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग (NJAC) कायदा, २०१४ संमत केला, ज्यामुळे सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची नियुक्ती करण्यासाठी कॉलेजियम प्रणालीच्या जागी स्वतंत्र आयोगांची निर्मिती करण्यात आली. दोन्ही विधेयकांना राज्य विधिमंडळांनी मान्यता दिली आणि ३१ डिसेंबर २०१४ रोजी त्यांना राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली.

पारदर्शकतेच्या अभावामुळे वर्षानुवर्षे टीका झालेल्या कॉलेजियम व्यवस्थेला बदलण्यासाठी, घटना (९९ व्या दुरुस्ती) कायद्याने तीन प्रमुख अनुच्छेद – १२४ अ, इ, उ आणि अनुच्छेद १२४ च्या अनुच्छेद २ मध्ये सुधारणा

केली गेली, अनुच्छेद १२४अ तयार केले गेले.राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग (NJAC) ही कॉलेजियम प्रणालीची जागा घेणारी एक घटनात्मक संस्था असून, अनुच्छेद १२४ब अन्वये या आयोगाला सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधिशांच्या नियुक्त्या करण्याचा अधिकार दिला गेला आहे आणि अनुच्छेद १२४क ने संसदेला या आयोगाच्या कामकाजाचे नियमन करणारे कायदे करण्याचे स्पष्ट अधिकार दिले आहेत.

**राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची रचना –**

१. भारताचे सरन्यायाधीश हे पदसिद्ध अध्यक्ष.

२. सर्वोच्च न्यायालयाचे दोन वरिष्ठ न्यायाधीश हे पदसिद्ध सदस्य

३. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री हे पदसिद्ध सदस्य.

४. नागरी जीवनातील दोन प्रतिष्ठित व्यक्ती (भारताचे सरन्यायाधीश, भारताचे पंतप्रधान आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते यांचा समावेश असलेल्या समितीद्वारे त्यांचे नामनिर्देशन केले जाईल; SC/ST/ मधून नामनिर्देशित केल्या जाणार्या प्रतिष्ठित व्यक्तींपैकी एक ओबीसी/अल्पसंख्याक किंवा महिला वर्गातील असावा.)

राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगकायद्याने, न्यायाधीशांची नियुक्ती करण्यासाठी आयोगाने अवलंबवायची प्रक्रिया विहित केली आहे. भारताचे सरन्यायाधीश आणि उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांची शिफारसराष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगद्वारे ज्येष्ठतेच्या आधारावर केली जाणार होती तर सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांची शिफारस क्षमता, गुणवत्ता आणि 'नियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर निकषांवर' केली जाणार होती. या कायद्याने राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाच्या कोणत्याही दोन सदस्यांना शिफारसीशी सहमत नसल्यास नकाराधिकार वापरण्याचा अधिकार दिला.

**राष्ट्रीय न्यायालयीन नियुक्ती आयोगावर टीका –**

१. 'कसे' ऐवजी 'कोण' वर लक्ष केंद्रित केले.

२. नामनिर्देशनाचा निर्णय कोणत्या गुणवत्तेवर आधारित असेल याकडे लक्ष दिले गेले नाही.

३. न्यायालयीन स्वातंत्र्याचा भंग – राष्ट्रीय न्यायालयीन नियुक्ती आयोगामुळे 'भारताचे सरन्यायाधीश आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या दोन वरिष्ठ न्यायाधीशांच्या सामूहिक मताचे प्राधान्य' या तरतुदीचे उल्लंघन केले गेले, कारण त्यांच्या सामूहिक शिफारशींना तीन बिगर–न्यायिक सदस्यांच्या नकाराधिकाराद्वारे किंवा 'बहुमताने रद्दबातल केले जाऊ शकते.'

**न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि मूलभूत संरचनेचा सिद्धांत**

- न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याचा सिद्धांत कलम ५० मध्ये नमूद केलेल्या सत्तेच्या विभाजनाच्या सिद्धांतातून उदयास आला आहे.
- मसुदा समितीचे अध्यक्ष, डॉ. बी.आर. आंबेडकर, संविधान सभेत म्हणाले: आपली न्यायव्यवस्था ही कार्यकारिणीपासून स्वतंत्र असली पाहिजे आणि ती स्वतः सक्षम असली पाहिजे यावर सभागृहात मतभेद असू शकत



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

नाहीत.

- मूलभूत संरचनेचा सिद्धांत ही केशवानंद भारती निकालाची उत्पत्ती आहे (१९७३). कलम ३६८ संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा आभासी पूर्ण अधिकार प्रदान करते परंतु खंडपीठाने असे मत मांडले होते की, संविधानाच्या मूलभूत संरचनेचा नाश किंवा उल्लंघन होईल अशा पद्धतीने त्याचा अन्वयार्थ लावला जाऊ नये.
- १६ ऑटोबर २०१५ रोजी, पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने ४:१ अशा बहुमताने निर्णय दिला की, राष्ट्रीय न्यायालयीन नियुक्ती आयोग ही 'असंवैधानिक' संस्था आहे आणि त्याच्या स्थापनेमुळे 'संविधानाच्या मूलभूत संरचनेचे' उल्लंघन केले गेले आहे.
- न्यायमूर्ती जे. एस. खेहर म्हणतात की, न्यायाधीशांची नियुक्तीचे करण्याइतके शहाणपण व कौशल्य राजकीय–कार्यकारी मंडळाकडे असेल, असे मानणे कठीण आहे. भारतात, नागरी समाजाचा अद्याप पुरेसा संस्थात्मक विकास झालेला नाही. या देशातील नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्याची न्यायव्यवस्थेकडूनची अपेक्षा ही केवळ शासनाच्या इतर अंगांपासून पूर्णपणे सुरक्षित आणि स्वतंत्र ठेवूनच सुनिश्चित केले जाऊ शकते.''
- दरम्यान, न्यायमूर्ती चेलमेश्वर हे असे निदर्शनास आणून देतात की, 'संवैधानिक शासना' मध्ये 'पारदर्शकता' हा एक महत्त्वाचा घटक आहे आणि कॉलेजियमची कार्यवाही 'पूर्णपणे अपारदर्शक' होती आणि जनतेसाठी ती 'अगम्य' होती. त्यांनी असे लिहिले की, 'न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये न्यायपालिकेस प्राधान्य हे घटनेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे हे 'गृहितक' सदोष होते आणि श्री. रोहतगी यांच्या 'कार्यकारी मंडळाला पूर्णपणे बाजूला करणे हे 'नियंत्रण आणि संतुलना'च्या मूलभूत वैशिष्ट्याचे उल्लंघन आहे,' या मताला ते दुजोरा देतात .
- विशेष म्हणजे, खंडपीठाने हे देखील मान्य केले की 'न्यायाधीशांची नियुक्ती करणार्या न्यायमूर्तींच्या' कॉलेजियम प्रणालीमध्येही सर्व काही आलबेल आहे, असे नाही आणि आता न्यायालयीन नियुक्त्यांची व्यवस्था सुधारण्याची वेळ आली आहे, सरकारला कॉलेजियम प्रणाली सुधारण्यासाठी काम करण्यास पुढे आले पाहिजे.

**न्यायालयीन सुधारणा (Judicial Reforms)**

**महत्त्वाची तथ्ये –**

१. न्यायव्यवस्थेतील एकूण प्रलंबित खटले – ३.६ कोटी (आर्थिक सर्वेक्षण २०१८–१९ नुसार).

- सर्वोच्च न्यायालय – ६०,०००
- उच्च न्यायालये – ३८ लाख.
- कनिष्ठ न्यायालये – ३ कोटी

२. लोकसंख्येच्या प्रमाणात न्यायाधीशांची कमी संख्या – २० प्रति दशलक्ष.

३. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या प्रलंबित असलेल्या नियुक्त्या – ४०० पेक्षा जास्त (संपूर्ण भारत)

४. सुनावणींची सरासरी संख्या – सर्वोच्च न्यायालय – १९३ दिवस, उच्च न्यायालये – २१० दिवस.

**भारतीय न्यायव्यवस्थेशी संबंधित मुद्दे –**

१. नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव – अपारदर्शक कॉलेजियम प्रणाली.

२. खटले प्रलंबित राहण्याचे उच्च प्रमाण.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. न्यायालयांमधील पायाभूत सुविधांची कमतरता – न्यायालयांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकारपुरस्कृत योजने अंतर्गत २०१९–२० मध्ये एकूण रु. ९८१.९८ कोटी मंजूर केले गेले. पाच राज्यांकडून यापैकी केवळ रु. ८४.९ कोटींचा एकत्रितपणे वापर करण्यात आला, उर्वरित ९१.३६% निधी वापरलाच गेला नाही.

४. न्यायपालिकेशी सल्लामसलत न करता केलेले नियोजन आणि अर्थसंकल्पीय कार्यवाही.

५. कर्मचार्यांची कमतरता – देशभरात उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची ४०० हून अधिक पदे रिक्त आहेत.

६. नियुक्ती प्रक्रियेत घराणेशाही – विधी आयोगाचा २३० वा अहवाल.

७. कायद्याची जटिल भाषा आणि विविध कायद्यांमधील गुंतागुंत.

८. प्रक्रियात्मक विलंब.

**नवा दृष्टिकोन–**

१. भारतीय राष्ट्रीय न्यायालयीन पायाभूत सुविधा प्राधिकरणा ची निर्मिती, जी देशातील कनिष्ठ न्यायालयांच्या अर्थसंकल्पन आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर नियंत्रण ठेवेल – माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा.

२. विद्यमान न्यायालयांची माहिती संप्रेषण तंत्रज्ञानविषयक क्षमता वाढवणे.

३. लोकअदालत, ग्राम न्यायलय इ. यांसारख्या 'पर्यायी विवाद निराकरण' यंत्रणा मजबूत करणे.

४. निवृत्तीनंतर कोणतीही नवीन सरकारी नियुक्ती स्वीकारण्यापूर्वी न्यायाधीशांसाठी कूलिंग ऑफ कालावधी ची तरतूद करणे.

५. न्यायालयीन माहिती संकलित करण्यासाठी आणि न्यायालयीन प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी एकसमान पद्धतीचा अवलंब करणे.

६. न्यायालयाबाहेर सौहार्दपूर्ण तोडगा काढण्यास प्रोत्साहन देणे.

७. उच्च न्यायालयांमध्ये स्थानिक भाषांच्या वापरास प्रोत्साहन देणे.

८. अखिल भारतीय न्यायालयीन सेवांची निर्मिती.

**न्यायव्यवस्थेतील सुधारणांबाबत विधी आयोगाचा अहवाल –**

१. घराणेशाही करणार्या न्यायाधीशांना काढून टाकणे – ज्या न्यायाधीशांचे कुटुंबीय आणि नातेवाईक उच्च न्यायालयांमध्ये प्रॅक्टिस करत आहेत त्यांना त्याच उच्च न्यायालयांमध्ये नियुक्त केले जाऊ नये.

२. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे सेवानिवृत्तीचे वय ३ वर्षांनी वाढवणे.

३. उच्च न्यायालयाच्या कामाचे विकेंद्रीकरण करणे – राज्यात अधिक खंडपीठे स्थापन करणे.

४. घटनात्मक बाबींवर राखीव निवाडे वाजवी कालावधीत दिले जावेत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – शासनाच्या विविध शाखा, विवाद निवारण यंत्रणा आणि संस्था यांच्यातील सत्तेची विभागणी.

**मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.**

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/ विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०२० | Judicial Legislation is antithetical to the doctrine of separation of powers as envisaged in the Indian Constitution. In this context justify the filing of a large number of public interest petitions praying for issuing guidelines to executive authorities. | न्यायिक विधिविधान या तत्त्वावर आधारित प्रश्‍न. |
| २०१९ | Do you think that the constitution of India does not accept the principle of strict separation of powers rather it is based on the principle of 'checks and balance'? Explain | भारतीय राज्यघटनेतील नियंत्रण आणि संतुलनाचे तत्त्व ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०१८ | Whether the Supreme Court Judgment (July 2018) can settle the political tussle between the Lt. Governor and elected government of Delhi? Examine. | नायब राज्यपाल आणि लोकशाही पद्धतीने निवडून आलेले विधिमंडळ यांच्यातील विवाद ही या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०१६ | Discuss the essentials of the 69th Constitutional Amendment Act and anomalies, if any, that have led to recent reported conflicts between the elected representatives and institution of Lieutenant Governor in the administration of Delhi. Do you think that this will give rise to a new trend in the functioning of the Indian Federal Politics? | कार्यकारिणी विरुद्ध विधिमंडळयांच्यातील अधिकारांच्या संदर्भातील संघर्षावर आधारित प्रश्‍न. |

**सत्तेच्या विभागणीचा सिद्धांत –**

- सत्तेची विभागणी म्हणजे राज्याच्या शासनव्यवस्थेची विविध शाखांमध्ये विभागणी करणे, ज्यात प्रत्येक शाखेला वेगवेगळे व स्वतंत्र अधिकार आणि जबाबदार्या दिलेल्या असतात, जेणेकरून एका शाखेचे अधिकार व इतर शाखांच्या अधिकारांशी संघर्ष होणार नाही. सर्वसाधारणपणे अशी विभागणी तीन शाखांमध्ये केली जाते –

  १. विधिमंडळ,

  २. कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ, याला कधीकधी 'त्रि–शाखा व्यवस्था प्रारूप' (ट्रायस पॉलिटिका मॉडेल) म्हणतात. हे संसदीय आणि निम–अध्यक्षीय शासनव्यवस्थांमधील अधिकारांच्या संमिश्रणाशी विरोधाभासी वाटू शकते, ज्यात विविध शाखांमधील, विशेषत: कार्यकारी आणि विधिमंडळ यांच्यातील सदस्यत्व आणि कार्यांची सरमिसळ होऊ शकते.

- जरी बहुतेकवेळा बिगर–अधिकारशाही अधिकारक्षेत्रांमध्ये, इतर शाखा, अधिकारक्षेत्रातील अधिकार वेगळे केलेले असले किंवा एकत्रित केलेले असलेतरी न्यायव्यवस्थेची जवळजवळ कधीही सरमिसळ होत नाही.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- राज्याचे कायदे तयार करण्यासाठी आणि सरकार चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची व्यवस्था करण्यासाठी विधिमंडळ शाखा जबाबदार आहे.
- कार्यकारी शाखा ही कायदे शाखेद्वारे लागू केलेल्या आणि निधीपुरवठा केलेल्या सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी आणि प्रशासन करण्यासाठी जबाबदार आहे.
- न्यायमंडळ शाखा संविधान आणि कायद्यांचा अन्वयार्थ लावण्यासाठी आणि त्यांच्यासमोर आणलेल्या विवादांचा अन्वयार्थ लावण्यासाठी व निराकरणासाठी जबाबदार आहे.

**उद्दिष्ट –**

- कोणत्याही एका शाखेला दुसऱ्या शाखेची मुख्य कार्ये करण्यापासून प्रतिबंधित करण्यासाठी शासनाच्या जबाबदार्यांचे वेगवेगळ्या शाखांमध्ये विभाजन करणे.
- सत्तेचे केंद्रीकरण रोखणे आणि नियंत्रण आणि संतुलनाची व्यवस्था करणे हा हेतू आहे. सत्तेच्या विभागणीमुळे सत्तेचा गैरवापर किंवा मूठभर लोकांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण होण्यास प्रतिबंध होतो
- सत्तेच्या विभागणीमुळे समाजाला राज्याच्या मनमानी आणि अतार्किक सत्तेपासून संरक्षण मिळते.

**सत्तेच्या विभागणीचे फायदे –**

एकाच सत्ताकेंद्रात/प्राधिकरणामध्ये सत्तेचे केंद्रीकरण घाल्यामुळे कुप्रशासन, भ्रष्टाचार, घराणेशाही आणि सत्तेचा दुरुपयोग हे परिणाम होऊ शकतो.

**सत्तेची विभागणी केल्यामुळे पुढील बाबतीत मदत होते–**

१. निरंकुशतेला पायबंद घालणे.

२. कार्यक्षम प्रशासनाची निर्मिती करणे

३. सत्तेचे स्वातंत्र्य राखणे.

४. विधिमंडळाला अनियंत्रित किंवा असंवैधानिक कायदे लागू करण्यापासून रोखणे.

**सत्तेची विभागणी करण्याबाबतच्या घटनात्मक तरतुदी –**

१. अनुच्छेद ५० : हा अनुच्छेद न्यायमंडळाला कार्यकारी मंडळापासून वेगळे करण्याचे बंधन राज्यावर टाकतो. परंतु, हा अनुच्छेद राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांतर्गत येत असल्याने, न्यायालयामार्फत त्याची अंमलबजावणी करता येत नाही.

२. अनुच्छेद ५३ आणि १५४ : यात अशी तरतूद आहे की संघ आणि घटक राज्यांचे कार्यकारी अधिकार हे राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्याकडे सोपविलेले असतील आणि त्यांना दिवाणी आणि फौजदारी दायित्वापासून संरक्षण मिळेल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. अनुच्छेद १२१ आणि २११ : हे अनुच्छेद अशी तरतूद करतात की, कायदेमंडळे सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या वर्तनावर चर्चा करू शकत नाहीत. केवळ महाभियोगाच्या बाबतीतच ते असे करू शकतात.

४. अनुच्छेद १२३ : राष्ट्रपती हे देशाचे कार्यकारी प्रमुख असल्याने, काही विशिष्ट परिस्थितींमध्येच त्यांना आपल्या कायदेविषयक अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार आहे.

५. अनुच्छेद ३६१ : राष्ट्रपती आणि राज्यपालांना न्यायालयीन कार्यवाहीपासून संरक्षण दिले गेले आहे. ते त्यांच्या पदाचे अधिकार आणि कर्तव्ये यांच्या वापरासाठी आणि कृतीसाठी कोणत्याही न्यायालयास उत्तरदायी असणार नाहीत.

**नियंत्रण आणि संतुलन प्रणाली –**

- न्यायमंडळाला कार्यकारी आणि विधिमंडळाच्या कृतींबाबत न्यायिक पुनरावलोकन करण्याचा अधिकार आहे.
- विधिमंडळाने संमत केलेला कोणताही कायदा अनुच्छेद १३ नुसार असंवैधानिक किंवा अनियंत्रित असेल (जर तो मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत असेल तर) तर तो रद्द करण्याचा अधिकार न्यायमंडळाला आहे.
- न्यायमंडळ हे कार्यकारी मंडळाची घटनाबाह्य कृती अवैध म्हणून घोषितदेखील करू शकते.
- कायदेमंडळ विविध संसदीय प्रक्रियांद्वारे कार्यकारिणीच्या कामकाजाचा आढावा देखील घेते.
- न्यायव्यवस्था स्वतंत्र असली तरी न्यायाधीशांची नियुक्ती कार्यकारी मंडळाद्वारे केली जाते.
- घटनात्मक मर्यादेचे पालन करताना कायदेमंडळ निकालाच्या आधारात बदल करू शकते.

**अपवाद –**

१. सदस्यांना अपात्र ठरवण्याचे आणि न्यायाधीशांच्या महाभियोगाचे कार्य पार पाडताना, कायदेमंडळ न्यायमंडळाची कार्ये पार पाडते.

२. कायदे बनवण्याच्या अधिकारांचा वापर करण्याव्यतिरिक्त कायदेमंडळ आपल्या विशेषाधिकारांचे उल्लंघन झाल्यास न्यायिक अधिकारांचा वापर करते.

३. कायदेमंडळाद्वारे न्यायमंडळाचे वरिष्ठ न्यायाधीश आणि राष्ट्रपती यांच्यावर महाभियोग चालविला जाऊ शकतो.

४. न्यायाधिकरणे आणि इतर अर्ध–न्यायिक संस्था ज्या कार्यकारी मंडळाचा एक भाग आहेत त्यादेखील न्यायिक कार्ये पार पाडतात. प्रशासकीय न्यायाधिकरणे जी कार्यकारी मंडळाचा एक भाग आहेत तीदेखील न्यायिक कार्ये पार पाडतात.

५. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांद्वारे न्यायिक कायदे.

६. कार्यकारी मंडळ काहीवेळा प्रत्यायुक्त विधिविधानांतर्गत कायदा बनविण्याच्या अधिकाराचा वापर करते.

**सत्तेच्या विभागणीच्या सिद्धांताचे मूल्यमापन –**

भारतीय राज्यघटनेत सत्तेची विभागणीचे तत्त्व काटेकोरपणे पाळले जात नाही. त्याऐवजी नियंत्रण आणि संतुलनाची व्यवस्था आहे. या तिन्ही शाखांमध्ये एक नाजूक समतोल आहे जो स्वातंत्र्यानंतर बहुतेक वेळा राखला गेला आहे.

तथापि अशीही काही उदाहरणे आहेत जेव्हा हे संतुलन बिघडते –

१. संसद आणि १४ घटक राज्यांच्या विधिमंडळांनी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा एकमताने मंजूर केला. तरीही सर्वोच्च न्यायालयाने न्यायिक पुनरावलोकनांतर्गत हा कायदा रद्द केला.

२. कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात अतिक्रमण करणार्या 'तीन राजधानी' सूत्रावर आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय.

३. कोणतीही तातडीची गरज नसतानाही कार्यकारी मंडळाकडून अध्यादेशाच्या साधनाचा केला जाणारा अतिवापर.

४. एनजीटी, फॉरेनर्स ट्रिब्युनल यांसारख्या न्यायाधिकरणांवरील कार्यकारी मंडळाचे वर्चस्व.

५. राष्ट्रपतींनी दया याचिकांचा वाजवी वेळेत निपटारा केला पाहिजे, असे सूचविणारे सर्वोच्च न्यायालय.

## अभ्यासक्रमाचा विषय – स्थानिक स्तरापर्यंतचे अधिकार आणि वित्तीय हस्तांतरण आणि त्यातील आव्हाने.

**मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.**

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०२० | The strength of local institutions in India has shifted from their formative phase of 'Functions, Functionaries and Funds' to the contemporary stage of 'Functionality'. Highlight the critical challenges faced by local institutions in terms of their functionality in recent times. | स्थानिक संस्थांसमोरील आव्हाने व समस्या हा मुद्दा या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०१९ | "The reservation of seats for women in the institutions of local self- government has had a limited impact on the patriarchal character of the Indian Political Process." Comment. | स्थानिक संस्थांमध्ये महिलांची भूमिका/स्थान अधोरेखित करणारा हा प्रश्न आहे . |
| २०१८ | Assess the importance of the Panchayat system in India as a part of local government. Apart from government grants, what sources can the Panchayats look out for financing development projects? | स्थानिक संस्थांच्या आर्थिक स्थितीच्या विश्लेषणावर आधारित प्रश्न. |
| २०१७ | "The local self-government system in India has not proved to be an effective instrument of governance". Critically examine the statement and give your views to improve the situation. | भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रणालीच्या विश्लेषण व मूल्यमापनावर आधारित प्रश्न. |
| २०१५ | In absence of a well–educated and organized local level government system, 'Panchayats' and 'Samitis' have remained mainly political institutions and not effective instruments of governance. Critically discuss. | स्थानिक स्वराज्य संस्थांचे राजकीयीकरण हा मुद्दा या प्रश्नामागील प्रेरणा आहे. |
| २०२२ | To what extent, in your opinion, has the decentralization of power in India changed the governance landscape at the grassroots? | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीचे विश्लेषणावर आधारित प्रश्न. |

यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की प्रश्नांचा मुख्य भर स्थानिक स्वराज्य संस्थांसमोरील आव्हाने या मुद्द्यावर आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**मूलभूत संज्ञा आणि त्यांचे अर्थ –**

- विकेंद्रीकरणाला राजकीय–प्रशासकीय आणि प्रादेशिक पदानुक्रमात केंद्र सरकारकडून खालच्या स्तरावर अधिकारांचे घटनात्मक हस्तांतरण म्हणून संबोधले जाते.
- प्रतिनिधीत्व : प्रतिनिधीत्व म्हणजे वरिष्ठाकडून अधीनस्थ व्यक्तीला अधिकार प्रदान करणे, अधिकार म्हणून नव्हे तर व्युत्पन्न सवलत म्हणून उपभोगणे आणि ते देखील वरिष्ठांच्या मर्जीने वापरणे.
- लोकशाही विकेंद्रीकरण : 'लोकतांत्रिक विकेंद्रीकरण' या शब्दाचा अर्थ वरिष्ठ व्यक्तीकडून गौण व्यक्तीस सवलत म्हणून नाही तर उपभोग घेण्याचा अधिकार म्हणून अधिकारांचे प्रदान करणे असा आहे आणि.
- जबाबदार्या व अधिकारांच्या हस्तांतरणाच्या या अंतर्गत सामान्यपणे नगरपालिकांना सेवांच्या जबाबदार्या हस्तांतरित केल्या जातात; त्या त्यांचे स्वतःचे महापौर आणि परिषदेच्या सदस्यांची निवड करतात, स्वतःचा महसूल वाढवतात आणि त्यांना गुंतवणुकीचे निर्णय घेण्याचे स्वतंत्र अधिकार असतात.

**घटनात्मक तरतुदी –**

१. अनुच्छेद ४० : ग्रामपंचायतींचे संघटन करणे आणि त्यांना स्वयंशासनाचे घटक म्हणून कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक अशी सत्ता आणि अधिकार प्रदान करणे.

२. ७३ वी घटनादुरुस्ती.

३. कलम २४३ ते २४३ ओ

**स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित समस्या आणि आव्हाने –**

- राज्य सरकारांच्या अधिकारक्षेत्रातून ११ व्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या बाबींचे कोणतेही स्पष्ट विभाजन नाही.
- केवळ काही किरकोळ स्वरूपाची नागरी कार्ये पंचायत राज संस्थांकडे सोपविली जातात. त्यांच्या इतर कार्यांची राज्य सरकारच्या कार्यांशी सरमिसळ होते.
- पंचायत स्तरावर महसूल निर्मितीचे कमी प्रमाण – मुख्यतः मर्यादित कर कक्षा आणि पंचायत राज संस्थांच्या कमी कर संकलन क्षमतेमुळे.
- पंचायत राज संस्थांकडे खर्चाबाबत मर्यादित स्वविवेकाधिन अधिकार आणि स्वातंत्र्य आहे.
- राज्य सरकारांकडून पंचायत राज संस्थांना प्राप्त होणारा निधी अनियमित आणि अपुरा आहे.
- राज्य सरकारांकडील बहुतेक निधी अटी आणि शर्तींसह येतात.
- पंचायत राज संस्थांच्या कार्यप्रणालीवर राज्य सरकारद्वारे नियुक्त पदाधिकार्यांचे लक्षणीय नियंत्रण.
- वेळेवर राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात राज्य सरकारचे अपयश.
- केंद्र पुरस्कृत योजना कोणत्या स्तरावरील पंचायतींची भूमिका काय असेल हे स्पष्टपणे नमूद करत नाहीत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**इतर विविध समस्या/मुद्दे –**

१. कर्मचार्यांची कमतरता.

२. कौशल्यांबाबतची निम्न पातळी.

३. खराब पायाभूत सुविधा (भौतिक आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानविषयक)

४. स्थानिक निवडणुका पुढे ढकलणे.

५. लोकांकडून अल्प प्रमाणावरील सहभाग.

**नवीन दृष्टिकोन (दुसर्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी) –**

- विकेंद्रीकरणामध्ये साहाय्यकारिता तत्त्वाचा वापर : साहाय्यकारितेच्या तत्त्वा (Principle of Subsidiarity) चा अर्थ असा आहे की, सरकारच्या खालच्या स्तरावर करता येणार्या कार्यांचे उच्च स्तरावर केंद्रीकरण केले जाऊ नये.
- स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य सरकारे यांच्या तसेच स्थानिक शासनसंस्थांच्या विविध स्तरांच्या कार्यांचे स्पष्ट वर्णन.
- क्षमताबांधणी आणि जबाबदारीसह कार्ये आणि संसाधनांचे प्रभावी हस्तांतरण.
- कार्यक्रम आणि संस्थांच्या एकत्रीकरणाद्वारे स्थानिक सेवा आणि विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 'नागरिक–केंद्रित' दृष्टिकोन.
- आर्थिकदृष्ट्या प्रभावी विकास आणि नागरिकांसाठी तसेच नागरिक केंद्रीत प्रशासन संरचनांसाठी सेवांचे अभिसरण.
- राज्यांनी सहयोगी तत्त्वावर, ११ व्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींच्या सर्वसमावेशक क्रियाकलापांचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक आदर्श प्रारूप मॉडेल कायदा प्रसारित केला जाणे.
- सर्व स्तरावरील पंचायतींसाठी निधी वितरित करणे.

**प्रकरण अध्ययन –**

१. अलीकडे, तामिळनाडू सरकारने स्थानिक ग्रामीण संस्थांचे आर्थिक अधिकार वाढवले आहेत.

२. गुजरात आणि राजस्थान – पंचायतींसाठी स्वतंत्र संवर्ग.

३. तामिळनाडू सरकारने पीआरआय आणि राज्य सरकार यांच्यात चांगल्या समन्वयासाठी ६०० ग्राम सचिवालये बांधण्याची योजना मंजूर केली आहे.

**शहरी स्थानिक स्वराज्य संस्था**

**महत्त्वाच्या घटनात्मक तरतुदी –**

१. ७४ वी घटनादुरुस्ती.

२. संविधानाची १२ वी अनुसूची.

३. संविधानाच्या अनुच्छेद २४३ पी ते २४३ झेड–जी.

**महत्त्वाची तत्थे –**

**इंडियन इन्स्टिटट्युट ऑफ ह्युमन सेटलमेंटनुसार –**

१. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा स्वतःचा स्रोत महसूल एकूण महसुलाच्या ५०% पेक्षा कमी आहे.

२. मालमत्ता कर – स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेल्या प्रमाणाची जागतिक सरासरी ०.६ ते १%, तर त्याच्या तुलनेत भारतातील सरासरी ०.१५%.

**शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुलाचे स्रोत –**

१. त्यांना निर्धारित केल्यानुसार कर आणि करेतर स्त्रोतांकडून संकलन.

२. राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सामायिक कर आणि शुल्कांचे हस्तांतरण.

३. राज्य सरकारकडून अनुदान.

४. केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत भारत सरकारकडून अनुदान.

५. केंद्र सरकारच्या केंद्र पुरस्कृत योजनांमधील राज्य सरकारचा हिस्सा.

६. केंद्रीय वित्त आयोगाकडून अनुदानाची उपलब्धता.

**भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित समस्या आणि आव्हाने –**

- नगरपालिकांची खराब वित्तीय स्थिती– मर्यादित, लवचिक आणि निरुत्साही कर आधार, विस्कळीत आर्थिक लेखा आणि लेखापरीक्षण प्रणाली आणि कर आणि वापरकर्ता शुल्क आकारण्यात आणि वसूल करण्यातील नगरपालिकांची असमर्थता.
- आधुनिक अवकाशीय नियोजन आराखडा, सार्वजनिक उपयोगिता आराखडा मानके आणि शहरांमधील जमिनींची मालकी यांचा अभाव असल्यामुळे शहरांमधील आर्थिक वृद्धी आणि उत्पादकता, पर्यावरणीय शाश्वतता आणि राहणीमानावर मोठा परिणाम होतो.
- नगरपालिकांमध्ये कर्मचारीवर्गाची कमतरता आहेत आणि शहरी व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्यांमध्येही लक्षणीय अंतर आहे.
- विकास प्राधिकरणे, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्वतः शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाही राज्य सरकारच्या विविध विभागांना अहवाल देतात, शिवाय त्यांच्याकडे अनेक अतिरिक्त व व्यापक जबाबदार्याही सोपवण्यात आल्या आहेत.
- शहर स्तरावर निवडून आलेले पदाधिकारी (महापौर आणि नगरसेवक) आणि शहर/जिल्हा स्तरावरील केंद्रीय प्रशासकीय सेवा संवर्ग यांच्यातील अधिकारांचे वितरण हे असमान असून, यात केंद्रीय प्रशासकीय सेवा संवर्गास झुकते माप दिलेले आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- नगरपालिका संस्थांच्या कायदेशीर सीमा संपूर्ण नागरी भागापर्यंत विस्तारित केल्या गेल्या नाहीत, परिणामी, अनेक मालमत्ता त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेर येतात.
- नागरी प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी ७४ व्या घटनादुरुस्ती (CAA) ची प्रत्यक्षात अंमलबजावणी आली नाही, ज्यामुळे नागरी संस्थांमधील नागरिकांच्या सहभागावर परिणाम झाला.

**इतर विविध मुद्दे –**

१. भ्रष्टाचार

२. विविध विभाग (केंद्र आणि राज्य सरकार यांच्या अंतर्गत असलेले) आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे योजनांची अंमलबजावणी अव्यवस्थितपणे आणि विलंबाने होते.

३. वेळेवर न घेण्यात येणार्या निवडणुका

४. अनियोजित शहरीकरण – स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनावर परिणाम होत आहे.

**नवीन दृष्टिकोन (दुसर्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी) –**

- शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा राज्य विधानसभेत सहभाग असणे आवश्यक आहे – स्थानिक स्वराज्य संस्थांची परिषद म्हणून विधान परिषदेची पुनर्रचना केली जाऊ शकते.
- सर्व स्तरांवरील अध्यक्ष किंवा सदस्यांची थेट निवड झाली पाहिजे.
- शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक स्तराच्या विहित कार्यांचे स्पष्ट वर्णन असावे.
- शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी कृतिकार्यक्रमांचा नियोजन आराखडा तयार करणे.

**निती आयोगाच्या शिफारसी –**






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- व्यवसाय मंजुरी प्रक्रियेला गती देण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये शहर आर्थिक परिषदे (सिटी इकॉनॉमिक कौन्सिल) ची स्थापना करणे. यामुळे व्यवसाय करणे सुलभ होईल.
- तत्थ-आधारित निर्णयांसाठी शहर-स्तरीय गुंतवणूक, स्थूल राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगार वाढ, आर्थिक स्थिती आणि आर्थिक कामगिरी आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांची स्थिती दर्शविणारा त्रैमासिक शहर डॅशबोर्ड विकसित केला जावा.
- दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांमध्ये महानगरीय प्रशासन प्रणालीदेखील आवश्यक आहे. द्विस्तरीय प्रशासन रचना असण्याची गरज निर्माण झाली आहे. या व्यवस्थेत सर्व स्थानिक कार्ये प्रभाग समित्यांकडे हस्तांतरित केली जातात आणि शहरव्यापी सेवा, जसे की वाहतूक, पाणीपुरवठा, मलनिस्सारण इत्यादी, नगर परिषद किंवा प्रादेशिक प्राधिकरणांकडे सोपविलेल्या असतात.
- शहरांच्या स्थानिक नियोजनासाठी समकालिक आणि आधुनिक राष्ट्रीय आराखड्याची तातडीची गरज आहे जो सध्याच्या नागरी विकास योजना निर्मिती आणि अंमलबजावणीविषयक (UDPFI) मार्गदर्शक तत्त्वांची जागा घेईल.
- अधोगामी उत्तरदायित्व यंत्रणेच्या वाढीसाठी प्रशासनाचा वॉर्ड आणि क्षेत्र स्तरावर विकास केला जावा.
- प्रभाग समित्या आणि क्षेत्र सभा तंत्रज्ञान-सक्षम 'ओपन सिटी फ्रेमवर्क'ने सुसज्ज करून पाठपुरावा आणि अहवालासाठी डिजिटल साधनांचा वापर करून सक्रिय केल्या पाहिजेत.

**प्रकरण अध्ययन –**

१. इंदूर महानगरपालिकेने संपूर्ण शहरात सौर प्रकल्पांसाठी निधीची व्यवस्था करण्यासाठी हरित बाँड जारी करून २५० कोटी रुपये उभारले.

२. गुजरातमधील वडोदरा महानगरपालिकेने २३ मार्च रोजी स्टॉक एसचेंजमध्ये अमृत योजनेंतर्गत १४ प्रकल्पांसाठी १०० कोटी रुपयांचे पाच वर्षांचे रोखे सूचीबद्ध केले होते, त्यांना बीएसई बॉण्ड प्लॅटफॉर्मवर १,००७ कोटी रुपयांच्या ३६ बोली मिळाल्या होत्या.

***


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# भारतीय राज्यघटना, राज्यव्यवस्था आणि शासन
## अभ्यासक्रमाचा विषय – विविध घटनात्मक पदांवरील नियुक्त्या, विविध घटनात्मक संस्थांचे अधिकार, कार्ये आणि जबाबदार्या.

वरील विषयाशी संबंधित मागील वर्षांचे प्रश्न पाहू.

| वर्ष | प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|---|
| २०२१ | How have the recommendations of the 14th Finance Commission of India enabled the states to improve their fiscal position? | सध्याची वित्तीय स्थिती सुधारणे आणि त्यात १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारसींची भूमिका या मुद्द्यांवर आधारित प्रश्न. |
| २०२० | Which steps are required for constitutionalization of a commission? Do you think imparting constitutionality to the National Commission for Women would ensure greater gender justice and empowerment in India? Give reasons. (2020) 15 | घटनात्मक दर्जा देऊन व्यवहार्यता आणि अपेक्षित परिणाम यांचे विश्लेषण करणारा प्रश्न. |
| २०१८ | In the light of recent controversy regarding the use of the Electronic Voting Machine (EVM), what are the challenges before the Election Commission of India to ensure the trustworthiness of elections in India? | भारतीय निवडणूक आयोग - आव्हाने यावर आधारित प्रश्न. |
| २०१८ | "The Comptroller and Auditor General (CAG) has a very vital role to play." Explain how this is reflected in the method and terms of his appointment as well as the range of powers he can exercise. | कॅग (CAG) ची नियुक्ती, भूमिका व अधिकार या मुद्द्यांवर आधारित प्रश्न |
| २०१८ | How is the Finance Commission of India constituted? What do you know about the terms of reference of the recently constituted Finance Commission? Discuss. | वित्त आयोगाशी संबंधित मूलभूत बाबींवर आधारित प्रश्न. |
| २०१८ | Whether the National Commission for Scheduled Castes (NCSC) can enforce the implementation of constitutional reservation for the Scheduled Castes in the religious minority institutions? Examine. | राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अधिकार आधारित प्रश्न. |
| २०१६ | Exercise of CAG's powers in relation to the accounts of the Union and the States is derived from Article 149 of the Indian Constitution. Discuss whether audit of the Government's policy implementation could amount to overstepping its own (CAG) jurisdiction. | कॅगच्या अधिकारांचे विश्लेषण या घटकावर आधारित प्रश्न. |
| २०२२ | Discuss the role of the National Commission for Backward Classes in the wake of its transformation from a statutory body to a constitutional body. | घटनात्मक दर्जा मिळाल्यानंतर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची भूमिका. |

येथे प्रश्न विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे या भागात सध्याचे संदर्भ लक्षात घेऊन महत्त्वाच्या संस्थांची चर्चा करू.

**भारत निवडणूक आयोग**

- भारतीय निवडणूक आयोग (ECI) ही एक घटनात्मक संस्था आहे. देशातील निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी आणि त्यांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने त्याची स्थापना केली गेली आहे. संविधानाच्या कलम ३२४ मध्ये अशी तरतूद आहे की संसद, राज्य विधानसभा, भारताचे राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदांच्या निवडणुकांची देखरेख, मार्गदर्शन आणि नियंत्रण यांचे अधिकार निवडणूक आयोगाकडे असतील. अशाप्रकारे, निवडणूक आयोग ही एक अखिल भारतीय संस्था आहे, या अर्थाने ती केंद्र सरकार आणि राज्य सरकार या दोघांसाठी समान आहे.

**भारत निवडणूक आयोगाशी संबंधित समस्या आणि आव्हाने –**

१. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीवर कार्यकारी मंडळाचे संपूर्ण नियंत्रण – हे सशक्त घटनात्मक लोकशाहीचे लक्षण नाही.

२. अल्प कालावधी – २०१५ ते २०२२ या कालावधीत सात निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे.

३. स्वतंत्र कर्मचारीवर्ग आणि सचिवालय नाही – यामुळे निवडणूक आयोगाच्या प्रभावी आणि जलद कामकाजात बाधा येते.

४. पदावरून काढण्याच्या प्रक्रियेत मुख्य निवडणूक आयुक्तांच्या तुलनेत इतर निवडणूक आयुक्तांची असमान स्थिती–यामुळे निवडणूक आयोगाच्या प्रभावी कामकाजावर मर्यादा येतात.

५. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम २९अ अंतर्गत निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षांच्या नोंदणीचे अधिकार असूनही, या आयोगाकडे कायद्याच्या अत्यंत गंभीर उल्लंघनासाठीदेखील त्यांची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार नाही.

६. संविधानाच्या कलम ३२४(२) मध्ये निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी संसदीय कायद्याची तरतूद आहे. मात्र आजपर्यंत कोणताही कायदा अमलात आलेला नाही.

**नवीन दृष्टिकोन –**

१. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी कॉलेजियम प्रणाली असावी.

२. आयुक्तांच्या नियुक्तीविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण करवण्यासाठी आयुक्तांच्या नियुक्तीपूर्वी अनेक सहभागी घटकांशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे.

३. भारत निवडणूक आयोगाची आर्थिक स्वायत्तता वाढवण्यासाठी या आयोगाचा खर्च भारताच्या एकत्रित निधीतून केला जावा.

४. भारत निवडणूक आयोगाकडे कामकाजासाठी स्वतंत्र कर्मचारी आणि सचिवालय असावे – यामुळे कर्मचारीवर्ग सरकारच्या हस्तक्षेपापासून दूर राहतील.

५. राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार भारत निवडणूक आयोगाला देण्यात यावा.

**मूल्यवर्धन मुद्दे–**

१. दिनेश गोस्वामी समिती (१९९०) – भारताचे सरन्यायाधीश आणि विरोधी पक्षनेते यांच्याशी सल्लामसलत करून मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या यांची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारे केली गेली पाहिजे (आणि जर विरोधी पक्षनेता उपलब्ध नसेल तर, त्यानंतरच्या लोकसभेतील सर्वात मोठ्या विरोधी गटनेत्याशी सल्लामसलत केली गेली पाहिजे).

२. राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेणारा राष्ट्रीय आयोग – पंतप्रधान, लोकसभा आणि राज्यसभेतील विरोधी पक्षांचे नेते, लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती यांचा समावेश असलेल्या संस्थेच्या शिफारशीनुसार मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांची नियुक्ती करावी.

३. 'चौथी शाखा असलेली संस्था' (Fourth Branch Institution') – लोकशाही शासनपद्धतीच्या कायदेमंडळ, कार्यकारी आणि न्यायपालिका या तीन शाखांच्या व्यतिरिक्त प्रभाव टाकणार्या किंवा कार्य करणार्या संस्था म्हणजे 'चौथी शाखा असलेल्या संस्था' या विविध प्रकारच्या संस्था निरोगी घटनात्मक लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. भारत निवडणूक आयोग हे या प्रकारातील एक उदाहरण आहे.

- दक्षिण आफ्रिका आणि केनियाच्या राज्यघटनांनी चौथ्या शाखा संस्थां' साठी संवैधानिक तरतुदी केल्या आहेत. जसे की, मानवाधिकार आयोग, निवडणूक आयोग, इत्यादी. त्यांना 'एकात्मिक संस्था' म्हणून संबोधले जाते आणि त्या 'स्वतंत्र' असणे आवश्यक आहे. अशा संस्थांच्या नियुक्ती प्रक्रियेमध्ये सामान्यतः राज्याच्या विविध विभागांतील अनेक सहभागधारकांचा समावेश असतो.

- निवडणुका हा लोकशाहीचा पाया आहे आणि निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही लोकशाही वैधतेचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच, निवडणूक व्यवस्थेच्या संरक्षकाला स्वतःच्या स्वायत्ततेचे रक्षण करण्यासाठी तातडीच्या संस्थात्मक संरक्षणाची आवश्यकता आहे. घटनात्मक नियुक्त्यांच्या राजकीयीकरणाला आळा घालण्याची कारवाई करण्याची आणि निवडणूक गैरव्यवहारासाठी पक्षांची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला देण्याची वेळ आली आहे. संस्थेवरील जनतेचा विश्वास पुनसथापित करण्याच्या दिशेने हे एक आवश्यक पाऊल आहे.

**नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (The Comptroller and Auditor)**

- नियंत्रक आणि महालेखा परीक्षक हा राज्यघटनेने नियुक्त केलेला एकमेव प्राधिकारी आहे ज्यावर केंद्र आणि राज्यांच्या खात्यांच्या लेखापरीक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. केंद्र आणि प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेश सरकारांच्या प्राप्ती आणि खर्चाचे लेखापरीक्षण करणे हे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांचे कर्तव्य आहे. नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांचे लेखापरीक्षण अहवाल संसदेसमोर किंवा घटक राज्यांच्या किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या विधिमंडळांसमोर ठेवले जातात. नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांच्या जबाबदारीचा विस्तार विधिमंडळाने बनवलेल्या कायद्यांनुसार आणि त्याखाली बनवलेल्या नियमांनुसार सरकारी कंपन्या व महामंडळे आणि संस्था आणि प्राधिकरणांचे लेखापरीक्षण करण्यापर्यंतदेखील वाढविला आहे.

**कॅग पदाचे महत्त्व –**

- कार्यकारी मंडळ कायदेमंडळास जबाबदार असणे आणि कार्यकारी मंडळाचे आर्थिक नियंत्रण कायदेमंडळाकडे असणे ही बाब संसदीय शासनव्यवस्थेचा गाभा आहे. कायदेमंडळाला हे कार्य योग्यरीत्या पार पाडता यावे म्हणून, या कायदेमंडळाला कार्यकारी मंडळपासून पूर्णपणे स्वतंत्र अशा घटनात्मक संस्थेचे साहाय्य मिळणे आवश्यक आहे, जी सरकारच्या आर्थिक व्यवहाराची छाननी करेल आणि अशा छाननीचे निष्कर्ष कायदेमंडळासमोर आणेल. यासाठी भारतीय राज्यघटनेत नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) पदाची तरतूद करण्यात आली आहे.

- डॉ. आंबेडकरांच्या मतानुसार, भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक हे भारतीय राज्यघटनेनुसार सर्वात महत्वाचे प्राधिकारी आहेत, कारण ते सार्वजनिक निधीचे संरक्षक आहेत आणि योग्य विधानमंडळाच्या अधिकाराशिवाय भारताच्या किंवा राज्याच्या एकत्रित निधीतून एक रुपयाही खर्च होणार नाही हे पाहणे त्यांचे कर्तव्य आहे. थोडयात, तो भारताच्या लेखापरीक्षण आणि लेखा प्रणालीचा निष्पक्ष प्रमुख असेल.

**कॅगला दिलेले महत्त्व –**

१. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि इतर न्यायाधीशांसाठी विहित केलेली शपथ, नियंत्रक आणि महालेखा परीक्षकालाही घ्यावी लागते, ज्यामध्ये 'मी राज्यघटना आणि कायद्यांचे पालन करीन' या शब्दांचा समावेश असतो.

२. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणेच पदावरून काढण्याची प्रक्रिया.

**कॅगशी संबंधित समस्या आणि आव्हाने –**

१. नियुक्ती प्रक्रियेवर कार्यकारी मंडळाचे संपूर्ण नियंत्रण.

२. केंद्र आणि राज्य सरकारांच्या खर्चाच्या आणि महसुलाच्या लेखापरीक्षणाच्या कार्यांचे अतिकेंद्रीकरण – यामुळे लेखापरीक्षण प्रक्रियेच्या गुणवत्तेला बाधा येते.

३. लेखापरीक्षण टाळण्यासाठी कार्यकारी मंडळाने अवलंबलेली धोरणे – अंदाजपत्रकबाह्य वित्त.

४. स्वयंसेवी संस्था आणि सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांना मिळणारा सरकारी निधी कॅगच्या कक्षेबाहेर आहे.

५. बहुतेक वेळा असे दिसून येते की सरकारी विभागांकडून कॅगने मागितलेली कागदपत्रे सादर करण्यात विलंब होतो. त्यामुळे कॅगला प्रभावीपणे कामकाजात बाधा येते.

६. समीक्षक हे कोळसा ब्लॉक घोटाळा आणि टू जी घोटाळ्याची उदाहरणे देऊन असा युक्तिवाद करतात की कॅगने लेखापरीक्षण करताना अनेकदा आपले अधिकारक्षेत्र ओलांडले आहे.

७. लेखापरीक्षण करताना अनेकदा कॅग प्रशासकीय मर्यादा लक्षात घेत नाही, अशीही टीका झाली आहे. यामुळे नोकरशहांना परंपरागत दृष्टिकोन अवलंबण्यास भाग पडते आणि त्यांना चौकटीबाहेर विचार करण्यापासून रोखले जाते.

८. अनेकदा कॅगचे अहवाल संसदेत मांडण्यास विलंब होतो. या अहवालांवर नियमितपणे चर्चा होत नाही.

**नवीन दृष्टिकोन –**

१. कॅगची निवड करण्यासाठी एका बहु–सदस्यीय निवड समितीची आवश्यकता आहे. लोकलेखा समितीचा अध्यक्ष तिच्या सदस्यांपैकी एक असावा.

२. कॅगची लेखापरीक्षणाची भूमिका विस्तारली पाहिजे – स्वयंसेवी संस्था आणि सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्प यांचा भरीव सरकारी निधी कॅगच्या कार्यकक्षेत असावा.

३. विविध सरकारी विभागांकडून प्रभावीपणे माहिती काढण्यासाठी कॅगला माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल करण्याचा अधिकार देण्यात यावा.

४. लेखापरीक्षणाची प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला पाहिजे.

५. कॅगच्या लेखापरीक्षणामध्ये सामाजिक लेखापरीक्षण समाविष्ट करण्यासाठी एक यंत्रणा विकसित केली पाहिजे.

६. सरकारच्या महत्त्वाच्या कल्याणकारी योजनांचे कॅगमार्फत नियमितपणे लेखापरीक्षण केले जावे.

**भारत आणि ब्रिटनमधीलनियंत्रक आणि महालेखा परीक्षक पदातील फरक –**

१. भारतात, कॅग महालेखापरीक्षकाची भूमिका पार पाडते परंतु नियंत्रकाची नाही. तथापि, ब्रिटनमध्ये त्यांच्याकडे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक असे दोन्ही अधिकार आहेत.

२. भारतात, कॅग हा संसदेचा सदस्य नाही, तर ब्रिटनमध्ये कॅग हाऊस ऑफ कॉमन्सचा सदस्य असतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. भारतात कॅग खर्च केल्यावर खात्यांचे लेखापरीक्षण करते, तर ब्रिटनमध्ये कॅगच्या मंजुरीशिवाय सरकारी तिजोरीतून पैसे काढता येत नाहीत.

प्रथा–संकेतानुसार, सरकारच्या धोरणात्मक निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे कॅगच्या कक्षेबाहेर आहे.

**काही प्रकरणांमध्ये सरकारी धोरणांवर शंका घेण्याच्या बाजूने युक्तिवाद खालीलप्रमाणे आहेत –**

(i) निर्णय घेण्यापूर्वी धोरणाच्या आर्थिक परिणामांचा अजिबात विचार केला गेलेला नसू शकतो ;

(ii) आर्थिक परिणामांचे मूल्यांकन स्पष्टपणे चुकीचे असू शकते ;

(iii) आकडेवारी बरोबर असू शकते ; परंतु निर्णयामागील तर्क अस्पष्ट किंवा चुकीचा असू शकतो ; किंवा

(iv) ज्या मूल्यांकनानुसार निर्णय घेण्यात आला होता त्यापेक्षा वास्तविक आर्थिक परिणाम खूपच जास्त असू शकतात.

'माझ्या मते हा मान्यवर किंवा प्राधिकारी बहुधा भारतीय राज्यघटनेतील सर्वात महत्त्वाचा अधिकारी आहे. विनियोग कायद्यानुसार संसदेने निर्धारित केलेला खर्च ओलांडला जाणार नाही किंवा ज्यासाठी निर्धारित केला गेला आहे त्यापेक्षा वेगळ्या कामासाठी होणार नाही हे पाहणारी ती एक व्यक्ती आहे.' – डॉ. बी. आर. आंबेडकर.

**वित्त आयोग**

- वित्त आयोग ही एक घटनात्मकदृष्ट्या अनिवार्य संस्था आहे जी वित्तीय संघराज्यवादाच्या केंद्रस्थानी आहे. घटनेच्या अनुच्छेद २८० अंतर्गत स्थापित झालेल्या या संस्थेची मुख्य जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्त स्थितीचे मूल्यांकन करणे, त्यांच्यामध्ये करांच्या वाटणीची शिफारस करणे, राज्यांमध्ये या करांचे वितरण निर्धारित करणारी तत्त्वे मांडणे ही आहे. सर्व स्तरांच्या सरकारांशी व्यापक आणि सखोल सल्लामसलत करणे हे त्याच्या त्याचे कार्याचे एक वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे ही घटनात्मक संस्था सहकारी संघराज्यवादाचे तत्त्व मजबूत करते. तिच्या शिफारशी सार्वजनिक खर्चाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि वित्तीय स्थैयाला प्रोत्साहन देण्यासाठी देखील उपयुक्त असतात.

**१५ व्या वित्त आयोगाने (२०२१–२०२६) वापरलेला विकासविषयक निकष**

| **निकष** | **१४ वा वित्त आयोग २०१५-२०** | **१५ वा वित्त आयोग २०२०-२१** | **१५ वा वित्त आयोग २०२१-२६** |
|---|---|---|---|
| उत्पन्न अंतर | ५०.० | ४५.० | ४५.० |
| क्षेत्रफळ | १५.० | १५.० | १५.० |
| लोकसंख्या (१९७१) | १७.५ | - | - |
| लोकसंख्या (२०११)' | १०.० | १५.० | १५.० |
| लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी | - | १२.५ | १२.५ |
| वनक्षेत्र | ७.५ | - | - |
| वन आणि पर्यावरणशास्त्र | - | १०.० | १०.० |
| कर आणि वित्तीय प्रयत्न* | - | २.५ | २.५ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **१००** |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**वित्त आयोगाच्या महत्त्वाच्या शिफारशी –**

१. २०२१–२६ कालावधीसाठी केंद्रीय करांमध्ये राज्यांचा हिस्सा २०२०–२१ प्रमाणेच ४१% ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे. हे प्रमाण २०१५–२० कालावधीसाठी १४ व्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या ४२% हिश्श्यापेक्षा कमी आहे. १% हिश्श्याचे समायोजन जम्मू आणि काश्मीर आणि लडाख या नव्याने स्थापन झालेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्राच्या संसाधनांमधून तरतूद करण्यासाठी आहे.

२. महसुली तूट अनुदान : महसुली तूट दूर करण्यासाठी १७ राज्यांना २.९ लाख कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

३. क्षेत्र–विशिष्ट अनुदान : राज्यांना पुढील आठ क्षेत्रांसाठी १.३ लाख कोटी रुपयांचे क्षेत्र–विशिष्ट अनुदान दिले जाईलः (१) आरोग्य, (२) शालेय शिक्षण, (३) उच्च शिक्षण, (४) कृषी सुधारणांची अंमलबजावणी, (५) PMGSAY अंतर्गत रस्त्यांची देखभाल, (६) न्यायव्यवस्था, (७) आकडेवारी आणि (८) महत्त्वाकांक्षी जिल्हे आणि खंड. या अनुदानांचा एक भाग कार्यप्रदर्शनाशी निगडित असेल.

४. राज्य–विशिष्ट अनुदान : आयोगाने ४९,५९९ कोटी रुपयांच्या राज्य–विशिष्ट अनुदानाची शिफारस केली. ते खालील क्षेत्रांमध्ये दिले जाईल : (१) सामाजिक गरजा, (२) प्रशासकीय प्रशासन आणि पायाभूत सुविधा, (३) पाणी आणि स्वच्छता, (४) संस्कृती आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन, (५) उच्च किमतीच्या भौतिक पायाभूत सुविधा आणि (६) पर्यटन.

१. आयोगाने राज्य–विशिष्ट आणि क्षेत्र–विशिष्ट अनुदानांच्या वापराचे पुनरावलोकन आणि निरीक्षण करण्यासाठी राज्य–स्तरावर उच्च–स्तरीय समितीची शिफारस केली.

५. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान : स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण अनुदान ४.३६ लाख कोटी रुपये असेल (अनुदानाचा एक भाग कामगिरीशी निगडित असेल).

६. आपत्ती जोखीम व्यवस्थापन : आयोगाने आपत्ती व्यवस्थापन निधीसाठी केंद्र आणि राज्यांमधील विद्यमान खर्च–वाटप पद्धती कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. केंद्र आणि राज्यांमधील खर्च–वाटपाचे प्रारूप असे असेलः (१) ईशान्य आणि हिमालयीन राज्यांसाठी ९०:१० आणि (२) इतर सर्व राज्यांसाठी ७५:२५. राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीमध्ये रु. १.६ लाख कोटी (केंद्राचा वाटा रु. १.२ लाख कोटी) ची तरतूद असेल.

७. महसुलाचे एकत्रीकरण : उत्पन्न आणि मालमत्तेवर आधारित कर आकारणी व्यवस्था मजबूत केली पाहिजे.

८. राज्यस्तरावर मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कामध्ये मोठ्या प्रमाणात अप्रयुक्त क्षमता आहे. संगणकीकृत मालमत्तेच्या नोंदी व्यवहारांच्या नोंदणीसह एकत्रित केल्या पाहिजेत आणि मालमत्तेचे बाजार मूल्य विचारात घेतले पाहिजे. राज्य सरकारांनी मालमत्तेच्या मूल्यांकनाची पद्धत सुव्यवस्थित करावी.

९. वस्तू व सेवा कर (GST) – १२% आणि १८% च्या दरांचे विलीनीकरण करून दररचना तर्कसंगत केली पाहिजे. राज्यांनी जीएसटीचा आधार वाढवण्यासाठी आणि अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय प्रयत्नांना गती देण्याची गरज आहे.

१०. केंद्राच्या कायद्याशी, विशेषतः, कर्जाच्या व्याख्येसह सुसंगतता आणण्यासाठी राज्यांनी त्यांच्या वित्तीय जबाबदारी कायद्यात सुधारणा करावी.

**राष्ट्रीय मागासवर्ग आयोग**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी उपलब्ध केलेल्या सुरक्षा उपायांचे निरीक्षण करणे, त्यांच्या सामाजिक–आर्थिक विकासाबद्दल सरकारला सल्ला देणे आणि त्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्याचे काम दिले जाते. हा आयोग राष्ट्रपतींना देशातील मागासवर्गीयांच्या स्थितीचा वार्षिक अहवालही सादर करतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

१. १०२ वा घटनादुरुस्ती कायदा – राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला घटनात्मक दर्जा.

२. १०५ वा घटनादुरुस्ती कायदा – घटक राज्यांतील इतर मागास वर्गांची यादी ठरवण्याचा राज्य सरकारांचा अधिकार.

**घटनात्मक दर्जा असण्याचा फायदा –**

१. पूर्वीची राष्ट्रीय मागासवर्ग आयोग फक्त इतर मागास वर्गांच्या यादीतून जातींचा समावेश करण्याबाबत आणि वगळण्याबाबत आणि या जातींमधील आरक्षणाचे फायदे मिळविण्याच्या संदर्भातील 'क्रिमी लेयर'च्या कट ऑफसंदर्भात उत्पन्नाची पातळीबाबत शिफारस करू शकत असे.

२. आता घटनात्मक दर्जा मिळाल्यानंतर इतर मागासवर्गीय जातींतील लोक त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नवीन राष्ट्रीय मागासवर्ग आयोगा (NCBC) कडे संपर्क साधू शकतात.

३. आतापर्यंत, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाद्वारे ओबीसींच्या तक्रारींचे निराकरण केले जात असे.

४. आरक्षणाची अंमलबजावणी न करणे, आर्थिक तक्रारी, हिंसाचार इत्यादींशी संबंधित तक्रारींच्या बाबतीत, सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्गातील लोक आयोगाकडे जाऊ शकतात.

५. घटनात्मक दर्जामुळे राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला अधिकार आणि संरक्षणापासून वंचित राहण्याबाबतच्या तक्रारींची चौकशी करण्याचा अधिकार मिळतो. कलम ३ (८) दिवाणी न्यायालयाप्रमाणे खटला चालविण्याचे, ते कोणालाही सुनावणीसाठी बोलावण्याचे, कागदपत्रे सादर करावयास सांगण्याचे अधिकार आणि प्रतिज्ञापत्रावर पुरावे प्राप्त करण्याची परवानगी देते.

**केस स्टडी –**

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग (एनसीएम) घटनात्मक दर्जाशिवाय गैरवर्तन करणार्या अधिकार्यांविरुद्ध कारवाई करू शकत नाही. 'संविधाना'ची रचना, पद्धती, तत्त्वे आणि मूल्ये प्रतिबिंबित करणारी घटनात्मकता सर्व सरकारी कृतींना वास्तविकपणे जबाबदार बनवते.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची अल्पसंख्याक संस्थांमध्ये आरक्षणाची तरतूद लागू करण्यातील भूमिका –**

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्याक संस्थांना निर्देश देण्याचे सक्षम अधिकार नाहीत.

**कारणे –**

१. अनुच्छेद ३० – अल्पसंख्याकांचा शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि प्रशासन करण्याचा अधिकार. – (१) सर्व अल्पसंख्याकांना, मग ते धर्म किंवा भाषेवर आधारित असो, त्यांना त्यांच्या आवडीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

२. ९३ वा घटनादुरुस्ती कायदा, २००५ – अल्पसंख्याकांच्या वगळता खाजगी शैक्षणिक संस्थांसह शैक्षणिक संस्थांमध्ये (राज्याकडून अनुदानित असो किंवा विनाअनुदानित असो) सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींसाठी विशेष तरतुदी करण्याचा राज्याला अधिकार दिला गेला (कलम १५ मधील खंड (५).

यावरून घटनात्मक तरतुदी स्पष्टपणे सांगतात की आरक्षणाची तरतूद अल्पसंख्याक संस्थांना लागू नाही.

**घटनात्मक संस्थांच्या कामकाजाशी संबंधित सामान्य समस्या/मुद्दे :**

१. नियुक्तींमध्ये अवास्तव विलंब – राष्ट्रीय मागासवर्ग आयोग सुमारे १० महिने उपाध्यक्ष, सदस्यांशिवाय कार्यरत आहे (डिसेंबर २०२२).

२. वार्षिक अहवाल संसदेत मांडण्यास विलंब.

३. घटनात्मक संस्थांच्या वार्षिक अहवालांवर संसदेत नियमितपणे चर्चा होत नाही.

४. आयोगाच्या सदस्यांच्या नियुक्ती प्रक्रियेवर संपूर्ण सरकारचे नियंत्रण.

५. कामकाजासाठी वेगळे सचिवालय नाही. उदा. भारत निवडणूक आयोग.

६. प्रभावी कामकाजासाठी सरकारी यंत्रणेवर जास्त अवलंबित्व.

***

PRAYAAS INSTITUTE OF EXCELLENCE

## अभ्यासक्रमाचा विषय – अभ्यासक्रमातील ठळक मुद्दा : वैधानिक, नियामक आणि अर्ध न्यायिक संस्था.

सर्वप्रथम आपण मागील वर्षीचे संघ लोकसंवा आयोगाचे प्रश्न पाहू आणि त्यांना नेमके काय अपेक्षित आहे ते समजून घेऊ.

| प्रश्न | संदर्भ/विषयसूत्र/प्रेरणा |
|---|---|
| The Central Administration Tribunal which was established for redressal of grievances and complaints by or against central government employees, nowadays is exercising its powers as an independent judicial authority." Explain. | केंद्रीय प्रशासकीयन्यायाधिकरणापुढील समस्या आणि आव्हाने या घटकांवर आधारित प्रश्न. |
| How far do you agree with the view that tribunals curtail the jurisdiction of ordinary courts? In view of the above, discuss the constitutional validity and competency of the tribunals in India. | न्यायाधिकरणाची अधिकार क्षेत्र आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या, न्यायाधिकरणाची घटनात्मक वैधता या घटकांवर आधारित प्रश्न. |
| Is the National Commission for Women able to strategize and tackle the problems that women face at both public and private spheres? Give reasons in support of your answer. | लोकसंख्येतीलअसुरक्षित विभागाच्या संरक्षणासाठी वैधानिक संस्थेचे सखोल विश्लेषण करणारा प्रश्न. |
| What is a quasi-judicial body? Explain with the help of concrete examples. | अर्ध-न्यायिक संस्था या घटकावरील थेट प्रश्न. |
| What are the major changes brought in the Arbitration and Conciliation Act, 1996 through the recent Ordinance promulgated by the President? How far will it improve India's dispute resolution mechanism? Discuss. | चालू घडामोडींवर आधारित समस्या. २०१५ मध्ये हा मुद्दा चर्चेत आला होता. |
| For achieving the desired objectives, it is necessary to ensure that the regulatory institutions remain independent and autonomous." Discuss in the light of the experiences in the recent past. | नियामक संस्थांचे महत्त्व अधोरेखित करणारा प्रश्न. |

| | |
|---|---|
| The National Human Rights Commission (NHRC) in India can be most effective when its tasks are adequately supported by other mechanisms that ensure the accountability of a government. In light of the above observation assess the role of NHRC as an effective complement to the judiciary and other institutions in promoting and protecting human rights standards. | राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे सखोल विश्लेषण करणारा प्रश्न. |
| The setting up of a Rail Tariff Authority to regulate fares will subject the cash strapped Indian Railways to demand subsidy for the obligation to operate non-profitable routes and services. Taking into account the experience in the power sector, discuss if the proposed reform is expected to benefit the consumers, the Indian Railways or the private container operators. | विविध नियामक संस्थांमधील सुधारणांशी संबंधित प्रश्न. |

आता तुम्हाला हा सीएसई मुख्य परीक्षा २०२१ आणि २०२२ साठी वरील घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करायचा आहे.

प्रत्येक संज्ञेचा मूळ अर्थ पाहू. अर्ध–न्यायिक संस्थेवर एक सरळ प्रश्न मागच्या वर्षी विचारला गेला होता, त्यामुळे आपण वैधानिक आणि नियामक संस्थांबाबत असे प्रश्न दिले जाण्याची अपेक्षा करू शकतो.

**वैधानिक संस्था**

- ही एक अशी संस्था असते जी बिगर–घटनात्मक स्वरूपाची असून, कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे स्थापित केली गेलेली असते.
- उदा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, २०१० अंतर्गत राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग कायदा, १९९३ अंतर्गत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग

**नियामक संस्था**

- या संस्था एखाद्या विशिष्ट क्षेत्रासाठी नियमन, तपासणी, मानके स्थापित करण्यासाठी कायद्याद्वारे किंवा कार्यकारी कृतीद्वारे स्थापन केलेल्या संस्था असतात.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- उदा., भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ अंतर्गत स्थापित भारतीय रिझर्व्ह बँकेची देशातील बँकिंग क्षेत्राचे नियमन करण्याची प्राथमिक भूमिका आहे.

**अर्ध–न्यायिक संस्था**

- या कायद्याद्वारे किंवा कार्यकारी कृतीद्वारे स्थापित केलेल्या संस्था आहेत, ज्यांना कायद्याचा अन्वयार्थ लावण्याचा आणि विशिष्ट हेतूसाठी निर्णय घेण्याचा अधिकार आहे.
- उदा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण हे पर्यावरण क्षेत्रात, तर आयकर अपील न्यायाधिकर आयकर क्षेत्रात कार्यरत आहे.

**नियामक संस्थांचे महत्त्व**

- नियामक संस्था खालील बाबतीत जोखीम कमी करण्यात मदत करतात.
- जास्त दर
- अपुर्या स्वरूपाची सेवा आणि गुणवत्ता
- सहभागी पक्षांमधील वारंवार उद्भवणारे असंतोष
- वापरकर्त्यांकडून कराराच्या अटींचे पालन न केले जाण्यावर नियंत्रण.

**नियामक संस्थांची कार्ये**

- सार्वजनिक हिताचे संरक्षण
- गुणवत्ता आणि मानके राखणे
- दर समायोजन आणि नियमितपणे पुनरावलोकन
- विवादांचे निराकरण
- तांत्रिक सुरक्षा आणि गुणवत्ता मानके यांची स्थापना करणे
- कराराच्या जबाबदार्यांच्या पालनावर देखरेख ठेवणे
- कार्यक्षेत्रामध्ये व्यवहार सुलभ करणे
- आता तुमचे काम प्रत्येक कार्याच्या संदर्भात किमान एक उदाहरण शोधणे हे आहे. उदाहरणार्थ, तांत्रिक गुणवत्ता आणि सुरक्षा मानकांच्या श्रेणीमध्ये उदाहरण म्हणून आपण अन्न सुरक्षा आणि भारतीय मानक प्राधिकरणा (FSSAI) चा उल्लेख करून शकतो.

**नियामक संस्थांबाबतच्या समस्या आणि आव्हाने**

- निवडीचा योग्य निकष नाही– राष्ट्रीय शेअर बाजार (NSE) प्रकरण
- निरीक्षण आणि मूल्यमापनामध्ये सातत्याचा अभाव आहे.
- पुनरावलोकनासाठी संस्थात्मक यंत्रणेचा अभाव आहे – अमेरिकेमध्ये FED सारख्या नियामक संस्थांच्या कामकाजाबाबत दूरदर्शनवर माहिती दिली जाते
- वेळेवर निधी न मिळणे आणि निधीसाठी मंत्रालयावर अवलंबून राहणे या बाबी त्यांच्या स्वायत्ततेला बाधा आणतात.

- नियामक संस्थांसाठी योग्य उत्तरदायित्व यंत्रणेचा अभाव– मुख्यतः तदर्थ आधारावर नोडल मंत्रालयांद्वारे याची सुनिश्चिती केली जाते.
- अंतराळ आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये नियामक संस्थांचा अभाव आहे.

**नवीन दृष्टिकोन**

- नियामक संस्थांना त्यांच्या निर्णयांची कारणे देणे व त्याबात स्पष्टीकरण करणे बंधनकारक करणे– यामुळे उत्तरदायित्व कायम राहील
- निधीच्या उपलब्धतेबाबत मंत्रालयावर अवलंबून नसलेल्या निधी पुरवठा यंत्रणेची स्थापना करणे.
- ब्रिटनप्रमाणे पुनरावलोकनासाठी संस्थात्मक यंत्रणेची स्थापना करणे.
- सार्वजनिक छाननीसाठी त्यांचा संपर्क वाढवणे.

**अर्ध–न्यायिक संस्था**

आता आपण अर्ध–न्यायिक संस्थांकडे वळूया.

**अर्ध–न्यायिक संस्थांची भूमिका आणि महत्त्व**

- या संस्था विशेषज्ञीकरण आणि तांत्रिक कौशल्य उपलब्ध करतात, ज्यांची प्रचलित न्यायालयांच्या न्यायाधीशांकडे कमतरता असू शकते – राष्ट्रीय कंपनी कायदा प्राधिकरणामध्ये दाखल प्रकरणांचा निर्णय घेणाण्यासाठी न्यायाधीशांसह वित्त तज्ज्ञांची नियुक्ती करणे.
- वेळेत निर्णय देणे बंधनकारक केले जाऊ शकते– राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सुनावणीसाठी आलेल्या प्रकरणांवर ६ महिन्यांत निर्णय घ्यावा.
- उच्च न्यायव्यवस्थेवरचा भार कमी करणे.
- अधिक प्रवेशजोगी आणि परवडणारी– पुणे आणि भोपाळसारखी शहरे जिथे उच्च न्यायालयांची खंडपीठे करणे, जेथे हायकोर्टाची ठिकाणे नाहीत.
- निर्णय नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर दिले जातात.
- भारतीय निवडणूक आयोग पक्ष चिन्हाच्या बाबींवर निर्णय घेताना अर्ध–न्यायिक संस्था म्हणून काम करतो. माहिती अधिकार कायद्याशी संबंधित प्रकरणांमध्ये केंद्रीय माहिती आयोग अर्ध–न्यायिक प्राधिकरण म्हणूनही काम करतो. येथे आपण न्यायाधिकरणाच्या दृष्टिकोनातून अर्ध–न्यायिक संस्थांवर लक्ष केंद्रित करणार आहोत. तुम्ही पाहिले असेल की, परीक्षांमध्ये संघ लोकसेवा आयोगा (UPSC) वर वारंवार प्रश्न विचारले जातात.

- **न्यायाधिकरणासाठी घटनात्मक तरतूद**

१. संघराज्याच्या अथवा भारताच्या राज्यक्षेत्रातील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील कोणत्याही राज्याच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिका–याच्या अथवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्याने नियंत्रित केलेल्या कोणत्याही निगमाच्या कारभारासंबंधातील लोकसेवा व पदे यांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीची भरती व सेवा–शर्ती यांबाबतचे विवाद किंवा तक्रारी यांचा अभिनिर्णय किंवा न्यायचौकशी प्रशासकीय न्यायाधिकरणांमार्फत व्हावी, यासाठी संसदेला कायद्याद्वारे तरतूद करता येईल (३२३अ).


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. अनुच्छेदात नमूद केलेल्या बाबींसाठी न्यायाधिकरण तयार करण्याचा राज्य विधानमंडळ किंवा संसदेचा अधिकार. तथापि सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की प्रकरणांची यादी संपूर्ण नाही.(323B)

**सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निकाल**

न्यायाधिकरणांच्या घटनात्मक वैधतेला वेळोवेळी आव्हान देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधिकरणांच्या घटनात्मक वैधतेवर शिक्कामोर्तब केले आहे.

१. संपत कुमार खटला– सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाप्रमाणे सक्षम पर्यायी व्यासपीठ म्हणून न्यायाधिकरणह्न निर्माण केल्याने संविधानाच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन होणार नाही, असा निर्णय दिला.

२. एल. चंद्रकुमार केस– सुप्रीम कोर्टाने संपत कुमार खटला रद्द केला आणि न्यायाधिकरणांचे निर्णय कलम २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या रिट अधिकारक्षेत्राच्या अधीन आहेत, कारण न्यायिक पुनरावलोकन हे भारतीय संविधानाचे मूलभूत वैशिष्ट्य आहे.

**न्यायाधिकरणाच्या कामकाजातील समस्या आणि आव्हाने–**

१. प्रकरणे प्रलंबित राहण्याचे उच्च प्रमाण – आयकर अपील न्यायाधिकरणाकडे ९०००० पेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत.

२. न्यायाधिकरणातील अधिकार्यांचे वर्चस्व.– यामुळे सत्तेच्या विभागणीच्या तत्त्वाचे उल्लंघन होते.

३. न्यायाधिकरणांमध्ये वेळेवर नियुक्त्या होत नाहीत– राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणामध्ये ५०% पेक्षा जास्त जागा रिक्त आहेत.

४. पायाभूत सुविधांचा अभाव– अलीकडेच कर्नाटक उच्च न्यायालयाने कर्नाटक सरकारला राज्यातील अर्ध–न्यायिक संस्थांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले.

**नवीन दृष्टिकोन–न्यायाधिकरणांसाठी राष्ट्रीय आयोग तयार करणे**

- या आयोगामुळे न्यायाधिकरणांमध्ये एकसमानता येईल.
- आर्थिक स्वातंत्र्यास चालना मिळेल.
- न्यायाधिकरणांचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यकारी मंडळाऐवजी घटनात्मक किंवा वैधानिक संस्थेची स्थापना केल्याने जनतेचा विश्वास वाढेल.
- सत्तेच्या विभागणीच्या तत्त्वाचे समर्थन केले जाईल.

**महत्त्वाच्या वैधानिक संस्था**

- तुम्ही पाहिले असेल की संघ लोकसेवा आयोगाने काही महत्त्वाच्या वैधानिक संस्थांवर विश्लेषणात्मक प्रश्न विचारले आहेत. म्हणून या विभागात आपण काही महत्त्वाच्या वैधानिक संस्थांशी संबंधित समस्या आणि आव्हानांचा समावेश करत आहोत. तुम्ही त्यांच्याशी संबंधित मूलभूत मुद्द्यांबद्दल राजकीय व्यवस्थेवरील कोणत्याही प्रमाणित पाठ्यपुस्तकातून माहिती मिळवू शकता. गेल्या काही वर्षांत संघ लोकसेवा आयोगाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, केंद्रीय माहिती आयोगावर प्रश्न विचारले आहेत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण–**

- राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० अंतर्गत या न्यायाधिकरणाची स्थापना. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडनंतर पर्यावरणविषयक समस्यांसाठी न्यायाधिकरण असलेल्या जगातील देशांपैकी भारत हा एक देश आहे.

**समस्या आणि आव्हाने–**

१. तज्ज्ञांच्या 'पर्यावरणविषयक उत्कृष्टतेचा अभाव'. नियुक्त केलेल्या तज्ज्ञांपैकी निम्मे प्रशासकीय सेवा आणि वन सेवेतील आहेत.

२. बैठकांमध्ये विलंब. एनजीटीची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत कधीही पूर्ण क्षमतेने काम केले नाही.

३. प्रशासकीय उदासीनता– गंगा नदी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापनावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या महत्त्वपूर्ण आदेशांची अंमलबजावणी होत नाही.

४. प्रकरणांच्या सुनावणीत विलंब– राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा असे नमूद करतो की, त्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते, परंतु त्याच्या आदेशांना केवळ सर्वोच्च न्यायालयातच आव्हान दिले जाऊ शकते असा उल्लेख त्यात नाही. यामुळे अनेक याचिकाकर्ते अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयात जातात.

५. सक्रिय नसलेले खंडपीठ – दिल्ली खंडपीठ वगळता राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या इतर खंडपीठांचे कामकाज वर्षभर बंद असते.

**नवीन दृष्टिकोन –**

- 'विशेषज्ञ' या शब्दाची व्यापक व्याख्या करणे. तांत्रिक तज्ज्ञ हे बहुविद्याशाखीय पार्श्वभूमीचे असावेत.
- राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० मध्ये सुधारणा करून अपीलबाबतची संदिग्धता दूर करणे.
- पर्यावरण नियामक अधिकाऱ्यांद्वारे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पालन केले जाण्याची सुनिश्चिती करण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे. उदा. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील संस्थात्मक यंत्रणा.
- निष्क्रिय खंडपीठांनी पूर्ण क्षमतेने काम करण्याची व्यवस्था करणे आणि छत्तीसगड, उत्तराखंड, ओडिशा यांसारख्या पर्यावरणीयदृष्ट्या नाजूक भागात अधिक खंडपीठांची स्थापना करणे.
- प्रकरण अध्ययन– ब्रिटनमधील पर्यावरण एजन्सी. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाची कार्यप्रणाली ब्रिटनमधील पर्यात्तरण प्राधिकरणा (EA) प्रमाणेच सक्षम असावी.

**केद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) –**

- दिल्ली पोलीस स्पेशल एस्टॅब्लिशमेंट ॲट, १९४६ अंतर्गत स्थापना.

**समस्या आणि आव्हाने–**

- राजकीय हस्तक्षेप. सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयबाबत 'पिंजर्यातील पोपट' अशी टिप्पणी केली आहे.
- ज्या विशिष्ट प्रकरणात खटला दाखल केला आहे त्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्याची संमती आवश्यक असल्याने अधिकारक्षेत्रावर मर्यादा.
- केंद्र सरकारचे प्रशासकीय नियंत्रण.

- माहिती अधिकार कायद्यातून सूट मिळाल्याने उत्तरदायित्व यंत्रणेला बाधा येते.
- सहसचिव दर्जाच्या अधिकार्यापासून ते वरच्या दर्जाच्या केंद्र सरकारच्या कर्मचार्यावर खटला चालवण्यासाठी केंद्र सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

**शिफारसी–**

- कर्मचारी, सार्वजनिक तक्रारी, कायदा आणि न्याय यासंबंधी विभागाच्या संसदीय स्थायी समितीच्या २४ व्या अहवालातील शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.
- सीबीआयची कर्मचारीसंख्या वाढवून मानवी संसाधनांचे बळकटीकरण.
- पायाभूत सुविधांमध्ये चांगली गुंतवणूक.
- उत्तरदायित्वासह वाढीव आर्थिक संसाधनांची तरतूद करणे.
- सीबीआयला सरकारच्या प्रशासकीय नियंत्रणातून मुक्त करणे.
- सीबीआयचे संचालन करण्यासाठी दिल्ली पोलीस स्पेशल एस्टॅब्लिशमेंट अॅट, १९४६ ऐवजी नवीन कायदा लागू करावा.–२ रा प्रशासकीय सुधारणा आयोग
- 'विविध केंद्रीय एजन्सींना एकाच छताखाली आणण्यासाठी स्वतंत्र अशी एकछत्री संस्था निर्माण करण्याची गरज आहे.' – माजी सरन्यायाधीश सी. जे. रमण.

**लोकपाल–**

- ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या ताज्या अहवालात भारताची आशियातील सर्वात भ्रष्ट देश म्हणून नोंद केलेली असून, लोकपालच्या परिणामकारकतेवर गंभीरपणे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**समस्या आणि आव्हाने–**

- लोकपाल निवड समितीवर राजकीय वर्चस्व आहे.
- जागल्यांना (व्हिसलब्लोअर्सना) फारसे संरक्षण दिले जात नाही.
- न्यायव्यवस्थेस दूर ठेवण्यात आले आहे.
- नोंदवलेल्या प्रकरणांची संख्या कमी आहे. लोकपालचे एक सदस्य न्यायमूर्ती भोसले यांनी त्यात काही कामच नसल्याचे कारण सांगून राजीनामा दिला.
- अशा महत्त्वाच्या संस्थेला घटनात्मक दर्जा नाही.
- लोकपाल विरुद्ध अपील करण्यासाठी पुरेशा कायदेशीर तरतुदींचा अभाव आहे.

**नवीन दृष्टिकोन –**

- लोकपालला आर्थिक आणि प्रशासकीय दृष्ट्या स्वतंत्र बनवणे ज्यांची चौकशी करायची आहे.
- लोकपालला घटनात्मक पाठबळ देणे.
- निवड समितीवरील राजकीय वर्चस्व कमी करणे.

- लोकपालच्या अधिकारक्षेत्राच्या सीमारेषा स्पष्ट करणे– शिबू सोरेन प्रकरणात लोकपालच्या अधिकारक्षेत्राबाबत दिल्ली उच्च न्यायालयाच्या अलीकडील निकालाने संभ्रम निर्माण केला आहे.
- लोकपालच्या कर्मचा–यांची वेळेवर नियुक्ती करणे– लोकपालच्या स्थापनेला ३ वर्षे उलटूनही, केंद्राने अद्याप प्राथमिक तपास करणा–या चौकशी संचालकाची नियुक्ती केलेली नाही. असे करणे म्हणजे, योग्य संस्थात्मक यंत्रणा स्थापन करण्याच्या दिशेने उचललेले पाऊल ठरेल.

**जेनेरिक पॉइंट्स**

- जेव्हा तुम्हाला एखाद्या संस्थेविषयी पुरेशी माहिती नसते
- प्रत्यक्ष परीक्षा देताना, असेही घडू शकते की, तुम्हाला एखाद्या विशिष्ट संस्थेविषयी पुरेशी माहिती नसेल. अशा वेळी तो प्रश्न सोडून देण्याऐवजी सरासरी गुण मिळविण्यासाठी तुम्ही खालील क्लृप्ती वापरू शकता. हे अपवादात्मक प्रकरणांमध्येच केले पाहिजे, अन्यथा तुम्ही प्रकाशघोतात असलेल्या महत्त्वाच्या संस्थांच्या सखोल अभ्यासाची तयारी केली पाहिजे.

१. पायाभूत सुविधांचा अभाव

२. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसणे.

३. आधुनिक साधनाने व उपकरणांची उपलब्धता नसणे.

४. नियमपुस्तिकेतील नियमांचे पालन करण्यात अपयशी अधिकारी.

५. अधिका–यांमध्ये जबाबदारीच्या भावनेचा अभाव.

६. संस्थात्मक यंत्रणेचा अभाव.

**महत्त्वाची टीप**

- अभ्यासक्रमाच्या मुख्य मुद्द्यांखाली दिलेल्या अध्ययनसामग्रीच्या साहाय्याने, तुम्ही संबंधित विषयांमध्ये सरासरीपेक्षा जास्त गुण मिळवू शकता. येथे सर्वच संस्थांचा आढावा घेणे शक्य नसल्यामुळे भविष्यात प्रकाशझोतात येऊ शकणाऱ्या इतर महत्त्वाच्या संस्थांचा अभ्यास करण्यासाठी तुम्ही 'प्रार्थना परीक्षण मेन्स मॉड्यूल' आणि 'प्रार्थना प्रभाव करंट अफेअर'चा संदर्भ घ्यावा. अभ्यासासाठी या दोन्हींचा वापर करून तुम्ही या अभ्यासक्रमाशी संबंधित विषयात चांगले गुण मिळवू शकता. आता तुमचे काम अध्ययनसामग्रीची उजळणी करणे आणि मागील वर्षामध्ये आलेले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे हे आहे.

***

# पर्यायी विवाद निवारण यंत्रणा

नायालयीन विवाद सोडवण्याची प्रक्रिया ही एक चांगली परिभाषीत आणि मान्यताप्राप्त व्यवस्था आहे.विवाद सोडविताना न्यायालयांचे नियम आणि त्यांचे निर्णय उभय पक्षांवर बंधनकारक असतात. ही कार्यप्रणाली शास्त्रशुद्ध आणि औपचारिक आहे. न्यायालयीन विवाद सोडविण्याच्या प्रकियेपेक्षा पर्यायी मार्गांनी विवाद सोडविण्याच्या प्रक्रियेकडे पक्षकरांचा कल वाढत आहे; कारण ही प्रक्रिया अत्यंत सुलभ, जलद व कमी खर्चिक आहे.

**आवश्यकता:–**

सध्याची न्यायव्यवस्था अत्यंत खर्चिक आणि विलंब करणारी आहे हे सर्वांना ज्ञात आहे.

वादातील पक्षकारांना वर्षानुवर्षे न्यायाची प्रतीक्षा करावी लागते. खटल्याच्या या दीर्घकालीन आणि खर्चिक प्रक्रियेमुळे न्यायालयांद्वारे पाळल्या जाणार्या न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास कमी झाला आहे. न्यायालयीन व्यवस्थेच्या या कमकुवतपणाने वाद मिटवण्यासाठी पर्यायी उपायांनी जन्म घेतला. न्यायालयीन विवाद सोडवण्याच्या प्रक्रियेपेक्षा ही प्रक्रिया अत्यंत सुलभ, जलद व कमी खर्चिक असल्याने या पर्यायी विवाद निवारण यंत्रणांचा उपयोग करून विवाद सोडवण्याकडे पक्षकारांचा ओढा वाढत आहे.

**ADR म्हणजे काय?**

ADR विवाद सोडवण्याच्या पद्धती या न्यायालयीन खटले सोडविण्याचा पर्यायी मार्ग म्हणून नावारूपाला येत आहेत. ADR प्रक्रियेमध्ये वाद किंवा हिंसाचाराचा अवलंब केला जात नाही. भारतामध्ये, वादग्रस्त पक्षांना लवाद, समेट, मध्यस्थ, वाटाघाटी इत्यादी पर्यायी विवाद निवारण व्यवस्था उपलब्ध आहे.

जगभरातील न्यायाधीश, वकील आणि पक्षकार यांचा कल न्यायालयीन खटल्याऐवजी ADR स्वीकारण्याच्या बाजूने वळत आहे. न्यायालयीन विवाद सोडविण्याच्या प्रलंबित मार्गापेक्षा लवाद दिवाणी विवादांचे जलद, कमी खर्चिक आणि सहमतीने निराकरण करण्यासाठी ADR सेवा प्रदान केली जाते. ADR पक्षांमधील सुसंवादाला प्रोत्साहन देते आणि विवादांमागील त्यांच्या वास्तविक चिंता सोडविण्यास मार्गदर्शन करते.

**पर्यायी विवाद सोडविण्याचे विविध मार्ग**

१) लोकअदालत

अ) लोकअदालत' हे एडीआरचे आणखी एक रूप आहे जे विशिष्ट क्षेत्रातील लोकांच्या गरजेनुसार तयार केले जाते. लोकअदालतीची शिबिरे सुरुवातीला १९८२ मध्ये गुजरातमध्ये सुरू करण्यात आली होती आणि आता ती संपूर्ण भारतात विस्तारली आहेत.

ब) लोकअदालतींच्या स्थापनेचा मुख्य उद्देश न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांचा भार कमी करणे हा आहे.

क) न्याय मिळविणारे लाखोंच्या संख्येने आहेत आणि सतत वाढत जाणारे खटले लक्षात घेता अशा प्रकरणांचा निवाडा करणे न्यायालयांवर एक मोठे ओझे बनत आहे.

ड) लोकअदालत सरकारच्या आर्थिक सहाय्याने आयोजित केल्या जातात आणि न्यायालयाद्वारे त्यांचे परीक्षण केले जाते. लोकअदालतींनी भारतात समेटाची प्रक्रिया सुरू केली आहे.

इ) लोकअदालतींना विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ अंतर्गत वैधानिक मान्यता प्राप्त झाली आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या कलम १९ मध्ये लोकअदालत आयोजित करण्याची तरतूद आहे.

फ) शिवाय, विवादासाठी पक्षांमधील तडजोड किंवा तोडगा निश्चित करण्याचा आणि अंमलात अधिकार आहे.

ह) लोकअदालतीचा प्रत्येक निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा आदेश किंवा तत्सम, इतर कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा आदेश मानला जाईल.

ई) लोकअदालतीद्वारे तडजोड किंवा समेट झाल्यास, अशा प्रकरणांमध्ये भरलेली कोर्ट फी परत केली जाईल. न्यायालयांमार्फत संदर्भित मध्यस्थी कक्षात निकाली निघालेल्या प्रकरणांमध्येही अशीच स्थिती आहे.

**२) ग्राम न्यायलय –**

भारतीय कायदा आयोगाने, आपल्या ११४ व्या अहवालात, नागरिकांना स्वस्त आणि जलद न्याय त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामन्यायालयांची स्थापना करण्याचे सुचवले होते. ग्राम न्यायलय विधेयक २२ डिसेंबर २००८ रोजी संसदेने मंजूर केले आणि ग्राम न्यायलय कायदा ०२ ऑक्टोबर २००९ पासून अंमलात आला. हा कायदा संपूर्ण भारतात लागू आहे; अपवाद नागालँड, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम ही राज्ये आणि आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम या राज्यांमधील भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २० च्या खालील तक्त्याच्या भाग I, II, III आणि III मध्ये निर्दिष्ट केलेल्या आदिवासी भाग वगळता.

**ग्राम न्यायालयाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. :**

- ग्रामन्यायालयांचा उद्देश ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या दारात माफक दरात न्याय मिळवून देणे हा आहे;
- मध्यवर्ती स्तरावरील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी किंवा मध्यवर्ती स्तरावर संलग्न ग्रामपंचायतींच्या गटासाठी किंवा संलग्न ग्रामपंचायतींच्या गटासाठी ग्राम न्यायलय स्थापन केले जावेत;
- ग्राम न्यायलयांची जागा मध्यवर्ती ग्रामपंचायतीच्या मुख्यालयात असेल. न्यायाधिकारी वेळोवेळी गावांना भेट देतील आणि पक्षकारांचे म्हणणे ऐकू शकतील आणि मुख्यालयाव्यतिरिक्त इतर ठिकाणी खटले निकाली काढतील;
- ग्रामन्यायालये फौजदारी खटले, दिवाणी दावे, दावे किंवा विवादांचा निवाडा करण्याचा प्रयत्न करतील जे कायद्याच्या पहिल्या अनुसूची आणि दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केले आहेत. त्यांनी असे करताना फौजदारी खटल्यात सारांश प्रक्रियेचे पालन करावे;
- पक्षांतर्गत समेट घडवून आणून शक्य तितके तंटे मिटवायचे आहेत आणि या उद्देशासाठी ग्राम न्यायलये नियुक्त करण्यात येणार्या समेटकर्त्यांचा वापर करतील;
- ग्रामन्यायालय; भारतीय पुरावा कायदा, १८७२ मध्ये प्रदान केलेल्या पुराव्याच्या नियमांना बांधील नसून ते उच्च न्यायालयाने केलेल्या कोणत्याही नियमाच्या अधीन राहून नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांद्वारे मार्गदर्शन करतील.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३) लवाद – जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती करारांद्वारे असे मान्य करतात की, त्यांच्यामधील विवाद किंवा भविष्यात उद्भवणारे विवाद एक किंवा अधिक निःपक्ष व्यक्तींसमोर पुरावे सादर करून त्यांच्याद्वारे न्यायिक रीतीने निर्णय करण्यात येतील तेव्हा अशा प्रकारे विवादाचा निर्णय करणाऱ्या व्यक्तींना लवाद करार असे म्हणतात. जेव्हा अशा व्यक्तींमध्ये विवाद उद्भवतो तेव्हा तो सोडवण्यासाठी अशा एक किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या लवादासमोर सादर केला जातो. त्यावर निर्णय देण्यासाठीच्या प्रक्रियेस लवाद कार्यवाही असे म्हणतात व त्यांनी दिलेल्या निर्णयास नवाज निवाडा किंवा असे संबोधले जाते.

- लवादाचा निवाडा पक्षांवर बंधनकारक आहे आणि न्यायालयांद्वारे त्याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. निवाड्याविरुद्ध कोणतेही अपील नाही.
- कायद्याने प्रतिबंधित केलेल्या विवाद वगळता; सर्व विवाद लवादाद्वारे सोडवले जाऊ शकतात.

**खालील प्रकरणांवर लवादाने निर्णय घेतला जाऊ शकत नाही:–**

- गुन्हेगारी प्रश्न, किंवा सार्वजनिक कायद्यांचे प्रश्न समाविष्ट असलेले प्रकरण;
- विवाहविषयक प्रकरणे, जसे घटस्फोट, देखभाल किंवा मुलाचा ताबा;
- दिवाळखोरी प्रकरणे, जसे की एखाद्या व्यक्तीला दिवाळखोर घोषित करणे;
- निगमित कंपनीचे विघटन; आणि
- वयाशी संबंधित विवाद

४) समेट – 'समेट' ही स्वतंत्र तृतीय व्यक्तीच्या मदतीने विवाद सोडवण्याची प्रक्रिया आहे जी वादग्रस्त पक्षांना वाटाघाटीद्वारे निराकरण करण्यासाठी मदत करते. 'समेट' म्हणजे निर्णय घेण्याचा अधिकार नसलेल्या तृतीय पक्षाच्या विवादात स्वीकार्य हस्तक्षेपाने विवाद मिटवणे. समेट केंद्रांमध्ये ही प्रक्रिया पार पाडली जाते.

**ADR यंत्रणेचे फायदे –**

- ADR कार्यवाही सुलभ आहे.
- पक्षकरांना विवाद निवारण मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.
- ते कोणत्याही रीतीने आणि पक्षकार सहमत असलेल्या भाषेत आयोजित केले जाऊ शकतात.
- कमीत कमी कालावधीमध्ये हा विषय निकाली काढला जाऊ शकतो ज्यामुळे खर्च कमी होईल.
- कोर्ट फी लागत नाही. कार्यवाही आणि अहवालांच्या प्रती मिळविण्यासाठी कोणताही खर्च घेतला जात नाही.
- विवादाचे समाधानकारक निराकरण करण्यासाठी तटस्थ तृतीय पक्ष त्याच्या/तिच्या सेवा पक्षकरांना देऊ शकतो. पक्षकारांच्या सोयीनुसार बैठक आयोजित करता येईल अशी तारीख आणि ठिकाण निवडतात.
- पक्षकार अशा मध्यस्थ व्यक्तीला देय शुल्क निवडू शकतात. मध्यस्थ पक्षकरांच्या संमतीने निवडला जातो.
- बैठकीमध्ये झालेली चर्चा गोपनीय ठेवली जाते. न्यायालयीन कामकाजात एक पक्षकार जिंकतो आणि दुसरा हरतो, परंतु समेट किंवा सामंजस्याने यशस्वी झालेल्या ADR मध्ये दोन्ही पक्षकार विजेते म्हणून उदयास येतात.


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- हे पक्षकरांमध्ये सुसंवाद निर्माण करते आणि संबंध सुधारते.
- गोपनीयता: पर्यायी विवाद निवारण यंत्रणा सामान्यत: गोपनीय असतात, याचा अर्थ वाद इतर लोकांच्या नजरेतून सुटलेला असतो आणि – अधिक महत्त्वाचे म्हणजे – संवेदनशील दस्तऐवज, व्यापार गुपिते, इत्यादी उघड होण्यापासून संरक्षित असतात.
- आजच्या न्यायिक व्यवस्थेतील समेट आणि लवाद; जलद आणि गुणात्मक न्याय देण्यास मदत करतात तसेच अनेक क्षेत्रांमध्ये दीर्घकाळ टिकणाऱ्या समस्यांचे समाधानकारक समाधान शोधण्यात मदत करतात. – न्यायमूर्ती एल नागेश्वर राव.

**समस्या आणि आव्हाने –**

- शक्तीचा असमतोल ही एक गंभीर चिंतेची बाब आहे, विशेषत: जेव्हा समेट पारंपारिकपणे प्रबळ गटांच्या प्रभावाखाली होत असेल.
- ADR बाबत जनतेमध्ये जागरूकतेचा अभाव.
- लवाद प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या.
- लवाद स्थळ म्हणून वापरण्यात येणाऱ्या इमारती, कार्यालयीन जागा आणि संबंधित उपकरणे यांसारख्या पायाभूत सुविधांचा अभाव.
- उपजिल्हा स्तरावर मनुष्यबळ संसाधनं, नोटरी, मुद्रांक विक्रेते इत्यादींचा अभाव.
- अपुरी केंद्रीय मदत.

**पुढील वाटचाल –**

- समांतर ADR संस्था देशाच्या सर्व भागांमध्ये मोठ्या प्रमाणात विकसित होणे आवश्यक आहे. ज्या रीतीने कायद्याची न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत त्याच पद्धतीने त्यांची स्थापना दुर्गम स्तरावर केली जावी.
- प्रत्येक न्यायालयात लवाद आणि मध्यस्थी केंद्रे असणे आवश्यक आहे. हे सुनिश्चित करेल की कोणत्याही ADR पद्धतीद्वारे सोडवण्यास सक्षम असलेले विवाद प्रथम ADR मंचाद्वारे ताब्यात घेतले जातील. जर पक्षकार तोडगा काढू शकले नाहीत, तरच प्रकरण न्यायालयात नेले जाईल.
- भारतात सध्या अस्तित्वात असलेली लवाद आणि समेट केंद्रे/संस्था मुख्यतः व्यावसायिक विवादांची पूर्तता करतात. एकतर गैर–व्यावसायिक विवादांसाठी (जसे कौटुंबिक वाद) नवीन खाजगी संस्था स्थापन करण्याची गरज आहे.
- देशातील ADR संस्थांची स्थापना, सशक्तीकरण आणि कायदेशीर मान्यता यांचा काहीही उपयोग होणार नाही जोपर्यंत लोक जागरूत होऊन; न्यायालयांआधी आदर निवडण्यास उत्सुक नसतील.
- नियमित पथनाट्ये करून दुर्बल–गरीब घटकांना ADR पर्यायांचे ज्ञान दिले पाहिजे. अशी कामगिरी संबंधित भागातील स्थानिक बोली आणि भाषेत करावी लागते.
- जोपर्यंत, ADR कायदेशीर व्यवस्थेशी समांतर यंत्रणा म्हणून उदयास येत आहे, तोपर्यंत ADR चा अधिक स्वैच्छिक वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**NALSA**

- घटनेच्या कलम ३९–अ मध्ये अशी तरतूद आहे की कोणतीही व्यक्ती केवळ गरिबीमुळे किंवा इतर कोणत्याही अपात्रतेमुळे न्यायापासून वंचित राहणार नाही. याचा अर्थ असा की प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळवण्याचा अधिकार आहे, जरी तो/ती कोणत्याही प्रकारे गरीब असला तरीही. राज्यघटनेची ही प्रवृत्ती विविध कायदेशीर तरतुदी आणि न्यायालयीन निर्णयांमध्ये गुंतलेली आहे. यापैकी एक आहे – कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ (१९९४ मध्ये सुधारित आणि आता विधी सेवा प्राधिकरण (सुधारणा) कायदा. १९९४ आहे.)
- हा कायदा कायदेशीर सेवांसाठी तपशीलवार तरतुदी देतो. परंतु काही कारणांमुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. पुढे १९९४ मध्ये त्यात विविध दुरुस्त्या करून त्या सुधारित स्वरूपात लागू करण्यात आल्या.

**रचना –**

**प्रदान करण्यात आलेल्या सेवा –**

- कायदेविषयक मदत – विधी सेवांमध्ये समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदेशीर सहाय्य प्रदान करणे समाविष्ट आहे जे विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या कलम १२ च्या कक्षेत येतात.
- यात कायदेविषयक जागरूकता शिबिरे, प्रिंट मीडिया, डिजिटल माध्यमांद्वारे कायदेशीर साक्षरता पसरवून आणि तडजोडीच्या मार्गाने प्रलंबित असलेल्या किंवा दाखल करायच्या असलेल्या विवादांच्या मैत्रीपूर्ण निराकरणासाठी लोकअदालती आयोजित करून कायदेशीर जागरूकता निर्माण करणे देखील आवश्यक आहे.
- लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्यांना भरपाई देणे.

**NALSA द्वारे उपक्रम –**

मोफत कायदेशीर सेवांच्या सहाय्याद्वारे जलद आणि कमी खर्चिक न्याय देण्यासाठी NALSA ने अनेक पावले उचलली आहेत. त्यात खालील बाबी समाविष्ट आहेत:–

- NALSA ने कायदेशीर सहाय्य मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी वेब पोर्टल तयार केले आहे. अर्जदार थेट राज्य विधी सेवा प्राधिकरण/जिल्हा विधी सेवा प्राधिकरण/उच्च न्यायालय विधी सेवा यांच्याकडे अर्ज दाखल करू शकतात.
- समिती/सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती जिथून अर्जदाराला कायदेशीर सहाय्य आवश्यक आहे. तिथे अर्जदाराला थेट NALSA कडे अर्ज दाखल करण्याचा पर्याय आहे आणि त्या बाबतीत तो अर्ज संबंधित कायदेशीर सेवा संस्थांकडे योग्य कारवाईसाठी हस्तांतरित केला जातो, म्हणजे कायदेशीर सहाय्य प्रदान करण्यासाठी पाठवला जातो.
- NALSA ने ८ ऑगस्ट २०२१ आणि ०९ नोव्हेंबर २०२१ रोजी Android आणि IOS आवृत्तीसाठी कायदेशीर सेवा मोबाइल प देखील सुरू केले आहे जे पुढील कार्ये सुलभ करेल:–
- कोणताही नागरिक मोबाईल पद्वारे कायदेशीर सहाय्य, कायदेशीर सल्ला आणि इतर तक्रारींचे निवारण करण्यासाठी अर्ज करू शकतो.

- कोणताही नागरिक कायदेशीर मदत आणि सल्ला आणि इतर तक्रारींसाठी सबमिट केलेल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतो.
- मोबाइल पद्धारे आठवण करून देणारे संदेश पाठविले जाऊ शकतात आणि स्पष्टीकरण मागवले जाऊ शकते.
- गुन्ह्यातील कोणताही पीडित किंवा अर्जदार मोबाईल पद्धारे नुकसान भरपाईसाठी अर्ज करू शकतो.
- व्यावसायिक प्रकरणांमध्ये पूर्व संस्थेच्या मध्यस्थीसाठी किंवा मध्यस्थीसाठी अर्ज या मोबाइल पद्धारे दाखल केला जाऊ शकतो.

***

PRAYAAS INSTITUTE OF EXCELLENCE

## संसद आणि राज्य विधानमंडळ – रचना, कामकाज, व्यवसायाचे आचरण, अधिकार आणि विशेषाधिकार, त्यातून उद्भवणारे मुद्दे.

पक्षांतर बंदी कायदा १९८५ मध्ये ५२ व्या घटना दुरुस्ती मध्ये मंजूर करण्यात आला. राजकीय पक्षांतरांच्या दुष्कृत्याला आळा घालण्याच्या उद्देशाने या दुरुस्तीने भारतीय संविधानात दहावी अनुसूची जोडली. पक्षांतर बंदी कायद्यानुसार, आमदारांनी निवडून आल्यानंतर त्यांच्या पक्षाचा राजीनामा दिल्यास किंवा कोणत्याही मुद्द्यावर मतदानादरम्यान पक्ष नेतृत्वाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास त्यांना सभागृहाच्या सदस्यत्वापासून अपात्र ठरवले जाऊ शकते.

पक्षांतर बंदी कायदा संसदेत किंवा राज्य विधानमंडळांमध्ये राजकीय पक्षाचे सदस्य, स्वतंत्र सदस्य आणि नामांकित(निवडणुकीला उभे राहिलेले) सदस्य यांच्याद्वारे होणाऱ्या पक्षांतराच्या संबंधित आहे.

काही ठराविक परिस्थितीत, कायदा आमदारांना अपात्र न ठरवता त्यांचा पक्ष बदलण्याची परवानगी देतो.

**उमेदवारांच्या अपात्रतेबाबत तरतुदी–**

| Questions | तरतुदी |
|---|---|
| १. When can a legislator be disqualified? | अ) जर एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित सभागृहातील (विधानसभा, विधानपरिषद) सदस्य:<br>-स्वेच्छेने त्याच्या राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडतो, किंवा<br>-त्याच्या राजकीय पक्षाने जारी केलेल्या निर्देशाच्या विरुद्ध मत देतो, किंवा जेव्हा असा निर्देश जारी केला जातो तेव्हा तटस्थ राहतो म्हणजेच सभागृहात अजिबात मतदान करत नाही. परंतु, जर एखाद्या सदस्याने त्याच्या पक्षाची पूर्वपरवानगी घेतली असेल किंवा अशा मतदानात अनुपस्थित राहिलेल्या दिवसापासून 15 दिवसांच्या आत पक्षाने त्याला माफ केले असेल तर त्याला अपात्र ठरविले जाणार नाही.<br>ब)निवडणुकीनंतर अपक्ष उमेदवाराने पक्षात प्रवेश घेतल्यास<br>क)जर नामनिर्देशित(निवडणुकीला उभे राहिलेले) सदस्य विधानमंडळाचा सदस्य झाल्यानंतर सहा महिन्यांनी पक्षात सामील झाला. |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | |
|---|---|
| २. Exceptions | अ) एखाद्या व्यक्तीचा मूळ राजकीय पक्ष दुसऱ्या राजकीय पक्षात विलीन झाल्यास त्याला अपात्र ठरविले जाणार नाही (पक्षाच्या दोन तृतीयांश पेक्षा जास्त सदस्यांनी विलीनीकरणास सहमती दिली असेल तरच हा अपवाद लागू होईल), आणि:<br>- तो सदस्य आणि तो ज्या जुन्या राजकीय पक्षात होता त्या पक्षाचे इतर सदस्य नवीन राजकीय पक्षाचे सदस्य होतात किंवा<br>- तो सदस्य आणि तो ज्या जुन्या राजकीय पक्षात होता त्या पक्षाचे इतर सदस्य विलीनीकरण स्वीकारत नाहीत आणि स्वतंत्र गट किंवा पक्ष म्हणून काम करण्याचा पर्याय निवडतात. |
| ३. Authority | अ. सदस्याला अपात्र ठरवण्याचा निर्णय दोन्ही सभागृहाचे अध्यक्ष किंवा सभापती घेतात.<br>ब. अध्यक्ष किंवा सभापती यांच्या पक्षांतराच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास, त्या सभागृहाने निवडलेला सभागृहाचा सदस्य यावर निर्णय घेईल. |

**पक्षांतर बंदी कायद्याची उद्दिष्टे –**

राजकीय भ्रष्टाचार आणि लाचखोरीने प्रेरित झालेल्या राजकीय पक्षांतराचा विरुद्ध कार्य करणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

### पक्षांतर बंदी कायद्यातील त्रुटी किंवा दोष –

| | |
|---|---|
| १. आमदारांना त्यांचे कार्य प्रभावीपणे किंवा त्यांच्या मतानुसार पार पाडण्यापासून प्रतिबंधित (रोखते) करते | संसदीय लोकशाहीमध्ये, विशिष्ट मुद्द्यांवर आमदारांनी त्यांचा स्वतंत्र निर्णय घेणे अपेक्षित असते. हा निर्णय सार्वजनिक हित, मतदारसंघाचे हित आणि राजकीय संलग्नता यांच्या सर्वांचा सारासार विचार करून घेतला जातो.<br>पक्षांतर बंदी कायद्यामुळे स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नष्ट होत आहे. |
| २. सरकारला जबाबदार धरण्याच्या किंवा जाब विचारण्याच्या आमदाराच्या क्षमतेवर परिणाम होतो | पक्षांतर बंदी कायद्यातील तरतुदींमुळे आमदाराला जवळपास प्रत्येक निर्णयावर पक्ष नेतृत्वाच्या सूचनांचे कोणताही प्रश्न न विचारता पालन करण्यास भाग पाडले जाते. |
| ३. निवडून आलेले आमदार आणि जनता यांच्यातील जबाबदारीचा किंवा उत्तरदयित्वाचा दुवा तुटतो. | पक्षांतर बंदी कायदा आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील नागरिकांऐवजी (जनतेऐवजी) पक्षाच्या नेत्यांच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यास बंधनकारक आहे. |
| ४.दोन्ही सभागृहातील( विधानसभा आणि विधानपरिषद) निर्णयांवर याचा परिणाम होतो | पक्षांतर बंदी कायद्यामुळे मोठे धोरणात्मक निर्णय आमदारांच्या एकत्रित सहभागातून न घेता काही राजकीय नेत्यांकडून घेतले जातात. |
| ५. वादविवाद आणि चर्चा | पक्षांतर बंदी कायद्यामुळे पक्षांतर्गत वादविवाद आणि चर्चा दडपल्या जातात( निरुपद्रवी असणारे तात्विक वाद आणि चर्चा) . |
| ६. अध्यक्ष किंवा सभापतीची भूमिका (स्वारस्यचा किंवा हिताचा वाद मुद्द्यावर) | पक्षांतराचा निर्णय सभापतीद्वारे केला जातो जो सहसा सत्ताधारी पक्षाचा किंवा युतीचा सदस्य असतो. असा निर्णय घेण्यासाठी वेळेची मर्यादा नाही. |

पक्षांतर बंदी कायद्याच्या अपयशाची उदाहरणे

१. २०१४–१८ मध्ये २६ आमदार विरोधी पक्षांतून तेलंगणा राष्ट्र समिती पक्षात गेले. या पक्षांतर करणाऱ्यांवर वक्त्यांनी(सभापती) कोणतीही कारवाई केली नाही. या पक्षांतर करणाऱ्यांपैकी १२ जणांना मंत्री करण्यात आले.

२. २०१५–१८ मध्ये वायएसआर काँग्रेस पक्षाचे २३ आमदार सत्ताधारी तेलगू देसम पक्षात गेले. त्यांच्या अपात्रतेची मागणी करणाऱ्या याचिकांवर सभापतींनी कोणतीही कारवाई केली नाही. पुढे यातील चार आमदारांची सरकारमध्ये मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**पुढील वाटचाल–**

१. जेव्हा सरकार अडचणीत असेल तेव्हाच राजकीय पक्षांना व्हिप लागू करण्याची परवानगी द्यावी.

२. स्वतःच्या इच्छेने सदस्यत्व सोडणे या शब्दाची अर्थपूर्ण आणि विस्तृत व्याख्या केली पाहिजे.

३. पक्षांतराचा मुद्दा भारतीय निवडणूक आयोगाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती/राज्यपालांसारख्या स्वतंत्र प्राधिकरणाने निर्णयासाठी पाठवला पाहिजे.

४. राजकीय पक्षाची व्याख्या विस्तृत व्हायला हवी. निवडणूक पूर्व केलेली युती हा एक राजकीय पक्ष मानायला हवा.

५. पक्षांतर करणाऱ्यांना त्याच्या कार्यकाळाच्या उर्वरित कालावधीसाठी पक्षांतरानंतर इतर कोणत्याही राजकीय पक्षात सामील होण्यापासून प्रतिबंधित केले जावे.

६. विधीमंडळाच्या उरलेल्या कालावधीसाठी पक्षांतर करणाऱ्यांना सार्वजनिक मंत्रीपद किंवा कोणतेही लाभदायक राजकीय मंत्रीपद धारण करण्यापासून प्रतिबंधित केले जावे( दिले जाऊ नये).

७. पक्षांतर्गत लोकशाही मजबूत करा. म्हणजेच पक्षात पक्ष प्रतिनिधींच्या मतांचा विचार करा.

**जागतिक परिस्थिती:–**

- यूएसए(युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका), यूके(युनायटेड किंग्डम) सारख्या प्रौढ लोकशाहीमध्ये पक्षांतर बंदी कायदा नाही.
- पक्षांतर बंदी कायदा असलेल्या ४० देशांपैकी फक्त ६ देशांच्या आमदारांना पक्ष जसे मतदान करेल तसे मतदान करणे बंधनकारक आहे. त्यात भारताचाही समावेश आहे.

**पक्षांतर बंदी कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील महत्त्वाचे मुद्दे –**

१. कायद्यातील तरतुदी निवडून आलेल्या सदस्यांच्या लोकशाही अधिकारांवर गदा आणणार नाहीत किंवा त्यांच्या विचार करण्याच्या क्षमतेला अडथळा करणार नाहीत. त्या संविधानाच्या कलम १०५ आणि १९४ अंतर्गत कोणत्याही अधिकाराचे किंवा स्वातंत्र्याचे उल्लंघन करणार नाहीत.

२. स्वतःच्या इच्छेने सदस्यत्व सोडणे या शब्दांची अर्थपूर्ण आणि विस्तृत व्याख्या सांगितली आहे. सदस्याच्या वागणुकीवरूनही अनुमान काढता येईल.

३. प्रलंबित(निश्चित कालावधीसाठी लांबणीवर टाकलेल्या) अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यासाठी सभापतींना निर्देश देण्यास न्यायालय सक्षम आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात आमदारांना अपात्र ठरवण्याची क्षमता त्यात नव्हती.

४. सभापतींच्या आदेशाला अंमलात आणणे वैध आहे. तथापि, न्यायालये न्यायिक पुनरावलोकन(पुन्हा तपासून पाहणे) करू शकतात ज्यात सभापतींच्या निर्णयापूर्वीची कोणतीही पायरी समाविष्ट नसावी.

***

# अभ्यासक्रमाचा विषय – भारतीय घटनात्मक योजनेचा इतर देशांसोबत तुलनात्मक अभ्यास

वरील विषया संदर्भात मागील वर्षीचे प्रश्न पाहू.

| Question | महत्व / मागणी | **विषयसूत्र** |
|---|---|---|
| Analyze the distinguishing features of the notion of Equality in the Constitutions of the USA and India. (2021) 15 | समानतेचा अधिकार | स्थिर |
| The judicial systems in India and the UK seem to be converging as well as diverging in recent times. Highlight the key points of convergence and divergence between the two nations in terms of their judicial practices. (2020) 10 | भारत आणि ब्रिटनच्या न्यायव्यवस्थेचे तुलनात्मक विश्लेषण | स्थिर |
| What can France learn from the Indian Constitution's approach to secularism? (2019) 10 | धर्मनिरपेक्षता | समकालीन चालू घडामोडी |
| India and the USA are the two large democracies. Examine the basic tenets on which the two political systems are based. (2018) 15 | भारत - अमेरिका संघराज्य (राजकारण ) | स्थिर |
| Critically examine the procedures through which the Presidents of India and France are elected. (2022) 15 | राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया (भारत - फ्रान्स) | स्थिर आणि चालू घडामोडी |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतीय राज्यघटना आणि ब्रिटिश राज्यघटना**

**भिन्नता / फरक –**

| भारतीय संविधान | ब्रिटिश संविधान |
|---|---|
| १. राष्ट्रपती हा नाममात्र प्रमुख<br>२. लिखित संविधान<br>३. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे, कर्तव्ये यांची तरतुद<br>४. केंद्र -राज्य संरचना<br>५. संविधानाची सर्वोच्चता<br>६. पंतप्रधान हा लोकसभा किंवा राज्यसभा यापैकी एका गृहाचा सभासद असू शकतो<br>७. न्यायिक पुनरावलोकनाची तरतूद<br>८. एकेरी नागरीकत्व<br>९. सभापती हा आपल्या राजकीय पक्षाचे सभासत्व कायम ठेवू शकतो. | १. घटनात्मक राजेशाही. राजा हा नाममात्र प्रमुख<br>२. अलिखित संविधान<br>३. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे कर्तव्य त्यांची तरतूद नाही.<br>४. एकात्मक रचना .<br>५. संसदेचे वर्चस्व<br>६. पंतप्रधान हा संसदेच्या कनिष्ठ सभागृहातील सभासद असणे आवश्यक.<br>७. संसद सर्वोच्च असल्यामुळे न्यायिक पुनरावलोकन नाही.<br>८ . सभापतीकडे राजकीय पक्षाचे सभासदत्व नाही. |

**समानता –**

१. संसदीय राज्यपद्धती

२. कायद्याच्या राज्याचे तत्व

३. बहुपक्षीय प्रणाली

४. मंत्रिमंडळ प्रणाली

५. राज्याच्या प्रमुखापेक्षा सरकारचा प्रमुख अधिक शक्तिशाली असतो.

६. न्यायाधीशांसाठी महाभियोग प्रक्रिया तरतूद



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतीय संविधान  आणि अमेरिका संघराज्याचे संविधान**

**भिन्नता –**

| भारतीय संविधान | अमेरिकेचे संविधान |
|---|---|
| १. संसदीय स्वरूप<br>२. केंद्र -राज्य संरचना<br>३. राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्षपणे .<br>४. अखंड आणि सार्वभौम प्रजासत्ताक.<br>५. कार्यकारी अधिकारी आणि कायदेमंडळ यांच्यात कोणतेही कठोर पृथक्करण नाही.<br>६. राष्ट्रपतीला मिळालेल्या कायदेशीर अधिकारांचा (vito)चा गैरवापर तो करू शकत नाही.<br>७. न्यायाधीशांच्या निवडीमध्ये संसदेची भूमिका नाही<br>८. ताठर आणि लवचिक संविधानाचे संतुलन<br>९. सर्वोच्च अधिकार केंद्राकडे .<br>१०. एकेरी नागरिकत्व<br>११. एक संविधान | १. अध्यक्षीय संसद पद्धती<br>२. मजबूत संघराज्य संरचना<br>३. राष्ट्रपतीची थेट निवड.<br>४. अखंड आणि स्वतंत्र राज्ये<br>५. कार्यकारी अधिकारी आणि कायदेमंडळ यांच्यात स्वतंत्रता<br>६. राष्ट्र अध्यक्ष मिळालेल्या कायदेशीर अधिकारांचा (vito) आपल्या मर्जीप्रमाणे वापर करू शकतात.<br>७. न्यायाधीशांच्या निवड प्रक्रियेमध्ये संसदेचा सहभाग असतो<br>८. ताठर संविधान<br>९. विशेष अधिकार राज्यांकडे<br>१०. दुहेरी नागरिकत्व<br>११. प्रत्येक राज्याचे स्वतःचे संविधान |

**समानता –**

१. लिखित संविधान

२. मूलभूत अधिकारांची तरतूद

३. उपराष्ट्रपती पद

४. राष्ट्रपतींचा महाभियोग

५. वरिष्ठ सभागृहात राज्याचे प्रतिनिधित्व

६. संविधानाची सर्वोच्चता

७. न्यायिक पुनरावलोकन

## भारतीय राज्यघटना आणि फ्रेंच राज्यघटना

**समानता –**

| भारतीय राज्यघटना | फ्रेंच राज्यघटना |
|---|---|
| १. सरकारचे संसदीय स्वरूप<br>२. राष्ट्रपतीचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो<br>३. पंतप्रधानांच्या तुलनेत राष्ट्रपतींना अधिकार कमी असतात<br>४. कायद्याची योग्य प्रक्रिया<br>५. धर्मापासून राज्याचे पूर्ण पृथक्करण नाही<br>६. एक न्यायिक संरचना<br>७. निवडणूक प्रक्रियेमध्ये न्यायालयाची भूमिका नाही<br>८. स्वातंत्र्यापासूनच देशात एकच राज्यघटना | १. अर्ध- राष्ट्रपती गणतंत्र पद्धती<br>२. राष्ट्रपतीचा कार्यकाळ सात वर्षांचा असतो<br>३. राष्ट्रपतीकडे पंतप्रधानापेक्षा जास्त अधिकार असतात<br>४. कायदेशीरकायदेशीर प्रक्रिये बाबत अनास्था<br>५. धर्मापासून राज्याचे पूर्णपणे पृथक्करण<br>६. नाईक न्यायालय आणि प्रशासकीय न्यायालये<br>७. निवडणूक प्रक्रियेमध्ये न्यायालयाची महत्वाची भूमिका<br>८. सध्या घडीला फ्रान्सची पाचवी राज्यघटना |

**समानता –**

१. लिखित संविधान

२. राष्ट्रपती निवडणूक प्रक्रियेद्वारे नियुक्त

३. राज्य प्रमुख असणारे प्रजासत्ताक

४. आणीबाणीची तरतूद

५. स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांची कल्पना / स्वीकार

## भारताच्या राष्ट्रपतींवर आणि अमेरिका संघराज्याच्या राष्ट्राध्यक्ष्यांवर महाभियोग

| भारताच्या राष्ट्रपतींवर महाभियोग | अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांवर महाभियोग |
|---|---|
| १. सभागृहाने महाभियोगाच्या आरोपांना प्राधान्य दिले आणि सभागृहातील किमान १/४ सदस्यांनी त्यावर त्यांच्या सहमतीची स्वाक्षरी दिली तर..<br><br>२. आरोप सिद्ध होण्यासाठी विशेष बहुमताची आवश्यकता . विशेष बहुमत मिळाल्यानंतर आरोपाची सिद्धता पारित करण्यासाठी दुसऱ्या सभागृहात पाठवले जाते.<br><br>३. दुसरे सभागृह झालेल्या आरोपांवर चौकशी करते. या तपासाचे प्रमुख सभागृहाचे पिठासीन अधिकारी लोकसभेचे किंवा राज्यसभेचे सभापती असतात.<br><br>४. तपासा अंतर्गत सभागृहामध्ये सभासदांच्या एकूण संख्येच्या ⅔ सदस्यांच्या विशेष बहुमताने ठराव केला जातो. हा ठराव मंजूर झाला तर त्याचा परिणाम राष्ट्रपतींवर महाभियोग लागू होऊन त्यांना पदमुक्त केले जाते तसेच त्यांचे सभागृहाचे सदस्यत्व रद्द होते.<br><br>५. महाभियोगाचा परिणाम म्हणून राष्ट्रपतीला पदावरून काढून टाकण्यात येते.<br><br>६. राष्ट्रपतींवर महाभियोगाचे प्रमुख कारण म्हणजे घटनेच्या कलम ५६ (१) b नुसार संविधानाचे उल्लंघन . | १. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह चा कोणताही सभासद राष्ट्राध्यक्षांवर महाभियोग ठराव मांडू शकतो. न्यायिक समिती ठरावाचे विश्लेषण करते. आणि ठराव साध्या बहुमताने पास करते<br><br>२. महाभियोगाच्या कलमांना सिद्ध होण्यासाठी साध्या बहुमताची आवश्यकता असते आणि असे कलम पारित झाल्यावर राष्ट्रपतींवर महाभियोग चालवला जातो.<br><br>३. तपासणीसाठी हा ठराव पुढील सभागृहाकडे पाठवला जातो. या तपासणीचे प्रमुख अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश करतात.<br><br>४. सभागृहांने मांडलेल्या खटल्यात कलम बहुमताने पास झाले तर राष्ट्रपती दोषी ठरतात आणि त्यांना कार्यालयातून काढून टाकण्यात येते.<br><br>५. महाभियोगचा परिणाम निष्कासनात नाही, परंतु आरोप म्हणून मानले जाते.<br><br>६. अमेरिकन राज्यघटनेच्या कलम २, कलम ४ नुसार देशद्रोह, लाचखोरी, उच्च गुन्हे आणि इतर गैरवर्तनांसाठी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांवर महाभियोग चालविला जाऊ शकतो. |

# राज्य विधिमंडळ

## अभ्यासक्रमाचा विषय – संसद आणि राज्य विधिमंडळ – रचना, कार्यपद्धती, कामकाज चालविणे, अधिकार आणि विशेषाधिकार आणि त्यातून उद्भवणार्या समस्या/मुद्दे.

**रचना –**

राज्य विधिमंडळांच्या रचनेत एकसूत्रता नाही. बहुतेक राज्यांमध्ये एकसदनी प्रणाली आहे, तर इतरांमध्ये द्विसदनी प्रणाली आहे. सध्या (२०१९), फक्त सहा राज्यांमध्ये दोन सभागृहे (द्विगृह) आहेत. आंध्र प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यात ही द्विसदन व्यवस्था आहे. जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ द्वारे जम्मू आणि काश्मीर विधान परिषद बरखास्त करण्यात आली.

बावीस राज्यांमध्ये एकसदनीय प्रणाली आहे. तेथे, राज्य विधिमंडळात राज्यपाल आणि विधानसभा यांचा समावेश असतो. द्विसदन प्रणाली असलेल्या राज्यांमध्ये, राज्य विधिमंडळात राज्यपाल, विधान परिषद आणि विधानसभा यांचा समावेश असतो.. विधान परिषद (विधान परिषद) हे वरचे सभागृह (द्वितीय सभागृह किंवा वरिष्ठ सभागृह) असते, तर विधानसभा (विधानसभा) हे कनिष्ठ सभागृह (प्रथम सभागृह किंवा जनतेचे सभागृह) असते.

**विधानसभा**

विधानसभेत सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारे थेट जनतेने निवडलेले प्रतिनिधी असतात. विधानसभांची कमाल सदस्यसंख्या ५०० आणि किमान सदस्यसंख्या ६० इतकी निश्चित केली गेली आहे. याचा अर्थ, राज्याच्या लोकसंख्येच्या आकारानुसार तिची सदस्यसंख्या ६० ते ५०० पर्यंत असू शकते. तथापि, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि गोव्याच्या बाबतीत, किमान सदस्यसंख्या ३० आणि मिझोराम आणि नागालँडच्या बाबतीत अनुक्रमे ४० आणि ४६ इतकी आहे. पुढे, सिक्कीम आणि नागालँडमधील विधानसभेचे काही सदस्य अप्रत्यक्षपणेही निवडले जातात.

**१. प्रादेशिक मतदारसंघ –**

प्रत्यक्ष मतदानाद्वारे विधानसभेच्या निवडणुका घेण्याच्या उद्देशाने, प्रत्येक राज्य प्रादेशिक मतदारसंघांमध्ये विभागले गेले आहे. या मतदारसंघांचे सीमांकन अशा पद्धतीने केले जाते की, प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या आणि त्यांना दिलेल्या जागांची संख्या यातील गुणोत्तर संपूर्ण राज्यात सारखेच असेल.

**२. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी जागांचे आरक्षण**

प्रत्येक राज्याच्या विधानसभेत लोकसंख्येच्या गुणोत्तराच्या आधारावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी जागांच्या आरक्षणाची तरतूद घटनेने केली आहे.

मुळात, हे आरक्षण दहा वर्षांसाठी (म्हणजे १९६० पर्यंत) करण्याची तरतूद केली होती; परंतु त्यानंतर हा कालावधी प्रत्येक वेळी १० वर्षांनी सातत्याने वाढवण्यात आला आहे. आता, २००९ च्या ९५ व्या दुरुस्ती कायद्यानुसार, हे आरक्षण 2020 पर्यंत टिकणार आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

## विधान परिषद

विधानसभेचे सदस्य प्रत्यक्षपणे निवडले जातात तर विधान परिषदेचे सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात. परिषदेची जास्तीत जास्त सदस्यसंख्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या एक तृतीयांश आणि किमान सदस्यसंख्या ४० इतकी निश्चित केली गेली आहे.

## निवडणूक प्रक्रिया –

१. १/३ सदस्य हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांद्वारे निवडले जातात जसे की नगरपालिका, जिल्हा मंडळे इ.,

२. १/१२ सदस्य हे किमान तीन वर्षे पदवीधारक आहेत अशा व्यक्तींनी बनलेल्या मतदारगणाद्वारे निवडले जातात आणि,

३. १/१२ सदस्य हे राज्यामध्ये वास्तव्यास असणार्या व किमान तीन वर्षे माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जाचे नाहीत अशा त्या राज्यातील शिक्षणसंस्थांमध्ये अध्यापन करणार्या शिक्षकांद्वारे निवडले जातात,

४. १/३ सदस्य हे राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांद्वारे विधानसभेचे सदस्य नसलेल्या व्यक्तींमधून निवडले जातात आणि

५. उरलेले सदस्य हे साहित्य, विज्ञान, कला, सहकारी चळवळ आणि समाजसेवेचे विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तींमधून राज्यपाल नामनिर्देशित करतात.

अशा प्रकारे, विधान परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी ५/६ सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात आणि १/६ राज्यपाल नामनिर्देशित करतात. सदस्य एकल हस्तांतरणीय मताद्वारे आनुपातिक प्रतिनिधित्व प्रणालीनुसार निवडले जातात.

कोणत्याही परिस्थितीत राज्यपालांच्या नामनिर्देशनाच्या प्रामाणिकपणाला किंवा योग्यतेला न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही.

राज्यसभेप्रमाणेच, विधानपरिषद हे कायम चालणारे सभागृह आहे, म्हणजेच ती एक कायमस्वरूपी संस्था आहे आणि तिचे विसर्जन होत नाही. परंतु, तिचे एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी मुदत संपल्यावर निवृत्त होतात. तर, कोणताही सदस्य सहा वर्षे सदस्यपदी राहतो. रिक्त झालेल्या जागा प्रत्येक तिसर्या वर्षाच्या सुरुवातीला नव्या निवडणुका आणि नामांकन (राज्यपालांद्वारे) भरल्या जातात. निवृत्त होणारे सदस्य कितीही वेळा पुन्हा निवडून येण्यासाठी आणि पुन्हा नामनिर्देशनासाठी पात्र आहेत.

## राज्य विधिमंडळातील कायदेनिर्मितीची कार्यपद्धती

### अ. सामान्य विधेयके मूळ सभागृहात विधेयक मांडणे

कोणतेही सामान्य विधेयक राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहात (द्विगृही विधिमंडळाच्या बाबतीत) मांडता येऊ शकते. असे विधेयक मंत्री किंवा इतर सदस्य मांडू शकतात. हे विधेयक मूळ सभागृहात (ज्यात ते प्रथम मांडले गेले असेल ते सभागृह ) तीन टप्प्यांतून जाते, उदा.–



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

१. प्रथम वाचन,

२. दुसरे वाचन, आणि

३. तिसरे वाचन.

मूळ सभागृहाने विधेयक मंजूर केल्यानंतर, ते दुसरया सभागृहात चर्चेसाठी आणि मंजूर करण्यासाठी पाठवले जाते. एखादे विधेयक राज्य विधानसभेने संमत केले आहे तेव्हा असे मानले जाते जेव्हा दोन्ही सभागृहांनी एकतर दुरुस्तीसह किंवा त्याशिवायत्यास संमती दिली असेल.

एकगृही विधिमंडळाच्या बाबतीत, विधानसभेने मंजूर केलेले विधेयक थेट राज्यपालांकडे त्यांच्या संमतीसाठी पाठवले जाते.

## २. दुसर्या सभागृहात विधेयक मांडणे

दुसऱ्या सभागृहातही हे विधेयक तीनही टप्प्यांतून जाते, म्हणजे पहिले वाचन, दुसरे वाचन आणि तिसरे वाचन.

३. जेव्हा विधानसभेत विधेयक मंजूर केले जाते आणि विधान परिषदेत पाठवले जाते, तेव्हा त्याच्याबाबत चार पर्याय असतात :

१. विधानसभेने ते विधेयक जसे पाठवले आहे त्याप्रमाणे ते मंजूर करू शकते (म्हणजे, दुरुस्ती न करता) ;

२. ते विधेयक दुरुस्त्यांसह पास करू शकते आणि पुनर्विचारासाठी विधानसभेकडे परत करू शकते ;

३. ते विधेयक पूर्णपणे नामंजूर करू शकते ; आणि

४. कोणतीही कारवाई न करता ते विधेयक प्रलंबित ठेवू शकते.

जर विधान परिषदेने एखादे विधेयक कोणत्याही दुरुस्त्या न करता मंजूर केले, किंवा जेव्हा विधानसभा विधान परिषदेने सुचविलेल्या दुरुस्त्या स्वीकारते, तेव्हा ते विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे असे मानले जाते आणि ते राज्यपालांकडे त्यांच्या संमतीसाठी पाठवले जाते. दुसरीकडे, जर विधानसभेने विधान परिषदेने सुचविलेल्या दुरुस्त्या नाकारल्या किंवा विधान परिषदेने एखादे विधेयक पूर्णपणे नाकारले किंवा विधान परिषदेने त्यावर तीन महिन्यांपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही, तर विधानसभा पुन्हा ते विधेयक मंजूर करून परिषदेकडे पाठवू शकते. जर कौन्सिलने विधेयक पुन्हा फेटाळले किंवा विधानसभेला मान्य नसलेल्या दुरुस्त्यांसह विधेयक मंजूर केले किंवा एक महिन्याच्या आत विधेयक मंजूर केले नाही, तर ते विधेयक दुसर्यांदा विधानसभेने ज्या स्वरूपात मंजूर केले होते त्या स्वरूपात दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे असे मानले जाते.

त्यामुळे सामान्य विधेयक मंजूर करण्याचा अंतिम अधिकार विधानसभेत असतो. विधान परिषद ही जास्तीत जास्त, चार महिन्यांच्या कालावधीसाठी एखादे विधेयक रोखू शकते किंवा मंजुरीस विलंब करू शकते – आधीच्या बाबतीत तीन महिने आणि दुसर्या बाबतीत एक महिना. विधेयकावर दोन्ही सभागृहांमधील मतभेद दूर करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीची व्यवस्था संविधानात नाही. दुसरीकडे, सामान्य विधेयकावरून दोघांमधील मतभेद दूर करण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभेची संयुक्त बैठक घेण्याची तरतूद आहे. शिवाय, जेव्हा एखादे विधेयके विधान परिषदेत आधी मांडले जाते आणि विधानसभेत पाठवले जाते, आणि जर विधानसभेने नाकारले, तर ते विधेयक रद्द होते आणि अस्तित्वहिन होते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

त्यामुळे केंद्रीय पातळीवरील राज्यसभेच्या तुलनेत विधान परिषदेला फारच कमी महत्त्व, स्थान आणि अधिकार देण्यात आले आहेत.

**राज्यपालांची संमती**

प्रत्येक विधेयक, विधानसभेने किंवा द्विसदनी विधिमंडळाच्या बाबतीत दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यानंतर, राज्यपालांकडे त्यांच्या संमतीसाठी पाठविले जाते. अशावेळी राज्यपालांसमोर चार पर्याय असतात :

१. ते विधेयकाला आपली संमती देऊ शकतात;

२. ते विधेयकाला आपली संमती रोखू शकतात;

३. ते सदनाच्या किंवा सदनांच्या पुनर्विचारासाठी विधेयक परत पाठवू शकतात; आणि

४. ते विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात.

राज्यपालांनी या विधेयकाला संमती दिल्यावर ते विधेयक कायदा बनते आणि आणि विधिपुस्तकात नोंदविले आहे. जर राज्यपालाने या विधेयकाला आपली संमती रोखली तर ते विधेयक संपते आणि कायदा बनत नाही. जर राज्यपालाने पुनर्विचारासाठी विधेयक परत केले आणि विधेयक सभागृहाने किंवा दोन्ही सभागृहांनी पुन्हा, दुरुस्तीसह किंवा त्याशिवाय मंजूर केले आणि राज्यपालांना त्याच्या संमतीसाठी सादर केले, तर राज्यपालाने विधेयकाला आपली संमती दिली पाहिजे. अशा प्रकारे, राज्यपालांना केवळ निलंबनाचा व्हेटो मिळतो. केंद्रीय स्तरावरही हीच स्थिती आहे.

**राष्ट्रपतींची संमती**

जेव्हा एखादे विधेयक राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवलेले असते, तेव्हा राष्ट्रपती एकतर विधेयकाला आपली संमती देऊ शकतात किंवा विधेयकाला आपली संमती रोखू शकतात किंवा राज्य विधिमंडळाच्या सभागृहाच्या/सभागृहांच्या पुनर्विचारासाठी विधेयक परत करू शकतात. जेव्हा एखादे विधेयक असे परत केले जाते, तेव्हा सहा महिन्यांच्या कालावधीत सभागृहाला/सभागृहांना त्याचा पुनर्विचार करावा लागतो. हे विधेयक सभागृहाने/सभागृहांनी दुरुस्तीसह किंवा त्याशिवाय मंजूर केल्यानंतर पुन्हा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी सादर केले जाते. अशा विधेयकाला राष्ट्रपतींनी संमती देणे बंधनकारक आहे की नाही, याचा घटनेत उल्लेख नाही.

**ब. धन विधेयके**

राज्य विधानसभेत धन विधेयके मंजूर करण्यासाठी राज्यघटनेने एक विशेष प्रक्रिया निर्धारित केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

१. धन विधेयक हे सर्वप्रथम विधान परिषदेत मांडता येत नाही. ते विधानसभेतच मांडले जाऊ शकते आणि तेही राज्यपालांच्या शिफारशीनुसार. असे प्रत्येक विधेयक हे सरकारी विधेयक मानले जाते आणि ते फक्त मंत्रीच मांडू शकतात.

२. विधानसभेने धन विधेयक मंजूर केल्यानंतर, ते विधान परिषदेकडे त्यांच्या विचारार्थ पाठवले जाते. विधान परिषदेचे धन विधेयकाबाबतचे अधिकार मर्यादित केले आहेत. ती धन विधेयक नाकारू शकत नाही किंवा त्यात सुधारणा करू शकत नाही. ती फक्त शिफारशी करू शकते आणि १४ दिवसांच्या आत हे विधेयक विधानसभेकडे परत करणे



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

बंधनकारक आहे. विधानपरिषदेच्या सर्व किंवा कोणत्याही शिफारशी विधानसभा एकतर स्वीकारू किंवा नाकारू शकते.

३. विधानसभेने कोणतीही शिफारस स्वीकारल्यास, हे विधेयक दोन्ही सभागृहांनी सुधारित स्वरूपात मंजूर केले आहे असे मानले जाते. विधानसभेने कोणतीही शिफारस स्वीकारली नाही, तर हे विधेयक कोणत्याही बदलाशिवाय विधानसभेने मंजूर केलेल्या मूळ स्वरूपात दोन्ही सभागृहांनी मंजूर केले, आहे असे मानले जाते.

४. विधानपरिषदेने १४ दिवसांच्या आत विधेयक विधानसभेकडे परत न केल्यास, विधानसभेने संमत केलेल्या मूळ स्वरूपामध्ये उक्त कालावधी संपल्यानंतर हे विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे, असे मानले जाते. अशा प्रकारे, धन विधेयकाबाबत विधानसभेला विधान परिषदेपेक्षा अधिक अधिकार आहेत. जास्तीत जास्त, विधान परिषद ही धन विधेयक जास्तीत जास्त १४ दिवसांच्या कालावधीसाठी रोखून ठेवू शकते किंवा विलंब करू शकते.

५. शेवटी, जेव्हा राज्यपालांना धन विधेयक सादर केले जाते, तेव्हा ते एकतर आपली संमती देऊ शकतात, आपली संमती रोखू शकतात किंवा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी विधेयक राखून ठेवू शकतात; परंतु राज्य विधानसभेच्या पुनर्विचारासाठी विधेयक परत करू शकत नाहीत. सामान्यतः, राज्यपाल हे त्यांच्या पूर्वपरवानगीने राज्य विधानसभेत सादर केल्यामुळे धन विधेयकाला संमती देतात.

जेव्हा एखादे धन विधेयक राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखून ठेवले जाते, तेव्हा राष्ट्रपती एकतर विधेयकाला आपली संमती देऊ शकतात किंवा विधेयकास आपली संमती रोखू शकतात; परंतु राज्य विधानसभेच्या पुनर्विचारासाठी विधेयक परत पाठवू शकत नाहीत.

**विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेचे स्थान –**

**अ. विधानसभेच्या समान स्थान–**

खालील बाबींमध्ये, परिषदेचे अधिकार आणि स्थिती सर्वसाधारणपणे विधानसभेच्या समान आहेत:

१. सामान्य विधेयक मांडणे आणि मंजूर करणे.

२. राज्यपालांनी जारी केलेल्या अध्यादेशांना मान्यता.

३. मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांची निवड.

४. राज्य वित्त आयोग, राज्य लोकसेवा आयोग आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यासारख्या घटनात्मक संस्थांच्या अहवालांवर विचारविमर्श करणे.

५. राज्य लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रात वाढ करणे.

**ब. विधानसभेच्या तुलनेत कनिष्ठ स्थान –**

१. धन विधेयकांच्या संदर्भात मर्यादित अधिकार.

२. सामान्य विधेयक मंजूर करण्याचा अंतिम अधिकार देखील विधानसभेकडे असतो. विधान परिषद ही जास्तीत जास्त चार महिन्यांच्या कालावधीसाठी विधेयक रोखून ठेवू शकते किंवा विलंब करू शकते – पहिल्या बाबतीत तीन महिने आणि दुसर्या बाबतीत एक महिना. दुसर्या शब्दांत, परिषद ही राज्यसभेसारखी 'सुधारणाकारी संस्था' (Reviring Body) नाही; ती फक्त एक विस्तारित कक्ष किंवा सल्लागार स्वरूपाची संस्था आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. विधान परिषद केवळ अर्थसंकल्पावर चर्चा करू शकते; परंतु अनुदानाच्या मागण्यांवर मतदान करू शकत नाही (जो विधानसभेचा विशेष विशेषाधिकार आहे).

४. विधान परिषद अविश्वास प्रस्ताव मंजूर करून मंत्रिपरिषदेस काढून टाकू शकत नाही; कारण मंत्रिपरिषद ही सामूहिकपणे केवळ विधानसभेला जबाबदार असते. परंतु, विधान परिषद ही सरकारच्या धोरणांवर आणि उपक्रमांवर चर्चा आणि टीका करू शकते.

**विधानपरिषदेच्या स्थापनेमागचा मुख्य उद्देश –**

द्विसदनीय विधिमंडळ असण्याचे फायदे सर्वज्ञात आहेत. हे वरिष्ठ सभागृह शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंतांसाठी, जे निवडणुकीच्या गुंतागुंतीच्या आणि गोंधळाच्या राजकारणासाठी योग्य नसतात, त्यांच्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करते. किमान कागदावर, हे सभागृह राज्य पारित करू शकणार्या कायद्याचे अधिक गांभीर्याने आणि विचारपूर्वक मूल्यांकन करण्यासाठी एक यंत्रणा उपलब्ध करते.

**विधान परिषदेच्या संदर्भातील मुद्दे/समस्या –**

१. देशात सध्या फक्त सहा राज्यांत विधान परिषदा अस्तित्वात आहेत, ही वस्तुस्थिती असे दर्शविते की या मुद्द्यावर व्यापक राजकीय सहमतीशिवाय कोणताही वास्तविक फायदा नाही.

२. विचारवंतांना विधिमंडळात आणण्याचे उदात्त उद्दिष्ट पूर्ण करण्याऐवजी, निवडून येऊ न शकलेल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना सामावून घेण्यासाठी या व्यासपीठाचा वापर केला जाण्याची शयता अधिक आहे.

३. योग्य प्रकारे वापर न केल्यास सरकारी तिजोरीवरही अनावश्यक ताण पडतो.

४. दुसरी समस्या अशी आहे की पदवीधर हा यापुढे दुर्मिळ घटक राहणार नाही; तसेच, घसरत्या शैक्षणिक दर्जाचा विचार करता, स्नातक पदवी ही कोणत्याही वास्तविक बौद्धिक वाढीची हमी नाही.

५. लहरी दृष्टिकोन – एखादा पक्ष सत्तेवर आल्यावर विधान परिषदेबाबत आग्रही असतो; परंतु पुढच्या वेळी जेव्हा दुसरा पक्ष सत्तेवर येतो तेव्हा तोच पक्ष विधान परिषद रद्द करण्याची शिफारस करतो.

**नवीन दृष्टिकोन –**

१. विधान परिषदांच्या स्थापनेबाबत राजकीय सहमतीने राष्ट्रीय धोरण विकसित करण्याची गरज आहे.

२. दुसर्या प्रशासकीय सुधारणा आयोगची शिफारस – राज्यसभेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रतिनिधी म्हणून विधान परिषदांची पुनर्रचना करावी.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

## अभ्यासक्रमातील विषय– लोकप्रतिनिधित्व अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये

गेल्या वर्षी परीक्षेत विचारल्या गेलेल्या प्रश्नांचा विचार करू.

| प्रश्न | कळीचा शब्द/मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| "There is a need for simplification of procedure for disqualification of persons found guilty of corrupt practices under the Representation of peoples Act" Comment (2020) 10 | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१मधील विद्यमान उणिवा | समकालीन चालू घडामोडी. |
| On what grounds a people's representative can be disqualified under the Representation of People Act, 1951? Also mention the remedies available to such person against his disqualification. (2019) 15 | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१मधील महत्त्वाच्या तरतुदी | समकालीन चालू घडामोडी |
| 'Simultaneous election to the Lok Sabha and the State Assemblies will limit the amount of time and money spent in electioneering but it will reduce the government's accountability to the people' Discuss. (2017) 10 | समांतर निवडणुका | समकालीन चालू घडामोडी |
| To enhance the quality of democracy in India the Election Commission of India has proposed electoral reforms in 2016. What are the suggested reforms and how far are they significant to make democracy successful? (2017) 15 | निवडणुकीय सुधारणा | समकालीन चालू घडामोडी |
| Discuss the procedures to decide the disputes arising out of the election of a Member of the Parliament or State Legislature under The Representation of the People Act, 1951. What are the grounds on which the election of any returned candidate may be declared void? What remedy is available to the aggrieved party against the decision ? Refer to the case laws. (2022) 15 | लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१मधील तरतुदी | समकालीन चालू घडामोडी |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

तर, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१अंतर्गत अपात्रतेचा निकष व निवडणुकीय सुधारणा या दोन पायाभूत विषयसूत्रांभोवती प्रश्न विचारले गेल्याचे दिसते.

संविधानातील पंधराव्या भागातील अनुच्छेद ३२४ ते ३२९ आपल्या देशातील निवडणुकीय व्यवस्थेशी संबंधित आहेत. संसदेत व राज्य विधिमंडळांमध्ये जाण्यासाठीच्या निवडणुकांशी निगडीत सर्व विषयांबाबत तरतुदी करण्याचा अधिकार संविधानाने संसदेला दिला आहे. या अधिकाराची अंमलबजावणी करत संसदेने 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०', 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१', व 'सीमांकन आयोग अधिनियम, २००२' हे कायदे केले.

**लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० –**

- लोकसभेतील जागांचे वाटप– पहिली सूची.
- लोकसभेतील व संसदीय मतदारसंघांमधील जागा भरणे– थेट निवडणूक
- विधानसभांमधील व विधानसभा मतदारसंघांमधील एकूण जागांची संख्या– दुसरी सूची.
- मतदारांची पात्रता.
- मतदारयाद्या तयार करणे– संसदीय, विधानसभा व विधानपरिषद मतदारसंघ.
- मतदारसंघांचे सीमांकन.
- सीमांकन आदेश अद्ययावत राखण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे.
- विधान परिषदांमधील जागांचे वाटप– तिसरी सूची.
- विधान परिषदेच्या मतदारसंघांचे सीमांकन.
- केंद्रशासित प्रदेशांना नेमून दिलेल्या राज्य परिषदेतील जागा भरण्यासाठी मतदारसंघ स्थापन करणे.

**लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१–**

- निवडणुका घेण्यासाठी पात्रता व अपात्रता.
- लोकसभा व राज्य विधानसभांसाठीच्या सार्वत्रिक निवडणुकांची अधिसूचना.
- निवडणुका घेण्यासाठीची प्रशासकीय यंत्रणा.
- निवडणूक अधिकारी, निर्वाचन निरीक्षक, महत्त्वाचे अधिकारी यांची भूमिका.
- नामांकनपत्रे दाखल करणे व निर्वाचन अधिकाऱ्याकडून छाननी.
- निवडणूकविषयक गुन्हे.
- निवडणूकविषयक वादावर उपाय.
- पोटनिवडणुका घेणे
- राजकीय पक्षांची नोंदणी.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

- व्यक्तिगत उमेदवारांच्या निवडणूकखर्चावरील मर्यादा.
- राजकीय पक्षांच्या निवडणूक दलालांचे नियमन करणे.
- मतदानासाठीची वेळ निश्चित करणे आणि आणीबाणीच्या प्रसंगी मतदान रद्द करणे.
- मते मोजणे व निकाल जाहीर करणे.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रण व व्हिव्हिपॅटची सुरक्षितता.

**लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ आणि अपात्रतेच्या तरतुदी–**

**१. कलम ८– विविध फौजदारी गुन्ह्यांसाठी अपात्रता**

- उमेदवार गुन्ह्यात दोषी आढळून त्याला पुढील शिक्षा झाली असल्यास तो अपात्र ठरवला जाईल–
- केवळ दंड– दोष सिद्ध झाल्यापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी.
- तुरुंगवास– दोष सिद्ध झाल्यापासून आणि सुटकेनंतरच्या सहा वर्षांसाठी ही अपात्रता सुरू राहील.

**२. कलम ८ए– भ्रष्ट आचरणाच्या कारणावरून अपात्रता**

- निवडणूक आयोगाच्या शिफारशीआधारे राष्ट्रपती या अपात्रतेचा निर्णय घेतील.
- अपात्रतेचा कालावधी सहा वर्षांहून अधिक होऊ शकत नाही.
- भ्रष्टाचाराचे आचरण– लाच, अयोग्य प्रभाव, जात, धर्म, इत्यादींच्या आधारे मतदानाचे आवाहन, मतदानकेंद्र ताब्यात घेणे, सतीसारख्या प्रथांचा प्रचार किंवा त्याचे गौरवीकरण, इत्यादी.

**३. कलम ९– भ्रष्टाचार किंवा निष्ठाभ्रष्टता यांमुळे अपात्रता**

- भारत सरकारमध्ये किंवा इतर कोणत्याही राज्याच्या सरकारमध्ये पद धारण केलेल्या व्यक्तीला भ्रष्टाचारामुळे किंवा निष्ठाभ्रष्टतेमुळे पदच्युत करण्यात आले, तर त्या व्यक्तीला पदच्युतीच्या दिवसापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी अपात्र ठरवले जाईल.

**४. कलम ९ए– शासकीय कंत्राटांमुळे अपात्रता**

- एखाद्या व्यक्तीने वस्तूंच्या पुरवठ्यासाठी किंवा शासनाने हाती घेतलेल्या कोणत्याही कामाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित शासनाशी व्यापार वा व्यवसाय करण्याबाबत कंत्राट केले असेल, तर ती व्यक्ती अपात्र ठरवली जाईल.

**५. कलम १०– शासकीय कंपनीतील पद धारण केल्यामुळे अपात्रता**

- एखादी व्यक्ती एखाद्या कंपनीची किंवा कॉर्पोरेशनची (सहकारी संस्थेचा अपवाद) व्यवस्थापकीय दलाल, व्यवस्थापक किंवा सचिव असेल; त्या कंपनीत किंवा कॉर्पोरेशनममध्ये योग्य शासनाचा किमान २५ टक्के वाटा असेल, तर ती व्यक्ती अपात्र ठरवली जाईल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**६. कलम १०– निवडणूकखर्चाचा हिशेब सादर करता न आल्यामुळे अपात्रता**

- निवडणूक आयोगाची पुढील बाबींमध्ये खात्री पटली तर ही अपात्रता होते–
- संबंधित व्यक्तीने ठरलेल्या वेळेत व ठरलेल्या पद्धतीने किंवा अधिनियमानुसार निवडणूकखर्चाचा हिशेब सादर केला नाही.
- हिशेब सादर न करण्याबाबत कोणतेही योग्य कारण वा समर्थन नसेल.
- अशा वेळी निवडणूक आयोग शासकीय राजपत्रामध्ये आदेश जाहीर करून संबंधित व्यक्तीला अपात्र ठरवेल आणि आदेशाच्या तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी अशी व्यक्ती अपात्र ठरेल.

७. कलम ११– एखाद्या व्यक्तीच्या अपात्रतेची कारण निवडणूक आयोग नमूद करू शकते किंवा तिच्या अपात्रतेचा कालावधी रद्द करू शकते वा कमी करू शकते. आयोगाने सिक्कीमचे मुख्यमंत्री पी. एस. तमांग यांच्याबाबतीत हा अधिकार वापरला आहे. त्यांनी भ्रष्टाचारासाठी एक वर्षाचा तुरुंगवास भोगला, त्यानंतर आयोगाने त्यांचा अपात्रता कालावधी कमी केला.

- लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलम ८(४) अनुसार, विधायकांना २०१३ सालापर्यंत तत्काळ अपात्रता टाळता येत होती. खासदार किंवा आमदार यांच्याबाबतीत तीन महिन्यांपर्यंत अपात्रता लागू होणार नाही. या कालावधीमध्ये दोषी विधिकाराने अर्ज दाखल केला किंवा सुधारणा अर्ज दाखल केला, तर आधीच्या याचिकेवर निर्णय होईपर्यंत अपात्रता लागू होणार नाही. निराळ्या शब्दांत सांगायचे तर, दोषी ठरवणाऱ्या निवाड्याविरोधात निव्वळ याचिका दाखल केली तरी अपात्रतेवर स्थगिती येते. 'लिली थॉमस विरुद्ध भारत सरकार' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हा खंड (४) असांविधानिक मानून रद्द केला, त्यामुळे विधिकारांना असणारे हे संरक्षण रद्द झाले.
- निवडणूक याचिका दाखल करणे

**१. निवडणूक याचिका कोण दाखल करू शकते?**

- राज्याच्या संबंधित मतदारसंघातील उमेदवार किंवा मतदार निवडणूक याचिका दाखल करू शकतो. या व्यक्तींव्यतिरिक्त इतर कोणालाही निवडणूक याचिका दाखल करत सर्वोच्च न्यायालयात जाता येत नाही. मतदार म्हणजे संबंधित निवडणूक याचिका ज्या निवडणुकीशी संबंधित असेल तिच्यात मतदान करण्याचा हक्क असलेली व्यक्ती. तिने अशा निवडणुकीत मतदान केले आहे अथवा नाही, हे गैरलागू असते. (प्रतिनिधित्व अधिनियमातील कलम ८१(१)).

**२. निवडणूक याचिका कधी दाखल करता येते?**

- राज्य विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर केल्यापासून ४५ दिवसांपर्यंत निवडणूक याचिका दाखल करता येते.

**३. निवडणूक याचिका कुठे दाखल करता येते?**

- निवडणूक याचिका संबंधित राज्यातील उच्च न्यायालयामध्ये दाखल करता येते (लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलम ८०अ)



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**४. निवडणूक याचिका कोणत्या कारणासाठी दाखल करता येते ?**

- निवडणूक याचिकेमागील कारणे अनेक प्रकारची असू शकतात. लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलम १२३मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार 'भ्रष्ट आचरण' केले जात असेल, तर त्याविरोधात याचिका करता येते. निवडणूक खर्च कमी दाखवणे, हासुद्धा भ्रष्टाचार आहे आणि त्याबाबतसुद्धा निवडणूक याचिका दाखल करता येते. एखाद्या उमेदवाराने स्वतःच्या निवडणूक खर्चाचा खोटा हिशेब दिला आहे, त्यातील खर्चाचे काही घटक कमी करून दाखवले आहेत, असे आढळले किंवा सिद्ध झाले, तर निवडणूक याचिका दाखल करता येते.
- लोकप्रतिनिधित्व अधिनियमाखाली भ्रष्टाचारात दोषी आढळलेल्या व्यक्तींच्या अपात्रतेसाठीची प्रक्रिया सोपी करण्याची गरज आहे.
- कलम १२३– भ्रष्टाचाराची व्याख्या.
- कलम ८अ– अपात्रतेची प्रक्रिया.

**सध्याची प्रक्रिया**

१. संबंधित उच्च न्यायालयामध्ये निवडणूक याचिका दाखल करणे.

२. याचिकेची सुनावणी.

३. उच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रपतींकडे किंवा लोकसभा/राज्यसभा/राज्य विधानसभा यांच्या सरचिटणीसांकडे पाठवणे.

४. राष्ट्रपतींनी हा निर्णय भारतीय निवडणूक आयोगाकडे पाठवणे.

५. भारतीय निवडणूक आयोग हा निर्णय राष्ट्रपतींकडे पाठवते. राष्ट्रपतींना सदर निर्णय स्वीकारणे बंधनकारक असते.

**सध्याच्या प्रक्रियेतील गुंतागुंत–**

१. उच्च न्यायालयातील प्रक्रिया क्लिष्ट आहे.

२. उच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रपतींकडे पाठवण्यात अवाजवी विलंब होतो.

३. निवडणूक झाल्यानंतरच याचिका दाखल करता येतात.

**प्रक्रिया सुलभ करणे–**

१. या खटल्यांची सुनावणी घेण्यासाठी उच्च न्यायालयाची विशेष खंडपीठे स्थापन करणे.

२. उच्च न्यायालयाचे निर्णय थेट भारतीय निवडणूक आयोगाकडे पाठवणे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण**

- राजकारणात गुन्हेगारांचा प्रवेश. राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्ह्यांचे राजकीयीकरण ही परस्परपूरक संबंधांनी चालणारी प्रक्रिया आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**महत्त्वाची आकडेवारी–**

**असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या संस्थेनुसार–**

१. सोळाव्या लोकसभेमधील ३४ टक्के खासदारांवर फौजदारी आरोप होते.

२. सतराव्या लोकसभेतील ४३ टक्के खासदारांवर फौजदारी आरोप आहेत.

यावरून राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढत असल्याचे सूचित होते.

**राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे परिणाम–**

१. कायद्यांची गुणवत्ता खालावते.

२. सनदी सेवकांचे मनोबळ व प्रेरणा खच्ची होतात.

३. लोकांचा शासनावरील विश्वास घटतो.

४. पैशाचा व बळाचा गैरवापर होतो.

५. राजकारणाची नकारात्मक प्रतिमा निर्माण होते.

**सर्वोच्च न्यायालयाचे आदेश–**

- प्रलंबित फौजदारी खटले असणाऱ्या उमेदवारांचा तपशील आणि असा खटला नसलेला उमेदवार का निवडला नाही याचा तपशील पक्षांनी प्रकाशित करावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. परंतु, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या अहवालानुसार सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आणि त्यानंतर निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचे पूर्णतः अनुसरण झालेले नाही.

**लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१–**

उमेदवारांनी त्यांची मालमत्ता व दायित्वे, शैक्षणिक पात्रता, फौजदारी गुन्हे, इत्यादींबाबतची माहिती द्यायची असते.

**आव्हाने–**

**१. खोटी प्रतिज्ञापत्रे**

- सध्या यासाठी केवळ सहा महिन्यांची शिक्षा आहे.
- ही शिक्षा दोन वर्षांपर्यंत वाढवण्याची गरज आहे.

**२. गुन्हेगारांच्या प्रवेशावर प्रतिबंध**

- गुन्हेगारी व्यक्तीची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर सहा वर्षांनी ती राजकारणात प्रवेश करू शकते.
- कायमस्वरूपी बंदीची गरज आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. लोकप्रतिनिधित्व अधिनियम विशिष्ट कारणांवरून विद्यमान विधिकाराला किंवा उमेदवाराला अपात्र ठरवत असली, तरी पक्षांतर्गत पदनियुक्तीवर नियमन ठेवणारी कोणतीही तरतूद त्यात नाही.

४. एखाद्या राजकारण्याला विधिकार असण्यापासून अपात्र ठरवले जाऊ शकते, पण तरी तो त्याच्या पक्षामध्ये उच्च पदांवर कायम राहू शकतो, आणि त्यामुळे कायद्याने त्याला सार्वजनिक भूमिका निभावण्यासाठी अपात्र मानलेले असूनही पक्षांतर्गत पदाद्वारे तो अशी भूमिका निभावत राहू शकतो.

- राजकारणातून गुन्हेगारी घटक संपवण्यासाठी राजकीय पक्षांचेही शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण भारतीय लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष ही मध्यवर्ती संस्था आहे.
- भारताचे माजी सरन्यायाधीश दीपक मिश्रा

**राजकीय पक्षांतर्गत लोकशाही**

- आपल्या देशातील राजकीय पक्षव्यवस्थेमध्ये सुधारणा केल्याशिवाय कोणतीही निवडणुकीय सुधारणा यशस्वी होऊ शकत नाही.
- संविधानाच्या कामकाजाचे परिशीलन करण्यासाठीचा राष्ट्रीय आयोग

**पक्षांतर्गत लोकशाहीचे महत्त्व–**

१. यातून पारदर्शकता वृद्धिंगत होईल.

२. असुरक्षित घटकांना अधिक प्रतिनिधित्व.

३. लोकशाही निर्णयप्रक्रियेमुळे उत्तरदायित्व सुधारेल.

४. यातून खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण होईल.

५. कमी गटबाजी.

६. यातून राजकारणाच्या वाढत्या गुन्हेगारीकरणाला आळा बसेल.

**पक्षांतर्गत लोकशाहीसमोरील आव्हाने–**

१. घराणेशाहीचे राजकारण.

२. भारतीय राज्यव्यवस्थेतील केंद्रीकरणाची प्रवृत्ती.

३. व्यक्तिपूजा.

४. कायद्याचा अभाव– कोणत्याही स्पष्ट कायदेशीर तरतुदी नाहीत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**पक्षांतर्गत लोकशाहीच्या शिफारशीचे स्त्रोत पुढीलप्रमाणे–**


१. विधी आयोगाचा १७०वा अहवाल.

२. दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग.

३. संविधानाच्या कामकाजाचे परिशीलन करण्यासाठीचा राष्ट्रीय आयोग.

**पुढील मार्गक्रमणा–**

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१मध्ये दुरुस्ती करून पक्षांतर्गत लोकशाहीच्या तरतुदीची भर घालावी. शिवाय, पक्षांतरबंदी कायद्यामध्येही दुरुस्ती करून भारतीय निवडणूक आयोगाला राजकीय पक्षांच्या वित्तीय पारदर्शकतेचे नियमन करण्याचे अधिकार द्यावेत.




**निवडणुकीय बंधपत्रांची योजना**

निवडणुकीय बंधपत्र हे वचनपत्रासारखे धारकाकडील साधन आहे– परिणामतः ते बँकेच्या चलनी नोटेसारखे असेल, त्यामुळे बंधपत्रधारकाला मागणीनुसार व्याजमुक्त रितीने ठराविक रक्कम मिळेल. भारताचा कोणताही नागरिक किंवा भारतात स्थापन झालेली कोणतीही संस्था हे बंधपत्र खरेदी करू शकेल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**वापर कसा करायचा ?**

बंधपत्रे १ हजार रुपये, १० हजार रुपये, १ लाख रुपये, १० लाख रुपये व १ कोटी रुपये या मूल्यांमध्ये दिली जातील, आणि भारतीय स्टेट बँकेच्या विशिष्ट शाखांमध्ये ती उपलब्ध असतील. केवायसीची पूर्तता केलेले खाते असणारा देणगीदार याची खरेदी करू शकेल. देणगीदाराला स्वतःच्या आवडीनुसार राजकीय पक्षाला बंधपत्रांचे दान करता येईल, आणि मग १५ दिवसांमध्ये पक्षाच्या पडताळणी झालेल्या खात्यातून बंधपत्रांमध्ये नमूद रक्कम रोख रूपात काढून घेता येईल.


SBI

भारतीय स्टेट बैंक STATE BANK OF INDIA

(भारतीय स्टेट बैंक अधिनियम, 1955 के तहत गठित/Constituted under the State Bank of India Act, 1955)
कॉर्पोरेट केन्द्र, स्टेट बैंक भवन, मादाम कामा रोड, नरीमन पॉइंट, मुंबई - 400021
Corporate Centre, State Bank Bhavan, Madame Cama Road, Nariman Point, Mumbai - 400021

इलेक्टोरल बॉण्ड/ELECTORAL BOND
(प्रोमेसरी नोट के स्वरूप में / IN THE FORM OF PROMISSORY NOTE)

जारी करने की तिथि / DATE OF ISSUE : 10 APR 2018
जारी करने की तिथि से 15 दिनों तक वैध / VALID UPTO 15 DAYS FROM THE DATE OF ISSUE
लिखत की राशि / VALUE OF THE INSTRUMENT : ₹ 1,000/- ( रुपये एक हजार मात्र / Rupees One Thousand only )

प्राप्त की गई राशि के लिए, बैंक एतद्द्वारा पात्र आदाता को जो इस लिखत का धारक है, मांग करने पर पात्र राजनीतिक पार्टी के नामित बैंक खाते में यह मूल लिखत जमा करने पर इस लिखत की राशि ₹ 1,000/- (रुपये एक हजार मात्र) का भुगतान करने का वचन देता है जो कि केन्द्र सरकार की गजट अधिसूचना क्रमांक 20 दिनांक 2 जनवरी 2018 द्वारा अधिसूचित इलेक्टोरल बॉण्ड स्कीम, 2018 के अनुसार है ।

उक्त राशि का भुगतान करने के उपरांत बैंक की देयता पूर्ण रूप से समाप्त हो जाएगी ।

For value received, the Bank hereby promises to pay on demand to the eligible Payee which is holding this instrument, upon surrender of the original instrument in the Designated Account of the eligible Political Party with the Bank, the sum representing the value of this instrument of ₹ 1,000/- (Rupees One Thousand only) in accordance with the Scheme called 'The Electoral Bond Scheme, 2018', notified by the Central Government vide Gazette Notification No. 20 dated the 2nd January, 2018.

On payment of the said amount, the liability of the Bank hereunder shall stand fully extinguished.

SAMPLE

स्थान / Place : NEW DELHI

प्राधिकृत हस्ताक्षरी
Authorized Signatory

**अटी–**

१. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ (४३) या कायद्यातील कलम २९–अ अनुसार नोंदणी झालेल्या आणि अगदी आदल्या लोकसभा वा राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये किमान एक टक्का मते मिळालेल्या प्रत्येक पक्षाला भारतीय निवडणूक आयोगाकडून पडताळणी झालेले खाते नेमून दिले जाईल. केवळ याच खात्याद्वारे निवडणुकीय बंधपत्रांचे व्यवहार करता येतील.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. केंद्र सरकारने विहीत केल्यानुसार प्रत्येक तिमाहीच्या आरंभी– म्हणजे जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर महिन्यांच्या– सुरुवातीच्या दहा दिवसांच्या कालावधीसाठी बंधपत्रे खरेदीसाठी उपलब्ध असतील. लोकसभा निवडणुकांच्या वर्षात केंद्र सरकारने ३० दिवसांचा वाढीव कालावधी यासाठी नेमून द्यावा.

३. निवडणुकीय बंधपत्रांवर देणगीदाराचे नाव नसेल. देणगीदाराचा व पक्षाचा तपशील बँकेकडे उपलब्ध असेल, पण संबंधित राजकीय पक्षाला देणगीदाराची माहिती असेलच असे नाही. पक्षाला दिल्या जाणाऱ्या सर्व देणग्यांचा हिशेब ताळेबंदामध्ये नोंदवला जावा, पण देणगीदाराचा तपशील सार्वजनिकरित्या उघड होऊ नये, हा यामागचा हेतू आहे.

४. राजकीय पक्षाला दिल्या जाणाऱ्या रोख देणग्यांची कमाल रक्कम २,००० रुपयांपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे आणि पक्षांना निवडणूक बंधपत्रांसोबतच चेकने वा डिजिटल मार्गाने देणग्या स्वीकारायची मुभा आहे.

५. देणग्या कर वजायोग्य असतील. देणगीदाराला वजावट मिळेल व देणगी स्वीकारणाऱ्याला किंवा राजकीय पक्षाला, परतावा भरल्यास, करसवलत मिळेल.

**निवडणूक बंधपत्रांशी संबंधित चिंता–**

१. ही योजना अंमलात आणण्यासाठी केंद्र सरकारने 'वित्त अधिनियम, २०१७' व 'वित्त अधिनियम २०१६' या दोन वित्त अधिनियमांमध्ये अनेक दुरुस्त्या केल्या. दोन्ही विधेयके मुद्रा विधेयके म्हणून मंजूर करण्यात आली (त्यामुळे राज्यसभेच्या नजरेखालून जाण्याची अट टाळणे शक्य झाले).

२. पारदर्शकतेवर परिणाम– सरकारने 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१'मधील कलम २९–इमध्ये दुरुस्ती केली, त्यामुळे राजकीय पक्षांना निवडणुकीय बंधपत्रांद्वारे मिळालेल्या देणग्यांचा तपशील निवडणूक आयोगाला कळवण्यातून सूट मिळाली.

३. निधीपुरवठ्यातील अपारदर्शकता वाढेल– कोणत्याही कंपन्यांना राजकीय देणग्यांचा तपशील त्यांच्या वार्षिक नफा–तोट्याच्या हिशेबात दाखवण्याची गरज उरणार नाही.

४. परदेशी कंपन्यांना भारतातील उपकंपन्यांद्वारे भारतीय राजकीय पक्षांना निधीपुरवठा करण्याच्या तरतुदीमुळे 'भारतीय राजकारण व लोकशाही आंतरराष्ट्रीय दबावगटांना स्वतःचे कार्यक्रमक रेटण्यासाठी खुले होईल.'

५. नागरिकांच्या जाणून घेण्याच्या मूलभूत अधिकारावर गदा आणणारी ही तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांमध्ये हा अधिकार अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा भाग मानला आहे.

६. निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे नजरेआड– या दुरुस्त्यांमुळे राजकीय पक्षांचा खर्च व देणगी या संदर्भातील खुलाशाबाबत आपण २०१४ साली दिलेली मार्गदर्शक तत्त्वे नजरेआड होत असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

७. बंधपत्रे प्रत्यक्ष रूपात किंवा धारककेंद्री साधन म्हणून दिल्याने पारदर्शकतेचा उद्देश साधला जाणार नाही, कारण ही बंधपत्रे हस्तांतरणीय आहेत, म्हणजे पक्षाला अंतिमतः कोणी देणगी दिली 'हे कळेलच असे नाही.'

**एकाच वेळी निवडणुका**

'एक राष्ट्र, एक निवडणूक' या कल्पनेमध्ये सर्व राज्यांच्या व लोकसभेच्याही निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. यासाठी भारतीय निवडणुकांच्या चक्राची पुनर्रचना करावी लागेल आणि राज्ये व केंद्र इथल्या निवडणुका परस्परांशी जुळवून घ्याव्या लागतील. तसेच मतदारांना एकाच दिवशी, एकाच वेळी (किंवा टप्प्याटप्प्याने) लोकसभेचे प्रतिनिधी आणि राज्य विधानसभांमध्ये पाठवायचे प्रतिनिधी निवडावे लागतील.

**पार्श्वभूमी–**

भारतामध्ये एकाच वेळी निवडणुका होण्याची घटना नवीन नाही. १९६७ सालापर्यंत तोच पायंडा होता. पण १९६८ व १९६९ या वर्षांमध्ये काही विधानसभा बरखास्त झाल्या आणि डिसेंबर १९७०मध्ये लोकसभाही बरखास्त झाली, त्यामुळे राज्य विधानसभांच्या व संसदेच्या निवडणुका वेगवेगळ्या घेतल्या जाऊ लागल्या.

**एकाचवेळी निवडणुका घेण्याची शिफारस पुढील संस्थांनी केली आहे–**

१. भारतीय निवडणूक आयोगाने १९८३ साली.

२. विधी आयोगाच्या १९९९च्या अहवालात.

३. नीती आयोगाने २०१७ साली.

**एकाच वेळी निवडणुका घेण्यातील फायदे–**

१. यातून सरकार व राजकीय पक्ष दोघांचाही खर्च कमी होईल.

२. लोकशाहीचा अविभाज्य भाग असणारे शासनव्यवहारातील सातत्य यातून राखले जाईल.

३. राजकीय पक्ष दीर्घकालीन कार्यक्रमावर काम करू शकतील.

४. भ्रष्टाचार व काळा पैसा कमी होईल.

५. सार्वजनिक जीवनात कमी अडथळा होईल.

६. सलोखा व शांतता (निवडणुकांवेळची सांप्रदायिक व द्वेषपूर्ण भाषणे).

७. आचारसंहिता कमी वेळा लादली जाईल– त्यामुळे विकासाच्या कामाला गती मिळेल.

**एकाच वेळी निवडणुका घेण्यातील तोटे–**

१. राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रश्न वेगवेगळे असतात, आणि एकाच वेळी निवडणुका घेतल्याने मतदारांच्या निवडबुद्धीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

२. दर पाच वर्षांनी एकदा निवडणुका घेतल्या जाणार असल्यामुळे सरकारचे लोकांप्रति असणारे उत्तरदायित्व कमी होईल. सतत होणाऱ्या निवडणुकांमुळे विधिकार सतत सतर्क राहतात व उत्तरदायित्व वाढते.

३. एखाद्या राज्यातील निवडणूक संयोजित टप्प्यापर्यंत लांबणीवर टाकली जाते तेव्हा मधल्या कालखंडात त्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल. हा लोकशाहीला व संघराज्यप्रणालीला तडाखा असेल.

४. या मुद्द्यावर राजकीय सर्वानुमतीचा अभाव आहे.

५. एकाच वेळी निवडणुका घेण्याची व्यवस्था आपण अंमलात आणली तर एखादं शासन खाली आणण्याचा विधिमंडळाचा अधिकार मर्यादित करावा लागेल. 'रचनात्मक अविश्वासाचा ठराव' अनिवार्य करावा लागेल. याचा अर्थ, कोणत्याही विरोधी पक्षाला स्वतःकडे तत्काळ नवीन सरकार स्थापन करण्याची क्षमता असेपर्यंत अविश्वासाचा ठराव मांडता येणार नाही.

### निवडणुकीय सुधारणा

### निवडणुकीय सुधारणांची गरज–

१. निवडणुकीय आणि वर्तनविषयक गतिमानतेमध्ये वेगाने बदल

२. निवडणुकीय सुधारणांमुळे सर्वसाधारणतः नागरिकांचा निवडणुकीय व्यवहारातील सहभाग वाढतो, तसेच भ्रष्टाचाराची भूमिका कमी होते आणि (भारतातील) लोकशाहीच्या कामकाजाला नव्याने ऊर्जा मिळते.

३. प्रचंड वैविध्य आणि धर्म, जात, भाषा, रूढी व धारणा, श्रीमंत–गरीब दरी, आणि भिन्न बोधात्मक आकलन, इत्यादी वैविध्याचे बरे–वाईट आविष्कार आढळणाऱ्या देशात ठराविक काळाने निवडणुकीय सुधारणा गरजेच्या ठरतात.

४. बदलती सामाजिक–आर्थिक गतिमानता.

५. राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण.

सुधारणा हा एका वेळचा प्रयत्न नसतो तर सततची प्रक्रिया असते. संसद्सदस्य व निवडणुकीय कायद्याचे तज्ज्ञ यांचा समावेश असणाऱ्या एखाद्या स्थायी समितीची स्थापना करून या प्रश्नाचा विचार झाला, तर ते योग्य ठरेल. या समितीने सरकारला निवडणुकीय कायद्यात आवश्यक ते बदल सुचवावेत.

### निवडणुकीय सुधारणांशी संबंधित समित्या–

१. तारकुंडे समिती– १९७४.

२. दिनेश गोस्वामी समिती– १९९०.

३. विधी आयोग (१७०वा अहवाल व २५५वा अहवाल).

### १९९६पूर्वीच्या निवडणुकीय सुधारणा

१. मतदानाचे वय कमी करणे– १९८८ साली करण्यात आलेल्या ६१व्या सांविधानिक दुरुस्ती अधिनियमाने लोकसभेसोबतच विधानसभांच्या निवडणुकांसाठीही मतदानाचे वय २१ वर्षांपूर्वी १८ वर्षांपर्यंत खाली आणले.

२. निवडणूक आयोगातील प्रतिनियुक्ती– निवडणुकांसाठी मतदारयाद्या तयार करणे, त्यांत सुधारणा करणे व दुरुस्ती करणे यांमध्ये गुंतलेल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती निवडणूक आयोगाने अशा कामाच्या कालावधीपुरती केल्याचे मानले जावे, अशी तरतूद १९८८मध्ये करण्यात आली.

३. प्रस्तावकांच्या संख्येत वाढ– राज्यसभेसाठी व राज्य विधानपरिषदांसाठी निवडणुकीच्या नामांकनपत्रांवर प्रस्तावक म्हणून सह्या करण्याची गरज असलेल्या विधिकारांची संख्या वाढवून संबंधित मतदारसंघांमधील मतदारांच्या १० टक्के किंवा १० मतदार यांपैकी कमी असेल तेवढी करण्यात आली.

४. इलेक्टॉनिक मतदान यंत्रे– निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापराला सुकरता मिळवून देण्यासाठीची तरतूद १९८९ साली करण्यात आली. पहिल्यांदा, १९९९ साली गोव्याच्या विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर झाला.

५. मतदानकेंद्रे ताब्यात घेणे– मतदानकेंद्र ताब्यात घेण्याची घटना घडल्यास तिथले मतदान स्थगित करावे किंवा निवडणुका पुन्हा घ्याव्यात, अशी तरतूद १९८९ साली करण्यात आली.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

६. मतदाराचे छायाचित्रांकित ओळखपत्र– निडवणुकांवेळी बनावट मतदान होऊ नये व ओळख बदलून मतदान केले जाऊ नये, यासाठी देशभरातील मतदारांना छायाचित्रांकित ओळखपत्र देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने १९९३ साली घेतला.

**१९९६ सालच्या निवडणुकीय सुधारणा–**

१. उमेदवारांची नावे यादीत नोंदवणे– निवडणुका लढवणाऱ्या उमेदवारांचे वर्गीकरण तीन प्रवर्गांनुसार केले जाते–

- मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार
- नोंदणीकृत असलेल्या पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांचे उमेदवार
- इतर (अपक्ष) उमेदवार

२. राष्ट्रीय सन्मानाचा अपमान केल्यामुळे अपात्रता अधिनियम– राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक अधिनियम, १९७१खाली गुन्हा केल्याबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तीला सहा वर्षांसाठी संसदेच्या व राज्य विधिमंडळाच्या निवडणुका लढवण्यापासून अपात्र ठरवले जाते.

३. मतदान संपण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळेआधीच्या ४८ तासांच्या कालावधीत दारूविक्रीला बंदी.

४. उमेदवाराचा मृत्यू– पूर्वी, निवडणुकीला उभ्या असणाऱ्या एखाद्या उमेदवाराचा प्रत्यक्ष मतदानाआधी मृत्यू झालास निवडणूक पुन्हा घेतली जात असे. अशा वेळी संबंधित मतदारसंघात निवडणुकीची प्रक्रिया पहिल्यापासून पार पडत असे. पण आता एखाद्या उमेदवाराचा प्रत्यक्ष मतदानापूर्वी मृत्यू झालाच निवडणूक थांबवली जात नाही. परंतु, मृत उमेदवार मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असेल तर संबंधित पक्षाला सात दिवसांच्या आत दुसरा उमेदवार उभा करायचा पर्याय दिला जातो.

५. पोटनिवडणुकांसाठी कालमर्यादा– आता संसदेच्या कोणत्याही सभागृहामध्ये किंवा राज्य विधिमंडळामध्ये जागा रिकामी झाल्यास सहा महिन्यांच्या कालावधीत पोटनिवडणुका घेतल्या जातात.

६. मतदानाच्या वेळी कर्मचाऱ्यांना सुट्टी– कोणत्याही व्यापारामध्ये, व्यवसायामध्ये, उद्योगामध्ये किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कामाला असणाऱ्या नोंदणीकृत मतदारांना मतदानाच्या दिवशी पगारी सुट्टी मिळण्याचा हक्क असतो.

७. एकाच वेळी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत किंवा पोटनिवडणुकीत कोणत्याही उमेदवाराला दोनहून अधिक लोकसभा किंवा विधानसभा मतदारसंघांमधून निवडणूक लढवता येत नाही. राज्यसभेसाठी व राज्य विधानपरिषदांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक व पोटनिवडणुकींवरही असेच निर्बंध लादले आहेत.

**१९९६नंतरच्या निवडणुकीय सुधारणा–**

१. निवडणुकीच्या कामासाठी कर्मचारीवर्गाची मागणी– १९९८ साली करण्यात आलेल्या तरतुदीनुसार स्थानिक प्रशासन, राष्ट्रीय बँका, विद्यापीठे, एलआयसी, सरकारी कंपन्या व इतर सरकारी अर्थसहाय्यावर चालणाऱ्या संस्था यांच्या कर्मचारीवर्गाची निवडणुकीय कामासाठी करता येते.

२. टपालाद्वारे मतदान– विशिष्ट वर्गातील व्यक्तींना टपालाद्वारे मतदान करायची परवानगी देणारी तरतूद १९९९ साली करण्यात आली. निवडणूक आयोग सरकारशी सल्लामसलत करून विशिष्ट वर्गातील व्यक्तींना अधिसूचना देऊ



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

शकतो, आणि अशा अधिसूचित वर्गातील व्यक्तींना टपालाद्वारे स्वतःचे मत देता येते; त्यांना स्वतःच्या मतदारसंघातील निवडणुकांमध्ये दुसऱ्या कोणत्या रितीने मतदान करता येत नाही.

३. प्रतिनिधीद्वारे मतदानाचा पर्याय निवडण्याची सुविधा– सेनादांमधील आणि सैन्य अधिनियमातील तरतुदी लागू होत असलेल्या कोणत्याही दलातील सदस्यांना प्रतिनिधीद्वारे मतदान करण्याची सुविधा देणारी तरतूद २००३ साली करण्यात आली.

४. उमेदवारांनी गुन्हेगारी पूर्वकृती, संपत्ती, इत्यादींची घोषणा करावी.

५. राज्यसभा निवडणुकांमध्ये बदल

- राज्यसभेची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या रहिवासाबद्दलची किंवा निवासाबद्दलची अट काढून टाकण्यात आली.
- राज्यसभेच्या निवडणुकांसाठी गोपनीय मतदानव्यवस्थेऐवजी खुली मतदानव्यवस्था लागू करणे.

६. लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना सरकारने मतदारयाद्यांच्या प्रती व इतर विहित सामग्री मोफत पुरवायला हव्यात.

७. इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील कालावधी नेमून देणे– २००३मधील तरतुदीनुसार निवडणूक आयोगाने निवडणुकांवेळी कोणत्याही विषयाबाबत प्रचार करण्यासाठी किंवा जनतेला संबोधित करण्यासाठी उमेदवारांना केबल टेलिव्हिजन नेटवर्कवरील व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील वेळ समान रितीने नेमून द्यायला हवी.

८. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये ब्रेल खुणांचा समावेश.

**२०१६ सालच्या प्रस्तावित सुधारणा–**

१. भारतीय निवडणूक आयोगाच्या सर्व सदस्यांना सांविधानिक संरक्षण.

२. भारतीय निवडणूक आयोगाच्या अर्थसंकल्पात वाढ.

३. आयोगासाठी स्वतंत्र सचिवालय.

४. लोकसभा, राज्य विधिमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यासाठी सामायिक मतदारयाद्या.

५. निवडणूक आयोगाने कलम १२५–अ अंतर्गत (खोटे प्रतिज्ञापत्र) शिक्षा दोन वर्षांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

६. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१मधील कलम १५९मध्ये दुरुस्ती करून मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांव्यतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनाही निवडणूककामासाठी कर्मचारी मागण्याचे अधिकार देण्यात आले.

७. एखाद्या व्यक्तीविरोधात दखलपात्र गुन्हा नोंदवला गेला असेल, आणि सक्षम न्यायालयाने आरोप निश्चित केल्यानंतर किमान पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होण्यासारखा गुन्हा असेल, आणि संबंधित खटला निवडणुकीच्या किमान सहा महिने सुरू झाला असेल, तर अशा व्यक्तींना निवडणूक लढवण्यापासून प्रतिबंध केला जाईल.

८. निवडणुकांमधील लाचखोरी हा दंडनीय गुन्हा करणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

९. भारतीय निवडणूक आयोगाला एखाद्या राजकीय पक्षाची नोंदी रद्द करण्याचे अधिकार दिले जावेत आणि राजकीय पक्षांची नोंदणी करणे व नोंदणी काढणे यांबाबतचे आवश्यक आदेश देण्याचे अधिकार आयोगाकडे असावेत.

१०.दोन हजार रुपये किंवा त्याहून अधिक निनावी देणगी स्वीकारण्याला प्रतिबंध असावा.

**सीमांकन अधिनियम**

**सीमांकन म्हणजे काय?**

- सीमांकन म्हणजे लोकसभा किंवा विधानसभा मतदारसंघांच्या सीमांचे पुन्हा आरेखन करण्याची प्रक्रिया, असे भारतीय निवडणूक आयोगाने नमूद केले आहे. ही प्रक्रिया संबंधित राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या लोकसांख्यिकी स्थानातील बदलांनुसार ही प्रक्रिया पार पाडली जाते. सीमांकन आयोग किंवा सीमा आयोगाकडून ही प्रक्रिया अंमलात आणली जाते. या स्वतंत्र संस्थेच्या आदेशांना कोणत्याही न्यायालयात प्रश्नांकित करता येत नाही. गतकाळात सीमांकन आयोगांची स्थापना १९५२, १९६३, १९७३ व २००२ या वर्षी करण्यात आली होती.
- भारतीय संविधानातील अनुच्छेद ८२ व १७० यांमध्ये प्रत्येक राज्याचे राज्यक्षेत्रीय मतदारसंघांमध्ये (संसदीय मतदारसंघ व विधानसभा मतदारसंघ) २००१च्या जनगणनेनुसार विभाजन करण्याची व त्यात पुनर्रचना करण्याची तरतूद आहे. संसदेला कायद्याने ठरवलेल्या अधिसंस्थेद्वारे व त्या संदर्भात ठरलेल्या रितीने ही प्रक्रिया पार पडते.
- ८४वी सांविधानिक दुरुस्ती अधिनियम– २०२६ सालानंतरची पहिली जनगणना होईपर्यंत किंवा किमान २०३१ सालापर्यंत मतदारसंघांच्या सीमा गोठवण्यात आल्या. सध्याच्या लोकसभेमधील जागावाटपासाठी १९७१ सालची जनगणना पायभूत मानण्यात आली आहे.
- ८७वी सांविधानिक दुरुस्ती अधिनियम– संविधान (८७वी दुरुस्ती) अधिनियम, २००३ अनुसार २००१ सालच्या जनगणनेतील लोकसंख्येच्या आकडेवारीआधारे राज्यांमधील राज्यक्षेत्रीय मतदारसंघांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्याची तरतूद करण्यात आली. २००१ सालच्या ८४वी संविधानदुरुस्ती अधिनियमामध्ये १९९१ची जनगणना आधारभूत मानण्यात आली होती.

**रचना–**

**केंद्र सरकारने सीमांकन आयोगामध्ये पुढीलप्रमाणे तीन सदस्य नेमावेत–**

१. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश असलेली किंवा राहिलेली व्यक्ती केंद्र सरकारने या आयोगाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करावी.

२. मुख्य निवडणूक आयुक्त किंवा मुख्य निवडणूक आयुक्तांनी नेमलेले निवडणूक आयुक्त– पदसिद्ध सदस्य.

३. संबंधित राज्याचे राज्य निवडणूक आयुक्त– पदसिद्ध सदस्य.

- या आयोगाने स्वतःची कार्यपद्धती ठरवावी, आणि स्वतःची कार्ये पार पाडत असताना नागरी कार्यपद्धती संहितेअंतर्गत दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार या आयोगाला असतील.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**सीमांकन आयोगाची भूमिका**

- 'एक मत एक मूल्य' हे आदर्श तत्त्व साध्य करण्यासाठी प्रतिनिधित्वामध्ये समतोल आणणे.
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासह असुरक्षित घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल याची खातरजमा करणे.
- विभिन्न समुदायांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी भौगोलिक प्रदेशांचे न्याय्य विभाजन करणे.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमाचा विषय – दबाव गट आणि औपचारिक/अनौपचारिक संघटना आणि त्यांची राजकीय भूमिका.

वरील विषयावर णझङ्ठ–केंद्रीय लोकसेवा आयोगाने मागच्या वर्षी विचारलेले प्रश्न पाहू.

| Question | कळीचे शब्द / मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| "Pressure groups play a vital role in influencing public policy making in India." Explain how the business associations contribute to public policies. (2021) 10 | धोरण निर्मितीवर दबाव गटांचा प्रभाव. | समकालीन/सध्याच्या चालू घडामोडी. |
| What are the methods used by the Farmers organizations to influence the policy-makers in India and how effective are these methods? (2019) 10 | दबाव गटांच्या विविध पद्धती. | समकालीन/सध्याच्या चालू घडामोडी. |
| How do pressure groups influence the Indian political process? Do you agree with this view that informal pressure groups have emerged as powerful as formal pressure | अनौपचारिक दबाव गट आणि अनौपचारिक दबाव गट. | समकालीन/सध्याच्या चालू घडामोडी. |

| | | |
|---|---|---|
| groups in recent years? (2017) 10 | | |
| Pressure group politics is sometimes seen as the informal face of politics. With regards to the above, assess the structure and functioning of pressure groups in India. (2013) 10 | दबाव गटांच्या कार्याचे विश्लेषण. | समकालीन/सध्याच्या चालू घडामोडी. |

Upsc च्या गेल्या वर्षीच्या प्रश्नांमध्ये दोन आयाम फोकसमध्ये असल्याचे आपण पाहू शकतो. दबाव गटांचा प्रभाव आणि त्यांच्या कार्य पद्धतीचे विश्लेषण.

**दबाव गट –**

या अशा संघटनांचे प्रकार आहेत जे देशाच्या राजकीय किंवा प्रशासकीय व्यवस्थेवर दबाव आणतात आणि त्यातून फायदे मिळवतात आणि स्वतःचे हितसंबंध वाढवतात.

**दबाव गटांचे प्रकार–**

**ते ज्या विचारक्षेत्रामध्ये सक्रिय आहेत त्यावर आधारित विविध प्रकारचे दबाव गट आहेत.**

१. जात गट – मराठा क्रांती मोर्चा, हरिजन सेवक संघ.

२. आदिवासी गट – नागालँडची राष्ट्रीय समाजवादी परिषद

३. भाषिक गट – तमिळ संघ, मराठी साहित्य परिषद.

४. कृषी गट – संयुक्त किसान मोर्चा, शेतकरी कामगार संघटना.

५. कामगार संघटना – राष्ट्रीय मजदूर संघ, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस–AITUC.

६. व्यवसाय –भारतीय वाणिज्य एवं उद्योग महासंघ–FICCI, दलित इंडियन चेंबर् ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री –DICCI.

७. विद्यार्थी संघटना – ABVP–अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युवा सेना, NIUS.

८. धार्मिक गट – जमात–ए–इस्लामी, विश्व हिंदू परिषद.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**दबाव गटांची वैशिष्ट्ये –**

१. काही विशिष्ट हितसंबंधांवर आधारित – प्रत्येक दबाव गट विशिष्ट हितसंबंध लक्षात घेऊन स्वत: ला संघटित करतो आणि अशा प्रकारे राजकीय प्रणालींमध्ये सत्तेची रचना स्वीकारण्याचा प्रयत्न करतो.

२. वाढत्या मागणीचे परिणाम आणि संसाधनांवर दबाव.

३. राजकीय पक्षांच्या कमतरतेला/अपुरेपणाला पर्याय.

४. बदलत्या चेतनेचे प्रतिनिधित्व करा – दबाव गट बदलत्या चेतनेचे लक्षण आहेत. वेगवेगळ्या गटांची चेतना बदलत राहते परिणामी (i) भौतिक परिस्थिती बदलते ; आणि (ii) वाढते राजकारणीकरण.

५. आधुनिक तसेच पारंपारिक साधनांचा वापर.

**दबाव गट आणि राजकीय पक्ष यांच्यातील फरक –**

| दबाव गट | राजकीय पक्ष |
|---|---|
| १ निवडणूक लढवू नका.<br>२ अप्रत्यक्षपणे शक्ती नियंत्रित करते.<br>३ दबाव गट लोकांसाठी जबाबदार नाहीत.<br>४ निसर्गात अनौपचारिक.<br>५ सदस्यत्वाचे निकष अत्यल्प आणि मर्यादित आहेत. | १ निवडणूक लढवा.<br>२ राजकीय पक्ष थेट सत्तेवर नियंत्रण ठेवतात.<br>३ जनतेला उत्तरदायी.<br>४ निसर्गता औपचारिक.<br>५ सदस्यत्व व्यापक आधारित आहे. |

**दबाव गट आणि स्वारस्य गट यांच्यातील फरक –**

स्वारस्य गट आणि दबाव गट यांच्यात फरक करणे महत्त्वाचे आहे. सरकार किंवा निर्णय घेणाऱ्यांवर दबाव न आणताही हितसंबंध अस्तित्वात असू शकतात. जो गट इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकार्यांवर प्रभाव पाडण्यासाठी किंवा दबाव आणण्यासाठी दबाव आणत नाही, त्याला दबावगट असे म्हटले जात नाही. हितसंबंध जो सरकारवर आपले ध्येय साध्य करण्यासाठी दबाव आणतो त्याला दबाव गट म्हणतात. सर्व दबाव गट हे स्वारस्य गट आहेत तर सर्व स्वारस्य गट दबाव गट असू शकत नाहीत. दोन गटांमधील खालील फरक लक्षणीय आहेत:


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| Interest Group | Pressure Group |
|---|---|
| Formally organized | Strictly structured |
| Interest-oriented | Pressure-focused |
| May or may not influence the policies of the government | Must influence the policies of the government |
| Softer in outlook | Harsher in attitude |
| More or less protective | Protective and promotive |

| स्वारस्य गट | दबाव गट |
|---|---|
| औपचारिक रित्या आयोजन | काटेकोर रचना |
| स्वारस्य पूर्ण | दबाव केंद्रित |
| सरकारच्या धोरणांवर प्रभाव | सरकारी धोरणांवर प्रभाव |
| पडू शकतो किंवा नसू शकतो | टाकला पाहिजे |
| सौम्य दृष्टिकोन | कठोर वृत्ती |
| कमी अधिक संरक्षणात्मक | संरक्षणात्मक आणि प्रोत्साहनात्मक |

**दबाव गटांची भूमिका आणि कार्ये –**

१. धोरण तयार करण्यात सरकारला मदत करणे – उदा. पुणे आंतरराष्ट्रीय केंद्राने पुणे शहरासाठी ग्रीन हायड्रोजन धोरण विकसित केले आहे.

२. लोकशिक्षण – असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स निवडणूक सुधारणांसंदर्भात वेबिनार आयोजित करते.

३. सरकारवर दबाव – मराठा क्रांती मोर्चा मराठा समाजाला आरक्षणासाठी सरकारवर दबाव आणत आहे.

४. एका कारणासाठी जनतेला एकत्र करणे.

५. राजकीय पक्षांवर दबाव आणणे – संयुक्त किसान मोर्चा किमान आधारभूत किंमत (MSP) कायदेशीर करण्यासाठी सत्ताधारी पक्षांवर दबाव आणत आहे.

६. योग्य धोरणात्मक निर्णयांसाठी सरकारकडे लॉबिंग – उदा. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर् ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज FICCI

**दबाव गट सार्वजनिक मतांवर प्रभाव टाकण्याचे मार्ग –**

१. प्रचार – रस्त्यावरील मोर्चे, रॅली.

२. सोशल मीडिया – त्यांच्या मतांचे Spamming.

३. याचिकेवर स्वाक्षरी.

४. व्यावसायिक लॉबिंग.

५. सशुल्क मीडिया हाऊसद्वारे प्रचार करणे.

६. बंद आणि हरताळ.

७. निवडणुकांवर प्रभाव टाकणे.

८. विधिमंडळ समित्यांना निवेदन सादर करणे,

**दबाव गटांनी वापरलेली तंत्रे –**

१. निवडणूक प्रचार – दबावगटासाठी अनुकूल असलेल्या व्यक्तीला सार्वजनिक कार्यालयात बसवणे.

२. प्रचार – दबावगटाच्या दृष्टिकोनाच्या समर्थनार्थ रॅली किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे जनमतावर प्रभाव टाकणे (यामुळे सरकारवर आंशिक अप्रत्यक्ष नियंत्रण होते)

३. लॉबिंग – विविध माध्यमांद्वारे सार्वजनिक अधिकाऱ्यांचे मन वळवणे. FICCI कर सुधारणांसाठी लॉबिंग करत आहे, अमेरिकन खासदार भारताला CAATSA मंजूरीतून सूट देण्यासाठी लॉबिंग करत आहेत.

**दबाव गटांशी संबंधित समस्या आणि आव्हाने –**

१. अस्थिरता – बहुतेक दबाव गट स्वभावाने स्थिर नसतात आणि त्यांची निष्ठा राजकीय परिस्थितीनुसार बदलते.

२. संकुचित हितसंबंध – भारतात, दबावगट बहुधा जात, प्रादेशिकता इत्यादी संकुचित हितसंबंधांवर आधारित असतात. यामुळे कधी कधी राष्ट्रीय हित बाधित होते.

३. जनतेला जबाबदारीचा अभाव.

४. अनेकदा असे दिसून आले आहे की दबाव गटांच्या संरचनेत लोकशाही संघटनात्मक रचनेचा अभाव आहे.

५. काहीवेळा, मत जनतेचे नसते तर दबावगटांच्या काही नेत्यांचे असते.

६. अतिरेकी प्रचार –१९६७ मध्ये बंगालची नक्षल चळवळ.

***

# PRAYAAS - Daily Answer Writing (UPSC)

## FREE ANSWER WRITING INITIATIVE




- Open to all Sincere aspirants.
- Monday to Friday Daily Answer Writing Practice.
- Detailed Individual and Group Feedback.
- Model Answer will be provided both in English and Marathi on Daily Basis.
- Available both in Marathi and English.
- Planned Syllabus Coverage.
- Immediate evaluation within 24 hours.
- Exam oriented Evaluation and Feedback.
- Personal counselling regarding Answer Writing through expert faculty.

Scan the QR code to join us on YouTube and telegram

Address :
Ramashree, CTS No, 279, NC Kelkar Road, Narayan Peth Pune.